पुणें भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७५

संभाजीकालीन पत्रसारसंग्रह

(श. १६०२-श. १६१०)

संपादक

शंकर नारायण जोशी

भा. इ. सं. मं. पुणें

प्रकाशक—चिटणीस भा. इ. सं. मं. पुणें २

[इ. १९४९

किंमत तीन रुपये

मंडळाचें प्रकाशन

भारत इतिहास संशोधक-मंडळ-स्वीय ग्रंथमाला

* ह्या खुणेचे ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठी मंजूर केले आहेत. × हें पुस्तक शैक्षणिक (Training) संस्था व शिक्षक-ग्रंथालयें यांसाठी मंजूर झालें आहे. त्रैमासिकाच्या फुटकळ अंकास रु. १॥

*मंडळ त्रैमासिक प्रत्येक पुस्तक रु. ५
१ अहवाल (शक १८३२) रु. ३
२ ,, (शक १८३३) रु. ५
३ सुबंत विचार (कै. वि. का. राजवाडे) १०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै. वि. का. राजवाडे) रु. १
*६ प्रथम संमेलन वृत्त (शक १८३५)८। ३
*७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६
*८ द्वितीय संमेलन वृत्त (श. १८३६) ३
*९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३
*११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६
*१२ तृतीय संमेलन वृत्त (शक १८३७) ३
*१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ८८
*१४ ग्रंथराज दासोपंत ८८
*१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला ८१२
*१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा ८१२
*१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३
१८ चतुर्थ संमेलन वृत्त (शक १८३८) ३
*१९ राजवाडे-खंड-स्थलसूची ४
*२० पंचम संमेलन वृत्त (शक १८३९) ३
२२ चंद्रचूड दप्तर-कला १ ३
२३ महाराष्ट्र-सारस्वत आ. १ ली. १०
२४ षष्ठ संमेलन-वृत्त (१८४०) ४
२५ सप्तम संमेलन वृत्त (श. १८४१) ३
२६ संशोधकाची छोटी जंत्री ८४
२७ प्रदर्शन-परिचय ८४
*२८ फासी पत्र व्यवहार ५
२९ फार्सी-मराठी कोश (कै. प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन) ४
३० शिवचरित्रसाहित्यखंड १ ला १८८
३१ Historical Miscellany १
३२ पुरंदरे दप्तर भाग १ ४
३३ शिवचरित्रसाहित्य खंड २ रा ४
३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ला.
३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १ २
३६ राजाराम-चरितम् (मूळ संस्कृत वा. सी. बेंद्रे) १८८
३७ मंडळांतील नाणीं
३८ शिवचरित्रसाहित्य खंड ४ १८८
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही रु. ४
×४० ऐतिहासिक फारसी साहित्य रु.१८८
×४१ दक्षिणच्या मध्य. इति. सा ख. २
×४२ ऐतिहासिक संकीर्ण सा. ख.२ २८८
४३ मंडळ चित्र ग्रंथ-चित्रें २० ८९
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं.३ २८८
×४५ विजयनगर स्मारकग्रंथ ४
×४६ ऐतिहासिक फारसी सा. खंड २ १८८
४७ शिवचरित्रसाहित्य ख. ६ १८८
×४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (कै. श. पु. जोशी) ८१२
४९ शिवचरित्र वृत्तसंग्रह (कानडी) १
५० शिवचरित्रसाहित्य खंड ७ १८८
×५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य ३.१८८
५२ शिवचरित्र-वृत्तसंग्रह खंड २ व ३
×५३ फार्सी विभाग, प्रत्येकी १८४
५४ पुणें नगर संशोधन-वृत्त खंड १.१

Poona Bharat-itihas-samsodhak-granthmala No. 75

पुणें भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७५

Sambhajikalin patrasarsamgraha

संभाजीकालीन पत्रसारसंग्रह

(1602-1610)

(श. १६०२-श. १६१०)

संपादक edited by

शंकर नारायण जोशी Shankar Narayan Joshi

भा. इ. सं. मं. पुणें

प्रकाशक—चिटणीस भा. इ. सं. मं. पुणें २

Chitnis, Poona

श. १८७१] [इ. १९४९

किंमत तीन रुपये

अनुक्रमणिका

प्रस्तुत अंकाविषयीं थोडेसे

भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाचा हा जोड अंक प्रसिद्ध होण्यास आमच्या अपेक्षेपेक्षां विलंब झाला ह्याबद्दल क्षमस्व ! युद्धकालीन परिस्थिति निवळल्यानंतर त्रैमासिक वेळच्या वेळीं वाचकांचे हाती जावे अशी योजना व संकल्प होता. त्याप्रमाणें गेल्या दोन वर्षांतले बहुतेक सर्व अंक बाहेर पडलेहि !

त्रैमासिकाच्या मागच्या अंकाची छपाई सुरु असतांनाच, मंडळांतील आजीव सेवकांपैकीं कोणाचे तरी एखादे पुस्तक प्रसिद्ध व्हावे ह्या हेतूनें, दुसऱ्या सभासदांकडून आलेला मजकूर बाजूला ठेऊन मंडळाचे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. शं. ना. जोशी ह्यांना विनंति केली थोडासा आग्रही- पणा धरून त्यांच्याकडून हे काम करवून घ्यावे लागले.

झालेल्या विलंबाचा थोडासा फायदा घेऊन गेली बारा वर्षे अधून मधून क्रमशः प्रसिद्ध होणारे " दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधनें, खण्ड तिसरा " हे प्रकरणही प्राध्यापक वा. वि. मिराशी ह्यांचा नगरधन ताम्रपटावरील लेख मुद्रित करून पुरें केले आहे.

संभाजीकालीन शकावली, पत्रसारसंग्रह, विस्तृत सूची, तसेच मध्ययुगीन साधनांची परिपूर्ति ह्या सर्वांच्या मुळें सुमारें २०० पृष्ठांचा हा जोड अंक स्वागतार्ह वाटेल यांत शंका नाहीं.

ह्या अंकातच पुरवणी दाखल पुण्यास भरलेल्या साहित्य संमेलनाचे वेळीं प्राचीन मराठी शिलालेखांचे एक मोठे प्रदर्शन भरविले होते त्यावेळीं तयार केलेली " मंडळाची गेल्या ३० वर्षातील साहित्य सेवा " सर्व प्राचीन व मराठी शिलालेखांचा परिचय ही दोन प्रकरणें जोडली आहेत. इतिहास संशोधनाचे अनुषंगानें मंडळाचे कडून मराठी भाषेची ही सेवा सर्व रसिकांचे चरणी रुजू होईल असा विश्वास वाटतो.

गेल्या एक दोन वर्षांमागें मंडळानें प्राचीन इतिहास संशोधनाचा एक नवीन उपक्रम करून पाहिला तो म्हणजे कऱ्हाड येथील दानशूर श्रीमंत पांडु अण्णा शिराळकर ह्यांच्या प्रोत्साहनानें सुरू केलेले कऱ्हाड येथील उत्खनन. ह्या उत्खननांत कऱ्हाड येथे सातवाहन कालीन अवशेष सांपडले व आतां ते काम पूर्ण होऊन त्याविषयींचा विस्तृत सचित्र अहवाल, या अंका पाठोपाठच प्रसिद्ध होत आहे हे कळविण्यास संतोष होतो.

मंडळांत यंदा व्याख्यानेंही बरीच व उद्‌बोधक विषयांवर झाली. गेल्या संमेलनाचे निमित्तानें डॉ. द्रु. ना. देवरे यांचे बहामनी कालीन वाङ्मय तसेच श्री. जांभेकर ह्यांचे कै. बाळशास्त्री जांभेकर ह्याचा जीवन वृत्तांत व कार्य व श्री. तळवलकर ह्यांचे शातवाहन कालीन शिल्प ही विशेष उल्लेख-नीय वाटतात.

नगर संशोधन समितीमार्फत शनवारवाडा व पाताळेश्वर लेणी ह्यांची पहाणी हेही दोन कार्यक्रम सांगण्यासारखे झाले.

पुणें विद्यापीठ स्थापन झाल्यापासून, मंडळाचा त्यांत समावेश व्हावा ह्या दृष्टीनें प्राथमिक पत्रव्यवहारही ह्या वर्षी झाला व त्यांत मंडळास यश येईल अशी खात्री वाटते.

यंदा मंडळाचे कार्याध्यक्ष महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे दिल्ली येथें भरलेल्या, व मंडळानें प्रथम सुरुवात करून दिलेल्या इंडियन हिस्टरी कॉंग्रेसचे अध्यक्षस्थानी विराजमान होते. त्याबद्दल त्यांचा गौरव मंडळानें ह्या पूर्वीचा अंक Dehli Special Number काढून केलाच आहे.

यंदाचे वर्षी मंडळाचे एक आश्चर्यवाईक व व्यासंगी सभासद श्री. गो. कृ. मोडक हे थोडयाशा आजारानंतर कालवश झाले हे नमूद करण्यास खेद होतो. मंडळाचे प्रत्येक समेस नियमाने हजर रहात व प्रासंगिक चर्चेंत भाग घेत. त्याच्या निधनानें महाराष्ट्रांतील व्याकरण विषयाची एक बाजू लंगडीच पडल्यासारखी झाली.

चिटणीस

भा. इ. सं. मंडळ

प्रास्ताविक

१ ग्रंथविशेष, २ दिवाणसत्ता व पेठेंतील शेटे-महानाड-वतनदारसत्ता, ३ राजकीय: दक्षिणीपक्ष व औरंगजेब; इंग्रज, ४ राज्यकारभार, ५ संभाजी बखरींतील काळ-निर्दिष्ट प्रसंग व समारोप.

१

वीस वर्षांपूर्वी 'त्रिशत-सांवत्सरिक-श्रीशिवाजी-स्मारक-ग्रंथावली' म्हणून पांचसहा ग्रंथ मंडळाकडून प्रसिद्ध झाले (श. १८५१ इ. १९३०). ह्या सहाहि ग्रंथांत 'शिवकालीन पत्रसारसंग्रह' हाच ग्रंथ आद्य व प्रमुख होय. ह्या ग्रंथाचे एकंदर तीन खंड श. १८५८ (= इ. १९३७) अखेर प्रकाशित झाले आहेत. असल्या ग्रंथाची थोरवी व उपयुक्तता किती तें एक अभ्यासकच जाणूं शकतील. बहुमोल ह्याच्याहि पुढला शब्द बिनमोल हा आहे. व तशीच गोष्ट असल्या ग्रंथाची आहे. इतिहासाच्या साधनांत मूळ समकालीन पत्रें मिळून तीं प्रसिद्ध होणें; त्यांतहि तीं एकत्रित व कालानुक्रमानें प्रसिद्ध होणें ह्याच्या इतका आनंद व उत्साह अभ्यासकास दुसरा कशानेंहि मिळणार नाहीं. अशा सारसंग्रह-ग्रंथाचा प्रथमच उपक्रम भा. इ. सं. मं. नें केला व तो पहिले छत्रपती श्रीशिवाजीराजे यांच्या कारकीर्दी पासून केला. तोच वर उल्लेखिलेला शिवकालीन पत्रसारसंग्रह हा त्रिखंडात्मक ग्रंथ होय. आणि त्याच्याच पुढला ग्रंथ म्हणजे दुसरे छत्रपती, शिवाजीराजांचे ज्येष्ठ पुत्र, संभाजी राजे ह्यांच्या राजवटीस अनुलक्षून 'संभाजीकालीन पत्रसारसंग्रह हा ग्रंथ, आज प्रसिद्ध होत आहे.

ह्या ग्रंथांत शिवकालीन पत्रसार-संग्रहाप्रमाणें निरनिराळ्या ५४ मराठी साधनग्रंथांतून श.१६०२ ते श.१६१० म्ह.इ.१६८० ते १६८९ ह्या ९वर्षांतील पत्रें कालानुक्रमानें, राजकीय दृष्ट्या साररूपानें संग्रहीत केलेलीं आहेत. शिवाजी-प्रमाणेंच संभाजीच्या ह्या कामासाठीं 'शिवचरित्र-कार्यालया' सारखें 'संभाजी चरित्र कार्यालय' आहे व तें हें आहे आणि त्या मार्फत प्रस्तुत ग्रंथ तयार झाला आणि आतां तो प्रसिद्ध होत आहे असें नाहीं. हें सांगण्याचा इत्यर्थ एवढाच कीं, शिवचरित्र कार्यालयाप्रमाणें ह्या ग्रंथासाठीं कोणाची देणगी वगैरे आज भा. इ. सं. मं. कडे आलेली नाहीं आणि शि. का. प. सा. सं. प्रमाणें

इंग्रजी, फारसी, डच, पोर्तुगीज इत्यादि अन्य भाषांतीलहि पत्रें ह्या ग्रंथांत मराठींत भाषांतरित करून घेतलीं गेलेली नाहींत. मराठी साधनसाहित्या-पुरताच मुख्यतः हा प्रयत्न आहे.

शिवकालीन प. सा. संग्रह आणि हा संभाजीकालीन प. सा. संग्रह यांतील शिव–व संभाजी–कालीन ह्या संज्ञेनें त्या त्या ग्रथांत संग्रहीत केलेल्या पत्रांच्या कालाची मर्यादा स्पष्ट होत असली तरी शि. का. प. सा. सं. त शिवपूर्वकालीनहि पत्रांचे उतारे घेतले आहेत.–व त्यासंबंधीची स्पष्टता त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत केली आहे–आणि ह्या संभाजी का. प. सा. सं. ग्रंथांत संभाजीच्या कार-कीर्दीतीलच म्ह. नऊ वर्षांमधीलच पत्रें घेतलीं असलीं तरी शि. का. प. सा. सं. हा ग्रंथहि संभाजी चरित्रासाठीं अवश्य अभ्यासांत घेतला पाहिजे. कारण, संभाजीचा छत्रपती ह्या नात्याचा काल नऊ वर्षांचा आहे पण छत्रपती होण्यापूर्वीची संभाजीची कामगिरी पंधरा वर्षांची आहे; व ती ह्या छत्रपतीपद-प्राप्तीनंतरच्या पत्रांतून अर्थातच आलेली नाहीं. म्हणून शिवकालीन पत्रसार-संग्रहाचे तीनहि खंड किंवा शिवचरित्र साहित्याचे आतांपर्यंतचे नऊहि खंड संभाजी–चरित्रासाठीं अगत्यपूर्वक अभ्यासिले पाहिजेत. इतकेंच नव्हे, ह्यापुढें असेच पुढल्या पुढल्या राजवटींच्या पुरतेच पत्रांचे संग्रह-ग्रंथ निघाले तरी पहिल्या पहिल्या पत्रसारसंग्रहग्रंथांचें अध्ययन अपेक्षितच राहील.

ह्या ग्रंथाचा दुसरा विशेष म्हणजे पृ. ९९ ते १२० हीं २२ पानें जोडलेली 'छत्रपति संभाजी शकावली' आणि शेवटीं जोडलेली सूची ही होय. शकावलींत छत्रपती होण्याच्या आधींच्याहि संभाजीच्या हालचाली दाखविल्या आहेत आणि सारसंग्रहांत तर छत्रपती झाल्यानंतरचीं पत्रें घेतलीं आहेत; आणि ह्या दोहींतहि आलेल्या व्यक्तिस्थलनामांचा संग्रह सूचींत केला आहे. शि. का. प. सा. सं. च्या तिसऱ्या खंडांत 'शिवाजी शकावली' दिली आहे. पण त्या शकावलींत आलेल्या व्यक्तिस्थलांची नोंद त्याच खंडांत जोडलेल्या सूचींत आलेली नाहीं. अशा दृष्टीनें पाहतां प्रस्तुत ग्रंथास जोडलेली ही सूची यथार्थ होय. आतांपर्यंत निरनिराळ्या शकावली व सूची त्या त्या ग्रंथास जोडल्या आहेत. पण त्यांत त्यांतीलच शकावलींतील उल्लेखांची नोंद सूचींत घेणें राहिली ती उणीव ह्या सूचींत नाहीं. तिसरा एक विशेष ह्या ग्रंथाचा सांगणें इष्ट व तो म्हणजे प्रारंभीं जोडलेली विषयसूची. ही सूची जरी नुसती वाचली तरी ग्रंथांत आलेल्या पत्रांचें महत्त्व कळून येऊन पत्राच्या वाचनाकडे व अभ्यासाकडे लक्ष लागेल.

२

ह्या संग्रहांत आलेल्या पत्रांची पाहणी व तशी मोजणी केली

असतां सामान्यत: असें आढळून येईल कीं, धार्मिक, वतनबाब, राजकीय इत्यादि पत्रांपेक्षां राज्यकारभारविषयकच पत्रें सर्वांत अधिक आहेत. विषयसूचींत पत्रांत आलेल्या मजकुरांतून जे निरनिराळे पोटविषय आले आहेत ते दिले असले तरी ठोकळ व मुख्य वर्गीकरण पत्रांचें असें–राज्यकारभार विषयक पत्रें १२०, वतनबाब ८२, धार्मिक ७५, राजकीय २८, इतर सामान्य बाबी २५, पेठ बाजार १२ व जहागिरींचा उल्लेख असलेलीं पत्रें ९. येथें हेंहि एक ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, कांहीं पत्रें राज्यकारभार व वतनबाब ह्या दोहींकडे घेण्याजोगी असल्यामुळें वर्गीकृत एकूण पत्रसंख्येंत ५३ पत्रांची वाढ झाली आहे. ह्या मुख्य सात बाबतींपैकीं एकदोन प्रमुख बाबतींतील कांहीं गोष्टींचा विचार करणें येथें उचित होईल. प्रथम राज्यकारभारविषयक पत्र तेंच वतन बाबतींतहि गणन करण्याजोगें कां तेंच उदाहरणानें पाहूं. व ह्यावरून राजसत्ता म्ह० दिवाणसत्ता व वतनी कारभार किंवा देशसत्ता ह्या दोन स्वतंत्र आणि प्रभावी सत्ता त्या कालीं होत्या हेंहि कसें तें लक्ष्यांत येईल. तिसरी एक ज्ञातिसत्ता म्हणजे धर्मसत्ता किंवा ज्ञातिधर्मसत्ता म्हणून स्वतंत्र असे. प्रस्तुत वरील दोन सत्तांविषयीं पाहूं. व त्यासाठीं आर्थिक व्यवहार करणारे पेठकरी व्यापारी व सावकार आणि राजसत्ताधारी ह्यांचें उदाहरण घेऊं. अथणी व तेरदळ ह्या दोन शहरांच्या पेठा शिवाजी कालापासून–अदिलशाहीपासून म्हटलेलेंच अधिक सयुक्तिक–चांगल्या भरभराटीस आलेल्या व विख्यात होत्या. पण शिवाजी राजे निवर्तले त्याच्या आदल्या वर्षापासून ह्या पेठांवर मोगली म्हणजे दिल्लीकरांचे हल्ले येऊं लागले. प्रथम दिलेरखान इ. १६७९ च्या प्रारंभीं इकडे आला. व त्यानें (श. १६०१ आश्वीन म्ह.) १६७९ च्या आक्टोबरांत अथणी लुटली व कांहीं जाळपोळहि केली. त्यावर तेथील व्यापारी दुकानदारांनीं थोडेंसें बांधकाम करून पुनः पेठेची रचणूक केली; तों खैरखानाचा हल्ला आला व त्यानें ती पेठ मारून खराब केली. खान परत जातांच पेठेची वसाहत व लावणी उभारणी तेथच्या व्यापारीमंडळींनीं पुनरपि केली तरी पुनः लगेच शहाजाद्याची स्वारी आली व त्यानें घर, मळगी वगैरे जाळून टाकलें. तात्पर्य, अशा प्रकारें लागोपाठ चार वर्षें अथणी पेठेवर हल्ले झाल्यामुळें तेथील व्यापारी व महाजन अथणी सोडून मुधोळ, तेरदाळ येथें जाऊन गुजराणा करूं लागले व तिकडेच स्थीरस्थावरहि होण्याचा विचार करूं लागले. उघडच अथणीचे गांवकरी व सरकार ह्यांची गैरसोय होऊन उत्पन्न बुडालें व कायमचेंच बुडतें कीं काय असेंहि त्यांस वाटलें. तेव्हां अथणीचे देशक म्हणजे देशमुख, नाडगीर, मोकदम व सरकारी सुभेदार मुधोळास गेले आणि त्यांनीं व्यापारीमंडळींस अभयपत्र देऊन परत अथणीस येण्याबद्दल विनविलें. ह्या वेळीं सुभेदार, देसक, मिरास-

दार आणि व्यापारी ह्यांत जो करार झाला तो मुख्यतः लक्षांत घ्यावयाचा आहे. व्यापारप्रसंगी सुपारी, लवंग, कापड, मीठ, तांदूळ, गूळ इत्यादि मालावर गोणीमागें जकात किती किती घ्यावयाची, तसेंच वजनामापावर 'छपाव' करतांना हक्क किती घ्यावयाचा इत्यादि ठरलें; त्याबरोबरच पेठेंत सादिलवार म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांचें सरबराईसाठीं व दप्तरखर्चासाठीं दुकानदारांकडून कांहींहि घ्यावयाचें नाहीं; इतकेंच नव्हे तर पेठेमध्यें आपापसात झगडाभांडण झालें तर त्या बहुतेक सर्व कज्जागती 'दैवांतच' म्हणजे पेठेंतील शेटेमहाजन चौधरी, महानाड व इतर व्यापारीमंडळी यांच्या सभेतच निर्णित होऊन संपावयाच्या, 'त्याची वाजीपुसी दिवाणानी करावयाची नाहीं' हेंहि ठरलें; ह्यांतहि विशेष हें ठरलें कीं, 'गुन्हेगार नफासी सिर मारावें' म्हणजे ठार करावें असें, तशाच प्रसंगाच्या खटल्यांत निवाडा झाला व त्याप्रमाणें सिके झाले; म्हणजे ठार करावें हें निश्चित झालें तरी, 'दैवानें सांगून पाठविले तर त्यास दिवाणांनीं सोडून द्यावें.' आणि 'व्यापाऱ्यांनीं खूनखराबी केली तरी ती मात्र कुल माफ असावी' (ले. ८९-९२). ह्या अभयपत्रावरून दोनतीन गोष्टी निदर्शनास येतात, कांहीं मर्यादेपर्यंतचे तंटे केवळ व्यापारीमंडळींनींच मिटवावयाचे; व ज्यांत खूनमारामारी होऊन निर्णयांत गुन्हेगाराला ठार करण्याची शिक्षा होण्याचाच संभव, तसा तंटा दिवाणअधिकाऱ्यांच्या उपस्थितींत निकालीं लागावयाचा आणि ती शिक्षा दिवाणाकरवींच दिली जावयाची. तिसरी गोष्ट कीं, देहान्ताची शिक्षा सरकारी म्हणजे दिवाण अधिकाऱ्यांनीं निर्णित करून देण्याचें ठरलें तरी, ह्या केवळ व्यापारीमंडळींच्या सभेनें म्हणजेच 'दैवानें' जर तें देहान्तशासन रहित करा असा आदेश सरकारी अधिकाऱ्यांला दिला तर दिवाणांनीं आपला निकाल फिरवून दैवाच्या मतानुसार त्या गुन्हेगारास त्या शिक्षेपासून मुक्त केलें पाहिजे; इतका अधिकार व्यापारश्रेष्ठींचा असे. ह्यावरून सरकारी सत्तेइतकीच दुसरी एक स्वतंत्र सत्ता त्या काळीं होती व ती ह्या काळी पांढरींतील वतनदार मंडळींची होती.

वतनदार म्हणजे 'काळी' आणि 'पांढर' विशेषतः काळीसंबंधींचे म्हणजे शेतीसंबंधींचेच तेवढे कामगार, असें नाहीं. तर केवळ पांढरीमधील म्हणजे बाजार पेठेंतील शेटे महाजन महानाड चौधरी हेहि देशमूख पाटील कुळकर्णी ह्यांच्याइतकेच वंशपरंपरेचे हक्कदार मानकरी व अधिकारी वतनदार होत. अशांपैकीं वरील व्यापारी मंडळीसंबंधाचा संभाजीकालीन सत्ताव्यवहार आहे. गांव–वसाहत किंवा जमीन–लागण ह्या विषयींचीहि अशींच सरकारी पत्रें त्या त्या वतनदारांची मनधरणी केलेली ह्या संग्रहांत आलेलीं आहेत. हीं पत्रें स्वतः संभाजी राजा, त्यांचे सरकारकून म्हणजे अष्टप्रधानांपैकीं प्रधान, सचीव, अमात्य किंवा छंदोगामात्य तसेंच ह्या प्रधानांच्या हाताखालचे सरसुभेदार,

सुभेदार, हवालदार, ठाणेदार ह्या राजसत्ताधिकाऱ्यांचींहि असून तीं देशमूख, देशपांडे, मोकदम, कुळकर्णी, खोत, नाडगौडा, देसाई ह्या वतनदार मंडळींना आहेत. ह्या पत्रांचे प्रत्यक्ष व पूर्ण उतारे येथें उद्धृत न करतां लेखांक निर्दिष्ट करतो.' गांव-लावणीबद्दल कुलकर्णी यास ४०, ६९, सरनाईकांबद्दल पाटलास ७३; फिरते व्यापाऱ्यांस तेरदाळ रायबाग, हुकेरी ७७; पेठेवर मार्ग पडोन आबादानी करणें ९४, खोत १४५; देशमूख २१३, राजापूरकर गनीम म्ह. सिद्दी यानें सोनार, सराफ यांस त्रास दिल्याबद्दल देशमुखास २३९-२४१, देशमुख खोत व मुजन लावणीबद्दल २५६,२६३;इ.इ.इ.एका पत्रांत तर छंदोगामात्य कविकलुषांनीं कानदखोऱ्याचे देशमुखास लिहिलें आहे कीं 'याप्रसंगीं अवघे वतनदार एकमतें राहोन गनिमास सजा द्यावी' (१२६); दुसऱ्या एका पत्रांत स्वत: संभाजीनेंच वांईच्या देशमुखाना अनुलक्षून लिहिलें आहे कीं, 'हे दिवसांत गनीम (म्ह. दिल्लीकर मोगल) कोंकणांत उतरला आहे. हशमाचा नौसंरणीचा जमाव करून पाठवून देणें. हशमाचा जमावाचें म्ह. पायदळ सैन्याचें बहुत प्रयोजन आहे. जमाव जाला तरी गनिमाचा काय गुमान लागला, बुडविलाच जातो, हें बहुत नाजूक काम आहे. तरी जमाव पाठविणें' (११२-१३). हीं सर्व पत्रें वर म्हटल्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांनीं देशमूख देशपांडे इत्यादि परगण्याचे व गांवाचे वतनदारांना लिहिलीं असून त्यांत वतनी कामाबद्दल मजकूर आहे. सारांश, अशीं हीं पत्रें राजाचें जें एक काम, गांवांची सुरक्षितता व शांतता राखून भरभराट करणें त्या कामासाठीं व वतनदारांना लिहिलेलीं असल्यामुळें तीं राज्यकारभार व वतनबाब ह्या दोहींचीहि माहिती देणारीं आहेत.

३

राजकीय दृष्टीची ह्या संग्रहांत जीं पत्रें आलीं आहेत त्यांत शिवाजीराजांच्या राजकीय धोरणाचा परिपाक कोणचा तें स्पष्ट करणारीं कांहीं आहेत. श्रीशिवरायांनीं स्वराज्य सोडविलें ह्यांत त्यांचें राजकाज संपूर्ण व्यक्त होत नाहीं. तो त्यांच्या तद्विषयक धोरणाचा पाया आहे; स्वसंस्कृति पालनरूप तें पहिलें हरिकथानिरूपण म्हणतां येईल. पण त्यांचें दुसरें तें राजकारण हें होय कीं, दक्षिण हिंदुस्थानांतील इतर ज्या दोन पातशाह्या, अदिलशाही व कुतुबशाही, ह्यांना देशाभिमानी-म्ह० 'दक्षिणी' बनविणें. ज्या खेमसावंत भोसल्यास-सरदेसाई कुडाळ सावंतवाडी यास-औरंगजेबानें 'संभा खोटा व हरामी आहे, त्याच्या किल्या-तालुक्यास वेढावें, (तसेंच) आदलखानी तळ-कोंकणांत (आमचे करितां) ठाणीं घालावी (२७१), असें सांगितलें; त्याच खेम सावंताला त्या वेळचा अदिल-

शाही तख्तावर असलेला सिकंदरबादशहा ह्यानें आधींच कळविलें कीं, 'संभाजीशीं ममता राखून मोगल ह्याशी मैत्री न ठेवावी. (१३३); आणि लेखांक १८१ मध्यें तर गोवळकोंड्याचा (अबुल हसन) कुतुबशहा अदिलशहाच्या पत्रांत संभाजीराजांचा 'महाराज छत्रपती संभाजी राजे पातशहा' असा उल्लेख करून 'हमारी पातशाही वा.दख्खणकी पातशाही जुदी नाही' हें लिहीत आहे. ह्याचा अर्थ, दक्षिणेंतील तीनही राज्यें उत्तर हिंदुस्थानांतील औरंगजेबी म्ह. मोगली सत्तेशी झगडण्यास एकोप्यानें तयार आहेत. त्यासाठीं त्यांचा वेगळा असलेला धर्म आड आला नाहीं. तात्पर्य, ही जी 'दक्षिणी' किंवा 'हिंदवी' वृत्ती ह्या दोन शाह्यांच्या गळीं उतरविली, तें शिवरायाचें 'दुसरें तें राजकारण' होय. व त्याची परिपक्वता संग्रहांतील पत्रांत दिसून येत आहे. औरंगजेबाचे रेट्यापुढें आणि आमच्यांतील कांहीं वैगुण्यामुळें विशेषतः आमच्या परधार्जिण्या वृत्तीमुळें ह्या वेळचा परिणाम विपरीत झाला हा भाग वेगळा. पण राजकारण, राजकारण म्हणजे—ज्यांत, स्वदेशांत राहणाऱ्या अन्य धर्मीयांना, त्या देशच्या धर्मीयांशी सलोख्यानें वागावयास व त्यांच्या धर्मास आपल्या धर्मांइतकाच मान देण्यास लावून, देशशत्रूच्या विध्वंसनार्थ देशनिष्ठेच्या बळावर आपल्याबरोबर संग्रामार्थ उभे करणें हा विचार आणि आचार असतो तें. ह्या राजकारणी वृत्तीची जाणीव इ. १५६५ नंतर चांगल्या प्रकारें होऊन ती वाढीला लागली आणि श्रीशिवरायाच्या स्वराज्य-स्थापनेनें त्याला मूळ धरलें व दक्षिणीपक्षरूपानें—हें नाव पूर्वीचेंच आहे—ती दृश्यमान व वर्धमान झाली. हीच वृत्ती शिवोत्तर कालांत 'दक्षिणी' पक्ष व 'परदेशी' किंवा 'पठाणी' पक्ष ह्याच्या जागीं वाढत्या कार्यक्षेत्रानुसार 'हिंदी' व 'तुराणी' पक्ष ह्या नामांतरानें चालू राहिली. इ. स. १७६१ मधील प्रसिद्ध प्रसंग व त्यापुढेंहि दोन तीन दशकपर्यंतच्या हालचाली हा त्याचाच भाग आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो. हा किंवा त्यापुढील वर्तमानकालीन एतद्विषयक विचार येथें कर्तव्य नाहीं. पण प्रस्तुतच्या ह्या संभाजीकालीन पत्रसारसंग्रहापुरतें पाहतां एवढें सांगितल्यास चालेल कीं, त्या वृत्तीचें दिग्दर्शन शिवकालीन पत्रसारसंग्रहांतील पत्रांतून जितक्या ठिकाणीं आलें आहे त्यापेक्षां थोड्या अधिक प्रमाणांत प्रस्तुतच्या ह्या छोट्या ग्रंथांतील मराठी पत्रांमधून होत आहे. येथें असा दुसरा विचार लक्षांत येईल कीं, समान संकट येणें हीहि गोष्ट हे विचार उद्भवण्याच्या मुळाशीं असल्यामुळें केवळ राजकारणी जागृत दृष्टीचा तो भाग मानणें अवश्यकच आहे असें नाहीं. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, शिवाजी राजे विद्यमान व राज्यपदारूढ असतांना केवळ अदिलशाहीवर असेंच संकट आलें होतें व तेव्हां शिवराज्यावर तसें झालें नव्हतें. अशाहि वेळीं अदिलशाही दक्षिणी पक्षाच्या वजीर व मुत्सद्दी मंडळींनी शिवाजीस साहाय्यास बोलाविलें व

शिवाजीनेंहि आपणास नसलें तरी ज्या आपल्या 'दक्षिणीपक्षांतील' एका राज्यास बुडविलें जात आहे त्यास, त्या 'परदेशी' किंवा 'पठाणी'पक्षीयांकडून आलेल्या संकटांतून वांचविणें हें दक्षिणीपक्ष–प्रमुख असलेल्या आपलें काम आहे, हा विचाराचा भाग ध्यानांत आणिला व साहाय्य दिलें. औरंगजेबाच्या मनांत शिवाजीचें स्वतंत्र राज्य तें हिंदूंचें म्हणून तर बुडवावयाचेंच होतें; पण विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान जरी शियापंथी होते म्हणजे औरंगजेब ज्या सुनीपंथाचा अभिमानी होता त्या पंथाचे हे दोन्ही सुलतान जरी नव्हते तरी मुसलमानच होते; तरीहि त्यांना बुडवावयाचे, असें औरंगजेबाच्या मनानें कां घेतलें ! औरंगजेबाच्या सैन्यांत व कारभारांत मोठमोठ्या कामावर शियापंथी मुसलमान होतेच. मग हेच शिया सुलतान त्यास हिंदू इतकेच द्वेष्टे व बुडविण्यायासच योग्य असें कां वाटले ! तर त्याचें कारण ते दोन्ही 'शहा' ह्या दक्षिणीपक्षांतील होते हें होय. औरंगजेबास आपणाला 'परदेशी' वा 'पठाणी' म्हणणारा हा 'दक्षिणी' पक्ष नष्ट करावयाचा होता.

औरंगजेब एकंदरें धोरण व त्याचे दूरगामी परिणाम जाणणारा होता. त्याच्या पदरचा शेखउल इस्लाम हा विद्वान् मनुष्य त्यांस हीं राज्यें बुडविणें इष्ट नाहीं हें सांगत होता. इतकेंच नव्हे तर जर हें आपलें म्हणणें ऐकलें नाहीं तर तुमचेजवळ मला राहणेंहि नकोसें होईल; इतक्या आग्रहानें तो तें पातशहास सांगत होता. शेवटीं हा पंडित त्यास सोडून गेलाहि; तरी औरंगजेबानें त्याचें वा अन्य कोणाचेंहि ऐकलें नाहीं, आपलेच मनानें ही सर्व मोहीम चालविली. बरें, औरंगजेबानें आपल्या हिंदु–द्वेषास कोठें कोठें मुरड घालून हिंदु साधु, मठ, एखादें देवालय ह्यास इनामहि दिल्याचें व तें चालविल्याचें आढळेल, म्हणजे नको असलेले शियापंथी व हिंदु ह्याविषयींची त्याची करडी नजर जेव्हां ते धर्मप्रेमापेक्षां विशिष्ट भागापुरते पण देशप्रेमभरानें म्हणजे राजकीय दृष्टीनें एकत्र होऊन नांदत आहेत तेव्हां चटकन् तिकडे वळते व मूळचा द्वेषाग्नि अधिक तीव्र व प्रज्वलित होतो. सारांश, उत्तरेकडील दिल्लीकर मोगलपातशहास 'दाक्षिणात्यांची ज्यांत हिंदुबलिष्ठ व सत्ताधीश आहेत अशी हिंदुमुसलमानांची जूट' नको होती. ह्या जुटीचें लक्षणांत कोण कोणास गनीम म्हणतो व दक्षिणचें तख्त म्हणून कोण कोणचें सांगतो तेंहि लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. तसेंच औरंगजेबाचा चौथा मुलगा अकबर हा संभाजीकडे दुर्गादास राठोड ह्या मारवाडच्या विवाणासह आला होता. अर्थात् वर जो 'दक्षिणीपक्ष' म्हणून म्हटलें त्या पक्षाच्या धोरणाच्या दृष्टीनें त्या उभयतांचें आगमन ही फारच उत्तम व सहाय्यक गोष्ट होती. पण त्यामुळें औरंगजेबाच्या द्वेषाग्नीस अधिकच इंधन मिळालें व त्या प्रमाणांत त्याच्या हालचाली चौफेर, घोडदौडीनें व अंगमेहनतीनें चालल्या. येथें मात्र एक गोष्ट स्पष्टपणें सांगणें भाग आहे

कीं त्या दोषांसंबंधीचे उल्लेख फक्त शकावलींत काय ते आले आहेत; मराठी पत्रांत त्यांचा निर्देश असलेलें पत्र एकच अर्धेमुधें प्रस्तुत उपलब्ध आहे. इतरहि राजकीय वृत्तान्तासंबंधानें हीच स्थिति आहे. तात्पर्य, संशोधन व अभ्यास अद्यापि व्हावयास पाहिजे.

राजकीय परिस्थितीचा विचार चालू असतां इंग्रजांनीं ह्या वेळीं कोणचें धोरण स्वीकारलें होतें तेंहि पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधींचें एक पत्र ह्या संग्रहांत ले. २४३ हें आलें आहे व त्याचा विचार झालेला दिसत नाहीं. औरंगजेब दक्षिणेंत उतरतांच त्यानें संभाजी, अदिलशहा ह्यांचे विरुद्ध देशमुखादिकांना जशी उठावणी दिली व त्याप्रमाणें त्याच्या गळाला कांहीं देसाई लागलेहि; त्याचप्रमाणें इकडील ज्या तीन आरमारी सत्ता त्यांसहि चालना मिळाली. ह्यांतील दोन सत्ता प्रत्यक्ष चालू होत्या. एक पूर्ण स्वतंत्र ती पोर्तुगीज, दुसरी सत्ता मांडलिकी स्वतंत्र ती सिद्दी, आणि तिसरी, हे जसे दोन परके तसे ही तिसरीहि परकीच मुख्यतः सिद्दीची मदतनीस म्हणून ती इंग्रज. ह्यांतील जंजिरेकर सिद्दी हा तर मोंगलांचा हस्तकच बनून संभाजीच्या मुलुखावर सारख्या स्वाऱ्या लुटालुटी करूं लागला, व त्याला सहाय्य पोर्तुगीजांचें मिळे. म्हणून संभाजीनें पोर्तु० जवर स्वारी करून यश मिळविलें. सिद्दीला पोर्तुगीजांप्रमाणें उघड नसलें तरी इंग्रज कंपनीचेंहि सहाय्य मिळत असे व म्हणून इंग्रजाकडे संभाजीचा वकील जाऊन उभयतांमध्यें तहाच्या वाटाघाटी झाल्या. इंग्रज व संभाजी ह्यांमधील संबंध सांगणारा एक लेख सर जदुनाथ सरकार यांनीं मंडळाच्या नवम संमेलनांत वाचलेला त्रै. व. २ पृ. ३० ते ४४ वर छापला आहे. त्यांत इ. १६८४ सालची माहिती आली आहे. ह्या संग्रहालयांतील पत्र इ. स. १६८७ मधील आहे. ह्या पत्रांत जनरल इंग्रज संभाजीस लिहितो कीं, "तुमच्या प्रधानांचे–निळो मोरेश्वर–पत्र येतें कीं, 'हबसी गनीम खाडींतून येऊन आमचा मुलूक मारतो. अशांत तुमची आमची जुनी दोस्ती असतां दर्यामधे खाडी राखली जात नाहीं. तरी खाडी राखावी व गनीम पैस होऊं न द्यावा.' ह्या पत्राबरोबर आणखी बोलणें करण्या करितां त्रिंबक गोपाल हा वकीलहि तुमचा आला व तह झाला. तह असा कीं, संभाजीनें इंग्रजास ५० ह. रु. रोख आणि २ ह. मुढे भात देऊन दर्यांत खाडी राखावी, आम्ही (संभाजीनें) खुशकीवरील मजबुदी करून खुशकी राखोन. ह्याप्रमाणें तह झाला व आम्ही कबूल केलें त्याप्रमाणें बोटी, जहाजें, गलबतें पाठवून आम्ही खाडी बंद केली, अशी कीं, गनीम इकडे येईना, नव्हे पाहीनाहि. असें असतां छत्रपतींचे लोकांनी खुशकी राखावी ते मोकळीच टाकली व ह्यास तीन महिने झाले. बरे, खर्चास देऊं केले तेहि पोहचविले नाहीं. २ ह. मुढे भात याव-याचे तेथें शंभरच मुढे भात आले. वरकड कांहीं पोहचत नाहीं. तशांत इंग्रज

लोकांचा खर्च बेमवलग. लोकांचे मुशाहिराखेरीज २० हु. अशर्फी खर्च झाली. आतां पुढें आणखी किती म्हणून करावा. १५ रोजांत हानीचा जाब आला तरी खूब. नाहीं तरी आम्ही आपले आरमार परत बोलावून आणून.' ह्यावर छत्रपती म्हणतील कि, पैकियावर नजर देता. तरी तैसे नाहीं. छत्रपतीच्या लोकांस काम फार पडलें आणि बोलाचा भरंवसा नाहीं. अशांतहि दोस्तीवर नजर देऊन अजीं-लग कामाची शर्ती केली." ह्या जनरलच्या पत्रावरून संभाजीकडील स्थिती कळून येते. विजापूर गोवळकोंडा येथील राज्यें घेतल्यावर औरंगजेबपातशहाचें सैन्य केवळ संभाजीचा समाचार घेण्यास मोकळें झालें. यामुळें ह्या वेळीं संभाजीच्या लोकांस काम फार हें इंग्रजांचें लिहिणें संयुक्तिक दिसतें व ह्यामुळेंच 'बोलाचा भरंवसा नाहीं.' हा टपका संभाजीस ऐकून घ्यावा लागला. सारांश, इंग्रज हे प्रथम सिद्दीचे मदतनीस नंतर धोरण म्हणून संभाजीशीहि संधान राखून असणारे असे होते.

४

संग्रहांत आलेल्या ज्या पत्रांचा व त्यावरून ज्या मुद्याचा विचार संक-लनात्मक ग्रंथांत आलेला नाहीं त्या राजकीय गोष्टींचा थोडक्यांत विचार केल्यानंतर आतां थोडेंसें राज्यकारभार व वतनकारभार ह्याविषयीं लिहिणें इष्ट होईल. ह्या संग्रहांत राजकीय, राज्यकारभार, धार्मिक इत्यादि ठोकळ विषयवार पत्रें किती तें वर दिलेंच आहे. त्याप्रमाणेंच स्वत: संभाजी राजे यांचें नांवें निघालेलीं किती, अष्टप्रधानांपैकीं प्रधान, सचीव, अमात्य, पंडितराव, सेना-पती यांनीं पाठविलेलीं किती, तसेंच कविकलश व सुभेदार व सर सुभेदार, ह्यांची किती, त्यांतहि अदिलशाही वा मोगल अंमलदारांची किती तें पाहिलें असतां हा विचार करणें सुलभ व रीतीचें होईल. ह्या संग्रहांत संभाजी छत्र० ४१, प्रधान २१, कविकलश ७, अमात्य १, सचीव ४, न्यायाधीश व पंडितराव १ व १०, सुभेदार ३०, सर सुभेदार ४, मुजुमदार, देशरक्षक हा नवाच अधि-कारी आढळतो, ह्यांची एकेक, हवालदार ५, ठाणेदार ६, दिवाण ४, ह्याप्रमाणें सरकारी पत्रें आलेलीं आहेत. दिल्लीकर मोगलाकडील पत्रें ३६ असून अदिलशहाचीं ८ व त्याचे दिवाण सर्जाखान, सुभेदार, अबुलमुजफर इत्यादींचीं १६, कुतुबशहाचें १ आहे. ह्याशिवाय घोरपडे, निंबाळकर, घाटगे, भोसले, शिरके, भांगरे, शिंदे, माहाडीक ह्या सरदारांचीं पत्रें असून, इतर नागरिक जे गिजरे, चाफळकर, कवींद्र, मावळंगकर, भाष्य, इतर मठपती, श्रीशंकराचार्य आणि वतनदारांपैकीं पाटील, परीट, चौगुला, सेटीकार, देश-मूख, देशकुलकर्णी, धर्माधिकारी, अधिकारी इत्यादींचीहि पत्रें ह्या संग्रहांत झालीं आहेत. ह्या पत्रसंख्येबरोबर त्या त्या पत्रांचे क्रमांक येथें व मागील

राजकीय वगैरे विषयाची जी पत्रगणना दिली तेथेंहि दिले असते तर तें अव-श्यक होतें. पण स्थलाभावी तसें करणें अशक्य. ह्यांपैकीं राजसत्ताधाऱ्यांनीं ज्या ठिकाणच्या वतनदार, मठपती, उपाध्ये वा इतर नागरिक मंडळींना पत्रें पाठ-विलीं आहेत त्यांतील तपशील लक्षांत घेतां दोन गोष्टी कळून येतात. एक कोणच्या प्रांतावर त्यांचा कसा व कां अधिकार आहे वा सुरू झाला आणि राज्यांतील सामान्यतः एकंदर ठिकाणांपैकीं कोणच्या ठिकाणचे कागद अद्याप मिळावयाचे आहेत. उदाहरणार्थ, कलुशाचे कागद फोंडा, कुडाळ, कानदखोरे, पुणें, देवरूख, शिराळे ह्या प्रांतावर असून त्यांपैकीं कुडाळ परगण्याच्या भानजी गोपाळ ह्या सुभेदारास, तेथील चिटणिसी पितांबर शेणवीच्या जागीं आलेल्या जिवाजीराम ह्याकडे चालविण्याबद्दल जें पत्र श. १६०६ (इ.१६८४) मध्यें दिलेलें आलें आहे त्या पत्रांत 'हली साहेबास मुलूक अर्जानी जाला' हें वाक्य आहे व तें अतिशय उद्बोधक आहे. संभाजीच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून कुडाळ प्रांतावर छत्रपतींची सत्ता चालत आहे. स्वतः संभाजीनेंच त्या प्रांतावरील गणोराम देशाधिकाऱ्याला पाटगांवच्या मौनी साधूंस पाल-खीच्या भोईसाठीं व वाजंत्र्यासाठीं १०० व २५ निशाणी होन द्यावे असें पत्र पाठविलें आहे. ले. ६ पहा. श. १६०३ मध्येंहि मोरेश्वर पंडितरायाचें पत्र त्याच गणोराम ह्या अधिकाऱ्यास लिहिलेलें प्रसिद्ध आहे ले. ५०. श. १६०५ श्रावणापर्यंत (१६८३ जुलै) छत्रपतींचीच सत्ता त्या परगण्यांवर आहे. पण पुढें १६०५ च्या पौषांत शाहाआलम ह्यानें कुडाळ व बांदे ह्यावर स्वारी केली आणि हे दोन्ही गांव जाळून टाकले (शकावली १६०५ पौष व. ५ पहा पृ. ११५). त्यानंतर त्या भागावर अदिलशाही सत्ता सुरू झाली (श.१६०५ माघ ले. ११५). पण आधींची सत्ता छत्रपतींची असल्यामुळें व छत्रपती संभाजी व अदिलशहा ह्यांत तह असल्यामुळें हा परगणा पुनः छत्रपतींकडे १६०६ च्या वैशाखांत आला आणि म्हणून कविकलशाच्या पत्रांत 'हली साहेबास हा मुलूख अर्जानी जाला.' म्ह. संभाजीराजांच्या ताब्यांत हा परगणा आला असें जें वाक्य आलें आलें तें सुसंगत व यथार्थ आहे. नुसत्या कुडाळ परगण्याचे देसाई व सरदेसाई आणि त्यांचे अदिलशाहीशीं व औरंगजेबाकडे म्हणजे मोगलाईशी कसे संबंध आले व हर्षामर्षाचे प्रसंग घडले हें पाहणेंहि महत्वाचें आहे कारण, श. १६१० च्या माघ महिन्यांत तेथील मूळचे देसाई जे नारायण प्रभु त्यांचे पत्रांत 'त्यावरी मुलूख पातशाही तरफातील आला' असें वाक्य आलें आहे. त्याचप्रमाणें लक्ष्मेश्वर परगण्याचा खानगौडा देसाई हा संभाजीलाहि सहाय्य करून इनाम मिळवितो आणि अलमगीर औरंगजेब यांसही मदत देऊन इनाम गांवें व जमीन मिळवितो; ह्यांतील मतलब व तफावत काय. तर बाद-शहाकडून त्यास सर नाडगौडकी मिळाली. देसाई व देशमूख हे एकाच

अर्थांचे वाचक दोन शब्द असले तरी कानडी भाषेप्रमाणें नाड–गौडा म्हणजे देशाचा पाटील म्हणजे देसाई किंवा देशमुख हाच अर्थ होत असला तरी नाडगौडा व देसाई ह्यांच्या अधिकारांत फरक आहे. देसाई हा नुसत्या प्रांताला अनुलक्षून असलेला अधिकारी आणि नाडगौडा हा किल्ला ज्यांत प्रमुख आहे त्या प्रांताचा अधिकारी आहे. नाडगौडाचा अधिकार प्रांतांतील किल्ल्यावरहि आहे तशी गोष्ट देसायांची नाही. अशा नाडगौडकी अधिकारावरीलहि अधिकार तो सरनाडगौडकीचा. त्या मानासाठीं खानगौड हा औरंगजेबाकडे गेला. असो. अशाप्रमाणें ह्या सारसंग्रहांतील पत्रांचा व शकावलीचा विचार होणें अवश्य आहे. विस्तारभयास्तव हा विचार आवरता घेऊन राज्यकारभार पद्धतिबद्दल दोन गोष्टी लिहितो.

सुभेदार, हवालदार, देसाई, पारपत्यगार, देशाधिकारी इत्यादिकांस पत्र लिहितांना 'व कारकाकून' किंवा 'व देशलेखक' अशी जोड दिलेली असते. सुभेदार म्हणजे देशाधिकारी, ह्याचें प्रत्यक्ष नांव दिलेलें असून त्याच्या जोडीस कारकून असें नुसतेंच कारकूनाचें नांव न देतां म्हटलेलें असतें. 'सुभेदार व 'कारकून' वा 'देशाधिकारी व देशलेखक' ह्या लिहिण्यांत सुभेदार व देशाधिकारी हाच मुख्य व त्यासच पत्र लिहिलेलें असतें. पण मग ज्याचा स्पष्ट नामनिर्देश नाहीं, मुख्याचें पोटांत त्याचे हाताखालचे येतातच, जो दुय्यमहि आहे, त्याचा मोघम उल्लेख तरी कशाला ? ह्या उल्लेखाचीं दोन कारणें वाटतात. एक कारण हें कीं, परकीय वरिष्ठ सत्तेचा तो एक अपरिहार्य परिणाम आहे. हा सुभेदार मुलकी व्यवस्थेसाठीं व त्या सरकारी दप्तराचा मुख्य अंमलदार असला तरी तो थोडासा फौजी अंमलदार आहे. परकी अंमल ह्या जोरावरच नांदावयाचा. मुसलमानी अंमलांत प्रारंभीं हे सुभेदार मुसलमान असणार व त्या एकट्या असल्या अधिकाऱ्याकडून प्रांताचा सर्व कारभार व दप्तर कसें सांभाळलें जाणार; म्हणून कामासाठीं अवश्य पण अधिकाराच्या दृष्टीनें दुय्यम अशी स्थानिक व्यक्ति हाताशीं घेणें प्राप्त. तो हा लेखन–प्रधान 'कारकून'. दुसरें कारण हें कीं, हा कारकून जरी स्थानीक दृष्टीनें आपल्या सुभेदारालाच जबाबदार तरी त्याची नेमणूक फडणिसी खात्याच्या प्रमुखाच्या मंजुरीनें व्हावयाची. सुभेदाराच्या वरचा अधिकारी 'सरसुभेदार' व त्याचा देशी प्रतिशब्द 'मुख्यदेशाधिकारी' असा आहे. ह्या सुभेदाराच्या जोडीलाहि 'कारकून' एवढेंच मोघम लिहिलेलें असतें. कारकुनाचे सरकारकून नाहीं किंवा देशलेखकाचे मुख्य देशलेखकहि नाहीं. ही 'सरसुभेदारी' सूचित करतांना 'महालानिहाय' म्ह. अनेक परगणे असें लिहिलेलें असतें. नागोजी बल्लाळ मुख्यदेशाधिकारी परगणेमहालानिहाय' (के. २२, २४, ४५, १००). अशा वेळीं सर्वच ठिकाणीं अधिक महाल म्हणजे परगणे कोणकोणते व ते किती हें सांगितलेलें असतें

असें नाहीं. पुष्कळ ठिकाणीं सुभेदार हाच शब्द लिहून 'महालानिहाय' हें लिहिलेलें असतें. व त्या शब्दावरून तो 'सरसुभेदार' आहे असें समजावयाचें. अजिरें, चेऊल, कोरल ह्या प्रांतावरील सरसुभेदारांचा उल्लेख 'महालानिहाय' ह्या शब्दावरूनच केला आहे असें समजावयाचें. सर सुभेदार असें प्रत्यक्ष सांगितलेलें नाहीं. कांहीं उल्लेखावरून एकाच प्रांतावर सुभेदाराप्रमाणें सर–सुभेदार हाहि अंमलदार आहे कीं काय हें अधिक उदाहरणावरून पाहिलें पाहिजे. येथें फक्त सं. का. प. सा. सं. तल्या पुरताच हा विचार केला आहे.

५

'संभाजी महाराजांचें चरित्र' म्हणून मल्हारराव चिटणीस यांनीं एक बखर लिहिलेली प्रसिद्ध आहे. तींत संभाजीविषयक ६, राजारामासंबंधानें व समर्थ रामदासविषयक एकेक आणि औरंगजेबाबद्दल २ असे एकूण १० शककाल देऊन प्रसंग सांगितले आहेत. त्यांपैकीं ६ कालोल्लेख राजवाडे खं. १५ ले. ३०१ मधील टिपणांत आले आहेत. हें टिपण मल्हारराव चिटणिसांच्या बखरलेखनाच्या साधनसाहित्यांतील दिसतें. चिटणीसांनीं आपली ही बखर खंडोबलाल व गोविंद खंडेराव ह्यांनीं केलेल्या टिपणाचिठ्यांच्या आधारानें लिहिलेली असावी. ह्या चिटणीस चरित्राचें हें टिपण आधारभूत अशासाठीं वाटतें कीं, जे कालोल्लेख दोन्ही ठिकाणीं आहेत ते जवळजवळ सारखेच आहेत. औरंगजेब भागानगर व विजापूर घेतो, संभाजी मृत्यु, राजाराम मंचकारोहण ह्या चाऱ्ही प्रसंगांच्या कालाचा बखरींत व खंडांत सारखाच उल्लेख आहे. पहिल्या दोन्ही प्रसंगांचे काल दोन्ही ठिकाणीं चुकीचेच सांगितले आहेत. पण त्या चुकींतहि दोघांचें ऐक्य आहे. भागानगर श. १६०५ मध्यें व विजापूर श. १६११ शुक्ल संवत्सरीं घेतले असें दोन्ही स्थलीं नुसता शकांक व शकांकाबरोबर संवत्सराचें नांव देऊन सांगितलें आहे. वस्तुतः श. १६०७ च्या कार्तिकांत (१६८५ आक्टो. १९) कुतुबशाही नष्ट केली आणि विजापूरचें राज्य श. १६०८ आश्विन शु. ६ म्ह. १६८६ सप्टं. १३ ला औरंगजेबाचें आधीन झालें. म्हणजे बखरींत व टिपणांत अनुक्रमें दोन व तीन वर्षांची आधीं व नंतर अशी चूक झाली आहे. तिसऱ्या प्रसंगाचें वर्ष व संवत्सरनांव दोहींकडे (श. १६१० विभव) सारखेंच आलें असून चवथ्या प्रसंगाचा शक महिना पक्षतिथी (श. १६०२ वैशाख व. ३) असा काल दिला आहे. तोहि दोहींकडे तसाच आहे. ह्या काल-निर्देशांत जेधे शकावलींतल्याप्रमाणें (शि. च. प्र.) वद्यच्या जागीं शुद्ध एवढा बदल पाहिजे. बाकी वद्य हाहिपक्ष त्याच पुस्तकांत पृ. ५३ वर दिला आहे.

शाहूचा जन्मशक टिपणांत १६०२ एवढाच दिला आहे आणि बखरींत रौद्रसंवत्सर मार्ग शु. १० असा थोडासा पुरता दिला आहे. व हाच शि. च. प्र. त त्याच पृष्ठावर सांगितला आहे. परंतु हा शाहूच्या जन्माचा शक वगैरे सर्व काल बरोबर नाहीं. श. १६०४ वैशाख वद्य ७ गुरुवार हाच शाहूचा जन्म दिन बरोबर आहे. बखरींत संभाजीचा राज्याभिषेक श. १६०२ माघ शु. १० गुरुवारीं झाला असें म्हटलें आहे. टिपणांत वार दिला नाहीं आणि संवत्सराचें नांव दुर्मती हें पुढलें दिलें आहे, तें चूक आहे. पण बखरींतील हा सिंहासनारोहणाचा दिवस तीन दिवसांनीं पुढला सांगितला आहे. जेधे शकावलींत माघ शु. ७–१६८१ जाने. १६ ही मिती दिली आहे. सिंहासनारोहणाचा हा विधी तीन दिवस चालला असावा. विनायक शांति, पुरंदरशांति, होम, हवन, तुलादान इत्यादि धार्मिक कर्मे ह्या राज्याभिषेकांगभूत झालीं व व त्यामुळें लागलेले तीन दिवस सप्तमी ते दशमी असे धरले गेले असावे, असें म्हणतां येईल. ह्याप्रमाणें चिटणीसांची चरित्ररूप बखर व रा. खं. १५ मधील टिपणयादी ह्या दोन्ही ठिकाणीं संभाजी चरित्रांतील म्हणून जे कालयुक्त प्रसंग आले त्यांचा विचार केल्यानंतर केवळ बखरींत जे आणखी चार कालनिर्दिष्ट प्रसंग आले आहेत त्यांचा विचार करूं.

संभाजीराजे शिवाजीराजे मृत्यु पावले तेव्हां पन्हाळागडावर होते. पन्हाळयाहून ते रायगडीं केव्हां आले ह्याविषयीं बखरीमध्यें पृ. ५ वर 'आषाढ शुद्ध द्वितियेस किल्ल्यावर येऊन याप्रमाणें बंदोबस्त केला', असें वाक्य आलें आहे. हीच मिती शिवचरित्रप्रदीपांत पृ. ३० व ५३ वरील दोन्ही शकावलींत आली आहे. पन्हाळयाहून रायगडास जातांना संभाजीची मनस्थिति–आपल्याविरुद्ध अष्टप्रधानांपैकीं प्रधानच आहेत आणि त्यांचा विचार आपल्याला छत्रपतीची गादी मिळूं न देण्याचा आहे. अर्थात् झगडा करावा लागणार. एकंदरींत, आपल्यावरील काहुराची व त्याबरोबर जबाबदारीची जाणीव उत्पन्न होऊन तो संतप्त तर झालाच पण धर्मप्रवणहि झाला आणि ह्या वेळीं संतमहंत साधु अशांचा आपल्याला आशीर्वाद असावा व त्यायोगेंहि धीर मिळावा–असें वाटणारी झाली होती. व असें होणें सहज आहे. आणि ह्यासाठीं पन्हाळासोडल्यानंतर रायगडास जातांना वाटेंत संभाजीनें कांहींचीं दर्शनें घेतलीं असावी, कांहीं वतस्थ व अनुष्ठानी मंडळींच्या गांठीहि घेतल्या. व त्याचें एक उदाहरण, श. १६०२ ज्येष्ठ वद्य १, २ म्ह. १६८० जून ३ ह्या दिवशीची अग्रहार पुनः चालू केयाची जी सनद ले. २ ही छापली आहे, त्यांत मिळतें. संभाजी आषाढ शु. २ स रायगडीं पोचला व ही सनद त्यापूर्वी पंधरा दिवसांची आहे. त्यांत स्पष्ट म्हटलें आहे की, 'पन्हाळीहून रायगडावर जातांना रा. स्वामी रा. गोसावी म्हणजे मल्हार गोसावी सदाव्रती ह्यास भेटले, संभा-

षण प्रसंग झाला. बहुत प्रामाणिक ईश्वरभक्त पाहून बंद केलेला अग्रहारगांव चालवावा ऐसा इत्यर्थ करून तो दिला.' पुढेंहि म्हणजे रायगडचा बंदोबस्त झाल्यावर नागपंचमीस मंचकारोहणविधि उरकल्यानंतर व राज्याभिषेक होण्याच्या आधीं मुद्दाम संभाजी असेंच कांहीच्या दर्शनास गेला व तेथें आठवडाभर राहून परत आला असेंहि बखरींत सांगितलें आहे. व त्याचा काल कार्तीक मासी एवढाच दिला आहे. ह्या मंचकारोहणाची मितिहि जेधे शकावलीशी अगदीं जुळती आहे. बखरींतील दहावा कालयुक्त प्रसंग समर्थ रामदास स्वामी ह्यांचा निर्याणदिन हा बरोबर सांगितला आहे. सारांश, बखरींत आलेल्या दहा कालनिर्दिष्ट प्रसंगापैकीं चुकीचे ३, बरोबर ४, सामान्यतः बरोबर २ व एक नवीन असे आहेत. बखर लिहितांना जीं टिपणें मल्हार-रावांनीं जमविली होतीं त्यांतील एक रा. खं. १५ ले. ३०१ हें असून तसेंच दुसरें शि. च. प्रदीप पृ ५३ वर आलेलें टिपणहि असावें. असो.

ह्या बखरीची एवढी चिकित्सा अशासाठीं केली कीं, हीच एक बखर संभाजी राजे ह्यांची त्यातल्या त्यांत संमत अशी आहे. महाराष्ट्र साम्राज्याच्या बखरींत पृ. ४९ ते ६३ पानांवर संभाजीविषयक मजकूर आहे; तसेंच शेड-गांवकर बखरींतहि संभाजीची माहिती आली आहे. पण ह्या सर्वांत महाराष्ट्रांचे आधुनिक सौनी जे मल्हारराव चिटणीस ह्यांचीच बखर अभ्यासिण्याजोगी आहे. मल्हार रामरावांनीं लगेच राजराम छत्रपतींचेंहि चरित्र असेंच लिहिलें व तें संभाजी चरित्रापेक्षां अधिक विस्तृत, आपुलकीनें व अधिक आदर उत्पन्न करणारें असें चित्रित केलें आहे. ह्या संभाजीच्या चिटणिस लिखित चरित्रांत वर जो दक्षिणीपक्ष व त्याचें राजकारण ह्याची चर्चा केली व त्याचीच वाढ औरंगजेब पुत्र अकबर व त्याचा सहाय्यक दुर्गादास राठोड ह्यांच्या येऊन मिळण्यानें झाली, असें जे लिहिलें त्याचा निसुटता उल्लेख, आपण सर्व मिळून सारी फौज गोळा करून पातशहावरी जावें, इत्यादि सांगत असतां 'थोरली मसलत' ह्या शब्दानीं चिटणिसांनीं केला आहे. रघुनाथपंत हणमंते हा जरा खालीं दक्षिणेंत राहणारा, संभाजीच्या जवळच्या लोकांपासून दूरस्थ व त्यामुळें तटस्थाच्या भूमिकेवरून बोलणारा, ह्याच्याच सांगण्यावरून जगदेव किल्ला बाळाजी कृष्ण ह्या दुर्गाधिकाऱ्यानें मुसलमानी फौजेशीं लढून आपल्या हस्त-गत केला. हा किल्ला कर्नाटक प्रांताच्या पूर्वेस नंदीनामक पर्वतावर मोठ्या माऱ्याच्या जागीं अगदीं नाक्यावर मजबूत असा बांधविला होता. त्या रघुनाथ पंडितामार्फत अदिलशाही व कुतबशाही त्यांचेंहि राजकारण संभाजीकडे आलें होतें. पण हें राजकारण, ही थोरली मसलत संभाजीस पेलली नाहीं, हें खरें. परी मधून मधून 'मोगल गनिमाचा तो

'गुमान काय, कापूनच काढतो,' 'दो दिवसाचे मोगल,' मुसलमानांचा हात घेतला तरच आलेल्या सुलतानी संकटांतून मी वांचेन वा वाचावें असें मला वाटत नाहीं, इत्यादि संभाजी झटक्यासरशी उद्‍गार काढतो, तरी आलेल्या संकटाच्या मानानें जी एक तेवढीच मोठीं मसलत उभारून त्या संकटास तोंड देणें हें संभाजीच्या हातून घडलें नाहीं. व 'एकेकाचीं घरें बुडवीत सर्वांचाच नाश हा पातशहा करील' असें जें म्हटलें आहे तेंच घडून आलें, आणि हा दक्षिणी पक्ष औरंगजेबाच्या अपेक्षेप्रमाणें ह्या वेळीं नष्ट झाला. तात्पर्य, हिंदु-मुसलमानांच्या एकीच्या आड परदेशी मग ते मुसलमान असोत वा अन्य कोणी हिंदुस्थानबाह्य असोत, कसे येतात; तसेंच, पूर्ण स्वावलंबी आणि आपल्याच ठिकाणीं सर्वांगानें दृढ व दूरांदेशी राजकारणी दृष्टीनें परिपूर्ण नसण्यानें अभ्युदय जो तो कसा खंडित होऊन आपण खोट्या परमार्थ साधनाकडे किंवा नेभळेपणाच्या पोटीं उद्‍भवलेल्या तकलुपी सौजन्याकडे अथवा व्यापकतेकडे कां झुकतो आणि फार झालें तर शेवटीं उच्च अशा भावनावेगानें आत्मार्पण करून कांहीं लौकिक संभाळण्याचा यत्न कसा करतो; तें येथें चांगलें कळून येतें.

पे. द. ३९ ले. १३८ मध्यें भगवंतराव प्रतिनिधींनीं त्यांना देशकुलकर्ण्यांनें विदित केली ती माहिती देतांना सांगितलें कीं, 'संभाजीस नावडी येथें पकडलें (इ. स. १७७१). ह्यातांपर्यंत आपण संगमेश्वर समजत होतों. हें गांव संगमेश्वर ता०त आहे. बारीक पाहण्यानें असे उल्लेख आढळतात. तसेंच संभाजीकालीन कोणचें वाङ्मय बनलें हें दर्शित करण्याचा विचार होता; तसे कांहीं उल्लेख दिलेहि. ह्या कामीं उतारे घेतले ते व ज्यांत उतारे आढळले नाहींत पण पाहावें लागले ते ग्रंथ तितकेच आहेत. असो. मं.तील इतर सर्व नित्यनैमित्तिक कामें संभाळून ह्या पुस्तकाचें काम त्यांतल्या त्यांत समाधान मानून केलें आहे. मं.नें व सर्वांनीं मानून घ्यावें.

ह्या संभाजीकालीन पत्रसार-संग्रहांत जी शकावली जोडली आहे त्यांतील हालचाली व त्यांचा काल ह्याचीहि चर्चा आणखी कांहीं प्रसंगापुरती तरी करावयास पाहिजे. व त्यासाठीं औरंगजेबनामा, हदिकत उलअलम् इत्यादि ग्रंथांतून आलेल्या कालनिर्दिष्ट प्रसंगाशीं तुलना करून निश्चिती केली पाहिजे. पण सध्यां झालें एवढेंच पुढें मांडून तूर्त विराम घेतों.

* * *

ह्या ग्रंथाचें सर्व काम अगदीं एकाकी झालें असलें तरी ह्या कामीं सहाय्य केलें त्या सर्वांचाच मी आभारी आहे.

शंकर नारायण वत्स जोशी

ग्रंथसंक्षेप

ह्या संभाजी कालीन पत्रसारसंग्रहांत ज्या ऐ. साधन ग्रंथांतील पत्रें सार-रूपानें घेतलीं आहेत ते ग्रंथ लेखांकाच्या डाव्या अंगास कंसांत संक्षेपानें दर्शित केलें आहे. त्या ग्रंथनाम–संक्षेपाची स्पष्टता पुढें अकारादि क्रमानें दिली आहे.

आठल्ये घ. इ. = आठल्ये घराण्याचा इतिहास.

इ. वृ. = इतिवृत्त भा. इ. सं. मं. प्रकाशन वार्षिक इतिवृत्त श. १८३२ ते ३८

इ. सं. गो. इ. सा. = इतिहास संग्रह मासिकांतील गोमंतकाच्या इतिहासाचीं साधनें.

इ. सं. पे. द. मा. = इतिहास संग्रह मासिकांतील पेशवे दप्तरांतील सनदा-पत्रांतील माहिती.

ए. पि. कर्ना = एपिग्राफिका कर्नाटिका व्हॉ.

ऐ. फा. सा. = ऐतिहासिक फारसी साहित्य भा. इ. सं. मं. प्रकाशन.

ऐ. सं. सा. = ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १ ते ७ भा. इ. सं. मं. प्रकाशन

का. पत्रेंयादी = काव्येतिहास संग्रहांतील पत्रें यादी 'चित्रशाळा आवृत्ति'

कों. इ. सा. = कोंकणच्या इतिहासाचीं साधनें

खं. = रा. खं. पहा

त्रै. व. = त्रैमासीक भा. इ. सं. मं. चें वर्ष १–३०

पुरुषार्थ मासिक सातवळेकर श्री. दा., पारडी (जि. सुरत)

पे. द. = पेशवे दप्तर एलिनेशन ऑफीस व पुणादप्तर या मधील निवडलेले कागद–सरकार प्रकाशित ग्रंथ.

रा. खं. = मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ते २६ हे सर्व वि. का. राजवाडे यांनीं संपादित केलेले आहेत.

राम. दासी. = रामदास रामदासी ग्रंथ माला सत्कार्योत्तेजक सभेचें प्रकाशन. धुळे,

लेखनालंकार = श्री. पां. मा. ऊर्फ आबा चांदोरकर व श्री. आ. बा. नावडे-कर प्रकाशित ग्रंथ.

शि. च. सा. = शिवचरित्र साहित्य खंड १ ते ९ भा. इ. सं. मं. चें प्रकाशन

श्रीसांप्र.का. = श्रीसमर्थ सांप्रदायाचीं कागदपत्रें, रामदास रामदासी ग्रंथमालेचे भाग

सनदापत्रें = पुरुषोत्तम विश्राम मावजी व रा. ब. द. ब. पारसनीस संपादित.

साधन चिकित्सा–वा. सि. बेंद्रेकृत

सां. सं. इ. = सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

विषयसूची

ह्या संभाजी का. प. सा. संग्रहांत जीं पत्रें साररूपानें घेतलीं आहेत त्यांत आलेल्या व्यक्तिस्थलनामांची सूची ग्रंथाचे शेवटीं दिली आहे. पण अभ्यासकांस ह्या विशेषनामांइतकीच किंबहुना त्याहून अधिक प्रमाणांत त्या ऐ. पत्रांतून आलेल्या अनेक विषयोल्लेखांचीहि आवश्यकता असते. उदा० पत्रांतून आलेला व्याजाचा दर, जकात, प्रायश्चित्त, नाणीं, कपडे, शस्त्रें, जासूद, शारीरिक व्याधी व त्यावरील उपचार. सती, भाषा, धर्मादाय, कर्ज-वसुली, जमीन मोजणी, दुष्काळ, अवर्षणें, लूट, न्यायनिवाडे, वाटण्या, बाजार, व्यापार, इत्यादि इत्यादि इतिहासकालीन सर्व. प्रकारच्या लोक-व्यवहाराची वा राज्यंव्यवहाराचीहि माहिती पाहिजे असते. व त्यासाठीं ठोकळ विषयसूची पुढें दिलेली आहे. अभ्यासकांच्या सूक्ष्मतेनुसार इतरहि अनेक विषय-प्रकार आढळून येतील. येथें सामान्येकरून विषयांचें दिग्दर्शन केलें आहे. नांवा-पुढील आंकडा लेखांकाचा आहे.

संभाजीकालीन शकवार पत्रसंख्या

शक	लेखांक		शक	लेखांक	
१६०२	१—३५	(३५)	१६०३	३६–५७,६३,८२	(२४)
१६०४	५८—८८	(३१)	१६०५	८९–१२०	(३२)
१६०६	१२१–१४४	(२४)	१६०७	१४५–१८८	(४२)
१६०८	१८९–२१८	(३०)	१६०९	२१९–२५६	(३७)
१६१०	२५५–२९५	(३८)	१६११	२९४–९६–२९८	(४)

संभाजीकालीन अधिकारी

पुढील यादींत प्रथम गांवाचें नांव देऊन गांवाचा इ० विशेष म्हणजे तर्फ, परगणा, प्रांत, मामला इ. सांगून त्यापुढें त्या गांवावरील अधिकाऱ्याचें नांव दिलें आहे; आणि त्यापुढें त्या अधिकाऱ्याचा हुद्दा दर्शित करून शककाल दिला आहे. तसेंच तो अधिकारी अदिलशाहींतील किंवा औरंगजेबाकडील म्ह० मोगली असल्यास तें नांव सुचविलें आहे. कांहींच दिलें नाहीं तो अधिकारी स्वराज्यांतील म्ह० संभाजीकडील समजावा.

अजिरेतर्फ—नारो राम सुभेदार महाला निहाय श. १६०४

अथणी—महमद सुभेदार अदि० अंमलदार श. १६०५

अहमदनगर सरकार—महमदशरीफ करोडी = जकात अमलदार श. १६०९

अहिवंतगड—शामजी केशव दप्तरदार श. १६०७

इंदापूर पा—नागोजी बलाळ मुख्य दे० री श. १६०२, १६०३

कडेवलीत पर०—येतमादखान मोगली अंमलदार श. १६०६

कऱ्हाड—भानजी गोपाळ देशाधिकारी श. १६०२-०६, प्रांत-कोनेर रंगनाथ मुख्य दे०री १६०७, बायाजी भास्कर १६०४, रंगो विश्वनाथ श. १६०६-०७—वेंकाजी रुद्र

कुडाळ—गणोराम दे०री श. १६०२-०३, अबुल मुजाफर अदि० श. १६०५, प्रांत भानजी गोपाळ सुभेदार श. १६०६, जिवाजी राम चिटनिवीस श. १६०६, नीलकंठ नारायण दे०री श. १६०८

कोपलप्रांत—रखमाजी बाबाजी सुभेदार महालानिहाये श. १६०८

गदग पर०—प्रांत गोविंद रघुनाथ सुभेदार श. १६०७-०८

चेऊल मामला—नरसो गुरो सुभेदार श. १६०८—विसाजी कुमदेव सुभेदार श. १६१०, येसजी फर्जंद, —रामाजी महादेव हवालदार सरदेसमुख श. १६०९,—यशवंतराव अनंत सुभेदार श. १६०७-०८,—सूर्याजी प्रभु श. १६०७-०८, मुजुम०—सुभेदार तिमाजी व्यंकटेश १६०३—सरसुभेदार तुळजोजी १६०८,—हरि शिवदेव सुभेदार महालानिहाय श. १६०६ —रंगाजी सबनीस श. १६०६ —बहिरो त्रिमल सुभे०, रायाजी सदक प्रभु हवालदार श. १६०७ —राघाजी सदक प्रभु हवालदार— राघो विश्वनाथ सुभे० श. १६०४ चिमणाजी आऊजी १६०५-०७

जगदेवगड—बाळाजी कृष्ण श. १६०२

जाऊली—काशी रंगनाथ श. १६०२, प्रांत—बायाजी भास्कर दे०री

प्रांत—विठ्ठल शंकर श. १६०५, प्रांत—गोविंद पुर्षोत्तम सुभेदार श. १६०७

जामखेड पा—अमानतखान दिवाण मोगली अंमलदार श. १६०३

तुंडील ता—रामाजी आपाजी हवालदार श. १६०२ मोगली अमल०

तेरदालपरगणे-भगवंतराव सुभे.कार० १६०५ मोगल अंमल.-खैरतखान मोगली अंमल शिद्दी १६०५

दौंडज मौ—हवाले मोकदमी बहिरो बावाजी श. १६०३

धाराशीव परगणा-असदखान मोगल अंमलदार श. १६०६

नाचणगांव परगणा—अमानतखान मोगल अंमलदार, श. १६०५

पारनेर पर०—अबदुल करीम फौजदार मोगली अंमलदार श.१६०४

पुणेपरगणे—काकडखान फौजदार श. १६०९-श्रीयाजी शिवप्रभु हवालदार श. १६१०—विनायक उमाजी देशाधि० श. १६०२ व श. १६०३-१६०५ सुभे बाबाजी तानदेऊ श. १६०६—दामाजी रघुनाथ सरसुभेदार मानिहाये श. १६०४

पुरंधर—कोंडाजी दामोदर सबनीस श. १६०५, बाजी घोलप हवालदार,मुद्राधारी व कार०१६०८ —१० कृष्णाजी गोविंद अजहत सबनिस व चिटणीस दिवाण. पंताजीपंत वोकील श. १६०५—कोंडाजी भोसले सर हवालदार हमारती श. १६०८ नेतोजीराजे पालकर हवालदार

प्रचंडगड—रघोजी अहीरराऊ मुद्राधारी श.१६०३-रायाजी तोडकरी हवालदार व कार० श. १६१० —विठाजी माणकेश्वर मुतालीक सबनीस श. १६१०

फोंडा—प्रांत कुडाळ व महालानिहाय प्रांत मामले धर्माजी नागनाथ सरसुभेदार मुख्य देशारी श. १६०२ —०५— ज्ञानलिंगयन सुभेदार वरिगे दबवई श. १६०८

बदामी किल्ला—श्रीनिवास वेंकटाध्वरी नाडगौडा १६०२ (बादामी ऊर्फ) शिकंदरगड पहा

बसवपटणकिल्ला—गाझीबेग किल्लेदार श. १६१०

बहादुरबिंडा किल्ला—गणेश रघुनाथ व कासी त्रिमल सबनीस १६१०

बंकापूर मामले—मकबुलखान सुभे० महालानिहाय श. १६०७

बारामती तर्फ—हणमंतराव ठाणेदार श. १६०९

भुबनलगड प्रांत—चांदो नारायण सुभेहाय श. १६०७

मलकापूर—जगन्नाथ वैजाजी देशारी श. १६०२ —बापूजी त्रिंबक देशारी श. १६०४

मुधोळ—बाळोजी राजे कदम सुभेदार व कार० श.१६०५ अदिल० अंमलदार

राजापूर प्रांत—गंगाजी दादाजी सुभे० श. १६०९

रायगड—दप्तरदार राघो स्वानंद

—बापोजी दिवाकर चिमणगांवकर १६०२–१०
रोहिडा—शिदोजी बाघव हवालदार श. १६०७
लांबगाऊप्रांत–बालाजी भास्कर दे०री श. १६०३
वाईप्रांत—येसाजी मल्हार देशरी व देशक श. १६०२–०४ व १६०९–१० —अंताजी संबदेव देशरी श. १६०७
विचित्रगड—हवालदार संताजी निंबाळकर मुद्राधारी १६०७
विशाळगड—मल्हार रंगनाथ पोतदार श. १६०४
विंझर—गदाजी प्रभु मुजुमदार व केशो राम हवालदार १६०४
शिकंदर – बदामी – किल्ला – शिवाजी विठल मुजुमदार श. १६०७
शिराळे—कृष्णाजी भास्कर श. १६०२
सज्जनगड— मुद्राधारी–जिजोजी काटकर श. १६०४
संगमनेर पर.—अमानतखान(मोगली अंमलदार) १६०२ तर्फ—येसाजी गोविंद सरसुभेदार श. १६०८
सातारा—तर्फ, सुभा महालानिहाय प्रांत—कोनेर रंगनाथ दे०री श. १६०२ सर सुभेदार—अंबाजी मोरदेव श. १६०५–०७
सासवड का—अंताजी गोविंद हवादार व कार० १६०५
सिंहगड—मोरो भास्कर कारखानीस श. १६०९
सुधागड तर्फ सुभाकिलेहाय–जिवाजी हरि सुभेदार० श. १६०८
सुपे परगणा—नागोजी बल्लाळ मुख्य देशाधिकारी श. १६०२–०३
सोनटसोलसे—मुकुंद शंकर हवालदार व कारकून श. १६०१

संभाजीकालीन पत्र-सार-संग्रह

रा. खं. २६ ले. ४३ जुलूस २३ रखर १३	(१)	श. १६०२ वैशाख शु. १५ इ. १६८० मे ३

अबदुल्ला वल्द अहमद जात शेखजादा, राहणार बलन, रंग तांबूस, पसरट कपाळ, अरुंद भोवया, काळे डोळे, नाक सरळ, उंच, दाढी व मिशा काळया, गालावर एक जखम उजवीकडे–इसम बरोबर आहे व मोहर तपासणी झाली. शिवाय घोडेस्वार, पायदळ, व रजपूत यांची यादी. घोड्यांचें वर्णन (भांबोरेकर भोसले दप्तर–राजरूप वल्द सयाजी याचे नायब, मनसबदार व अधिकारी)

सनदापत्रें पृ. १३५ राजशक ७ रौद्र सु. १०८१ जवल १५	(२)	श. १६०२ ज्येष्ठ वद्य १–२ इ. १६८० जून ३ गुरु.

राजा शंभु छत्रपती—भानजी गोपाळ देशाधिकारी व देशलेखक सांप्रत व भावी प्रांत कराड.

वे. रा. मल्हार गोसावी सदाव्रती गोसावी वस्ती नाडोली तर्फ मारुल प्रां. कऱ्हाड हा गांव पहिलेपासून अग्रहार असतां कै. स्वामीनी कांहीं दिवस अमान्य केलें होतें कीं हे रीति आपले राज्यांत चलिली नाहीं. यावरी, स्वामी रा. गोसावी याचे भेटीस मौजे कोरटीस पन्हाळीहून रायगडाधर जातांना भेटलें. संभाषण प्रसंग झाला. पाहातां बहुत प्रामाणिक ईश्वरभक्त. यावरून गांव अग्रहार चालवावा ऐसा इत्यर्थ करून तो दिला. कुल गोसावी यांसी दुमाला करणें. ते गावी तुम्ही कांहीं घ्यावयासी गरज नाहीं. उजूर व हरकत न करणें. लेखनालंकार.

एपि. कर्ना १० चिकबाळा. ३२	(३) शिलालेख	श. १६०२ श्रावण शु. ६ इ. १६८० जुलै २१

रौद्र संवत्सरीं शिवछत्रपतीचा पुत्र संभाजीराजा येथें चिक–बाळापुरीं राज्यांत–राज्य करीत होता. त्यावेळीं बाळाजी कृष्ण हा जगदेव किल्याचा दुर्गाधिकारी होता. त्यानें रघुनाथपंडिताच्या आज्ञेवरून नंदी किल्याचा

अधिकार आपल्याकडे घेतला. सदर किल्ला घेण्याकरितां म्लेन्छ मोठी फौज घेऊन आले पण त्यांचा पराभव झाला. (शि. प. सा. सं. ३-२७-८७)

एपि. कर्ना १०
मुळबागळ ११७ (४) श. १६०२ श्रावण शु. १५
शक इ. १६८० जुलै ३१

(उत्तनूर-मडीवाल शिलालेख)

रा. संभाजी छत्रपती यांनीं कोलालच्या कारकुनास आज्ञा केली कीं चन्नभट्ट यांचा पुत्र व्यंकटेशशास्त्री यास उत्तनूर मडीवाळ बक्षीस दिले. (शि. प. सा. सं. ३-२७८८)

पे. द. ३१ ले. ४२ (५) श. १६०२ भाद्रपद शु. ५
राज शक ७ रौद्र गुरुवार इ. १६८० आगष्ट १९

राजा शंभु छत्रपती—विनायक चमाजी देशाधिकारी प्रांत पुणें

तुकोबा गोसावी याचे पुत्र महादोबा वस्ती देहू यास वर्षासनाची मोईन होन पातशाही एक, लुगडियाबदल गला जोरी बारुले महाळमापे खंडी १ मोईन आहे. ते सालमजकुरापासून सुमेमजकुरावरी देविली आहे.

रा. खं. २० ले. २८१
राजशक ७ रौद्र इंदुवार (६) श. १६०२ आश्वीन शु. १
साबान २९ इ. १६८० सप्टं. १३

शंभु छत्रपती—गणो राम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ

पाटगांव-मौनी गोसावी ईस्वरपुरुष आहेत. त्यास पालखीस भोई व वाजंत्री पाहिजे. त्यास निशाणी होन १२५ त्यांचे शिष्य तुरुतगिरी त्यांजवळ देणें. वाजंत्रीयास वर्षास २५ होन, उरले १०० होन भोई यास. गोसावी कुशल असत तो ठेवीत जाणें. तियास वतावटाव माफ असे.

शि. च. सा. ४ ले. ७३६ (७) श. १६०२ आश्वीन शु. १
राज श. ७ रौद्र. इंदुवासर इ. १६८० सप्टं. १३

राजा शंभु छत्रपती—गणो राम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ

तुम्ही हुजूर येऊन विनंती केली की, मौनी गोसावी पाटगावी राहतात बहुत थोर ईश्वरपुरुष आहे. (खं. २० ले. २८१ प्रमाणें. म्ह. क्रमांक ६ पहा.)

साधनचिकित्सा पृ.२८५-२८६ } (८) { श.१६०२ आश्वीन शु.१०
लेखनालंकार पृ. ३३ } { इ. १६८० सप्टं. २३

छत्रपती संभाजीचें दानपत्र. तुळजापूरच्या देवीस शृंगारकेला इत्ती, सालंकार पांच घोडे व २० सहस्र होनांचें वार्षिक दान दिलें आहे. (संस्कृत)

सनदा पत्रें पृ. २९ } (९) { श. १६०२ आश्विन वद्य ३०
सु. १०८१ रम २८ } { इ. १६८० आक्टो. ११

मालोजीराव घोरपडे—कारकून व देसाई परगणे कैलूर ममदाबाद

मुद्गल येथील श्रीनिवासभट वेंकटभट यांनीं हुजूर येऊन सांगितलें कीं, कसबे होनगुंदे, तिमापूर, कलदेव नहाल, बेवीनमोर्टी येथील जमीन ८४ आणि जकातपैकी रोजमुरा बारा रुके, ।·, वैशाख, कार्तिक माघ मासी शेला १ आणि रामवाडिगी जमीन कुडो ८= येणें प्रमाणें चालत आहे. शिवाय, इतर सात पत्र्या साल गुदस्त चालत आहे. हल्लीं साहेबास मोकासा अर्जानी जाला आहे. तरी सालगुा प्रमाणें चालवावें.

श्रीसांप्र. ले. ३५ } (१०) { श. १६०२ कार्तीक शु. ६
राजशक ७ रौद्र इंदु. } { इ. १६८० आक्टो. १८
सु. १०८१ सौवाल ४ }

राजा शंभु छत्रपती—काशी रंगनाथ देशी व देशक प्रांत जाउली

रा. रामदास गोसावी यांस श्री रघुनाथ देव वास्तव्य कसबे चाफळ यांस प्रत्यही पूजेनिमित्त व नैवेद्यास व देवाच्या सेवकास मोईन बाा सनद रा. कै. स्वामीनी श. १५९७ वर्ष प्रतिपदेस दिली ती दर माहे होन पातशाही २५ व दरोज वजन टकवंदी १७॥ शेर ९ टांक आणि नख्त खुर्दा येक रास पेशजीपासून चालत आहे ते चाळविणे असल पत्र दिवाकर गोसावी यापासी देणे. मुशाहिरा निवळ देणे.

श्रीसां. १ ले. ३४ } (११) { श. १६०२ कार्तीक शु. ६
राज शक ७ रौद्र. इंदुवासर } { इ. १६८० आक्टो. १८
सु. १०८१ सवाल ४ }

राजा शंभु छत्रपती—काशी रंगनाथ देशी व देशक प्रांत जाउली

रा. रामदास गोसावी यांस अतीत अभ्यागत आदि नित्यनैमित्तिक चालिले पाहिजे म्हणौन तीर्थस्वरूप कै. स्वामीनें (श. १५९७ चैत्र शु. १) मोईन ८१॥९॥४॥ येक मण २९ शेर साडेचार टाक दर माहे ३ शेर, पाने

रोज ५०० व दुभती म्हैस एक रास प्रो दिले ते चालत आहे तसे चालविणें. म्हैस दुभेल तोवरी ती, ती उडालियाउपर दुसरी देणें. १॥ शेर तेल नंदादीपास नव्हे, गोसावियाकडे समुदायास देत जाणें. पूर्वी जावलीमुध्यातून फाटी, गवत पावत होते. हाली सातारा मुम्यांतून देविले असे. तरी तुम्ही नेदणे. सामग्रीचे लग पडो नेदणे. व श्रीकडे एक हरकारा हुजरून पहिल्यापासून विल्हा आहे त्यास होनपा। २ वेतन देऊन ते धर्मादाऊ म्हणोन लिहून पाववीत जाणें.

श्रीसां. का. १ ले. ३३ रा. श. ७ इंदुवासर सु. १०८१ सवाल ४	(१२)	श. १६०२ कार्तीक शु. ६ इ. १६८० आक्टो. १८

राजा शंभु छत्रपती—जगन्नाथ वैजाजी देशाधिकारी व देशलेखक प्रांत मलकापूर

रा. रामदास गोसावी यांचे इनाम प्रांत मजकुरी आहेत. गोसावियानी श्री हणमंत देवाची प्रतिष्ठा चाफलियामधे केली आहे व वे. रघुनाथ भट वसिष्ठ गोत्री याजकडे देवतार्चन आहे. यांस नवेदानिमित्य व दीपास व किरकोळ उपसाहित्यास देविले बा। सनदा आनाजीपंत सिराले ठिकाणे २ रकम ५०–(नाटोली सेत २५ वेणावाई सेत २५) टके; व मौजे वांकुरडे ता। शिराले मौजे विळासी ता। वारुण येथील इनाम चालविणे.

श्रीसां. का. ले. ३२ राजशक ७ इंदुवासर सु. १०८१ सवाल ४	(१३)	श. १६०२ कार्तीक शु. ६ इ. १६८० आक्टो. १८

राजा शंभु छत्रपती—भानजी गोपाळ देशाधिकारी व देशलेखक प्रांत कऱ्हाड

कसबे चाफळ येथें श्री रघुनाथ देवस्वामी आहेत. प्रतिवर्षी रामनवमी मोहत्साये करावया (शि. प. सा. ले. १९७२) होन पा। ११ खुर्दा टके १५० व गला महालमापे १७॥ मण ३ पायली व वजन टकवंदी १८ मण ९॥ शेर व कापड १४ सनगे व विडे पाने ११ हजार दिले. ते चालत आहे तसें चालवणे. कापड गैरकिमतीची म्हणोन म्हणजे मोघम हें कसें. तर पा। होन ११॥ चीं द्यावी तरी गुदस्ताच्या किमतीची देणें. खेरीज दशमीचे दिवशीं १२१ ब्राह्मणभोजन रुके ८४ सुमेमारी चालत आहे तसें देउन देवाचा मोहोत्साव चालवीत जाणे.

ऐ. फा. सा. ३ ले. ८५
हि. १०९१ सव्वाल ४
सु. १०८१
(१४)
श. १६०२ कार्तीक शु. ६
इ. १६८० आक्टो. १८

सिकंदर अदिलशाह—श्रीनिवास वेंकटाधरी देसाई परगणे गदग व नाडगोंडा किल्ले बदामी.

ह्या किल्ल्यापैकी सिद्दी सालिम याचे बाबतींतील मूळ हा गांव ह्या किल्ल्याच्या नाडगौडकीबद्दल तंबाकु, जकात, इनाम लवाझिमे सोडून महसूल, नकद व इतर बाबींसह इनाम दिला आहे. मध्यस्थी मसऊदखान.

श्रीसां. ले. ३७
राजशक ७ इंदुवासर
(१५)
श. १६०२ कार्तीक शु. ७
इ. १६८० आक्टो. १९

राजा शंभु छत्रपती—वासुदेव बाळकृष्ण

कां चांफळ येथें रामदासस्वामींनी श्री रघुनाथाचें देवालय केलें, तेथें यात्रा भरते, सर्वदाहि मोहत्साय चालतो. यैसियास कटकीचे सिपाई व वरकड कितेक लोक श्रीची मर्यादा चालवीत नाहींत; यात्रेचे लोकास तसवीस देताती, दिवाणवळे कलागती करिताती. तरी यात्रेमधें हीं अगर सर्वदा ही कोणाचा उपद्रव होऊ नेदणे. नाणेघोल तर्फेचे व ते प्रांतीचे कारकून संगीनातीनें जाऊन यात्रा सुखरूप भरे ते करवणे. मुसलमान व हरकोणाचा उपद्रव न लगे ऐसे करून रामदासगोसावी यांचें स्थल हरएकविशी परामृश करणे. सालाबाद चालते तसे चालविणे. श्रीची सिंहासने स्थलोस्थली आहेती, त्यांस पत्रे पाठ- उनू आणवीत जाणे.

श्रीसां. ले. ३६
राजशक ७ रौद्र. भौम.
सुा १०८१ सवाल ५
(१६)
श. १६०२ कार्तीक शु. ७
इ. १६८० आक्टो. १९

राजा शंभु छत्रपती—कोनेर रंगनाथ देशपांडे व देशलेखक सुभा माहाला- निहाये तर्फ सातारा

श्री रघुनाथदेव वास्तव्य चाफळ कर्यात नाणेघोल यासी इनाम म्हणून जे ११ गांव दिले ते देवाच्या नांवे लिहून त्या गांवचें उत्पन्न श्रीचा प्रसाद म्हणून राजगृहीं जमा करावें. त्यापैकीं दर गांवास ११ बिघे अवल जमीन पाणियाखालील पाहून देवणें. वरकड गांवांतील प्रजा राजी राखोन गांव माहा- मूर करावें. दर गांवचे ११ बिघया खेरीजचें उत्पन्न दिवाणांत जमा करावें, एकूण बिघे १८१ (१२१) पैकीं जमा कऱ्हाडमधील ६ गांवे म्हे ६६ बिघे.

बाकी ५ गांवचे ११ प्रमाणें ५५ बिघे शाहापूर, रिसवड, उंबरज, सिरगाऊ, वडीगाऊ या पाच गांवचे दिले असत. याखेरीज येदिलशाहीपासून कदीम इनाम बिघे चवेचाळीस मसूर ११, शाहापूर १२, उबरज ५, सिरगाऊ ११ व कोरटी ५ असे सालमजकुरी अवल सालापासून पेस्तर साल चालवीत जाणे. सुभेमजकुरी खर्च घालीत जाणे. सनद दिवाकर गोसावीयासी देणें

श्रीसां. ले. ३८ राज शक ७ भोमवासर } (१७) { श. १६०२ कार्तिक इ. १६८० आक्टो.

राजा शंभु छत्रपती— भानजी गोपाळ देशाधिकारी व देशलेखक प्रांत कऱ्हाड

(ले. ३६ प्रमाणें म. क्र. १६ पहा व) मौजे शिगणवाडीस इनाम आहे तेथें मठ आहे याकारणे तेथील रयतास वेठ बेगार माफ केली असे. निमित्य की मठास शाकार करणे लागते व बागाची कुंप(ण)कांटी व किरकोळी श्रीकडील कार्यप्रयोजन पडते. व इनामाचे खटपटेस एक लिहिणार ब्राह्मण पेशजी तीर्थस्वरूप कै. स्वामीनें दिल्हा. त्याची वेतन निवल देउनु धर्मादाऊ म्हणौन गोसावियाकडे खर्च लिहिणे व अकराद येक सुभे मजकूरपैकी देऊन त्यास मुशाहिरा हि देणे.

श्रीसां. २ ले. ५५९, ५६० श्री सां. वि वि. पृ. ११४ राजशक ७ रौद्र. भोम्यवासर } (१८) { श. १६०२ कार्तीक शु. ७ इ. स. १६८० आक्टो. १९

राजा शंभु छत्रपती—विनायक उमाजी देशाधिकारी व देशलेखक प्रांत पुणें —येसाजी मल्हार देशाधिकारी व देशलेखक प्रांत वाई

रा. वासुदेव गोसावी वास्तव्य मठ कन्हेरी ता। नीरथडी प्रगणे पुणें. यास जिराईत जमीन ९ कास रुके मौ। मार व बागाईत जमीन पुष्पवाटिकेस मौजे माडिरदे व बिघे ४ व जवलापैकी बिघे ७ दिले असे.

श्रीसां. ले. ४० राजशक ७ सौम्यवासर } (१९) { श. १६०२ कार्तिक शु. १५ इ. १६८० आक्टो. २७

राजा शंभु छत्रपती—कासी रंगनाथ देशाधिकारी देशलेखक प्रांत वाऊली

महाबळेश्वर येथें श्री हणमंतदेव याचे देऊळ पंचगंगेसनिध दिवाकर गोसावी यानी बांधोन प्रतिष्ठा केली. त्यास माजी प्रधान मोरो त्रिमल याणी नंदादीपास, व किरकोळ मोईन ८८४॥४॥ साडेचार शेर साडेचार टाक व

पानें १० व सालिना नख्त टके १४ व वजनी टकबंदी १॥। मण ५ शेर याप्रमाणें मोकाशाचे गाव देविले होते. हली सुभे मजकूरपैकीं देविले.

श्रीसां. ले. ३९ } (२०) { श. १६०२ कार्तिक शु. १५
राज शक ७ बुधवासर } { इ. १६८० आक्टो. २७

राजा शंभु छत्रपती--कोनेर रंगनाथ देशरी देशक प्रात सातारा

सजनगडी श्री गोसावी व श्रीदेव आहेत त्यांस खासा समुदायास व नवेदास २ व १ फाटी व गवत पुले १०० भारे २, कोळसे सेगडीस टकबंदी ८८५ शेर समयाचे समयास देत जाणे लग पडो नेदणें. पावलियाचे प्रति उतर घेणे.

श्रीसां. ले. ४१ } (२१) { श. १६०२ कार्तीक वद्य १
राज. ७ रौद्र. गुरुवासर } { इ. १६८० आक्टो. २८

राजा शंभु छत्रपती—कृष्णाजी भास्कर

श्री सां. ले. ३७ प्रमाणें सर्व मजकूर—म्हणजे वरील क्र. १५ पहा.

शि. च. सा. ३ ले. ५५८ } (२२) { श. १६०२ कार्तीक वद्य ९
राजशक ७ } { इ. १६८० नोव्हें. ४

राजा शंभु छत्रपती—नागोजी बलाल मुख्य देशाधिकारी

रा. मोरेश्वर गोसावी वास्तव्य क्षेत्र मोरगाऊ यांचा इनाम प्रांत (पुणे) मजकुरी आहेत व येविशी कै. स्वामीच्या सनदा (शि. च. सा. ३ ले. ५५४) आहेत तरी लोणी, पणदरे, काझड, सेलगाऊ, जमीन कास टके ७ व दोन चावर रोज टाकसाळी खुर्दा येक टका सा रुका येणेप्रा। इनाम आहे. चालविणे.

शि. च. सा. ३ ले. ५५९ } (२३) { श. १६०२ कार्तीक वद्य ११
राज शक ७ मंदवासर } { इ. १६८० नोव्हे. ६

राजा शंभु छत्रपती—सुमेदार, जुमलेदार व कारकून लष्कर

रा. मोरेश्वर गोसावी वास्तव्य श्री मोरेश्वर ता। कऱ्हेपठार येथें कुटुंबेसी राहाताती. तरी तुम्ही योताजातां त्यांच्या माणसांस सेतापोतास, गुराढोरांस काडीची तसवीस देत नव जाणे.

शि. च. सा. २ ले. ३९०–३९१ } (२४) { श. १६०२ मार्ग. शु. ५
राजशक ७ रौद्र } { इ. १६८० डिसें. १६

शिव (!) छत्रपती—धर्मोजी नागनाथ मुद्राधारी प्रात कुडाळ व महाकालिहाय प्रांत मामले फोंडा

रा. नागोजी नाईक प्रतापराऊ सरदेसाई यांही विनंती केली जे, आपण मामले मजकूरचे सरदेशमूख, वडील घराणेत वडील परंपरा, देसकत चालत आली आहे ते प्रमाणे प्रवर चालवावा. अदलखानी कारकीर्दीस हक वतन इनाम जिरायत व बागायत व मुकासे गाव बिलाकसूर चालत होते. हली मस्ता खंड दर सालीना होन निशाणी ५०० देतात. तेणेकरोन अवकात चालत नाही. महाराजस्वामी कृपालु होऊन वृत्ति दुमाला करून चालवावे. येविशी रा. मल्हार नरजू हरी व रा. नागोजी इंगले हवालदार किले भीमगड याही विनंतीपत्रें लिहिली जे देसाई मशारनिले स्वामीसेवाठायीं बहुत तात्पर्य धरितात. सांप्रत किले मजकूरचे तनखेच्या खेडेयासि तांब्राकडील स्वारी येऊन घोसो लागले ते समई देसाई मशारनिले आपले जमावानसी राहोन व दुसरे देसमुखीकडील जमाव मिलऊन घेऊन मार्ग धरून मर्दानगी करून गनिमास नतीजा देऊन गांव आबादानीस लाविले म्हणून त्यावरून परंपरा वृत्ति करार करून तपे अंतरूज मामले फोंडा, मौ बांदिवडे...सरदेशमुखी महालानिहाय चंद्रवाडी, हेंबाडबारसें, मुकुंद नारायण मुतालीक याचे इनाम देखील बरहुकूम भोगवटा दुमाला केले असे. नागोजीचे वारीस वंशज एकोदर ऐक्यपणें एकत्र असतील तंव त्यांचे आपले सिस्तीप्रमाणें चालवावे. विभक्तीने निराळे होतील तर प्रतिवर्षी दर घराणेस होनु जमा १२५ देऊन वृत्तिपरंपरा चालवणें.

रा. खं. २१ ले. ६८ शक रौद्र.	(२५)	श. १६०२ पौष शु. १० इ. १६८० डिसें. २०

अपदेभट्ट गिजरे—रुद्रभट्ट गिजरे

खंडपत्र दिले जे, तुम्ही वाराणशीहून आलेशी आणि विभाग मागितला. तरी आम्ही तुम्हास भाग दिधला-तपशील, घर, वृत्तीचे धान्य, भांडी, वृत्ति, संहितेचा भाग, देव, लिंग व पश्वादि; पंच घातु ऐसा तृतीय भाग तुमा तुज दिला. सर्वांचा भाग व तोला मासा रुका अडका वडील दादा असता तुमा तुज दिला होता. वृत्तीचे कागदहि तृतीय भाग दिला असे व अणाचा भाग तृतीय दिला. परस्परे कोणाचे कोणा संबंध नाही. यास अन्यथा करील तो देवब्राह्मणाचा अपराधी व पंचमहापातकाचा दोषी. अम्ही आपल्या करभागी अंश आला त्यास आम्ही परसात आपल्या अंशांत गज दोनी पश्चमभागी वाटेकारणे दिले होते. यानंतर दुर्मती संवत्सरी अधिक वद्य १० स पत्र फालिले. दोघे झगडो लागलो मग सभासतानी समजाऊन गज १ देविला वाटेकारणे. गजा वेगली भिंती, सरदेची भिंती, उभयतानी घालावी. यावेगळी पश्चमेची भिंती रुद्रभटाची.

श्रीसां. ले. ४२
शक
(२६)
श, १६०२
इ. १६८०

चाफळच्या रामचंद्र महायात्रेंळची कलह जाहला. कलहमूल निवेदून संदेहवचने ऐकोन आज्ञा झाली ती व्यवस्था–कलमें ३५.

'संभाजीस राज्याभिषेक होण्याचे आधीं सज्जनगडास निमंत्रण विनंती राघो अनंत यांनी केली.'

शि. च. सा. ६ पृ. ६९
रौद्र दुर्मती दुंदुभी
सु० १०८१–१०८३
(२७)
श. १६०२–०४
इ. १६८०–८२

येसाजी मल्हार हा तीन वर्षें सुभेदार होता. (हा शिवाजीच्या कारकीर्दीत श. १५९९ पासून असून १६०१ मध्यें तो बदलला. नंतर त्याच वर्षी माहादाजी सामराज सुभेदार झाले व पुनः १६०२–०४ मध्यें येसाजीकडे सुभेदारी आली. पुढेंहि पुनरपि श. १६०९ व १० मध्यें वाई प्रांतीं येसाजी सुभेदारीवर आहे.)

सनदापत्रें पृ. ५९-६०
(२८)
श. १६०२–११
इ. १६८०–८९

राघोस्वानंद बापोजी दिवाकर चिमणगांवकर संभाजीचे कारकीर्दीत रायगडावरील दफ्तरदार.

ऐ. फा. सा. ३ ले. ३०
हि. १०९१ जिल्हेज २५
(२९)
श. १६०२ पौष वद्य १२
इ. १६८१ जाने ६

सिकंदर अदिलशाह — !

नबाबापाशीं येऊन पादशाही मसलत नीट बजावून स्वतःची निष्ठा व सेवकत्व व्यक्त करावें त्याप्रमाणें उत्कर्ष होईल.

इ. वृ. १८३७ पृ. १४४–४५
इ. वृ. १८३८ पृ. १२७
(३०)
श. १६०२ माघ शु. ७
इ. १६८१ जाने. १६

औरंगजेबाची सर्वांत वडील मुलगी झेबुन्निसा हिला बापानें दिल्लीतच सालिमगड येथें कैदेंत ठेविलें. (ती मुक्त न होतां कैदेंतच पुढें १७०२ मे २६ रोजीं मेली.)

रा. खं. १५ ले. ३०१
दुर्मती (!)
(३१)
श. १६०२ माघ शु. ७
इ. १६८१ जाने. १६

संभाजीराजे यास राज्याभिषेक (जे. श. पृ. ३१ वर शु॥ ७ आहे व

संवत्सर नाम रौद्र आहे तेंच बरोबर म्ह. मग जाने. १६ येईल. दुर्मती हें श. १६०३ चें संवत्सर-नाम आहे.)

शि. च. सा. ९ ले. ५८ 　जुलूस २४ मोहरम १३　　(३२)　　श. १६०२ माघ वद्य १ 　इ. १६८१ जाने. २४

--रामाजी आपाजी हवालदार ता। तुंडीळ

सेख दावल हुजूर आला. तुम्ही वखर पाठवून ता। मारची हकिकत लिहिलीत नाहीं. दावलनें सांगितले की १२॥ खंडी भात व नागली खंडी ५ असा साठा केला. पैकी ६। खं. चे पैसे हुजूर रवाना केले. बाकी गल्याचे पैसे निर्ख ९ प्रो जाहाला सबब घेतले नाही. हाली येऊन पाठवितील. दरकाचे तसरेचे वणटका, लम्रटका व मोहतर्फा जमा जाहला व हुजूरामधी येऊन पोचेल. गल्याचे फरुख्तीचे पैसे व गैरा आवबाबचे तफरका न करू. जलदीणे रवाना करणें. आपले घरी शादी असे. खर्चाचा जरूर आहे; मुर्गिया वगैरे सामना रवाना केले पाहिजे. व फडावर गला जमा जाला असेल त्याची तफर्का न करणें. सेख अबदला व हसन कदीमपासून सरकारातून परवरीस पावले आहेत. परागंदगीने ते जागा राहात असत. कदीम आपले सरकारचे पावस्त आहेत. त्याचे तंगीचा अहवालावरून त्यावर असलेली बाकी दस्तगीर्दी देविली असे. कुल १ खडी गला देविला असे. जी बाकी राहील त्यास दुसरे गावी देविले. अदा करणे.

शि. च. सा. ५ ले. ७९८ 　फ. १०९० मोहरम १५　　(३३)　　श. १६०२ माघ वद्य ३ 　इ. १६८१ जाने. २६

महजर--मौजे कोले कानडी (परगणे आंबे जोगाई=मोमिनाबाद) हा गांव दादो गोसावी यास मलिकंबरानें आपल्या जाहागिरींतून इनाम दिला. मग दादोबानीं निजामशहाचे त्याबद्दलचे फर्मान मागितले. तेहि मिळाले. त्यानंतर मोगलाई जाली व परगणा हिमातखानास जागीर जाला. त्याची तगिरी होऊन अरबखानास व त्यानंतर दिलावरखानास त्यानंतर रणमस्त-खान त्यानंतर आजमखान यास जहागीर झाली. ह्या सर्वांनीं आपआपली इनामपत्रसनद दिली. त्या सर्व सनदा पाहून अमानतखानजी दिवाण यानी बरहुकूम फर्मान आपला परवाना करून दिधला.

शि. च. सा. ३ ले. ५६०-६१ 　सु. १०८१ मोहरम २७　　(३४)　　श. १६०२ माघ व. १४ 　इ. १६८१ फेब्रु. ७

नागोजी बलाळ सर सुभेदार—हवालदार व कारकून पा। इंदापूर

मोरेश्वर गोसाव्यांचा इनाम प्रांत मजकुरी आहे. येविषयीं स्वामींची सनद (ले. ५५८ म्ह. क्रमांक २२ पहा) आहे. तो चालवणें.

शि. च. सा. खं. २ ले. २४१ सु. १०८१ रा. श. ७ रौद्र. बृहस्पतवार सफर ९	(३५)	श. १६०२ फाल्गून शु. १० इ. १६८१ फेब्रु. १७

मोरेश्वर पंडितराय--भानजी गोपाळ देशाधिकारी व देश-लेखक प्रा कऱ्हाड वर्तमान व भावी.

वे. सिवभट नीलकंठभट अग्निहोत्री वास्तव्य कऱ्हाड (यास) धर्मादाय देविले जोवले केली कोठी मापे खंडी २. जोवरी भट गोसावी क्षेम असतील तोवरी प्रतिवर्षीं परामर्श घेऊन सदरहूप्रमाणें आदा करणे. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा अक्षेप न करणे. भट गोसावी याची वृत्ति कामजकुरी चावर ३ व नख्त होन २० होते ते कुली अमानत केले म्हणोन धर्मादाय देविले.

शि. च. सा. २ ले. २४२ सु. १०८१ राबश ७ दुर्मती बृहस्पतवार रवल १४	(३६)	श. १६०३ चैत्र शु. १ इ. १६८१ मार्च १०

मोरेश्वर पंडितराय--भानजी गोपाळ देशाधिकारी प्रा कऱ्हाड

रुद्रभट नीळकंठभट अग्निहोत्री वास्तव्य कऱ्हाड का। मार यासी वृत्ति चावर १ नक्त होन पा। १५ येणेंप्रमाणें होते तें कुली अमानत केले. ब्राह्मण निराश्रीत देखोन धर्मादाय देविले जोवले केली कोठीमापे मण ·।।।· जोवरी भट गोसावी क्षेम असतील तोवरी प्रतिवर्शी मण १५ देणे. भट गोसावी याचे इनामपैकीं आदा करणें.

रा. खं. २६ ले. ४४ रवल ६	(३७)	श. १६०३ चैत्र शु. ८ इ. १६८१ मार्च १७

राजरूप वल्द सयाजी यांचे नायब व हिस्सेदार कबीरखान वल्द बालूखान मुलगा हबीबखान, जात अफगाण, राहणार नादनज, रंग तांबूस, कपाळ पसरट, भोवया आखूड, काळे डोळे, नाक उंच, मिशा व दाढी काळी, हनवटीवर एक मस, व डावीकडे दोन मस, तोंडावर देवीचे वण, दोन्ही कानास भोंकें.

संभाजी वल्द जानोजी जात मराठा, राहणार दौलताबाद, तांबुस रंग, कपाळ पसरट.

रा. खं. २० ले. २७३
राजशक ७ दुर्मती गुरुवासर } (३८) { श. १६०३ चैत्र वद्य ७
इ. १६८१ मार्च ३१

राजा शंभु छत्रपती--रघोजी अहीरराऊ मुद्राधारी प्रचंडगड

गड मजकूरचे कोळी मेटकरी गडाचे घेरियाखाली राहतात. पैकी काही गडावर चाकर आहेत व कितेक सोनजी इतबारराव याचे दिमतीस आहेती. त्यानी अर्ज केला. ऐशास त्यांची गाईची वणी तो एकंदर माफ केली आहे; म्हैसीची वणी (कर) घ्यावयाचा तह आहे. तर हवालदार, नाइकवाडी व रजपूत यास २ म्हैसी सोड आहे. उरतील त्या म्हसीस वण घेणे. गडावर चाकर असतील त्यांची वणी त्याच्या नावे लिहिणें. घरटकाहि त्याचे नावें वार करणें. हेच सनद माहालचे कारकुनी मसमू जाणून एवंप्रमाणें चालवावें.

ऐ. सं. सा. ५ ले. २५
राजशक ७ दुर्मति सोमवासर } (३९) { श. १६०३ चैत्र वद्य १३
इ. १६८१ एप्रिल ६

राजा शंभु छत्रपती--दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ देशमुख वांई परगणा.

दिल्हे अभयपत्र ऐसे जे, पिलाई कोम केशवजी नाईक याणी सिवाजी सुरो कारभारी व रामचंद्र दताजी मुतालीक यांचे सांगणेवरून पिलाईची दीर गंगाजी, त्याचा लेक दत्ताजी हा अवघ्या बंदभावी पिलाईच्या वोट्यात घातला व पुत्रपण देऊन देसगतीस पा होन ५ ह. शेरणी मोकरर केली. हकाची मोईन के. स्वामीनी करार करून दिल्ही त्याप्रो चालत असे. तैसेच पेस्तर हवाला केले. पेशजी केशवजीस खंड बांधिला त्यापैकीं २ ह. पावले. बाकी ३ ह. च्या खिस्ती बांधून देऊन त्याप्रो वसूल करून देणें.

राम. दासी. ४२ ले. ४३
सु १०८१ रखर ७ } (४०) { श. १६०३ वैशाख श. ९
इ. १६८१ एप्रील १६

तिमाजी व्यंकटेश सुभेदार--बाळाजी ताऊजी कुलकर्णी व कारकून सुभाप्रांत चेऊळ मामले चेऊल

तुमचे बावे सूर्याजी प्रभु मजमूदार व देशक मा मार याणी सुभा मालूम केले कीं तुमचेकडे बाकी आहे म्हणून तुम्ही परागंदा जाला. तरी निमे बाकी सोडी दिल्ही व निमे दुसाला उसूल करून गांवास येऊन सुखे असणें.

[ले. ४२ हें पत्र ले. ४३ च्या आधींचें वाटतें. पण वर्ष इसने म्हणजे पुढलें आहे अणि तारीखहि जमत नाहीं.]

शि. च. सा. ३ ले. ४६६ } (४१) { श. १६०३ वैशाख शु. ९
सु. १०८१ शक } { इ. १६८१ एप्रील १६

अकोले देशपांडे यांजकडील हकीकत. लुमाजी देशकुलकर्णी त्याचे दोन पुत्र रामाजी व हरबाजी हे देशमुखानें मारले. इत्यादि इत्यादि.

खं. १८ पृ. ८२ } (४२) { श. १६०३ जेष्ठ शु. १२
सु. १०८१ जवल १० } { इ. १६८१ मे १९

बहिरो बाबाजी हवाले मोकदमीमौजे-दतसेट सेटिया
दौंडज ता॥ निरथडीप्रा॥ पुणें

तुह्माकडे रा. हिरोजी इंदलकर सुभेदार यांचे कर्ज आहे. त्यांनी आम्हांस पैके देविले आहेत. त्यास तुह्मी आम्हास होन पा॥ ३५ व रु. ५ दिल्हे ते पावले. अखेर साली रायगडास जाऊन कर्जपैकीं मजुरा देऊ.

इ. सं. गो. इ. सा. ले. ३४ } (४३) { श. १६०३ ज्येष्ठ वद्य ५
सु. १०८२ राजश. ८ दुर्मती } { इ. १६८१ मे २६
गुरु. जवल १७ }

मोरेश्वर पंडितराय--बालाजी भास्कर दे०री व दे०क प्रा॥ कांबगाऊ

श्रीनिवास आपा जोसी करकरा चा. खानापूर यासी पूर्वी निशाणी होन १॥ व १ सेत ठिकाण होते ते कुल अमानत केले. त्यामुळें ब्राह्मण निराश्रित जाला, देखोन तांदूळ केळा कोठी मापे मण ।= सात जोवरी भटगोसावी क्षेम असतील तोवरी प्रतिवर्षी परामर्श घेऊन आदा करणे. आमचे सनदेविरहित जो धर्मादाय असेल तो गैरमजुरा असे. ...... सदरहू नांव सक्त जाले याचें नाव श्रीनिवासभट अपभट यासि पत्रप्रमाणें आदा करणें.

शि. च. सा. ५. ले. ८४० } (४४) { श. १६०३ आषाढ शु. ९
शक. रविवार (जं. मंगळ) } { इ. १६८१ जून १४

मुकुंद दुरडी सावरगांवकर पाटील—आपाजी भट निरंतर

श्रीमुरडेश्वराचे देवालयांत पूर्वपासून पुराण सांगत आहां. सांप्रत आह्मी या देवाळयाचा जीर्णोद्धार केला. आपण देवासंनिध पुराण सांगत जावें. अन्यथा करील त्यास कुलस्वामीची श्रीसांबची शपथ असे.

शि. च. सा. खं. १ ले. ६५ } (४५) { श. १६०३ श्रावण शु. ४
सु. १०८२ रबव ३ } { इ. १६८१ जुलै ९

नीलकंठ मोरेश्वर प्रधान--नागोजी बलाल सुभेदार व कारकून सुभा प्रांत महालानिहाय पा॥ इंदापूर सुपे.

सुपे खुर्द येथील पाटिलकी रायाजी काटकर व शंकराजी नीलकंठ राऊ व हाऊजी धणगर या तिघांची. ती तशीच चालवणें.

रा. खं. १५ ले. १४३ } (४६) { श. १६०३ श्रावण शु. १३
श. दुर्मती सु. १०८२ } { इ. १६८१ जुलै १८

हजीर मजालसी विद्यमाने परगणे वाईपैकीं सेकीन निंब येथील श्रीमदानंद मठास कर्यात पा माणपैकीं प्रतिवरुसी भंडाराबदल गला केली खंडी बेरीज १॥२॥ गांवें ५८ मधून मिळावे.

रा. खं. २६ ले. ४६ } (४७) { श. १६०३ अ. आश्वीन शु. ११
जुलूस २५ रमजान १० } { इ. १६८१ सप्टें. १३
फ. १०९०१ (!)

चिठी–परसोजी भोसले याचे नातू सयाजीचा मुलें राजरूप यांच्या नांवे परगणे संगमनेर वगैरे वसूल बाकी जामखेड खरीफाचा हंगामा ५ ल. ९९ इ. दाम अमानतखान दिवाण, ज्याहाबहादूर जफरजंग देशमुख, देशपांडे, मोकदम, रया पा जामखेड सरकार आमदानगर, सुबे अवरंगाबाद ऊर्फ दक्षण यानीं मा।रइलेचें गुमास्तेयासि अमल दीजे.

रा. खं. २० ले. २४८–४९ } (४८) { श. १६०३ अ. आश्वी. व.१२
सु. १०८२ फ. १०९१ रम २५ } { इ. १६८१ सप्टें. २८

बजाजी नाईक (निंबालकर)–करेपठार (पा पुणेचे कारकून) व वेंकाजी जिवाजी हवालदार

विनायक उमाजी देशी व देशलेखक व देशमूख. सिवाजी वलद गणेशभट सेकीन मोरेश्वर (मोरगावचे इनाम चालविणें.)

शि. च. सा. २ ले. १६८ } (४९) { श. १६०३ अ. आश्वीन वद्य १२
सु. १०८२ फ. १०९१ } { इ. १६८१ सप्टें. २८

दस्तक बो रहदारानी, चवकीदारानी, पतकीयानी कमावीस जकाती मार्ग तहत् मोरेश्वर

मो रा। सिवजी गोसावी मा। मोरेश्वर यास सरकार राजश्री बजाजी नाईक साहेब लस्कर मो का। हाटोलू गोसावी यासी खिलारपैकीं धर्मार्थबुधीने गाई ७, बैल २, वाटी १, वासरु १ एकून ११ दिल्ही आहेत ते गोसावी घेऊन जाताती तरी यास वाटेस हरएक बाबे मुजाहीम न होणे. (' मुधोजी वणगोजी नाइक ' असा शिका व ' मोरतब ' असा समाप्ती शिका).

रा. खं. २० ले. २७१ } (५०) { श. १६०३ आश्वीन शु. १३
सु. १०८२ राजशक ८ | इ. १६८१ आक्टो. १५
+शाबान ११ दुर्मती मदवार

मोरेश्वर पंडितराय—गणोराम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाल

वे. अनंतभट मा(हा)दे(व)भट कांदळगाव ता मसुरे यास दर माहा कोठीमापें मण ·॥।·।·५। जोवेरी यट ध्यान करतील तोवरी प्रतिवर्षी आदा करणें.

+ सवाल पाहिजे.

इ. वृ. १८३४ पृ. ३२८ } (५१) { श. १६०३ कार्तिक शु. ६
रा. श. ८ दुर्मती रविवार | इ. १६८१ नवं. ६

छत्रपती शंभु—कासी रंगनाथ देशाधिकारी व लेखक प्रांत जाउली

वे. रामभट गोपालभट अग्नहोत्री मामलेश्वरकर यांनीं सांगितलें आपले पिते गोपाळभट श्रीकरर्म्ले याजपासून महाराज कै. याजी मंत्र उपदेश घेऊन आपल्या अभ्योदयाकार्णे सूर्येप्रीत्यर्थ अनुस्ठान सांगितले. त्यास वर्षासन दानपत्र मोईन करून आमचे पिते यासि दिल्ही. तें दानपत्र व सुभाचे पत्र दाखविले. स्वामी भले थोर अनुष्ठाते सूर्ये उपासनी पद्महस्ती ऐसे जाणोन आम्ही स्वामीपासून मंत्र उपदेश सपादिला. वर्षासन होन पातशाही शंभर वजन टा ·।४ तूप ·।४ तेल; (खंडी मण) गळा नवसेर बारुले मापे खंडी ४ तांदूळ ४ नागली अरक्तवस्त्रे—अनुष्ठानसमई नेसावयास व असन पीतांबर, शाल, असन चंदन शुभ्र व अरक्त ८८५ (शेर) स्वामीचे वंशपरंपरेने आमचे वंशपरंपरेस मंत्र उपदेशहि करावा व दान उत्तरोत्तर चालवावे. अन्यथा करू तरी महादेव साक्ष. महाराज अबासाहेब कै. स्वामीनी करून दिल्हे ते आबासाहेबाचे संकल्पित आहे ते चालवावे हें आम्हांस अगत्य. हली हुजुर ऐवज न पावे म्हणवून नख्त व जिनस सुमेमजकुरावरी देविले असे.

ऐ. सं. सा. ६ ले. १ } (५२) { श. १६०३ कार्तीक वद्य १२
राजशक ८ दुर्मती मंदवासर | इ. १६८१ नवंबर २६

राजा शंभु छत्रपती—कृष्णाजी कासी

आश्वीन वद्य ७ चें पत्र काल (१६८१ नव. २५ शुक्रवार) पावलें. हरजीराजे माहाडीक यांचे आज्ञेंत वर्तत जाणें. तुमची वृत्त पुणेची आहे ते अमानत केली आहे. तुमचे गोत्रजन हुजूर येऊन गैर वाका सांगोन वृत मोकली करवितील तरीं तैसीच आहे. पुढें तुमचा कोणी दाईज हुजूर आला तर्‍हीं त्याचे बोले मोकली करायाची आज्ञा होणार नाहीं. अमानतच आहे. येविसी तुम्ही आपलें समाधान असों देणें.

रा. खं. १५ ले. १४४ } (५३) { श. १६०३ कार्तीक वद्य १३ रवि.
सु० १०८२ जिलकाद २६ } { इ. १६८१ नोवें. २७

साबाजी राजे घाटिगे देशाई—कारकून व मोकदम
कर्यात मळेवाडी मौजे बुधरवीरें

सदानंद गोसावी—आखाडा मौजे निंब पा वाई यासी इनाम अवरा-मन्हामत बा। ठिकाण पेशजीचे मळा देवपूळ व बाजे जमीन ते देविले असे. ते कीर्द करतील. हदमहदूद असेल ते दाखवावे.

कों. इ. सा. के. ९६ पृ. १०९ } (५४) { श. १६०३
{ इ. १६८१

कुडाळ कसबा येथील सोन महवळ (=परीट) मिरासदार होता. हवा-लदार कुडाळचा मिरजाखान याणे परिटाचा सत्यानाश करावा ऐसे योजिले. परीट पळोन गेला. दोन पिढि गेला. गावी १०।२० वरिसे कसबेमधे परीट कोणी नाहीं. तेव्हां दाद सामंत पहिले देशाई परुळेकर कुडाळास होते त्यानीं देशकास अर्ज करून भान महवळ परुळेकर यास आणून कसबेची मिरास स्वाधीन केली मडवळकी चालऊ लागले.

रा. खं. २६ ले. ४५ } (५५) { श. १६०३
फ. १०९० } { इ. १६८१

बा(तु)लोजी मोकदम मौजे नरसोजी
चौ (जो) गला रंभापूर (रतनापूर) विठोजी
शिंदे, रजाजी, वाघोजी रऊत मौजे घोड
पारगाव, (बो)रलें पा जामखेड समस्त रयत } —राजेश्री रुस्तुमजी राजेसाहेब भोसले

आम्ही सर्व (तुमच्या) जाहागिरींतले आहो, हे आम्ही पवित्र स्थळीं कबूल करतो की, तुमच्या योग्य वागवणुकीनें व न्याय्य बंदोबस्तानें राजी व उप-कृत आहोत. आपण आपले धनी, मायबाप आहेत. यांच्या गुमास्त्याकरवीं जुलूम जबरी झाली नाहीं. साहेबाचे पायासी जिवेसी राजी आहों. यास हिला-हरकत करूं तरी साहेबांचे गुन्हेगार.

शि. च. सा. खं. ७ } (५६) { श. १६०३–०४
सु. १०८२ } { इ. १६८१–८२

जाबिता हकदार पा वाई. एकूण आकार राजभाग पंचादुई गला दसेरी बारके मापे खंडी १५३३६।।।२।।२ दर सदे रयतनिसबत गला खंडी ५ (देशाई देसकुळकर्णी, मोकदम कुलकर्णी चौगुला यांचे तपशीलासह)

शि. च. सा. ५ ले. ९७१ } (५७) { श. १६०३—०७
सु. १०८२ } { इ. १६८१--८५

विनायक उमाजी सुभेदार प्रांत पुणे इनामती खंडणी ३०५ देशमूख, ९५ देशकुलकर्णी.

बाबाजी तानदेऊ सुभा श. १६०६ परगणा खराब, शाबदीखान पुणा येऊन ठाणे घातले. दिवाणदस्तक, देशमूख होन १५२॥ देशकुलकर्णी होन ४७॥ सुभा दामाजी रघुनाथ सरसुभेदार पा मार खराब, खंडणी श. १६०६ प्रमाणेंच.

श्रीसां. ले. ५४ } (५८) { श. १६०४-०५
{ इ. १६८२-८३

बंधुवर्ग गणेश चाफळकर—दिवाकर गोसावी.

उधव गोसावी मठात राहणे. दिवाकर सर्वप्रमुख. इत्यादि ले. ५३ प्रमाणें पुढें क्रमांक ६१ पहा.)

श्रीसा. ले. ४९ } (५९) { श. १६०४-०६
{ इ. १६८२-८४

कल्याण नाम्ना--मोक्षश्रिया विराजित दिवाकर गोसावी

तुमचें पत्र पावोन अवगत जाहालें. श्रीसमर्थ आज्ञेप्रमाणें वर्तावें हें उचित. वंशपरेनें तुम्ही संस्थान-कार्य करावे ऐसे बोलोन श्रीनी तांबूल दिला. ते अभिमानअक्रोध होऊन प्रवर्तल्यानें श्री दया करतील. धैर्य श्री भजनाचें न टाकणें. कलहामुळें श्रीच्या धर्मस्थापनेसी अंतर पडे ऐसे न करणें.

श्रीसां. ले. ५० व ५२ } (६०) { श. १६०४
{ इ. १६८२

बंधुवर्ग कल्याण व विठल—दिवाकर

श्रीचे स्थळचा सर्व पारपत्याधिकार दिवाकर गोसावी यांनी करावा येविषयीं पूर्ववृत्तांत—रा. छत्रपती शरीरवेथा कठीण ऐकोन श्रीचे सांगण्यावरून सातारांच्या दरवाजियांस गेलों. त्या उपरी त्याच समागमे त्रिन्हाड न घेतां राजदरशनास गेलों. ते प्रसंगी उबरजेकडे धावणी होऊन गुरे वाळून आणिली होती. ती सोनगावींच्या ११ गाई सवत्स राजश्रीनी दिल्या त्या सिरगावी ठेवून श्रीसमर्थास पारमाचीस शिवथर प्रांती नवलवाडियाचा कोंड तेथें बांभळीच्या चौथरीवर बसले असतां दरशन घेऊन छत्रपतीकडील चमत्कार कौतुक प्रसिधी निवेदन केलें. समर्थ बोलिले. हें प्रयोजन तुम्हास बोलिलें नाहीं. श्रीचे स्थळचा सर्व पारिपत्याधिकार दिवाकर गोसावी यास, तो दुरोखी मोहरा.

२

वैदिक, भला; आर्जव वृतीनें मागणें निस्पृहाचा धर्म नव्हे. ऐसी आज्ञा संवत्सर कार्तीक प्रतिपदा परिछिन जाली. इ. श्रीपृष्ठावरी हात ठेवून आज्ञा. चरेगाव, माजगांव, उंबरज. कोरटी येथील इनाम उल्लेख अधिकारी उल्लेख.

श्रीसां. ले. ५१ } (६१) { श. १६०४-०६ / इ. १६८२-८४

(ले. ५० प्रो) दिवाकर गोसावी रायगडास. रघुनाथभट पंडितराय नवहस्त यास दिवाकरांनीं सर्व राजगृहींचीं कामें करावी ही आज्ञा. इत्यादि.

श्री सां. ले. ५३ } (६२) { श. १६०४ - ०६ / ई. १६८२ - ८४

श्रीसमर्थ शिष्य समुदाय, देशकुलकर्णी प्रां. सराळ पनाला वांइ इ.—
समस्त हुजरात राजसभा धर्मसभा व बाबास्वामी.
चाफळ उत्सवाचे तहपत्र. श्रीसमर्थांनी पदार्थांचा जाबता करवीला व धर्मादाय समर्पिला. दिवाकर गोसावी यानी मानमहत्व सुरलीत चालवावे. ऐसें असतां उधव गोसावी घालमेल करतात. विक्षेप करील तो संप्रदायवेगला जाला. मोहछायप्रसगी समुदायमधून अवज्ञेन वर्तेल त्यास उठोन वेगळे बसावे लागेल निमित्य कीं श्रीचा द्रोह घडला. तरी श्रोचे आज्ञेचे पाळण होय. (क्र. ५८ पहा)

रा. खं. २६ ले. ४७ / जुलूस २५ सफर २१ } (६३) { श. १६०३ फाल्गून शु. ९ / इ. १६८२ फेब्रु. २०

राजरूप वल्द सयाजी परसोजी भोसले यांचे वकील—

परगणे बळगांवची देशमुखी, गंगा वाघ याचा नाश केल्यानंतर सम्राट-बाद शहाच्या कृपेने आमच्या मालकांच्या वडिलांच्या नावें नेमली होती. मरहूम मुरशीद कुलीखान यांच्या कारकीर्दीत रसूम जप्त झाला. परसोजीस कांही देणें होते, त्यांच्या गुमास्त्याचा अडथळा आहे. कांही वर्षे गंगा वाघाचा मुलगा जहागिरदारांच्या गुमास्त्यांचा ओळखीनें वसूल गोळा करतो. या कारणे आमच्या मालकाला आता कांही देणें राहात नाहीं. देशमुखी व तिचा रसूम आमच्या मालकाच्या वडिलांच्या नावें नेमला जावा आणि ५० स्वारांची जमीयत, मनसब कायम राहील तोपर्यंत ते सेवेस तयार ठेवतील.

ऐ. फा. सा. १ ले. ५९ / जुलूस २५ सफर २९ } (६४) { श. १६०४ प्र. चैत्र शु. १ / इ. १६८२ फेब्रु. २८

—मुरुतारखान

काल्वी नाइलच्या लढाईत विजयसिंह आपल्या जमातीसह कामास

आला. म्हणून तुह्मी नर्मदा उतरून त्या बाजूस जावें. काकरखानहि तेथें येईल त्यासह लढण्यास लागावें. आवास येथील जमिदार पर्वतसिंह हा तुमच्याकडे येतांच त्यास दरबारकडे पाठवून द्यावें. म्हणजे त्यास चाकरी मनसब देऊन परत पाठविलें जाईल.

श्रीसा. ले. ४७ राज श. ८ दुंदुभी सोमवार } (६५) { श. १६०४ अ. चैत्र शु. १५ इ. १६८२ मार्च १३

संभाजीराजे—वे. रा. दिवाकर गोसावी

श्रीस्वामी सज्जनगडी पूर्णावतार केला. ते स्थली हनुमंताचे देवालय करविले. आहे. स्वामी असतां समुदाय होता तो सेवेसी असों देणें. आणि सुबासुबाहून धर्मादाये इनाम देविला तो आणऊन देवास व समुदायास पाववीत जाणे. यथाविध उछव समारंभ करीत जाणें. तैसेच श्रीरघुनाथदेवालय चाफलीं आहे तेथील नित्यपूजा रथोत्सव सनदे प्रमाणें मोईन व इनाम आणऊन येथासांग करीत जाणें.

श्रीमां. ले. ४५, ४६ रोज. ८ दुंदुमी सोमवार } (६६) { श. १६०४ अ. चैत्र शु. १५ इ. १६८२ मार्च १३

शंभु छत्रपती—कोनेर रंगनाथ देशाधिकारी प्रांत सातारा

ले. ४४ प्रमाणें व दिडींस खर्च लागतो. तो माहालीहून करणें. खासा तुम्हीच यात्रासंरक्षण करून समारंभ संपादीत जाणें.

श्रीसां. ले. ४४ राज श. ८ दुंदुभी सोमवार } (६७) { श. १६०४ अ. चैत्र शु. १५ इ. १६८२ मार्च १३

शंभु छत्रपती—कासी रंगनाथ देश्री व दे०क प्रांत जाउली

रामदासस्वामीनी पूर्णावतार केला. त्या स्थानीं श्री हणमंताचे देवालय करविले त्यासी व चाफळच्या रथोत्साहाकरता कर्नाटकांतून देवाच्या मूर्ति असतील त्यासी नित्यपूजेस व समारंभास व शिष्यसमुदायासाठी धर्मादाय मोईन पेशजीप्रमाणें चालवून ती दिवाकर गोसाव्याचे विद्यमाने करीत जाणे.

पुरुषार्थ } (६८) { श. १६०४ चैत्र शु. १४ इ. १६८२ एप्रील १०

रामसिंहाचा पुत्र कृष्णसिंह म्ह. जयसिंग मिर्जाराजाचा नातू, औरंगजेबाच्या फौजेंत नोकरीवर होता. तो आपल्या पुत्रास—अकबरास—आपल्या विरुद्ध होऊन सहाय्य करतो अशा संशयानें त्यास म्ह. कृष्णसिंहास परिंड्याजवळ औरंगजेबानें ठार केलें.

रामदासराम. ४२ ले.४२ } (६९) { श. १६०४ चैत्र वद्य १२
सु. १०८२ रखर २५ } { इ. १६८२ एप्रील २४

राघो विश्वनाथ सुमेदार व कारकून सुभाप्रांत चेऊल —बाळाजी कुलकर्णी मामले चेऊल

कौलनामा—तुम्हाकडे बाकी उतरत आहे ते घास्तीने रेवदंडा राहिले आहा. तरी सुखे घरी येऊन राहाणे. बाकी विषयीं मनास आणून विल्हे करून देऊन. एकंदर तसवीस लागो देणार नाहीं.

इ. सं; पे. द. मा. ले १ } (७०) { श. १६०४ वैशाख वद्य ७
शक. गुरुवासर } { इ. १६८२ मे १८

रा. राजा शाहू छत्रपती स्वामी शा. श. १६०४ दुंदुभी नामसंवत्सरे वैशाख वद्य ७ गुरुवासर सूर्योदयापासून घटिका ५४ जन्म. दिनमान घ. ३२ शततारका नक्षत्र, चरण. ३ रास कुंभ.

श्रीसा. ले. ४८ } (७१) { श. १६०४ ज्येष्ठ शुद्ध ७
राजश. ८ दुंदुमी भृगु. } { इ. १६८२ जून २

शंभू छत्रपती—जिजोजी काटकर मुद्राधारी सज्जनगड

श्रीस्वामी याणी अवतार पूर्ण करण्या अगोदर आज्ञा केली होती त्याप्रमाणें राहाटी करवणे. भानजी व रामजी आणि दिवाकर गोसावी, उधव गोसावी, यांनीं न भांडणें. मुख्य मोहत्सव चाफळीच होत जाईल. तुम्ही घालमेलीत पडावया प्रयोजन नाहीं.

शि. च. सा. ६ ले. १११ } (७२) { श १६०४ ज्येष्ट वद्य ३
राजशक ९ दुंदुमी } { इ. १६८२ जून १२
सु. १०८३ जखर १५ }

संभाजी—बापूजी त्रिंबक देशाधिकारी व लेखक प्रांत मलकापूर

तुळाजी देसाई निकम परगणे शिराले हुजूर विदित केले कीं, आपली देशमुखी मिरासी असतां पा। मा।रचे विलासी तरफेचे १२ गांव ते सोनजी बांदल याणे बळेंच वारणेचे देशमुखीकडे कमाविशीस लावले. गतवरुषी छत्र० स्वामी पनालाहून पा। मास आले ते समई स्वामीस हे वर्तमान विदित केले. स्वामीनी सदर देशमुखीचे १२ गांव वारणेकडे देशमुखीकडे वोढत होते तें सिरालेकडे लावणें आणि दोखीचा कारभार तुळाजीच्या हाते भोगवट्याप्रमाणें वेत जाणे म्हणोऊन कृष्णाजी भास्कर यास आज्ञा केली. व सामाजी बांदळ यांस हरामखोरी केली म्हणोऊन सजा पावविला व वारणेची त्याची मिरासी देशमुखी दिवाणात अमानत केली. कमविशीस

तुळाजी कडू व खंडेराव पानसंबळ पाठविला. तो या १२ गांवास कथला करतो. तरी स्वामीनें आपलें पारिपत्य केलें पाहिजे. तरी तुळाजी कडू यासी कथळा करावया गरज काय. रोखा देखत विलासीतर्फेचे गांव तुळाजीकडे देणें व त्याचें हाते कारभार घेणें.

शि. च. सा. १ ले. ६६ सु. १०८३ रजब ४	(७३)	श. १६०४ आषाढ शु. ६ इ. १६८२ जून ३०

ताा निरथडी (पाा पुणें) ठाणे—मोकदम मौजे किकवी

शंकराजी नीलकंठराव यांचा इनाम कास रुके ८४॥ पडिक आहे. कीर्दीस उमेद धरली आहे. तरी लावणी दुमाले केलें असे. सुभाचें खुर्दखत सादर आहे. पेस्तर छत्रपती स्वामींचा हातरोखा आणितील तेणेंप्रमाणें विल्हे होईल.

शि. च. सा. ७ ले. ६३ सु. १०८३ रजब ९	(७४) कौलनामा	श. १६०४ आषाढ शु. ११ इ. १६८२ जुलै ५

दिवाण सुभा विनायक उमाजी सुभेदार व कारकून सुभा पाा पुणा व महालानिहाय —महादाजी कमळाकर रबडे कुलकर्णी मौजे चिंचवड ताा हवेली पाा मजकूर

तुमचे बाबे देशमूख देशकुलकर्णी पाा मार मालूम केले कीं चिंचवडी मिराशीचा वाडा बापभावासमेत होता. तेथें वाटणीनें आपलियास भोये बहुत थोडी येऊ लागली. म्हणऊन आपण कुनबावा सेत सवा १। खंडी, वाडा ४९×६६ दिला. आबराई नवी विहीर पाहून कराल त्यास दर पेडास रुके ॥· चोवीस, दर सदे पडलावणीस पेड ५ व देाास देाार्णी इ. चालवून शक आदेशा न धरणें.

आठल्ये घ. इ. ले. ७ सु. १०८३ साबान २	(७५)	श. १६०४ श्रावण शु. ३ इ. १६८२ जुलै २७

देवळे ठाण्याचे अधिकारी—खोत, मोकदम व रयत तर्फ देवळे

आठल्ये यांचे उपाध्येपण गावगनाचे असता एकटा त्रिमलभटच भक्षीत असतो. तरी हरीभट यानें सुभा जाऊन सनद आणिली त्याप्रमाणें समस्त आठल्ये यांस हक दरगांवास लाहारी येक प्रमाणें आहे त्याप्रमाणें जारी करीत जाणें.

ऐ. फा. सा. १ ले. ५२ जुलूस २६ रमजान १ हि. १०९३	(७६) (शिलालेख)	श. १६०४ भाद्र. शु ४ इ. १६८२ आगस्ट २५

परमेश्वराच्या व पैगंबराच्या कृपेनें नाहरखान गोरी याचा मुलगा जो

पारनेर परगण्याचा फौजदार आहे- अबुल करीम- ह्यानें पारनेर (च्या वेशीच्या डाव्या अंगाचा) बुरुज बांधला.

शि. च. सा. २ ले. ३६९ } (७७) { श. १६०४ भाद्र. शु. ११
सु. १०८३ रमजान ९ } { इ. १६८२ सप्टें. २

नारो राम सुभेदार व कारकून —वकालानी देस तेरदल व रायेबाग व महालानिहाय सुभा ता अजिरे पेठ हुकेरी व बाजे देहाय

कौलनामा ऐसा जे, सरकार अडगल या विलायेतीमध्यें गांवगना कितेक बैल आणून चारणीस घालीत होता. त्यास दरम्यान सा मवकुरास बैल न पाठविता परभारा चारणीस घालीत आहा तेणे करून दिवाणचे हसिलास तट पाडिला म्हणून मालूम केले. तरी पेसजीप्रमाणें बैल कुल आवघेच पाठवणे आणि शिरस्तेप्रमाणें देत जाणे. यावरी या गोष्टीस दगावा काही येक लागणार नाही. खातिरजमा राखोन कुसहाल येत जाणे दरी बाब कौल.

शि. च. सा. २ ले. ३०५ } (७८) { श. १६०४ आश्वीन शु. ८
शक दुंदुमी } { इ. १६८२ सप्टें. २९

गोसावी गंगाभारथी (पूर्वील नाम —त्रिंबक नाईक वडाळकर व केसावा नाईक अनंत नाईक

अपुण गोसावि जालो असो. तुमच्या घरासी, द्रव्यासी, वित्तविषयासी तुम्हासी व आम्हासी अर्थाअर्थी समध नाही. जर बोलो तर गुरुची दाही असे.

रा. खं. १५ ले. १४५ } (७९) { श. १६०४ आश्वीन वद्य १
सु. १०८३ सवाल १५ } { इ. १६८२ आक्टो. ७

—मोकदम मौजे ओझर्डे सा हवेली ता वाई.

तीर्थस्वरूप रा. अनंतागिरी गोसावी मठ श्रीसदानंद मु॥ निंब यास पेसजी तुम्हीं काय देत होतेस ते काही दिवाणांतून नाहीं (तेव्हां) आताहि देणें. दुसरियानें फिर्यादी येऊं न देणें.

शि. च. सा. ७ ले. ६४ } (८०) { श. १६०४ मार्ग. शु. ४
हि. १०९३ जिल्हेज ३ } { इ. १६८२ नोव्हें. २३
सु. १०८३

सरकार फौज—

तुझे बाबे अमालानी हुजुर अरीजा लिहिला कीं, पटेल निपुत्रिक होता तो फौत जाला. बाजद कोण्ही पटेल नव्हता. कीर्दी माहमुरी जाहाली पाहिजे. यैसियासी देसकुलकर्णी मवकुराने सदरहू पटेलगीस सिर्णी होनू १२५ कबूल

केले. पटेलगीचे मिरास दुमाला करून पटेलगीचे इनामतीस सेत, बाग व गदे दिा बकल व आयेपुले व आयेघात मोर बात व कटण व हारकाई, पसगी, पलगी, व पडद, बाजे हक कुलबाब कुलकानु बो भोगवटा साविका मिरास पटेलगी मन्हामत केली. जमीन पडो नेदीता कीर्दी मामुरी करून सुखे असणें.

खं. १६ ले. २५ पृ. ४१ } (८१) { श. १६०४
सु. १०८३ } { इ. १६८२

विसाजी गोज प्रभु देश कुलकर्णी—राऊसाहेब देशमूख तर्फ
तर्फ कानदखोरे कानदखोरे

इस्तकबिल बटाईपासून आपण चाकरीस गेलों. त्यावरी सु. १०८१ मिरासीस आलो. त्यावरी मागे तिमाजी व गदाजी तकसीमदार इही देस-कुलकर्ण व गांवकुलकर्ण हक उत्पन्न खादले. आपण आल्यावरी इहिदेचे सालीं दोार्ण चालवावयास साहेबाच्या मते कारभार सेवकाचे स्वाधीन केला. आपण आपला बगजोड असावा म्हणून आपला भाऊ (तर्फ चाढवे) व विठोजी काका (मोसे खोरे) बोलाविले. केशोराम हवालदार व गदाजी प्रभू मुजुमदार ठाणे मुा विंझर येथें चाहुडीस साहेबा हुजूर दोही रुमाल काकापुढें ठेविले. तुम्हास चालेल तो एक रुमाल आपणा स्वाधीन करून घेणें. इही दोही रुमाल सेवकाचे स्वाधीन केले. इतक्यांत इसने तिमाजी प्रभूकडे लागले. साल मज-कूर सेवक साहेबास साक्ष करून गांवकुलकर्णे १६ व देसकुलकर्ण दोही काका स्वाधीन केली. विठोजी कथळा केला कीं, देश-कुलकर्णाचा मुशाहिरा १५३ पैकीं ५७ टके द्यावे.

श्रीसां. ले. ४३ } (८२) { श. १६०३ पौष व. ९
दुर्मतीसंवत्सर पौष व. ९ } { इ. १६८२ डिसें.

[ज्योतिर्गणिताप्रमाणें ह्या वर्षी क्षय मास आहे व तो पौष आहे. खरेजंत्री पहा] समर्थांचा अंतकाल प्रसंग सनिध, म्हणोन संभाजीस त्यांनीं उपदेश केला.

कों. इ. सा. ले. ९७ पृ. १०९ } (८३) { श. १६०४
मु. सलास, दुंदुभी } { इ. १६८२

कानोजी काटकर— नारायण प्रभु सर देसाई प्रगणे कुडाळ

पूरवी आम्ही तुमचे तीर्थरूप तियापासून १०० होन घेतले. त्यास ते कैलासवासी जाहाले...इ.

आठल्ये घ. इ. ले. ६
सु. १०८३

(८४)

श. १६०४
इ. १६८२

देवले तप्याचे ठाणेदार दिवाण—मल्हार रंगनाथ पोतदार किले विशालगड.

कौलुनामा--मौजे सिपोसी तपे मार येथें मोहल व दाभोळच्या सीमेचे असे दोन परिये (ओढे) आहेत. तुम्ही मशागतीदार आहां. परिये मोडून सेत बांधणे. आम्ही, देसक, तेथें येऊन तेथील रयेत, मिरासी व गुरव, माहार ऐसे बोलावून हरदू जागे नजर गुजार करून पाहाता मोहलचा परिया गावचे नदीस मिळाला आहे तो मोडून उत्तरेस डोगर आहे त्यांतून १४०० हात लांब; १८, १० हात रुंद; ५·७ हात खोल असे जमीन तोडून खणोन नदीसी मेळविला पाहिजे. माथा हाद व मूल हाद ऐसे बहुत आटीचे काम दिसोन आले...

रा. खं. २० पृ. ७१,५०
फ. स. १०९२

(८५)

श. १६०४
इ. १६८२

दलेलखान बाहदूरखान आले यानी पडेगावी कोट बांधला. मुलूक वोस पाडिला ता स. १०९२ (पृ. ७१)

दक्षणचा सुभा नवाब खान बहांबहादुर यांचा हरोल दलेलखान आले. ते भिवरे अलिकडे बंदमवेसी करून मुलूक ताराज करूं लागले आणि पेडगांवी बहादुरगड बांधला (पृ. ५०)

रा. खं. १५ ले. १० पृ. ३४
सु। १०८३

(८६)
महजर

श. १६०४
इ. १६८२

संताजी भिवजी चव्हाण पाटील मौजे कोणेगाऊ सुलतानजी पटेल जगदले कसबे मसूर यानें महादजी सुलतानजी पटेल कसबे मसूर हे थोर नाईक यांस आपले शरीररक्षणार्थ आपले मिरासीपैकीं एक चावर खासगत ठेऊन उरेल जमीन चावर १॥। ठिकाणें ४ व वडीलपण होनु २० यास विकले पा मारचे देसक व बाबभाऊ या विदमाने क्रयपत्र दिल्हे. व ठाणा राजमुद्रा साहेबसदर व देसक यांचा महजर महादाजीच्या, गावीचे बारा बलुते यांच्या संमतिनंतर केला. खासा रुद्राजीपंत देसकुलकर्णी यासी ॥१४ ठिकाणे २ पहिलेच विकत दिल्हे वी त्यापासून मागोन घेतली व त्यास १ घोडा, सारंगा किं. होन १५० चा दिला. कागद रुद्राजीपंताच्या दस्तुरें अलाहिदा असे, कोनेर रंगनाथ सरसुभेदार यास हरकी १०० होन दोास, सरदेाास ५० दोणीं २५ दिले खेरीज गावकरियास व परगणियाच्या पाटलास तश्रिफा

दिल्हा. होन १०० संताजी चव्हाणकडे १ चावर राहिला तोहि ३० होन देऊन घेतला. खेरीज पोटखर्च जाहाला.

शि. च. सा. ७ ले. ६५ }
सु. १०८३ मोहरम २७ }
(८७)
खंडणी कबूल कतबा
{ श. १६०४ पौष वद्य १४
{ इ. १६८३ जाने. १६

दा। बो मोकदमानी मौ. सेखापूर का नासरे पा। माण. साहेबांचे बंदगीस लेहून दिल्हा कबूल कतबा ऐसा जे, मौ. मारचा अहवाल खरीफ व रबीचे पेरणी जाइलेवरी मेहू पडिला नाही. जुजबी पीक जाइलें. त्यास दुतर्फा लस्कर मोगलाई व संभाजी राजेचे घोडाराऊत फिरोन पीक गेले. रयत परमुलकास गेली. त्यावरी साहेबाचा कौल व रोटी घेऊन देसक येऊन गावावरी वस्ती करविली. जुजबी बांद राहिले. त्यास खडणी केली दोनखत व मा। व फाला कानूफाला गैरकानू व प्रनपटा व पायेपोशी व वेलकटी व सरखेली; गांवखर्च, मेहमानी, येगानी बलुते राणखा। व बगाईत व मोव्हतर्फा व वाणी व घाणेबूड व राबिता बेगारी व अडपालीव भेटी ठाणे व हागदार व तंबाकू व पत्र केणी, कुलबाब हसमलमख्त येकूण खंडणी १७ कबूल असो.

सनदापत्रें पृ. १६२ ले. ३ }
राजशक ११ रुधिरोद्गारी }
सफर ४ इंदुवासर }
(८८)
{ श. १६०४ दुंदुभी माघ शु. ५
{ इ. १६८३ जाने. २२

राजा शंभु छत्रपती— देशाधिकारी व देशलेखक प्रांत पुणें वर्तमान व भावी

श्रीदेवस्वामी वास्तव्य चिंचवड यांजकडे बागा व इनाम कारकीर्द निजामशहा व मलिकंबर व अदिलशहा व रा. महाराजसाहेब व कै. स्वामी चालत आलें आहे. सबब श्रीस्वामी मौ मार पिढीदरपिढी राहोन अन्नछत्र, गरीबगुरीब व फकीरफकिराणा जो कोणी येतो त्यास अन्न उदक देत आहेत. याबद्दल गांव इनाम दिल्हा आहे. तेणे प्रो आम्हासहि चालवणें अगत्य आहे तरी तुम्ही सालाबादप्रमाणें चालवणें.

(ह्या पत्रावर जो राजशक व संवत्सरनाम व वार आणि मिती व मुसलमानी महिना दिली आहे ती मुळींच जमत नाहीं. राजशक ११ रुधिरोद्गारी दिला आहे. पण रक्ताक्षी येतो. ह्या वर्षात माघ शु. ५ स गुरुवार जंत्रींत येतो. आणि शिवाय मुसलमानी महिना रबीलौवल ३ हा येतो. तर हें सर्व विसंगत आहे. राजशक १० घरला तरी वार शुक्रवार येतो. म्हणून मुसलमानी महिना तारीख मराठी महिना वारमितीस जमतो तो शक संवत्सर धरून हा काल दिला आहे. रा. श. ९ येतो.)

३

शि. च. सा. २ ले. ३७२ } (८९) { श. १६०५ ज्येष्ठ शु. ३
सु. १०८३ जखर २ } { इ. १६८३ मे १९

खान शर्जाखान—महानाड का पेठ अथणी.

मोगलाचे तहवेलीकरतां पेठ कसबे मजकूर जाळून फना होऊन खराब जाहाले. सदर पेठ जुजवी मामूर होत असतांना खैरतखान येऊन पेठ मारून खराब केले. यावर लावणी होत असता दुसरेने मोगलाचें तहवेली येऊन जे होते ते घर व मळगी जाळून खराब केले. याकरता ४ साले पेठ मार दिवा-लावणी नाहीसे जाले. सा माहानाडाचे दिलासाबद्दल ठाणा मुधोळासी आले. देसक व मिरासीदार यासी ७ साले कौल देवे. मिरे सुपारी दर गोणीसी मुठे २ लाभासी मुठे १ उगटासी मुठ १ व लवगा व पत्री जायेफल,गडच गुळखोबरे तांदुळ जिनसाना केणे जे घडेने जोका घेत होता तेची बा घेवे. जैन लोकानीं माहाजर प्रो चालावे. दिवाणात दैवामध जो कोण वडीलपण करितावी त्यानेच जावे. जकायेती व आडाणी व बाजे कानू कदीमप्रमाणे घेणे नवी जिकीर करूं नये. उभामार्ग व आडमार्ग जकायती कदीमप्रमाणे घेऊं. आपुलेआपुले मधे झगडाभांडण खुनखराब वगैरे कुल माफ. दरीबाल कौल. पानेचे नगासी जकाती होनु ८= यासी दिवाणासी होनु ८–। व हकदारास होन ८।· येकूण होन ८= येणेप्रमाणे घेऊं. याखेरीज येक पान दिवाण व हकदार घेणे निसबत नाही. पेठेमधे दुकानदारासी सादिलवार घेऊ नये. गुन्हेगारासी सीर मारावे सिके जाहाले असेल तरी दैव सांगून पाठविलीया सोडून देऊन· आबादानी करून सुखे असणे.

शि. च. सा. २ ले. ३७४ } (९०) { श. १६०५ ज्येष्ठ शुद्ध ३
सु॥ १०८३ जखर २ } कौलनामा { इ. १६८३ मे १९

सर्जाखान—महानाड पेठ शर्जापूर कसबे तिरदल.

कसबे पेठ अथणी असता दिलेलखानाचे तहवेली होऊन दौड केले. त्यातर्फे आम्ही होतो. अजीवास्ता तुम्ही पा तेरदाळाचे आसरेयास आलेत हे अहवाल पा मारचे कारकून हुजर लिहिले की माहानाडाचे दिलासा करून पेठेचे रचणूक करावे. ऐसियासी साहेबी कौल पाठविले जे, उदमवेवसाव करून सुखे असणे. पेस्तर आम्ही ते तर्फेसी येऊन तमाम तह करून देऊन म्हणौन तरी साल मा शाहाजादे ये तर्फेसी आले ते धास्तीने तुम्ही जागा सोडून परागंदा जालेती हे अहवाल महमद सुबेदार येही लिहिले बराये मालुमती कौल सादर तुम्हासी केले. पा माचे व पेठेचे उस्तवारी बदल महमद सुबेदारास धणी करून जे काय ते कौल बोल देतील ते बाबे आम्हापासून फरक पडणार

नाही. समस्त माहानाडाचे मुदाबदल ठाणा मुधोळासी येऊन दिलासा केले. सुबेदार, देसक, नाडगीर व हकदार यासी ११ साले कौल दिल्हे. गोणास जकाती (मीठ, सुपारी, म्हैस, बैल, तांदूळ, कापड, बैसक, छगाव, घास, कडबा, लकड, जायफल, लवंग, इत्यादि वस्तु यावरील कराची माहिती.) जैन लोक व हटगर वऱ्हाड केलिया व मयेत जालेया कलस ठेऊ नये. नवी जिकीर करू नये. दशावतार व बाजे खेल खेळावे. सालकेत देवरु येऊन वाचावे. पेठ मबकुरी सादिलवार करूं नये. पटणसेटी चिटी दुकानासी न लावणे. पेठ मारो कलागती केलिया दैवात पाठवावे. दिवाण वाजीपुसी करूं नये. गुन्हेगार नफरासी सीर माराने सिके जाले असेल तरी दैवाने सागोन पाठविलेया सोडून देऊ हा कौल.

शि. च. सा. २ के. ३७१ }　(११)　{ श. १६०५ आषाढ वद्य ५
सु. १०८४ रजब १७ }　(कौलनामा　{ इ. १६८३ जुलै ३

भगवंतराऊ सुभेदार व कारकून पा। तेरदाळ　— सिवया मुळोडी व सा। माहानाड पेठ शर्जापूर पा। का। मा।

कौलनामा जे, तुम्ही समस्त सालगुदस्ता शाहजादेचे तहवेली करतां समस्त माहानाड पेठ मा। सोडून ठाणा मजकुरासी गेळे. यैसियासी साहेबी नजर इनायत करून ठाणा मा। पावेतो जाऊन दिलासा करून पेठ मामूर करावी, म्हणोन इलतमेश केली. त्यावरून आम्ही, व देसक व नाडगौड, ठाणामासी येऊन माहानाडाचे मुदा काये म्हणौन विचारिले तुम्ही रा. जाखोजीराजे कदम सुभेदार व कारकून ठाणामारचे विद्यमाने मुदा पेश केले त्याप्रमाणें कौल सादीर करावा म्हणून तपसीलवार साहेबासी लिहिले. साहेबीहि कौल पाठविला. दिवाणीचे फर्मान, हजरत मदारुलमहामीचे व छत्रपतीचे कौल आणौनु देऊन. सर्व सरंजामी करून खातीरजमा राखावा. पेठ आबाद करावी. कौल प्रमाणें हकजवार पा। मा। देसक, नाडगीर, पटेल, कसबा व देश-कुलकर्णी व बारा बलुते याचे निशाणानसी महाजरहि देऊ. विरतमठास पाऊ चावर दर सवाद का। मारपैकी दिल्हे. याप्रमाणें खुर्दखत आणून देऊ. हली मिसल दिल्हे. पेठ मारचे जे काय वस्तभाऊ व पैके गोपाळराऊ नि। राजेसाहेब घेतले असेल व नेले असेल ते तमाम आणून देऊन. तंबाखू दर नगास ८= होन देणे, येक लावणी जकात देणे, फरोखत जालिया त्या पासून घेणे माल घण्यापासून येक लावणीचे देणे. पेठ मारापासून परपेठेस नग घातलेया जकायती घेणार नाही. येक लावणीच देणे, तंबाखूजलीजचे दर नगास ८— देणे.

शि. च. सा. २. ले. ३७५ } (१२) { श. १६०५ आषाढ वद्य २
सु. १०८४ रजब १७ } { इ. १६८३ जुलै ३

यादपा जखापा देसाई पा तेरदल--सिवपा मुचडी व समस्त माहानाड
पेठ शर्जापूर पा तेरदळ.

सालगुदस्ता मोगलाचे तहवेली करता पेठ मार सोडून परागदा होऊन ठाणे मुधविलेसी गेले. समस्त देवाचे दिलासे बदल माहाराज रा प्रभू देवरु पेठ मामूर करणें म्हणून हुकूम केले. ठाणाचे सुबेदार भगवतराऊ माधवराव विदमाने तपसील हाल कौल आणून देऊ म्हणून नेम करून ते बरहुकूम हजरत किबलगाह साहेबी दिवाणफर्मान, हुकुमतपन्हाचे कौल पाठविले. ठाण मबकूर थळ विदमानें तमाम कौल दिल्हे. आम्ही समस्त मिरासीदारान कौल बा राहाटी चालून घेऊ. कोणाविशी अनमान न करता पेठ मा मामूर करून सुखे असणे. तमाम नाडगिराचे निशानानसी माहजर करून देऊ.

शि. च. सा. ४ ले. ७३७ } (१३) { श. १६०५ श्रावण शु. ११
सु. १०८३ साबान ९ } { इ. १६८३ जुलै २४

जावता मोईन. मोहनीबाबा, पेठ पाटगाऊ सुबा पो कुडाल. बा सनद मोईन, छत्र० शक ९ दुंदुभी भाद्र. व. १३ भोमवासर सालिना मोईन पाद. ४०० दर १। येकून निशाणी होन ५०० (नित्यपूजा, नैवेद्य, निमित्य-पूजा श्रावण सुध अष्टमी समाधितीथपूजा, येकादसनी, सहस्र भोजन, वस्त्रे, क्षीरापती, रात्रीपूजा, नेजदार=नेजा (भाला) दार; लिहिणार ब्राह्मण, कोठ-वळा, पुराणीक इ. ची नेमणूक) पूजा करून श्रीरासी कल्याण इच्छिणें.

शि. च. सा. २ ले. ३७६ } (१४) { श. १६०५ श्रावण वद्य ७
सु. (१०८)४ साबान २० } { इ. १६८३ आगष्ट ४

साबाजी राजे घांटगे—शिवपा मुचोडी व समस्त माहानाड पेठ
अथणी हली मुा तेरदल

मालोजी पोळ येही लिहिले व कृष्णाजी कमलाकर तुम्हापासी पाठविले होते त्यानी लेहून दाठविले त्यावरून समाधान जाले. तरी पूर्वीपासून पेठेचा अभिमान तुम्ही धरिला आहे. आम्हांसही भरंवसा तुमचाच आहे. साहेतेस कौल, हातरोखा, पत्र पाठऊन देतो. व रा. सवाजी राजे याचाहि कागद पेठेचे मामुरी करिता आणावया पत्रे रवाना केली आहेत. तेही येतील. पेठेवरी मार्ग पडोन आबादानी केली पाहिजे. येणेकरून तुमचा नामोस आहे. कदीम जागा तुमचा आहे.

शि. च. सा. खं. ९ ले. ५९ } (९५) { श. १६०५ श्रावण वद्य ३०
सु. १०८४ साबान २८ } { इ. १६८३ आगष्ट १२

केसो त्रिमल—बाबाजी महादेऊ देशकुळकर्णी चेऊल.

पत्रदर्शनी स्वार होऊन आम्हापासी आपले माहालीची दस्त व समजाविसीचे कागद घेऊन येणें.

रा. खं. १८ ले. ५७ } { श. १६०५ आश्वीन वद्य २
रा. श. १० रुधिरोद्गारी } (९६) { इ. १६८३ सप्टं. २७
सु. १०८४ सवाल १५ }

दतसेटी सेटिया याचे नावें हिरोजी इंदुलकर याचे कर्ज बा बाकी वादत आहे. त्या पैा कोंडाजी दामोदर सबनीस दिा फुटनाईक यास बदल मुशाहिराचे ऐवजी होन पा. १७ देविले. आदा करून जाब घेणे.

शि. च. सा. २ ले. १३७ } (९७) { श. १६०५ आश्वीन वद्य ७
सु. १०८४ सवाल २० } { इ. १६८३ आक्टो. २

अंताजी गोविंद हवालदार व कारकून काा सासवड } कृष्णाजी, गोविंद अजहत सबनिसी व चिटनिसी दिा राजश्री पंताजीपंत

तुम्हास मुशारा पावला नाही म्हणून रुसवा करून घरास गेला आहां. येथे दिवाणकाम टाकून न पुसता घरास गेलेस. आम्ही माहालास येऊन ३।४ महिने जाले भेटीस येत नाहीत. तरी पहिलेपासून तुम्ही सबनिसीचे कामकाज करीत आले. आतां आम्ही आलो म्हणून घरीं राहिले आहां. तरी ऐसे न करणे. देखत कागद भेटीस येणे. मुशारा राहिला असेल तोहि विल्हे करून देऊन. तुमचेविशई रा. पंताजीपंत याणी लिा आहे. याकरता तुमचें चालवणे आगत्य आहे. तर लौकर येणे.

शि. च. सा. १ ले. ६७ } (९८) { श. १६०५ कार्तीक शु. ७
सु. १०८४ जिलकाद ५ } { इ. १६८३ आक्टो. १६

नीळकंठ मोरेश्वर प्रधान—बाजी घोलप हवालदार व कारकून किले पुरंदर.

तांब्रापासून किला घेतला (श. १५९१ फा. व. १२) ते पासून वे. विश्वनाथभट व सखंभट ठकार यांस किल्यावरील तासाची सेवा निळो सोनदेव भट यांनीं सांगितली. त्याउपरी किले मजकुरीचे मिरासीदार जोतिषी शिवभट व नारायणभट पुरंदरे तासाची सेवा आपणच करूं म्हणू लागले. पण ते निळोपंतांनीं अमान्य केलें. पुढें कै. (शिवाजी राजे) किलियास आल्यावर त्यांनीं ठकारांकडील तास मना केला. पण पुरंदरे यांस

ताशाची सनद दिली नाहीं. पुनः भेटावें तों शिवाजी राजे कर्नाटकांत गेले. नंतर पुन: रायगडी जावे तों घडलें नाहीं. पुढें १६०१ मध्यें जाल्हनापूरप्रांते गेले व उपरी सवेच कै. केला. पण पुरंदर सारखा सरहद्दीवरील नामोशाचा किला तेथें तास पाहिजेच. वृत्तिवंताचें संस्थापन करणे हें स्वामीसही अगत्य. म्हणून पुरंदरे यांस ५० पातशाही होन सेरणी, देखील सरदेशमुखी, घेऊन ताशाची सेवा सांगितली. उभयतां पुरंदऱ्यास १५।१५ अशा ३० लारी देण्याचा करार. सुरनिसी वजावाटा करून उरले वेतन दरबार रवेसीप्रो देणें. सेरणी यंदा होन १० व बाकीचे ४० दरसाल ८ प्रो भटमजकुराचे हकी वजा करणे. सिंहगडाप्रमाणें दररोज तेल देत जाणे.—(ह्या पत्राची शेवटी दिलेली ता. ५ पण पत्राचे मबकुरांत आली आहे. ता. ७).

रा. खं. १५ ले. २५ } (९९) { श. १६०५ कार्तीक शु.१०
सु. १०८४ जिलकाद ८ } { इ. १६८३ आक्टो. १९

केसो त्रिमल—विनायक उमाजी सुबेदार व कारकून सुभा प्रा पुणे.

पा मा।रचे देशकुलकर्णी हुनिघ येऊन विनंती केली देशमुखास व देशकुलकर्णीयास पेशजी रा. दादाजी कोंडदेऊ सुभेदार तीही इनामती खंडणी दर सालास विघली होनु पातशाही ४०० देशमुख ३०५ व देश-कुलकर्णी होनु ९५ एकूण ४०० होनु खंडणीचा तह विधला. त्याप्रमाणें गलबलिया आधी उसूल होत आला आहे. हाली १०।५ साले गलबला जाला आहे. माहाल खराब पडला. जुजबी गाऊ वसाहत थोडे बहुत आहेत. त्यास आपणास व देशमुखास हकाचे दस्त बहुत थोडे होते. त्यास दस्त माफीक देशमुखास व आपणास पोटास देऊनु वरकड दिवाणात घेत आहेत. एणेकरून आपला अवकात चालत नाही. स्वामीची सेवा करावी लागत आहे. त्याहीमधें आपण वृतिवंत आहों. सेवा एकनिष्ठपणे करीत आहो. तरी जे वेळेस सारा परगणा कीर्दी होत होता. तेव्हांचा तह ४०० होन खंडणीचा. हाली परगणा खराब, वसाहती जुजबी, आपणासहि हक उसूल होत नाही. तरी दस्तरकम-प्रमाणे होते त्या हिसेबे चौ शा होनाची तकसीम बसेल ते देशमुखापासूनु व आपणापासूनु जे तकसीम ते घेतलियाने आपलाहि अवकात चालेल. स्वामि-सेवेस वृतिसंमंधे एकनिष्ठ सेवा करून म्हणून देशकुलकर्णियानी विनंति केली. ऐसियास हाली यांचा इनामती खंडणीचा तह केला. ऐन दस्त साल ब साल होईल त्यास दस्तमाफीक चौ शां होनाची बेरीज दस्तांप्रमाणें बसेल ते यापासूनु घेत जाणे. हाली दस्तहि कमी आहे. ऐणप्रो तह केला आहे. विसेष तोसीस न देणे. एविसी रा. कै. व रा. पंत वैकुंठवासी यांचीहि पत्रे माहालीच्या कारकुनास आहेती.

शि. च. सा. १ ले. ६८ } (१००) { श. १६०५ कार्तीक शु. ११
सु. १०८४ जिलकाद १० } { इ. १६८३ आक्टो. २१

नीलकंठ मोरेश्वर प्रधान—नागोजी बलाल सुभेदार व कारकून सुभा प्रा माहालानिहाय प्रा इंदापूर व सुपे.

' ले. ६५ प्रो. ' तिघांची पाटिलकी सुपे खुर्द येथील. तरी तशीच चालवणें. शंकराजी नीलकंठराऊ व हाऊजी धणगर याशी जगथाप नसता कथळा करावयास समंध नाहीं. (मागील क्र. ४५ पहा)

रा. खं. १५ ले. १४६ } (१०१) { श. १६०५ कार्तीक वद्य १४
सु. १०८४ जिलकाद २७ } { इ. १६८३ नोवें ७

—मोकदम मौजे कविठे सा हवेली पा वाई

श्रीसदानंदाचा (मठ मौजे निंब) इनाम मौ मारी आहे. साल गुदस्ता चालिले आहे तेणेप्रमाणें चालवणे, एक जरा उजूर न करणें.

इ. वृ. १८३३ पृ. ५५ } (१०२) { श. १६०५ मार्ग. शु. ७
व ,, १८३४ पृ. १५६ } { इ. १६८३ नोवें. १५

शिवराम (कल्याणि) एकनाथस्वामीच्या मुलीचा मुलगा—यानें गीताचंद्रिका मराठी केली. दीनदत्तपदांकितमुकुंद कवी काव्य करूं लागले.

शि. च. सा. २ ले. ३७८ } (१०३) { श. १६०५ मार्ग. शु. ८
सु. १०८४ जिल्हेज ७ } { इ. १६८३ नवं. १६

सर्जाखान—सिवापा मुचेडी व जिवाजी सोमाजी व समस्त माहानाड पेठ शर्जापूर मो पा तेरदल

तुम्ही पा मार पेठ शर्जापूर वसात केले म्हणऊन तुम्हांवरी मेहेरबानी नजर करून हुजूर बोलावून तुम्हास मुधोलाचे ठाणा इपतीदेपासून कौल मऱ्हामत केले. हालीही कौल दिल्हे. पेठ मा व मार्गानिहये पुंड व पाळेगार व असपाद लोकाचे तसवीस लागितील तरी त्यासी सजा दिल्हे जाईल. पेठा मारासी संभाजी राजेचे तसवीस लागो देणार नाहीं.

शि. च. सा. २ ले. ३७९ } (१०४) { श. १६०५ मार्ग. शु. ८
सु. १०८४ जिल्हेज ७ } { इ. १६८३ नवं. १६

सर्जाखान—सिवपा मुचेडी व जिवाजी सोमाजी (ले. ३७८ प्रो) पेठ व का अथणीहून मोगलाचे तहवेलीकरता तेरदाळास आला. तेंव्हां

सिवराऊ सुभेदारास कौल देऊन पाठविलें कीं पेठ वसत करणे. तुम्ही पेठ सर्जापूर वसात करून, मळगिया बाधोन, मामूर केले. सालगुदस्ता शाहजादेचे तहवेलीकरता पेठमार सोडून मुधोळास गेले. तेयेहि पेठेबदल विचारले व तुम्ही सांगितलेबरहुकूम मुधोळथळ मार्फतीनें कौल दिल्हा, तरी आबादानी करुन सुखी असणे. रवेशबराबरी फारफेर होऊं देणार नाहीं. जैनानी नवी जिकीर करणे निसबत नाहीं.

शि. च. सा. २ ले. ३८० } (१०५) { श. १६०५ पौष वद्य १
सु. १०८४ मोहरम १५ } { इ. १६८३ डिसें. २४

कर्जखतबा

आदिसेटी सेटीकर पेटा जोहरापूर — खंडोबा नाईक गो

पा तेरदाळचे महानाडसी होन २८०० सर्जाखानाशी आपण धणी होऊन महानाडसी साडिले असता महानाड पा मानी. सदरहू पैकपवे होन २११६८० निरवेध करून दिल्हे. बाकी होन ४६४ राहिले. ते करता खानेसाहेबानें तागाद लाविल. त्यासाटीं तुम्हापासून ते घेतले. त्यासी कलतर ५ प्रमाणें असे. मुा चादर्सा. चांदचे मुदतीसी नेऊ तरी पुढील चाद माहसी सवाकी घालून देऊ. यासी कही उजूर नाही.

शि. च. सा. ३ ले. ६४१ व } (१०६) { श. १६०५
५ ले. ८२९ फ. १०९३ } { इ. १६८३

पा मजकुरीची देशमुखी देवकर याची पिढी दरपिढी असता उमाजी वलद संभाजी भोसले-शिवाजीमहाराजांचा पुतण्या-यास विजापूर तर्फेनें जागीर होती. तेव्हां त्यानी देशमुखावरी धामधूम करून जोरावरीने दोखी घेतली. देशमुखास मारून बाहीर घातले. व जागीर होती तोवरी देशमुखी खादली. त्यावरी पातशाही जाल्यावर पा मास जे जाहागीरदार आलें त्यानीं तनखियांत दोखी खात आले. पुढे सन माराकारणे जागीरदार हाबीबुलाखान जहागीरदार आले. त्यासी हुकूम आणिला कीं, देसमुखाचे मुलास वतन देणे. मग दोडे, मोकदम, हालीमवाली बोलावून हकीकत मनास आणून कदीम दोखाकडे दोखी देणें. हा महजर.

रा. खं. २० पृ. ५० } (१०७) { श. १६०५
फ. १०९३ } { इ. १६८३

हजरत जिलसुभ नी बदौलत दक्षणेंस आले. तेथून (सुपा) ठाणे को मजकूर मानूरखान आले. ठाणे कायेम करून रसूलखान मयाणी यास ठेऊन गेले सन १०९३. याउपेरी कितेका रोजां हजरत बादशाहा तुळापुरास

आले ते समई जुलपुकारखान रायरी फते करून राजश्रीस बराबर घेऊन आले. ते समई कुलपरगणाचे जमीदार हुजूर तलब केले की तमाम मुलूक आबाद होए म्हणोन मुचलके लेहोन घेतले. म्हणोन तलबा केल्या. तेसमई...कुल मुलकास सिरपाव देऊन कौल घेतला. तो महादाजी यमाजी वोकील दिवाणचे कचेरीस उभा राहिला कीं, सुपांचे देशपांडेपण आपले आहे.. लस्करहि कूच जाले विज्यापुरास चालिले. तों मेहेरचंद पेशदस्त दक्षण कचेरीचा त्यास खबर कळली कीं, देसपांडिया हमराही मधेंच आहे अजणू परगणियांत गेला नाहीं. मग चोपदार महसल लाविले आणि लस्करातून च्यार कोसी काढिले की परगण्यास जाऊन आबाद करणे.

शि. च. सा. २ ले. २७७ } (१०८) { श. १६०५ इ. १६८३

साबाजी राजे घाटगे-सिवसेटी मुचडी व समस्त महानाड.

अथणीचे पेठ मामूर करावी ऐसे आम्हासी गोसावी बहुत (सांगितले अस)तां साप्रत दिपवाली कारणें विवेक करू ऐसे बोलिला होता. तरी कोणेविसी आतां दिरंगावरी न घालतां दिपवाली कारणे दुकान मुस्तैद होऊन साऊकार सेटीकार येऊन आपला उदीम वेवसाव करीत यैसे केले पाहिजे. येणेकरून तुमचे वचन सत्य होईल. आम्ही तो श्रीमहादेव भक्त अहों. जे तुम्हासी शफत पूर्वक बोलिलेस अतर पडणार नाहीं. तुम्हास खान अजमाचे पत्र प्रमान तरी पाठऊन देऊं. येथील वर्तमान राजकी येक प्रकार जाहाले आहे. ते परस्परे राऊलासहि श्रुत आहे. थोडियाच दिवसामधे पत्र पाठउनू देउनू.

शि. च. सा. २ ले. ३७३ } (१०९) { श. १६०५ इ. १६८३

सिदगौड भूपती देसाई वा पाटेल का। अथणी } — सिवण मुछेडी वा समस्त माहानाड पेठ का। अथणी मा। परगण तेरदाल

मोगलाचे गलबलेकरता तुम्ही वा समस्त दैव आवघे मिळून पा। मासी गेलेवरी हजरत खैरतखान सिद्दी दास मोकासा अर्जानी जाला, त्यावरी चेनपा हजरतसाहेबाचे भेटीस गेले. आपण पेठ मामूर करतो मुदे घातले, की सुपारी वा मिरे लाभा वा उगट यासी येक गोणीस ८। येक उगट मुठीने देता जातो. आतां तेरदालमधे ते लाभउभट दोनी मुठीने घेऊ देऊ सालाबादप्रमाणे म्हणतात. ऐसियासी साहेबाने आपणावरी ८८। येक पाऊ जोखून देवे सरिखे खुर्दखत करून दिल्हेया आपण जाऊन पेठ बिलाकुसूर मामूर करू देऊ म्हणून आम्हीप रभारे आइकलो. हे वर्तमान तुम्ही आइकिले असाला तरी

गोसावीयाने त्या गोष्टीवरी ना बाणे. सालाबाद जषी पेठ बाहले तषीपासून लाभ वा उगट दोनी मुठीने देतघेत आहेती. तैसेची पेठेचे रवेश आहे. नवे जिकीर सौदीमधे बैसून मूटमार्दीनें चालून घेतले. आतांहि मालुमाती करून खुर्दखत करून घेतले त्या गोस्टीवरी गोसावीयानें ना बाता सालाबाद जैसे दोनी मुठीने लाभ वा उगठ देतघेत आहेती तैसेच पुढेहि सालबाद चालेल. चालून घेणार आम्ही आसो, दरमेने आम्हा वितरक्त नवे जाकीर केले होते चालू पाहतो की काय हे गोस्टी सर्वथा चालणार नाही. तुम्ही समस्त दैवाचे समाधान करणे. याची आम्ही चुकलेया श्रीसिद्धेश्वरदेवस्वामी साक्ष असो. सालाबादप्रमाणे दोनी मुटीने लाभ वा उगट जैसे चालिले आहे तैसे चालू.

शि. च. सा. लें. ३८४ } (११०) { श.१६०५–०६ इ.१६८३–८४

अदिसेटी सेटिकार पेठ जोहरापूर-सिवमा मुचेडी वा जिवाजी सोमाजी वा समस्त माहानाड प्रा। तेरदाळ.

पैकेसी गहुत दिरंग लावले. येथें खानसाहेबानें पैके झाडे लावून सरगिर्दाने करताती येस तरी होऊ नये. आतां गोसाव्यानें २८०० होन···पैक ३५४ त्या वेगळ येथें रा। रंगोपापंताचे १ शे, पैकीं होनु ५० योहूनमध्यें दिल्हे. वा खोबगिरी माहलदार बरोबर होन २६ वा रसद फेरमुबादल करून हुजूर पावन करिताना तुटी होन ३४ एकूण ४६४ इतक्यासी खानसाहेबाने बहुत तगादा लाविल ते (ले. ३८० प्रो) दिल्हे, त्या पैके बदल सौदागराने तातड लाविली. तेबदल तुम्हांजवळ पावाडसेटीसी पाठविले. सदरहू पैके कळतर सहीत व रंगोपंताचे पैकीं ५० पाठविले पाहिजे. सौदागरचे पैकसी आम्ही चांदसी नाहीं दिल्हे म्हणजे सवाकी बर निसबतने होईल ते देऊ. चांद दोन दिवस असतां पाठऊनु दीजे. बळसेटीवरी होनु १०॥ ची हुडी रोखा करून पाठविले ते पैके आम्हासी पावले नाही. मलिकभाईसी मासला होन १॥ देविले.

शि. च. सा. खं. ८ ले. ४६
पोर्तु. मराठा पृ. ७५
सु. १०८४ मोहरम २४ } (१११) { श. १६०५ पौष वद्य ११ इ. १६८४ जाने. २

कविकलश—धर्माजी नागनाथ सरसुबेदार व कारकून सुभा प्रा। फोंडे.

हजरत पीर अबदुलाखान कोट फोंडा, बहुत जागृत स्थळ. फिरंगियांनी गनिमाई करून कोटास वेढा घातला, कोट बहुत जेर केला, तेव्हां कोट मजकूरच्या हवालदार, सर नोबत, सबनिवीस, नाइकवाडी, लोकीं प्रार्थना केली

कीं, गनिमाचा पराभव करणे. रा. छत्र. स्वामी विनंती करून ऊर्जा चाले-सारखी पोख्ती सरंजाम करून घेऊन. रा. स्वामीची फत्तेबाजी होऊं देणे म्हणोन नियत केला. त्यावरी रा. स्वामीचे स्वारी कोट मजकुरी होउनु फिरंगी गनीम मारून काहाडले. रा. स्वामी जये आले फते जाहाली. ऐसी विराची करामती. म्हणौनु तुम्ही व कोटकरी यांही छत्र. स्वामीस विनंती केली. त्यावरून नियत केला धर्मादाये देविला. दर साल नव होन ५० रास ऊदफूल दिवा देखिल उरूस येकून नव होन २६ मुा मुजावर नफर सालिना होन नव २४ येणे प्रो सुबे मजकुरी ऐवज देविला.

सनदापत्रें पृ. १६१ राजशक १० रुधिरोद्गारी	(११२)	श. १६०५ पौष वहुल १२ इ. १६८४ जाने. ३ गुरु.

राजा शंभुछत्रपती—विठल शंकर देशाधिकारी प्रांत जावली

दताजी केशवजी पिसाळ देशमूख तर्फ जोरखोरे यांसी कै. स्वामींनी हकवतन करून दिल्हे आहे. त्याप्रमाणें मोईन चालत आले. हली कुसूर होतो. तरी हे दिवसांत गनीम कोंकणांत पेशक. या प्रसंगें हशमाचा जमाव करावया देशमूख मानिल्हेस आज्ञा केली असे व पुढें कितेक काम याचे हातून घेणें असतां उगेच माणूस दिलगीर करावे आणि स्वामीकार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी. हे गोष्टीनें स्वामीचा तरी फायदा! तरी कौडी इतकी गोष्ट नाही. ऐसे असतां असे करावया गरज काय! याउपरी देशमुख तरी रंजीस न करणें. त्यांचा हक साबाबादप्रमाणें चालवणें. कसूर काडीइतकी न करणें. पुढें बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहींत हें नेमस्त समजणें लेखनालंकार.

शि. च. सा. २ व ५ ले. २७१ व ले. ९४४ रा. श. १० रुधिरोद्गारी	(११३)	श. १६०५ पौष वा। १२ इ. १६८४ जाने, ३ गुरु.

शंभु छत्रपती स्वामी—देशमुखानी प्रांत वाई

सुलततान मांजम व शाबदीखान गनीम दोहीकडून कोकणात उतरला, याप्रसंगे हशमांचे बहुत प्रयोजन आहे. करितां रा. संताजी यमाजी सरमिरा + यांला नौसंचणी हशमाचा जमाव करावयाबद्दल वरघाट प्रांते पाठविले असे. ते सांगतील तेण्हेप्रमाणे नौसंचणी करून पाठऊन देणे. हे काम बहुत नाजूक आहे; याप्रसंगी जरी हशमाचा पोख्त जमाव जाला तरी गनिमाचा काय गुमान लागला. बुडविलाच जातो. जमाव पाठविणे. स्वामी संतोषी होतील. आजीवरी स्वामींने तुमचे चालविले ते सार्थक ह्या दिवसांत करून आपला मुजरा करून घेणे. तलाश तरतूद करून हशम पाठवून देणे.

श्रीसां. ले. ५५, ५६
रुधिरोद्गारी इंदुवासर

(११४)

श. १६०५ माघ शु. १
इ. १६८४ जाने ७

रघुनाथभट्ट नवहस्त—भैरवभट्ट महाबळेश्वरकर जामात व श्री
सांप्रदाई उपासक भक्तराज.

श्रीरामदासस्वामीनी दया करून श्रीरघुनाथ चाफळ येथील उपाध्यपण व पुराण ऐशा दोन्ही वृत्ती आपणांस दिल्ह्या. कन्यादानसमयींच्या संकल्पाप्रमाणें सांप्रत महायात्रेस जातेसमई या दोन्ही वृत्ति तुम्हास दिल्या. त्यास इनाम विळाशी अर्धचावर व वर्षासन यासहित व राजपत्रेहि तुमचे स्वाधीन केली असत. हे दानपत्र श्रीचे माहास्थलीं महापुरुष भलेभले श्रीचे सांप्रदाई यांच्या विद्यमाने वंशपरंपरा दिल्हे.

शि. च. सा. २ ले. ३३०
सु. १०८४ सफर ६

(११५)

श. १६०५ माघ शु. ७
इ. १६८४ जाने. १४

अबुल मुजाफर अदि०—भानजी देसाई पा कुडाल

तुझेविसी हजरत शाहापनाह मूर्तजाखान गुदराणिले. तेवरून कौल हुमायून तुज सादीर फर्माविलें असे. तुवा हे कौलनामावरून आपुले खातीर करार करून असणे वा मोकासाई याचे हक मोंकासाईयासी वा रयेताचे हक रयेतासी पाववणे वा हलालखोरी करून विलायेती पा मार मामूर वा आबादन करून वा कोणे बाबे कांहीं अदेसा न करणे.

शि. च. सा. २ ले. १६९
सु. १०८४ सफर १३

(११६)

श. १६०५ माघ शु. १४
इ. १६८४ जाने. २१

विनायक उमाजी सुभेदार व—जिवाजी नारायण हवालदार व
कारकून प्रा पुणें. कारकून ता करेपठार

रा. महादाजी गोसावी सेकीन मोरेश्वर याचा इनाम मौजे मजकुरी आहे. जिराईत हिवरटिके कास रुके ८३।। बागाईत पाढरी देविळा नजिक बिघे ८६. सालाबाद दुमाले चालत आहे. सालमजकुरी कीर्दी करितील म्हणून म्हणतावी. तरी यावत् आले आहे तियाप्रो साल मारी चालवणें.

शि. च. सा. ९ ले. ६०
राज्य. १० रुधिरोद्गारी
सफर २८

(११७)

श. १६०५ माघ वद्य १४
इ. १६८४ फेब्रु. ५ भोमवासर

—चिमणाजी आऊजी

गनीम हबसी व फिरंगी यांनी कुडे, ब (दा) पोली व सिडकोली-मामले चेऊल ही ३ गांवें मारून नेले. ते समयीं रयतीचा गला कूळ लुटून नेला.

याकरतां रयत दिलगीर व परागंदा होऊ पाहते...चेऊलच्या हवालदारे हुजुर लिहिले. तरी तुम्ही मनास आणणें व हुजूर लिहिणे. लिहाल त्या प्रो त्याची विल्हे होईल. दादाजी कुलकर्णी याचे सेतचा गला मौजे कारले येथें होता तो साराच राजभाग प्रजभाग कुल घेऊन खर्च केला. म्हणोन दादाजीनें सांगितले. तरी राजभाग वजा देऊन प्रजभाग तितका दादाजीस परतोन देणें.

रा. खं. २६ ले. ४८ } (११८) { श. १६०५ फाल्गुन शु. १
जुलूस २७ सफर २९ } { इ. १६८४ फेब्रु. ६

(मोगल वरिष्ठ अधिकारी) अमानतखान—परगणे नाचनगाव सुभा वऱ्हाड येथील देशमूख, देशपांडे, मुकादम व इतर लोक.

हा परगणा आतां भगवंत सिंग याच्या ऐवजी राजरूप वलद सयाजी भोसले याजकडे जहागीर दिला आहे. तरी त्या प्रांताचा कर त्यांजकडे द्यावा व त्यांचे अधिकारीयांस त्यासाठीं नेमिलें आहे. ते तेथील प्रजा शेतींत गढून गेलेली व वसूल नियमित देणारी अशी ठेवावी. ४ ल. २७ ह. रु. वसूल. त्यांचे वकिलाकडून २०० रु. घेऊन मुचलका घ्यावा व हुद्दा द्यावा.

शि. च. सा. ९ ले. ६१ } (११९) { श. १६०५ फाल्गुन शु. ६
सु. १०८४ रबल ५ } { इ. १६८४ फेब्रु. ११

दादाजी महादेऊ देसाई व —सुभेदार व कारकून सुभाप्रांत चेऊल देसकुलकर्णी मामले चेऊल

माजी सुभेदार राघो विश्वनाथ व आपणामधे वर आकसी पडली होती. आपण चिमणाजी आउजी बराबरी माहागडीचे मुकामी गेलो. मामले चेऊलचे वर्तमान साकल्य विदित करून मामला करून द्यावा या निमित गेलो म्हणौनु सुभेदार मशारनिल्हेने मागे आपले घर कैद करून आपले नगनगोटी वस्तभाव आणिली. हाली आपण स्वामीजवली वर्तमान विदित केले. राजश्री पंत कृपावंत होऊन राजाज्ञा पत्र स्वामीस दिधले. कीं नगनगोटी देणें. पैकी कितेक खर्च लेहून दिधले. ते स्वामीहीच वर्णून दिधले. त्यावरून वस्तभाव आणिली सुभा होवी. ते देविले तितपसील कठमाला, तारी, गजव्रण नरूत.

श्रीसां. ले. ५७, ५८ } (१२०) { श. १६०५ फाल्गुन वद्य ६
राज १० रुधिरोद्गारी } { इ. १६८४ फेब्रु. २६ भौमवासर

राजा शंभु छत्रपती—वेंकाजी रुद्र मुख्य देशाधिकारी प्रांत कऱ्हाड.

—अंबाजी मोरदेऊ प्रांत सातारा

श्रीदासनिर्मितस्थान श्रीरघुनाथ प्रो चाफळ येथील प्रतिवर्षीच्या रामनवमी-यात्रा-समारंभास बाऊन कुसूरकथला करूं न देणे.

—श्रीदेवास को चाफळ येथील इनाम सुभे मजकुरी आहे ते कै. स्वामीसनदेने चालत आहे. त्याची विल्हे वे. दिवाकर गोसावीयाच्या विद्यमाने चालो देणें.

सा. सं. इ. ले. ३१ सु. १०८४ जवल १	(१२१)	श. १६०६ वैशाख शु. ३ इ. १६८४ एप्रिल ७

कविकलश—भानजी गोपाळ सुभेदार व कारकून पा कुडाळ.

पाटगांवींचे मुकामी जिवाजी राम चिटनिवीस विनंती केली कीं, आपला वडील पितांबर शेणवी यास अदिलशाहाचे कारकीर्दीस चिटनिसीबदल होन निशाणी ४४ व हरकारगिरीबदल ३६ एकूण ८० आणि इनाम वाडी व रावडें मौजे नेरूर व वाडी हुबरमळा मौजे अणव व कुलकर्ण माहाल जकात देखील बंदर वेंगुर्ले यास मुशहिरा तैनात सालास दर सदे होन १ व विस्वा हरीजन्नस केर्णे १ चरीस दर गोणीस १ रुका चालत आहे. ते हली साहेबास मुल्क अर्जानी जाला. पूर्वीची कै. स्वामीचे वेळची सनद ४०० ची होती (शक १५९१ श्रावण शु. २=१६६९ जुलै २० विद्यमान बाबाजी पुंडे). पुढें पितांबर शेणवींचे जागी आपण चिटणिसीचे चाकरीस राहिलों त्यास वतन ५ होनाचा तह जाला. येणे करून अवकात चालत नाहीं. पहिले पालखी चालत होती तेहि राहिली. तरी सरंजामी आतां १०० होनाची केली ते आदा करून चिटणीसीची सेवा घेत जाणें.

रा. खं. २६ ले. ४९ जुलूस २७ जमादिलाखर २८	(१२२)	श. १६०६ ज्येष्ठ वद्य ३० इ. १६८४ जून ३

(येतमादखान मोगल अधिकारी आसदखान)—देशमूख, देशपांडे, मोकदम व राया, मुजारिया परगणे कडेवलीत सर० अहमदनगर सुभे औरंगाबाद ऊर्फ दखन.

राजरूप वलद सयाजी भोसला बा तलफ इजाफा व येवज जागीरा मोकरर सूद १ ल. ५ ह. दाम.

[त्या चिठीत सलास व १०९२ हा आंकडा देऊन अखर=जमादिउसानी २८ सन २७ दिला आहे. त्या फसलीसनाशी सलास सन व जुलूस २७ याचा मेळ बसत नाहीं. जुलुस २५ येतो. २७ धरून वरील काल दिला आहे.]

राम. दाधी ४२ ले. ४४ } (१२३) { श. १६०६ ज्येष्ठ वद्य १०
सु. १०८५ जखर २८ } { इ. १६८४ जून ३

नीलकंठ मोरेश्वर-हरि शिवदेऊ सुबेदार व कारकून ता। चेऊल

चेऊलचे अदिकारी व देशमूख हुजूर आले होते त्यास रा. चिमणाजी आऊजी यानी जेणेप्रमाणें कौल देऊन संचणी केली आहे त्याप्रमाणें हे कबूल आहेत व कतबा लिहून दिल्हा आहे. अमानत गांव आहेत त्या गांवची लावणी संचणी करणे व बाजती वसूल जाला तो पेस्तर सालामधे मजरा देणे. सागरगडीहून ५० खंडी गला देविला आहे तो आणून रयतीस देवणे. लावणी संचणी होय ते करणें.

शि. च. सा. २ ले. ३८१ } (१२४) { श. १६०६ आषाढ वद्य ४
सु. १०८४ रजब १७ } { इ. १६८४ जून २१

विवाण परगणे तेरदळ-मोकदम कसबे तेरदळ.

दडीतील देसकानी पा। मा। येही इलतमेश केली कीं तेरदळमधील मर्जापूर पेठेंतील वीरत मठ महानाडानी नोविना केला आहे. मठाचे निषादारतीबदल जंगमास इनाम जमीन पाऊ चावर देखील पटीयां कुलबाब कुळकानूसी दिधलीया निषादास्ती चालेल, तरी दिली असे. दुमाले करणें. इनामपदी खर्चपटी घेणे निसबत नाहीं.

१८३५ इ. वृ. पृ. १७७ } (१२५) { श. १६०६ अ. आ. शु. ८
{ इ. १६८४ जुलै १०

मोरेश्वर पंडितराई—प्रांत राजापूरचे देशाधिकारी.

वे. हरिंभट पटवर्धन पांवस हे ब्राम्हण योग्य धर्मादाय देविले. तांदूळ केली कोठी मापे ८२॥ अडीच मण. वेदमूर्ती क्षेम पावतील तोवरी देणे.

शि. च. सा. ५ ले. ८७२ } (१२६) { श. १६०६ श्रावण शु. ३
सु. १०८५ रमजान १ } { इ. १६८४ आगष्ट ३

कविकलशछंदोगामात्य—देशमुख कानदखोरे.

साळगुा। रा. छत्रपतींनीं बकाजी नावडकर यास तुम्हाकडे पाठविले होते. तुमच्या मुद्यामवाफीक सरंजामी जाली नाहीं, दिसगत लागली, म्हणून दिलगीर जाहले म्हणोन कळो आलें. त्यावरून आम्ही रा. छत्रपतीस्वामीस विनंती करून तुम्हास भेटीस यावयाची आज्ञा केली आहे. येणे. मुदा मनास आणून तदनुसार पारपत्य करून देऊ. या

प्रसंगी अवघे वतनदार येकमते राहोन गनिमास सजा द्यावी, आपली सरफराजी करून घ्यावी.

पे. द. ३१ ले. ४३ } (१२७) { श. १६०६ श्रावण वद्य १
मु. १०८५ रमजान १४ } { इ. १६८४ आगष्ट १६

हरि सिवदेऊ सुबेदार व कारकून— रा. बावा (कबजीबावा !)
सुभा माहालानिहाय प्रांत चेऊल

देसक मामले चेऊल याचे इसावतीचे गांव आपले राज्याचे कारकीर्दीपासून अमानतमुळे लागले दस्त जमाबंदी होते. कांहीं खराबे जमा होत नाहीत. असे असोन श. १५९७ मध्यें वहिरो त्रिमल माजी सुभेदार यानीं खमस व सीत ह्या दुसालाचे देसकमाराचे इसावतीचे खराबे जमा केले आहेती. ते १६४, ५५ वसरी लारी आतां बाकीस कादले. पुढें श. १५९८ मध्यें पेशव्यांनीं ह्याची सोडीची सनद द्यावयासी आज्ञा केली. लगेच कोलवणतर्फेस स्वारी झाली व सनद देणे राहिली. आणि त्यामुळें बाकी १०।१२ वर्षे ओढत राहिली. तीन वेळ कांहीं हस्ता दिला पण सेरीकर बहुत जबुन आले आहेत. शिवाय मुख्य कीं, आपले राज्यांत खराबे द्यावयाचा तह नाहीं. कोणी घेतले दिलेहि नाहींत. एका चेऊलांतच हें नवे जालें आहे. तर सेरीकर सेवेसी आले आहेत. मनास आणून पारिपत्य करणार स्वामी आहेती.

रा. खं. २६ ले. ५० } (१२८) { श. १६०६ आश्वीन शु. ४
जुलूस २८ जिल्काद २ } { इ. १६८४ आक्टो. २

(असदखान, मोगल अधिकारी)—परगणें धाराशिऊर सरकार नलदुर्ग सुभा औरंगाबादचे देशमूख इ.

परगण्याचा रबीच्या हंगामाचा वसूल १६ लक्ष ५ हजार मदावनजी वलद दावलजी यांच्या जहागिरींत नेमला आहे. तरी वाजवी हक, सारा, प्रामणिकपणें व रीतसर हंगामाचे वेळीं त्यांना द्यावा. त्यांच्या सल्याप्रमाणें वागावें त्यांच्या गुमास्त्यांनीं शेतीची प्रगती व स्वतःचा मान वाढेल असा प्रयत्न करावा.

ऐ. फा. सा. ३ ले. ८६ } (१२९) { श. १६०६ कार्तिक वद्य १०
हि. १०९५ जिल्हेज २४ } { इ. १६८४ नोव्हें. २२

सिकंदर आदिलशहा—श्रीनिवास वेंकटाधरी देसाई परगणे गदग

पातशाही काम संप्रत प्राप्त झालें आहे. तेव्हां स्वार व पायलोक यांच्या जमावासह एका विश्वासुक मनुष्यास पाठवून निष्ठा व्यक्त करावी. तुमचे

करतां पोषाख पाठविला आहे. त्याच्या स्वीकारांत स्वोत्कर्ष समजावा. यासाठीं रुद्रो चिमणाजी पंडीत सर डबीर, मख्दूम खुर्द व खवास यास पाठविले आहेत.

सनदापत्रें पृ. १५७ ले. ४४ } (१३०) { श. १६०६ पौष शु. ४
राजशक ११ रक्ताक्षी } { इ. १६८४ डिसें. २९

यादी वे. शा. सं. रामचंद्रभट केशवभट पंडित, उपनाम पुरोहित, कौशिक, ऋग्वेदी, वेदाध्याई, आश्वलायन, यांचे पिते केशवभट महाराज राजश्री थो. कै. स्वामीसंनिध होते. त्यांचे हातून दानाध्यक्षपणाचे प्रयोजन महाराज घेत होते. त्याज उपरी कै. स्वामीहि दानाध्यक्षपणाचे प्रयोजनघेऊन चालवीत होते. कै. स्वामीनी तीर्थरूपाचे मुखे रामायण पुराण श्रवण केले. श्रवणाची सांगता दक्षणा भूमिदान ता. संगमेश्वर प्रां. राजापूर येथें कोंड ५ शेते ठिकाणें ३ येकूण भूमीमहसल दाभोळी लारी १६०० धारादत्त दिल्हे.

शि. च. सा. ३ ले. ६४३ } (१३१) { श. १६०६
फसली १०९४ } { इ. १६८४

—अमार दोख, गोविंद कान्हो, गोमाजी सुन्हो, देशपांडे पा। इंदापूर.

मलारी चोपदार मिर्धा याने बारामती कचेरीस कागद लिहून दिल्हा.

रा. खं. १५ ले. १४७ } (१३२) { श. १६०६
सु. १०८५ } { इ. १६८४

दत्ताजी पाटील मौजे देगाऊ ता। सातारा—रा. आनंदगिरी महंत

कतबा दिल्हा ऐसा जे, दाहा साल मुदल मण ८२ घेता त्याची वाढीस वट मण ८३ देऊं. बिघे ८१० खरीदीचे राहिली असे.

सा. सं. इ. ले. १३–१५ } (१३३) { श. १६८६–८७
 } { इ. १६८४–८५

(महंमद) शिकंदर अदिलशहा-खेमसावंत सरदेसाई परगणे कुडाळ महालानिहाय. सर जमीनदार

तुम्हावर बादशाहा कृपा जहाल होऊन तुमची अर्जी विदित जाली. वडिलार्जित बादशहाचे चाकरीवर आलां आहा. तुम्ही कोणते तऱ्हेने राजा

संभाजीशी ममता राखून मोगल याजबरोबर मैत्री न ठेवावी-कुमके करता तुम्ही बादशाही फौजेत येऊन पोहोंचणें. कोणी चांगला मनुष्य रवाना करणें. हस्तपंजे बादशहाचे करून व पोषाख रवाना केला आहे. तो घेऊन चाकरीवर खंबीर राहाणें (१५). बादशाही जाग्यांत शेवेसी हजर जाहाले त्याकडे कृपा-दृष्टीनें तमाम परगणे घाटाचे पायाखालील पो। कुंडाळ वगैरे बक्षीस इनाम करून दिला. मौजे मसुरा वगैरे १३ गांव व हक्क लाजिमा कदिम आद-लखान अमलात हिंदवीत लिहिल्याप्रमाणें दिले असे. ज्यावेळीं घाटावरून फौजा येतील त्या समई हजर राहावें आणि मार्गानें रहदारीस हरकत न होई असा बंदोबस्त ठेवावा.

ऐ. फा. सा. ३ ले. ८७
हि. १०९६ सफर ५
(१३४)
श. १६०६ पौष शुद्ध ६
इ. १६८५ जाने. १

शिकंदर अदिलशाह—श्रीनिवास वेंकटाघरी देसाई परगणे गदग.

जमशीदखानानें विनंति केल्यामुळें आणि रुद्रो चिमणाजी पंडीत सर दबीर याचा अर्ज आल्यामुळें स्वतःची निष्ठा व चाकरी व स्वतःच्या मुलाबरोबर स्वार व पायलोक यांच्या जमावासह हुजूरकडे पाठविणें. सरदारकीहि दिली आहे. त्यांतच उत्कर्ष आहे.

ऐ. फा. सा. ३ ले. ८८
हि. १०९६ रबल ३
(१३५)
श. १६०६ माघ शु. ५
इ. १६८५ जाने. २९

सिकंदर आदिलशाह—श्रीनिवास वेंकटाद्री देसाई गदग

(ले. ८६, ८७ म्ह. (१३४) प्रमाणें व) नवीन जिंकलेल्या प्रदेशांत जागिरीची व्यवस्था होईल.

रा. खं. १५ ले. ११
रा. श. ११ रक्ताक्षी
सु. १०८५ रबल ५
(१३६)
निवाडा
श. १६०६ माघ शु॥ ७
इ. १६८५ जाने. ३१

माहादजी पा। जगदळा कसबे मसूर तर्फ उंबरज व संताजी पा। घाडगा मौजे सिवडे व वराडे तर्फ उंबरज यांची सितोजी व भाऊ सट-वोजी भोसले यांजविरुद्ध तक्रार कीं, मौजे कोणेगव्हाण सिरवडे सिवडे व वराडे ता। मसूर येथील सेते भाते १०० व ४१॥, चोरली व चारली, मालिस्त करून नेली, पाचा आकणीच्या सोपयाची लाकडे तुळया खांब, कड्या इसणी; कडबा, १२ ह. तुरीचे व बाजे हर जिनसीचे कूट व लदई नेली, गुल करून अंगावरील वस्ता कुडकिया जोड, कोचकी, सेला, तरवार, तांबडी

पासोडी; पाउसाळियाचा घराचा शाकर भारे २००; नेले व माळ्या दोन जाळविल्या पेवें गल्लियाचीं राळे सोळुले नवशेरी खंडी २॥ नेली अशी कळमें ७. तरी कविकलश छंदोगामात्य आणि सर कारकून याणीं सदरेस बैसोन निवाडा केला कीं, देशाधिकारी व पारपत्यगार दोास दोाणीं ताा माारचे वतनदार यांनी चोरले किती जाळलो किती, वस्ता अंगावर कोणकोणत्या होत्या माला बांधला तेव्हांचे सुतार असतील त्यास विचारून कलमाचे कलम गोही साक्षीनसी शिक्यानसी सर्व बखर शफतपूर्वक, हकहिसाबी मनास आणून बदलामी न ये, निर्वाह होय, असे आकस कोसीस न करता परनिष्टपणें कळवावें. आकस कोसीस दिसून आली तर स्वामी मुलाहिजा करणार नाहीं यैसे बरें समजोन लिहिणें म्हणून आज्ञा.

रा. खं. १५ ले. १० रक्ताक्षी सु. १०८५ } (१३७) साक्षपत्र { श. १६०६ माघ शु. १० बुध इ. १६८५ फेब्रु. ४

सटवोजी बाबाजी भोसले—

महादजी सुलतानजी पाटील कसबे मसूर याच्या बापभावाचा गाव सिरवडे (ताा उंबरज) येथें आपण सेतें केलीं होती, पटेल मजकुराची मिरासीची सेतें घेतली होती व पटेलगीस कटकट केली यामुळें महादजी व आम्हांमधें कुसुर पडोन कोणेगावां आपण महादजी वरी चालोन गेलो व गर्दी केली. पुढें महादजीनें हें रायगड येथें गाऱ्हाणें नेलें म्हणून आपणांस कविकलश छंदोगामात्य व सरकारकून यैसे सदरेस बसोन मनसुफी केली. तरी आपण गदर केली, सेताचा आवारा केला, बेरणकाडी पांघुरणें लाकडे नेली हा नसताच कथळा आपण केला, पेस्तर करणार नाही. केला तरी दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा अन्याई.

शि. च. सा. ९ ले. ६२ सु. १०८५ रवल १६ } (१३८) { श. १६०६ माघ वद्य २ इ. १६८५ फेब्रु. ११

चिमणाजी आउजी—दामा(दा)जी कुलकर्णी मामले चेऊल.

रंगाजी सबनीस याणी कागद पाठविला. त्याचे उतर पाठविले. त्यावरून कलो येईल. तुम्ही यावयासी इतकें दिवस विलंब लाविला. याउपर लवकर येणें.

रा. खं. २१ ले. ६९ श. रक्ताक्षी रविवार } (१३९) { श. १६०६ माघ वद्य ७ इ. १६८५ फेब्रु. १५

कानोजी राजे शिरके— रुद्रभट गिजरे कऱ्हाड.

आम्ही कृष्णा-ककुद्मती संगमीचे तीर्थपुरोहितपण तुम्हांस दिले असे. तुम्ही श्रीस अभिषेक करणे. प्रतिवर्षी वरसासन होन ७ देऊन ते भक्षून आशीर्वाद देणे आमच्या वंशपरंपरेनें तुमचे वंशपरंपरेनें चालवितील.

ऐ. सं. सा. ५ ले. २९ राजशक ११ रक्ताक्षी रविवासर सु. १०८१ रबल ५	(१४०)	श. १६०६ फाल्गुन शु. ६ इ. १६८५ मार्च १

मोरेश्वर पंडितराऊ—रंगो विश्वनाथ देशाधिकारी व लेखक प्रांत कऱ्हाड

वे. नरसीभट शेषभट मुंज्येमणी वस्ती कऱ्हाड यास धर्मेदाय तांदूळ कैली कोठी मापे मण रुजु जोंधले देणे मण ।॥· दाहा प्रति वर्षी देणे.

रा. खं. २६ ले. ५१ जुलूस २८ रखर ६	(१४१)	श. १६०६ फाल्गुन शु. ७ इ. १६८५ मार्च २

रुस्तुम वलद सयाजी यांच्या वकिलाने अर्ज केल्याप्रमाणें परगणें जामखेडें सरकार अहमदनगर येथील मुकदम त्यांच्या मालकांना (रुस्तुम सयाजी यांस) जहागिरी वतनाची चालू रकम व बाकी चार वर्षांत देत नाहींत. तरी जहागीरदारानी सरकारी अदालतीच्या सल्यानें तक्रार दूर करावी.

शि. च. सा. २ ले. २०६ शक रगतायी	(१४२)	श. १६०६ फाल्गुन वद्य २ इ. १६८५ मार्च १२

रा. येसवतराऊ धाऊजी राउ भांगरें—सोनप्रभु धर्माधिकारी भागरेंवाडी पा कोतुल

नासीक तीर्थ पुरोहितपण लेहोण नासीक गोदावरी काठचे दिले. आच्या वौशास मानितील हे सत्य (षडकी व साकरवाडीकर भांगरे.)

पे. द. ३१ ले. ४४ सु. १०८५ रखर २५	(१४३)	श. १६०६ फाल्गुन वद्य १२ इ. १६८५ मार्च २१

कविकलश छंदोगामात्य—बाबाजी तानदेऊ सुभेदार व कारकून प्रांत पुणें.

मोरो विठल देश कुलकर्णी प्रांत मावळ यांनीं सांगितलें कीं, (शहाजी) महाराज व स्वामी (शिवाजी राजे) यांचे कारकीर्दीस देशमूख व देश कुळकर्णी पा मावळ यांचा हक व इनामती दुमाले करून दिवाणात इनामती खंडणी पा होन ३०५ व ९५ असे घेत असत. आणि जर हक इनामतीचे

दस्त कमतर पडले तर त्याप्रमाणांत दोखाकडून व दोर्णीकडून खंडणी घेत. हाली प्रा मार खराब पडलें आहे. तर दस्तमाफीक खंडणी घ्यावी. एखादे महाराज साहेबाचे व कै. स्वामीची आज्ञा पत्रें असतील ते रुजू घालून हाली राजाज्ञेकडून सनद सादर आहे तेणेप्रमाणें वर्तणूक करणे.

सनदापत्रें पृ. १६२ ले. ४ } (१४४) { श. १६०६ फाल्गुन वद्य १४
सु. १०८५ रबर २७ } { इ. १६८५ मार्च २३

गंगाधर मोरेश्वर प्रधान—बाबाजी तानदेऊ सुभेदार व कारकून प्रांत पुणें.

मोरो विठल (होनप) देशकुळकर्णी प्रां मजकूर हुजूर विदित केले कीं, प्रांतमारी आपला हक लाजिमा व दस्तमल व कतबा इनामती गांव मौजे न्हावी व जमीन गांवगना व वीरचे वणचराई वनाचा व नावा, टोकरे, झाडझाडोरा महत कदीम चालत आहे. तेणेप्रमाणें कृपाळू होऊन ताजी सनद सादर केली पाहिजे म्हणून विनंति केली. तरी बाबहाय कदीमपासून तागाईत साळगुदस्ता भोगभोगवटा चालिला असेल तो मनास आणून चालवणें.

शि. च. सा. ९ ले. ६३ } (१४५) कौलनामा { श. १६०७ चैत्र शु. १२
सु. १०८५ जवल ११ } { इ. १६८५ एप्रील ६

हरि सिवदेव सुभेदार व कारकून—खोत, पाटील, रयत, मोख्तसर सुभा महालनिहाये ता चेऊल रयत मामले चेऊल

तुमचे बाबे देसक मामले मजकूर सुभा येऊन मालूम केले जे, मामले मजकुरी रयतेवरी कितेक बाबे जळल जालें आहे. रयतेमधे कांहीं उबार राहिला नाही. रयत कुल जमा होऊन हुजूर पारपत्याकारणे जात आहे. तरी अजी मृगास महिना दीड महिना राहियेला. हंगामी रयेती हुजूर गेली म्हणिजे थोडा तरी एक महिना पारपत्या कारणे पाहिजे. तेथे रयत गुंतोन राहिली म्हणिजे मागे···बुडाली. कीर्दीस धका. तरी मुदा मनास आणोन रयत समजाऊन कीर्दीस लाविली पाहिजे. त्यावरून मुदा मनास आणावया कारणे देसकमार तुम्हाकडे पाठविले त्याबरोबर लेहून पाठविल्या मुदाप्रमाणें कौल सादर केला.—नारळ व सुपारीचा दस्त आर्मांचें (श. १६०५) चेच पाहणीमुळे घेतले पाहिजे, बागायेत, जिरायेत, राजभाग इ. इ. बद्दल कलमें ७

रा. खं. २६ ले. ५२ } (१४६) { श. १६०७ चैत्र वद्य १
जुलूस २८ जवल १५ } { इ. १६८५ एप्रील १०

मुकबिलाखान—महंमद कासीम

सरकार अहमदनगर पैकी नादनजचा राहणार दताजी वकील ह्याचे करवीं कळलें कीं त्याचे मालक रुस्तुमजी यांचेकडे जमिनीबाबत ५०० रु. येणे असून ते देण्यांत दिरंगाई होत आहे. तरी चौकशी करून खरी माहिती व निकाल द्यावा.

रा. खे. २६ ले. ५३ } (१४७) { श. १६०७ चैत्र वद्य ८
जुलूस २८ जवळ २१ } { इ. १६८५ एप्रील १६

रुस्तुम वलद सयाजी यांनी सरकारी हुकुमावरुन महंमद कासिम व फौजदाराचे नोकर ह्यांस पकडून आणिलें होते. ते म्हणतात मला धर्मशास्त्रान्वयें पकडले व मी त्यांच्या स्वाधीन झालों.

शि. च. सा. ६ ले. ७४ } (१४८) { श. १६०७ वैशाख शुद्ध ३
सु. १०८५ जखर १ } { इ. १६८५ एप्रील २६

चांदो नारायण सुभेहाय—गोविंद रघुनाथ सुभेदार
प्रांत भुजबलगड व कारकून प्रा गदक

केंचणगौडा पाटील मौजे सावसी सा कुंदगोल याणे हरामजादगी केली होती. याबदल त्यास अदबखाना ठेविला. त्यासी करारवी होनु पा ५०० बांधले. पैकी १ शे होनु वसूल जाला. बाकी ४०० त्या उसलाबदल २।३ वरसे नवलगुदी अदबखाना ठेविला. नफर मार बहुत हलाख जाला, उबार काही उरला नाहीं. म्हणून आपले पाटीलगीची चउथी तकसीम नरसिंगराऊ रामाजी यासी विकत देऊन होन पा १५० घेतले. इनामती जमीन मार दहा व इकवर्तना व फसकी फळगी व खालसात जमीन देखील दुमाला करून दिली आहे. तरी तुम्हीहि पाटील मजकुराचे पाटीलगीची ४ थी तकसीमेचा मामला लावणी संचणी, कीर्दमामुरी, वरकडी गावीचा कारभार याचे गुजारतींने घेत जाणें.

शि. च. सा. ९ ले. ६४ } (१४९) { श. १६०७ ज्येष्ठ वद्य ३
सु. १०८६ रजबू १६ } { इ. १६८५ जून ९

हरि सिवदेऊ सुभेदार कारकून—रायाजी सदक प्रभु हवालदार
सुभामहालानिहाये प्रांत चेऊल मामले चेऊल

तश्रीफ खर्चबदल देसक मामले मजकूर बरहुकूम सनद होन पा १२ देसाई अदिकारी कुार्णी प्रत्येकी ४ प्रो रास असेत. मामलेमजकुरी बाकी देसक मजकुराचे निा असत. त्यापैकी आदा करणे आणि सालमजकुरीचा आकार गुदस्ताचे बेरजेस ज्याजती होये ते गोष्टी करणें.

रा. खं. १५ ले. १२ } (१५०) { श. १६०७ ज्येष्ठ वद्य १३
रा. (१२) क्रोध (न) } निवाडा { इ. १६८५ जून १९
सु॥ १०८६

माणकोजी राहूजी जगदळा पटेल मौजे शिराडे ता उंबरज आणि शिवाजी व नरसोजी नाइकडा कुणबी मौजे मजकूर ह्यांमधे मो॥ मारन्या निमे पटेलगीचा वेव्हार लागला असतां माणकोजीचा भाऊ माहादजी यानें हुजूर विदित केलें कीं, आमची म्ह. जगदळे यांची वृत्ति कदीम; नाइकवडा लाइनी कथळा करतो. तरी बरहक निवाडा व्हावा. त्यावरून कोनेर रंगनाथ मुख्य देशाधिकारी प्रांत कऱ्हाड यांस आज्ञा-पत्र सादर झालें. मग दोघांचे राजीपणें राजीनामे व नंतर जमान कतबे लेहून घेतले. हमशाही गावीचे मोकदम, मौजे मजकुरीचे बलुते ऐसे बृघ, कसबे पेठ तर्फ कोडली येथें जमा करून श्रीकृष्णेची क्रिया व सत्य घालून आपले बेताळीस स्मरोन गोष्टी देणे म्हणोन त्यांस सत्य घातले. त्यांनीं जी साक्ष दिधली ते साक्षपत्र माहालीहून चैत्र व. १३ स आले व चैत्र वद्य १४ ची मुख्य देशाधिकारी कोनेर रंगनाथ याची बखर छत्रपती स्वामीस आणिली. जगदळे व नाइकडे उभे करून विचारिले. मोख्तसर कुणबी येही तक्रीरा दिल्ह्या. त्यांत जगदळे पाटील खरे व नाइकडे कुणबी खरे. तक्रीरा दफतरी विल्हे लाविल्या. जगदळे व नाइकडे दिव्हाडी गेले. तेच दिवशीं नाइकडा कुणबी पळाला. त्याचा जमानदारहि गैर हजीर जाहला. मग जगदळे तक्रीरा हुजूर येऊन जगदळे खरे असे साक्षपत्र, बखर, करीना व भोगवटा पाहून जगदळेच खरे पाटील. नाइकडे कुणबी झोड, ते दूर केले. जगदळे यास हरकी होन २५ पा॥ नाइकडे गुन्हेगारी होन पा॥ ५० देखील सर देशमुखी करार केले. हे निवाडपत्र सत्य.

शि. च. सा. २ ले. ३९७ } (१५१) { श. १६०७ आषाढ शु. २
राजशक १२ क्रोधन भोमवार } { इ. १६८५ जून २३

('संभाजी छत्रपती व निलोमोरेश्वर--कृष्णाजी कंक पदाती नायेक यांचे शिके) सेवक राज्यमंडल

मशारनिलेचा बाप कृष्णाजी येसजी कंक यास हशमाची हजारी होती. त्यावरी फोंडियाच्या कोटास फिरंगियानी लगट केला तेव्हां रा. स्वामी राजापुरीहून स्वार होऊन फोंडियासि गेले. ते वख्ती खाडीवरी गनिमासी गांठी घालून जुंझ बहूतच केले. ते वख्ती जखमा लागोन जरवुर जाला म्हणोन घरास जावया आज्ञा दिल्ही. घरास आलियावरी जखमा फुटोन मयत जाला. त्याचा लेक मानिके त्याचें नांव कृष्णाजीच ठेविले आहे. तीन वरसाचा मूल

आहे. त्याच्या नावे सुभा चालवावा आणि लोकाच्या जमावास चाहुजी कंक आहे त्यास कारभारी करून ठेवावा. म्हणोन येसजी कंक याणि विनंती केली. त्यावरून स्वामि कृपाळू होऊन कृष्णाजी कंक स्वामिकार्यावरी पडला याकरिता याच्या लेकास सुभा दिल्हा आणि लोकाचा जमाव करावा, हमेशा चाकरीवरी आसिले पाहिजे, म्हणोन चाहुजी कंक शंभर मावलियांत होता तो माकुल पाहोन कारभार चालवावयासि दिल्हा. वेतन दोघांस मिलोन करार केले. सालिना होन पादशाही निवळ ६००–कृष्णाजी, कृष्णाजी कंक याची सुभाची आसामी चालवावी. चाकरील्याख होये तोवरी घरबैठे देणे. सालिना होन २०० यासी चाकरीचा सिरिस्ता नाहीं. घरबैठी तैनाती घ्यावी. पोतदारी मात्र घरावी. नानपरवेशी सुभा–चाहुजी कंक यास वेतन सालिना होन पाा ४०० खासा जातीस २०० चाकर १४ येाा–१५० भोई १०, ३० दिवटिये २ येाा, २० अफ्तागिऱ्या व नेजदार नफर २ येणे प्रो तैनाती केली असे. यासी वटावाट व दंडक प्रमाणे वजा करून उरल वतन घेत जाणे. चाहुजी कंकास चाकरीची मोईन केली आहे. त्याची हजरी पाहोन जमा सुाा तील होन मुजरा होणे.

खं. १५ ले. ३६५ शक १२क्रोधन सु. १०८६ रबब ३०	(१५२)	श. १६०७ आषाढ शु. २ इ. १६८५ जून २३

—येसाजी कंक सरनोबत व कृष्णाजी
येसजी कंक पदाती नायक

या दोघानी फोंडाचे स्वारीस फिरंगीयांसि गाठी पडिली तेव्हां बहुत कस्त केली आणि गनीम मारून काढिला. ते वख्ती दोघालाहि जखमा लागोन चकचूर जाले. कठीण जखमा राजश्री स्वामीनी दृष्टीनें पाहिल्या आणि घरासी जावया आज्ञा दिल्ही. त्यावरी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन घरी मयत जाला. हाली येसाजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले. त्यावरून हे कामाचे, मर्दाने, स्वामिकार्यावरी तत्पर; आणि याचा पुत्रहि स्वामिकार्यावरी मयत जाला. फोंडाचे बक्षीस द्यावयाचे होते म्हणोन छ मजकुरी पारितोसिकाची मोईन केली होन पादशाही बेरीज दोन सहस्र–खासा येसजी कंक सरनोबत होन १०००, कृष्णाजी कंक स्वामिकार्यावरी पडिले म्हणोन १००० येणेप्रमाणे एकसाला ये वर्षी परितोसिक द्यावयाचा नियत केला असे.

राम. दासी ४२ ले. ४५ } (१५३) { श. १६०७ ज्येष्ठ-आषाढ
सु. १०८६ रजब } { इ. १६८५ जून-जुलै.

नीलकंठ मोरेश्वर-गौली बाजे खूम मामले चेऊल

कौलनामा, तुम्ही रयतपणा करावया चुकविता. तरी कोणे बाबे शक अंदेशा न धरणे-तुमचे बाबे चिमणाजी आऊजी यास लिहिले. ते कौलबोल देतील. त्याप्रमाणे आम्ही चालऊन. कीर्दी मामुरी खुशाहाल होऊन करणे.

रा. खं. २६ ले. ५४ } (१५४) { श. १६०७ अ. श्रावण वद्य १
हिजरी १०९५ साबान १३ } { इ. १६८५ जुलै ६

—परमानंद वल्द मानजी तोया रा. नारनूल

रु. ३९५ अलमगिरी हे दावल वल्द आदम दीन यांचे देणें देण्या-करता शामदास वल्द मोहनीदास यांचे मार्फत घेऊन पावलो. वरील इसमाचा रंग गव्हाप्रमाणें पीत, कपाळ रुंद त्यावर आठया, उंच, दाढी, दोन्ही कानास भोकें हा शपथ घेऊन म्हणाला कीं, रकम मिळाली.

सनदापत्रे पृ. १६४ ले. ६ } (१५५) { श. १६०७ आषाढ वद्य ३०
शक क्रोधन. भौमवासर } { इ. १६८५ जुलै २१
सूर्यग्रहण सु. १०८६ साबान २८

शिवाजी विठल मुजमूदार—वे. तोरवणभटपुत्र शंकरभट जोशी,
किले शिकंदर ऊर्फ बदामी आश्वलायन शाखा, मौद्गल्य गोत्र

महापर्वणी पुण्यदिनीं किल्ले मजकुरी अगस्ती तीर्थी श्रीभूतेश्वरसन्निधानीं तुम्ही महासंकल्पविधानपूर्वक सांगितलेवरी सत्पात्र, साधु, वृत्तिनिष्ठ ब्राह्मण पाहून श्रेयस्व यावें, पुण्यसामग्री संचित व्हावी, म्हणोन आमचे इनाम उमली गांव मौजे तोरे भास्करापुरीं खालसा जमीनपैकी किल्ले मजकुरीचे शिवेस लागले होते. फजेनवेंची गणेशानजीक मसचपटी ॥· तुम्हास हदमहदूद घालोन कुलबाब कुलकानू वेठबेगार हुगी (गव्हाची खीर) पंचनली, बलुते देखील धारादत्त करून दिल्हे. तुमचे परंपरे स्नानसंध्या करून आम्हास वेदोक्त आशिर्वाद देऊन कल्याण इच्छून सुखी असिले पाहिजे. या धर्मकार्याचे वृत्तीस चातुर्वर्णीचे जन नष्टपण करून हर्कील व नवीन कानू जो कोन्ही करील त्यास त्याचे वर्णाश्रमाची व मातृपिताची आण आहे.

रा. खं. २१ ले. ५ } (१५६) { श. १६०७ श्रावण शुा १
शक रक्ताक्षी सौम्यवासर } { इ. १६८५ जुलै २२

रंगोबा व नरसोबा व—मातुश्री कृष्णाबाई व विष्णुभट व वासुसोमाजी नायक मावळंगकर देव भट सफरे पुरोहीत.

देशमुखी व सरदेशमुखी संगमेश्वर माहालची व मामले प्रभावली व मामले दाभोळ या वतनाची वडिलामध्ये अर्जक कोण पुरुष, त्यापासून वंशावली कैसी चालिली. त्यावरून कृष्णाबाई याणी व उभयता भट गोसावी यानी सांगितले [तें वृत्त. अपूर्ण.]

ऐ. फा. सा. २ ले. ४२ } (१५७) { श. १६०७ भाद्र. शु. १
हि. १०९६ सवाल १ } { इ. १६८५ आगष्ट २२

[मिरजकिल्यामध्यें पब्लिक स्टोअर्स इमारतीच्या मागें भिंतीस टेकून ठेवलेली शिला. त्यावरील लेख.]

परमेश्वराचा प्रसाद व कृपा यामुळें जुनी मशीद ८१६ तील ती शिकंदर कादिरी यांच्या कारकीर्दीतील असदखानानें पुन: बांधली.

सनदापत्रें पृ. १६३ ले. ५ } (१५८) { श. १६०७ भाद्र. शु. ३
सुा १०८६ सवाल १ } { इ. १६८५ आगस्ट २२

अज दिवाण कसबे नवलगुंद—मोकदम कसबे नवलगुंद

सनदसुभा तेथे लिहिले, लखवा लिंगपा देसाई मामले तोरगल यानी विनंती केली कीं, गतवर्षी सुलतान तारा मोगल लष्करासमवेत येऊन कसबे मजकुरी मुकाम करून घरें, वाडे व पेठ मोडून जाळून तलफ केली. त्या बराबरी गावांत साक्षांत देवस्थान तेहि छिन्नभिन्न केले. थोर देवालये होती तीहि मोडून तलफ केलीं होती. त्याकरतां गावांत मरग सुटला. माणसें मरूं लागली. रयत लोक व दिवाण लोक व वाणी वळूंज गावी राहेनासे जाहलेवरी, गांवे हुगी घालून आवंतुक देवताचें स्थापन केलें. ग्राम देवस्थानाच्या दिवसापासून पांढरी बसली. त्या दिवसाच्या स्थापनेच्या पुरातन स्थळेस मूर्ती होत्या, त्या दुरात्म्यांनीं विछिन्न केल्या. त्यांची स्थापना जाली पाहिजे. महाराज राजश्री महाराष्ट्रराजा आहे. देवस्थानें छिन्नभिन्न असों नये. या कारणें देवालयें बांधावीं. उरचा चालवावी. हयात आपण व स्वामी मिळोन जें करणें तें करीत आहों. तूर्त नवलगुंदा सारखे गांवांत देवस्थान देवळेंच नाहींतसें जालें आहे. ऐसियास हुगी घालते समयी श्री देवस्वामींची स्थापना करावी. देवळें इमारती बांधाव्या. तूर्त मूर्ति स्थापना करून पूजा चालवावी; नित्य पुराणश्रवण चालावें. त्यास एक भला ब्राह्मण योग्य पाहून दोनी मार इनाम अबरामराहमत करून देऊन पुराण श्रवण चाले ते करावे आणि वरकड देवाची उरजा चालवावी ऐसें वचन गुंतलें आहे. ऐसियास वेद० वेंकटभट काशिनाथ भट वाराणशीकर बहुत योग्य भले आहेत. यांसी पुराणाबदल खालसात इनाम हुलमार २ देऊन

चालविलें पाहिजे. तेणेंकरून देवस्थानाची स्थापना होऊन शांत होईल... म्हणोन विनंती केल्यावरी वस्तुता विचार मतेंहि पाहतां हिंदुकीची गोष्टी खरींच. उदंड खर्चवेच महाराजांचे दरबारांत होऊन जातो, अगर पड जंगलहि पडतें. त्यापरीस श्रीचे उरजें अर्पित राजगृहांतून जरी वेच जाहाला तरी 'ज्यांचें नांव त्यांचें पुण्यें' महाराज छत्रपतीसाहेबांस श्रेय येईल. ऐसे पाहून हुलमार सर्व मान्य कसबेपेकी मशाती ३६ बिघेचा मार दुमाला करून दिल्हे असे. तुम्ही कारकून हाल व इस्तकबाल व नाडगीर कसबे मजकूर ग्रामस्त यानीं चालवणें.

श्रीसा. ले. ५९ } (१५९) { श. १६०७ आश्विन शु. १
सु. १०८६ सवाल } { इ. १६८५ सप्टं. १९

नारायण रघुनाथ हणमंते अमात्य —सुभेदार व कारकून सुभा कऱ्हाड

रा. दिवाकर गोसावी विदित केले कीं, गोविंद गंभीरराउ यानीं उचापती केली. त्यास तारले व नानेघोल येथील ऐवज देविला आहे. तो ज्याचा त्यास देववणें. १८ खूम नाणी बकाल श्रीचे यात्रेस येतात त्यास जुलूम उचापती करावया गरज नाहीं. असें रा. साहेबाचे शासन असे. रयत लोकास रंजीस होऊं न देणें.

रा. खं. १८ पृ. ८१ } (१६०) { श. १६०७ आश्वीन शु. ११
सु. १०८६ जिलकाद ९ } { इ. १६८५ सप्टं. २८

नीलकंठ मोरेश्वर —दतसेट सेट्या

तुजकडे हरकी बा। इमारती किले पुरंदर बा। सेरणी बाकी वोढत आहे. त्यापैकी मुशाहराबदल देणे. शामजी केशव दफ्तरदार किले अहिवंतगड पा। होन २० आदा करणे पावलियाचा कागद घेणे—वरात.

शि. च. सा. २ पृ. २३४ } (१६१) { श. १६०७ आश्विन वद्य ३
{ इ. १६८५ आक्टो. ५

शिवजी जेधे मोगलास मिळोन कारीची व आमचे माहालातील गुरे वळून नेली मुलुखास उपद्रव देऊन उद्वस केला. मग संताजी निंबाळकर हवालदार किलें विचित्रगड व गडकरी व सर्जाराव एकत्र होऊन विचार केला की, मुलकाचा बंदोबस्त कोणे रीतीने होतो ! हवालदारे सला दिली जे, तुम्ही शिरवळास मोगलाकडे जाणे आणि शिवजी वगैरे यांचा सालजाब करून मुलखाची वसाहत होय तो अर्थ करणे. त्याजवरून सर्जाराव शिरवळास जाऊन अविंधाची भेट घेऊन सर्व हकीकत जाहीर केली. त्याजवरून शिवजी वगैरे यास मोगलाने दूर करून गावगनाची वसाहत करावयाची आज्ञा केली.

त्यावरून मुलखाचीं वसाहत जाली. हे वर्तमान संभाजीराजे यास कळलें. त्यावबर सर्जाराव मोगलाकडे गेले ऐसे जाणोन महाराजानी इतराजी केली. तेव्हां संताजी निंबाळकर हवालदार यास पूर्वीची सर्व हकीकत ठावकी होती. त्यानी महाराज याना सर्जारावाविशी पत्र लिहिलें जे शिवजी जेधे मोगलाकडे गेले त्याने महालात उपद्रव करून मुलूख बेचिराख केला. सर्जेरावाची गुरेढोरें वळून नेली. सबब मुलखाच्या बंदोबस्तास सर्जाराव गेले. त्यास महाराज यांनी कृपाळ होऊन अभयपत्र पाठविले पाहिजे. त्यास महाराजानी शब्द लावून उत्तर लिहिले आणि हुजूर येणे ऐसी आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें सर्जाराव दर्शनास गेलें. मागे मोगलाने किला रोहिडा घेतला. ती मसलत सर्जाराव यास सांगोन आज्ञा देऊन रवाना केले. आज्ञेप्रमाणे कारीस येऊन मुलेमाणसे यास ठिकाण घरवेना. हे जाणोन वाई देशात जांबलीस नेऊन ठेवली. आणि आपण लोकांचा जमाव करून किले रोहिडा हस्तगत केला. मग माहाराज रा. संभाजीची भेटी घेतली. बहुत मेहेरबान होऊन सर्जाराव यास शिरपाव दिल्हा. काहीएक दिवसानंतर या प्रांती औरंगजेब पादशाहा यांची मोहीम जाली. तुळापूर येथें पादशहा याचा मुकाम होता तेथे महालो महालचे देशमूख व देशपांडे गेले. ते समयीं सर्जारावहि गेले. तेथें कचलाखान (?) वगैरे मुत्सद्दी यास नजर व अंतस्थ देऊन निरोप घेऊन घरास आले. मुलखाची वसाहत केली. तेथें खर्च पडिला. तो आमचे वडिलानी पदरचा दिला, दुसऱ्या कोणी दिला नाहीं. पातशहांचे पुत्र शाहाबकस व अजमतारा यानी कसबे शिरवळी येऊन मुकाम केला आणि सर्जाराव व बाळाजी नाईक खोपडे देशमूख तर्फ उत्रोली यास बोलाविले की, किले रोहिडा घेऊन देणे. त्यावरून सर्जाराव बोलिले जे, आम्ही जमीदार, तेव्हां हा मनसोबा आम्हांस कैसा होईल ? मग बाळाजी नाईक याणी कबूल केले कीं किला घेऊन देतो. व सर्जाराव याची चापगूद (?) केली. त्यावरून सर्जाराव यास अटकेत घालावे ऐसा ठराव दरबारात जाहला. हे वर्तमान सर्जारायास कळताच रातोरात निघून कारीस आले किल्यास सावध केले. मागे बाळाजी नाईक खोपडे यानीं स्वारी घेऊन किल्याखाली आले. गडकरी हरजी पवार याचे डोचके कंकरीजवळून कापून नेले आणि किल्याभोवता वेढा घालोन अंघरवडाजवळ मुकाम करून राहिले. आणि सर्जाराव यास आणावयाकरतां चार भले लोक पाठविलें. त्यावरून सर्जाराव याणी दुखणियाचे मिस घेऊन आपले पुत्र मताजी नायक याजला बरोबर देऊन सलूख वरकरणीचा करून पाठविले. तदनंतरी मताजी नाइकास जमाव सुधा येऊन त्यास सांगितले कीं, किल्यास मोर्चे लावून लढावे. तेव्हां मताजी नाईक मुळीच्या बेताप्रमाणें मावेची लढाई करूं लागले. इकडे सर्जाराव याणी किल्यास बातमी खबर

हुशार असणे, अवसान न सोडणे, ऐशिये रीतीची वरचेवर खबर शिदोजी जाधव हवालदार यास पोहचवीत गेले व किले मजकुरी गला बेगमीस पाठवावा म्हणोन मौजे चिखलगांव येथें आपला खासगत गला होता तो परभारा गडकरी यास सूचना देऊन घेऊन जाणे, ऐसी बातमी खेळविली. वगैरे गावगनाचा गला नेणें ऐसे सांगितले. त्यावरून दरवाजावरोवर उतरोन गला घेऊन गेले. तो खर्च वेच शिवजी व चांदजी वगैरे यानी दिल्हा नाहीं. व मसलतेसहि सामील जाहले नाहींत. पुढें पातशहा यानी पुरंदर वगैरे किले हस्तगत केले. ते समयी सर्जाराव यानी पुरंदरचे कोळी व बेरड यास आणोन आपल्या जवळ ठेऊन घेऊन आपले पदरीचा खर्चवेच देऊन किले पुरंदर हस्तगत करून साहेबचाकरी करावी म्हणोन मसलत करोन सरकारची कामेकाजे उमदी धरून करावयाचा निश्चय केला आणि वतनदाराचाहि बंदोवस्त जाला पाहिजे म्हणोन.

रा. खं. १५ ले. ३४२ क्रोधन } (१६२) { श. १६०७ आश्वीन वद्य ३
रा. श. १२ जिल्हेज ३ } { इ. १६८५ आक्टो. ५

शंभु छत्रपती— सर्जाराऊ जेधे

तुम्ही संताजी निंबाळकर मुद्राधारी विचित्रगड यासी पत्र लिहून मुद्दा सांगोन पाठविला कीं, आपला भाऊ शिवजी जेधा याणें हरामखोरी करून सिरवळास गेला त्याणे आपली गुरेढोरे वळून नेली. पुढें आपणास बरे पाहणार नाही यावदल आपणहि उठोन सिरवळास आलों आहे. ऐसियासि आपण रा. स्वामीच्या पायाजवळी एकनिष्ठच आहे. स्वामी कृपाळू होऊन, आपले वतन देशमुखी आपले स्वाधीन करतील आणि अभय पत्र सादर होईल तरी आपण सेवेसी एउनु एकनिष्ठ होउनु सेवा करीन म्हणून. तरी तुमचा मुद्दा मााइले हवालदार एही स्वामीचे सेवेसी हुजूरास लिहिला. त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास लिहिले आहे. तरी आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केली की वतनदार होऊन इमानेइतबारे वर्तावें ते गोष्ट न करितां स्वामीचे अन्न बहुत दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत की स्वामीच्या पायासी दुर्बुद्धि धरून दोन दिवसांचे मोगल त्यांकडे जाऊनु राहिलेस. तुमचा भाऊ शिवजी गनिमाकडे गेला तो आम्हास बरे पाहे ना. ऐसे होते तरी तुम्ही स्वामिसनिध हुजूर यावे होते. म्हणिजे तुमचे इतबारपण कळोन एकनिष्ठता कळो एती. ते केले नाहीं. तरी बरीच गोष्ट जाली. या उपेरीहि गनिमाकडे राहाणेच असेली तरी सुखेच राहाणे. तुमचा हिसाब तो काय ! एक्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनिमादेखील तुम्हास कापून काढवीतच आहेत हें बरें समजणे. दुसरी गोष्ट की, तेथे राहाणेच नाही. एकनिष्ठेने स्वामीच्या पायजवळी वर्तावे ऐसे

असेली तरी तुम्ही परभारे मुदे सांगोन गडकिलियाकडे राबिते काय म्हणून करिता! हे गोष्ट स्वामीस मानत नाही. जो राबिता करणे तो स्वामीकडेच करून हुजूर वर्तमान लेहून पाठवावे. स्वामी तुमचा मुदा मनास आणून आज्ञा करावयाची ते करितील. तरी ऐसी गोष्ट करावया प्रयोजन नाही. हुजरातीखेरीज दुसरीयाकडे एकंदर राबिता न करणे. जे वर्तमान लिहिणे ते स्वामीस लिहित जाणे. तुमचे ठाई एकनिष्टताच आहे, ऐसे स्वामीस कळलियावरी जे आज्ञा करणे ते करून आज्ञापत्र सादर होईल. तेणेप्रमाणे वर्तणूक करणें.

शि. च. सा. ६ ले. ४६७ फ. १०९६ जिल्हेज ५	(१६३)	श. १६०७ कार्तिक शु. ७ इ. १६८५ आक्टो. २४

—विसाजी माणकेश्वर देशपांडिये पा अकोले.

तुमचे वडिलाचें सेत मौजे थुगौऊ व मौ बासेर याचे सिवेसी आहे. ते कीर्दी करणे. व तुम्ही म्हटल्याप्रमाणें सात साला इस्तावा बिल मक्ता दर चाहुरी सा ६० (८।१६।२४।३२।४०।४८ व ६० या) प्रमाणें देणें. यासिवाय सादिलवार व पटी वगैरे बाबती व वेठीबिगार जेवा भावा तुम्हीं न देणे.

शि. च. सा. ६ ले. २३ सु. १०८६ जिल्हेज १२	(१६४)	श. १६०७ कार्तिक शु. १४ इ. १६८५ आक्टो. ३१

किले सिकंदरगड ऊर्फ बादावी—मोकदम व कुळकर्णी व रयानी त्याचे दिवाण मौ हुलगुडी सा बलगानूर किले मार.

श्रीनिवास वेंकटाद्रि देसाई पा गदग व नाडगौडा किले मार याची निघेत साहेब कामावरी साबीत दखोनु मौजे मजकूर कुळबाब कुल कानू इनाम मन्हामती केला.

रा. खं. २६ ले. ५५ जुलूस २९ जिल्हेज १२	(१६५)	श. १६०७ कार्तिक शु. १४ इ. १६८५ आक्टो. ३१

—पर. नसिराबाद सुभा खानदेश येथील देशमूख, देशपांडे, मुकादम इ.

परगण्यांतील १५ लक्ष दाम सय्यद शेखानाच्या जहागिरींतून मालोजी बल्द लोकोजी यांच्या जहागिरींत रबीच्या हंगामाच्या आरंभापासून नेमण्यांत आले आहेत. तरी दिवाणी व इतर हक्क त्यांना द्यावे. त्यांच्या सल्यानें वागावें व त्यांच्या गुमास्त्यांनीं प्रजेस राजी ठेऊन शेतीची भरभराट करावी.

श्रीसां. ले. ६०, ६१, ६२ } (१६६) { श. १६०७ कार्तीक वद्य २
राज्यशक १२ क्रोधन इंदुवासर } { इ. १६८५ नवंबर २

राजा शंभु छत्रपती—रंगो विश्वनाथ दे०री प्रांत कऱ्हाड व कवि-कलश छंदोगामात्य, व अंबाजी मोरेदेऊ दे०री प्रांत सातारा

चाफळ श्रीरघुनाथ यात्रेचे नंदादीप, लिहिणार व अफराद यांचे वेतनाची मोईन पेशजी सादर आहे. त्याप्रमाणें ऐवज तुम्ही पावीत नाहीं. गावोगाव वराता करता पण ऐवज पावत नाहीं. एकच गांवावरीं सरस पाहून ऐवज नेमून देणे. सिंगणवाडी येथें सारे ऐवजाची वरात पावावी. उरला ऐवज दिवाणांत घेणें. दिवाण लोक वाणियाजवळून उचापती करतात ते धास्तीने यात्रा मोडो पाहते, ऐसे न करणे. तुम्ही जाणे. दिवाकर गोसावी—हस्ते पूर्वी-प्रमाणें मोहोत्सव चालवावा. उधव गोसावी मधेंच नसते कथले करावयास संमध नाहीं. शाहापूर येथें रामदासमठासंनिध हनमंताचें देवालय आहे. व गोसावियाचें इनाम आहे. ते उत्पन्न वाहागांवचा पाटील कृष्णाची व पुजारी भक्षतो. तरी बरजोर ताकीद करणें आणि पाटलाने खादले ते इनाम बेरीज त्यापासून घेऊन दिवाकर गोसावीयास देणे. कसबे परेली येथें श्रीकडील काही तृण व काष्टाची मोईन आहे ते पावीत जाणे.

त्रै. व. ११ अं. ३ पृ. १७ } (१६७) { श. १६०७ कार्तीक वद्य ९
जुलूस २९ जिल्हेज २२ } { इ. १६८५ नोवें. १०

(औरंगजेब)—रावराजें महालोजी बहादर घोरपडे (मुधोळ)

सैन्यासह बादशहाकडे यावें. सय्यद अलीमुहमद उमराव याजला याजसाठींच पाठविलें आहे.

शि. च. सा. ५ ले. ८४२ } (१६८) { श १६०७ कार्तिक वद्य ११
सुहूर १०८६ जिल्हेज २४ } { इ. १६८५ नोव. १२

तकरीर कर्दे का म्हैसवड पा माण दहिगाव हाजीर मजालसी धर्माजी देशमुख का वेलापूर याणे मारेकरी नफर तिघे पाठविले. ते उमाई अबा-जीचे वाडियांत होते. बुधवारा बाजाराचे रोजी रात्री कोटाचे दिंडीचा दारवटा खणोन उखडिला. इतक्यांत रजपुताचे चौकींतील रजपूत जागा जाला. त्याने गुल केला. त्यास धोंडमार करुन ते उमाईचे वाडियांत दडोन राहिले. दुसरे रोजी सांजेस अबाजीने लोगारा पाठवून आपणास — पारनाईक मांग बोलावून

नेले. आपण गोंवणीच्या झाडाखाले बैसलो. तेथें सदरहू नफर होतें. त्यांस रात्री तारतखानाचे दिंडीने बाहीर काढून बनाचे वेसीने बाहेर घातले. यावेरी देवाचा अंगारा, माल व भाकरी मजपुढें ठेवली; हे गोष्टी नो वळावी म्हणोन क्रिया घेतली.

शि. च. सा. २ ले. २७२ } (१६९ { श. १६०७ मार्ग. शु. ६ शनिवार
रा. श. १२ क्रोधन } -७०) { इ. १६८५ नोवें. २१

शंभु छत्रपती—अंताजी संबदेव देशाधिकारी प्रांत वाई

प्रा मारीचा मुलकाचा तहरह लावणीसंचणी प्रा मजकुरीचे देसमुखाचे मते करीत नाही. येणेकरून कितेक रयेतीचा दिलासा राहात नाही. हे गोष्टीने गैर फायदा हो(तो). तरी यैसी गोष्टी सर्वथा न करणे. जो तहरह करणे तो देशमुखाचे मते (करावा). मुलूक मामूर होये तीं राहाटी करणें.

[हाच कागद शिवचरित्र साहित्य खंड ५ मध्यें लेखांक ९४५ हा पुनः आला आहे. व तो ओझर्डे येथील संग्रहांतीलच आहे. त्यांत 'मजमूचे' व देशमुखीचे 'मक्ते' असे शब्द आले आहेत. पण ह्या खं. २ ले. २७२ शीं ताडून पाहतां ह्या शब्दांचें वाचन व मुद्रण चुकीचें झालें हें सांगतां येतें. खं. २ मधीलच वाचन दुरुस्त आहे.]

ऐ. व. ३ पृ. १६० } (१७१) { श. १६०७ मार्ग. शु. १३
जुलूस २९ मोहरम ११ } { इ. १६८५ नोव्हें. २८
हि. १०९७ }

—मुल्ला अवदुल्ला मौजे उंबरे

उंबरे येथील मशिदीची खितावत=पुराणिकी–तसेंच कझायत=काजीपणा व मौअजन्द = प्रार्थनानिमंत्रकी असे तीन अधिकार दिले आहेत. फर्मान लेखक महमदखान वाकेनिवीस.

सनदापत्रें पृ. ४८ } (१७२) { श. १६०७ मार्ग. शु. १३
शक क्रोधन सु. १०८६ } { इ. १६८५ नोवें. १८ शनि.

गणेश जनार्दन कुलकर्णी —दामाजी व गोविंद खंडेराव
मौजे चऱ्होली तर्फ हवेली लिंगरस मौ. व तर्फ मजकूर

तुम्हापासून कर्ज मुद्दल रु. ६७६॥ आत्मसुखें प्रवर्ततंत्रंचें घेतले. त्यास द. मा. द. स. व्याज रु. ५ प्रो ३३॥। मार्ग. ते ज्येष्ठ शु. १३ सहा महिने

ही मुदत मुदतीनंतर मुद्दल कलांतर वाढ. न देऊं तरी कुलकर्ण तुम्हांस दिल्हें. (पुढें हे कुलकर्ण लिंगरसाकडे गेलें.)

सां. सं. इ. ले. ३२ } (१७३) { श. १६०७ मार्ग. व. ३
सु. १०८६ मोहरम १७ } { इ. १६८५ डिसें. ४

खेम सावंत भोसले—वाणी महानाड परदेशी
सरदेसाई पा कुडाळ उदमी तळघाट.

मा। जिवाजीराम चिटणिवीस पा मा।र यास विस्वा बा। फर्मान व खुर्दखते मोकासाई घाट चालिले आहे. अलीकडे शिवाजी राजे यांचे कारकीर्दीमध्यें चालिलें. हलीहि दर गोणीस एक बैलास थलभरीत हसलमवाफिक ८१ रुका मा।रनुलेचे कमाविसदारापाशी देणें.

श्रीसां. ले. ६३,६४ } (१७४) { श. १६०७ पौष शु. १
सु. १०८६ मोहरम २९ } { इ. १६८५ डिसें. १६

गोविंद पुर्षोतम सुभेदार व—मुकुंद शंकर हवालदार व
कारकून प्रांत जाऊली कारकून सा। सोनाटसोलर्से
—कमाविसदार, भेटकरी घाटकुंभारला.

(ले. ६० प्रो) सदरहू मोहनचा ऐवज ज्या गांवी याल तेथें दुसरियाची वरात न करावी. म्हणजे ऐवज पावेल. छत्रपती स्वामीस विशेस पुन्य आहे. म्हणून घाट मजकुरी पातशाही होन १०० रास देविलें. आदा करीत जाणें. या उपरी तुम्ही फुगोन रोखे गात्रावर कराल आणि हुजूर बोभाटा येईल म्हणजे तुमचे मुलाहिजा होणार नाही. ताकीद असे. (मागील क्र. १६६ पहा).

शि. च. सा. ६ ले. २४ } (१७५) { श. १६०७ पौष शु. २
सु. १०८६ सफर १ } { इ. १६८५ डिसे. १७

सर्जाखान—कारकून व देसाई व नाइगीर किले सिकंदरगड उरफ बादावी

श्रीनिवास वेंकटाद्री नाडगौडा किले मजकूर हे दिवाणीचे काम करीतच आले व हाली पवाडी नाईक देसाई किले मा। यानें हरामजादगी करुन दिवाण विलायेतीची कीतेक खेडियात ठाणें घालून मजबूद केले होते. तरी तुम्ही आपुले जाती मचकरा पाठऊन देसाई मा।राचे ठाणें ऊठाउन दिवाणीचे ठाणे

घातले ऐसे तुम्ही व कारकून किले मार येही लेहून पाठविले. यैसियास मौजे हुलगडी किले मार देखील नख्त दुमाले करणें.

श्रीसा. ले. ६५ }　(१७६)　{ श. १६०७ पौष शु. ५
सु. १०८६ सफर ४ }　　　{ इ. १६८५ डिसें. २०

ता मेढचे दिवाण—सायगावचे मोकदम ता मार

देवस्थान मुकाम चाफल व रामदासस्वामी किले सजनगड दोही स्थली नित्य पूजा व मोहछाव होवयास अंतर पडो लागले. संकल्पसिद्धीस गेला पाहिजे. याकरता मौजे सायगाव दिला असे. तेथील जो दस्त होईल त्यापैकी ४३०॥८ टके नख्त व गला ऐन जिनस ४॥१॥१८= गहू, भात बारीक ५८३ तूप, तेल वगैरे श्रीकडे देविले असे. वेटबेगारी श्रीकडे.

शि. च. सा. ९ ले. ६५ }　(१७७)　{ श. १६०७ पौष शु॥ ६
सु. १०८६ सफर ५ }　　　{ इ. १६८५ डिसें. २१

निलकंठ मोरेश्वर-रायाजी सदक प्रभु हवालदार व कारकून मामले चेऊल

बाबाजी (दादाजी?) महादेऊ देसाई व देसकुलकर्णी मामलेमजकूर याणी विनंती केली कीं, सालगुदस्ता, खंडोजी मोहिता सेवक राजमंडल याणि रामनाक भंडारी प्रज मौ॥ गोठी तो॥ ब्राह्मणगो याजकडे राजगृहींचा राजभाग बाकी देणे असता दरम्यान खंडोजीनें त्याचे टोणगे दोन ...१० मण घेऊन गेला उपरी रामनाक चिमणाजी आउजी यासी फिर्याद जाहाला. खंडोजी मोहिते याचे मुशाहिराबदल लेहोन बाबाजी कुलकर्णी यासी मजुरा देणे

इ. वृ. १८३४ पृ. १४४ }　(१७८)　{ श. १६०७
फ. १०९५ }　　　{ इ. १६८५

पाटोद्य चे देशपांडे
अबदुल सलाम ऊर्फ विसाजीराम फौत (मृत्यु) जाले.

इ. वृ. १८३४ पृ. १४४ }　(१७९)　{ श. १६०७
फ. १०९५ }　　　{ इ. १६८५

शके १६०७ सोळाशदे सातोत्तर। तैं टीका शिवरामेश्वर।
कोनरी बावा सादरें। जाला विचार लेखकु ११२
पूर्णानंदाचे शिवरामस्वामीकृत अध्यात्मरामायण.

१८३७ इ. पृ. ११२ } (१८०) { श. १६०७ इ. १३८५

मोरेश्वर पंडितराव—रंगो विश्वनाथ देशपांडे व लेखक प्रां. कऱ्हाड वे० नरसिंभट शेषभट मुंजेमणी यांस ते योग्य विद्वान धर्मादाय तांदूळ मण १, जोंधळे मण १० प्रतिवर्षी देवणें.

शि. च. सा. २ ले. ३९४ पो रखर ५ } (१८१) {

अली कुतुबशहा तख्त गोलकोट शेर भागानगर तेलगण } —पातशाहा तख्त दक्षण, शार विजापूर

साहेबानके दिलपरी सुणाकर हामारी दिलकी मादमी दूर होकर गे. हामारेपर दिलीका पातशाहा हजरत अकबर जलालदीन हुकूम करकर राहा. पातशाहा भाकर तख्त दौलताबादमे भकर उतऱ्यो है. ऊने हमणेकू कतबत सुरू किया है. उसके शोगान हजरत मीर दौलत मुरगी हेजीब भेज दिया है. उनो आकर हमणेकु बोलता है, हम दखणकी पादशाहीपर हुकूम केये है मराठे छत्रपत सबापर नजर किये है. च्यारो लाख घोडा ताराछु करवा दिलेलखान वा रणमस्तखान राहा चेलके ये है. ते हमणाकू तुमरे घोडा फौबा नालबदी दिये तो खूब है. नै तो, तुमपर राहा चल दते है. हामारेपर बातने करकर बोलत है उस बातकू हम जबाब दिये है हमारी पादशाही वा दखणमेकी पादशाही जुदी नै. उनोकू हुवा तो हमनेकु हुवा. वो खबर सुणकर मोगल च्याल देकर आया है. हमारे ज्यौपर बहुत कुच मुस्तैदी सूद तुम इस बातकू कुच दिलगीर न होणा. देखणेकु नै तो कितबत लिखकर भेज देणा है. हम खर्च कुच पैसे भेज दिये गे. हजरत सर्जाखान खलदकू दिलासा देकर राहा चल सुरु करकर आपणा बोला, लेयाकर वखत है लोते हजीर है. उनोकू दिलासा करकर सर्जाखान सरसुभा देरकर मोगलापर हुकूम करणा है. माहाराज छत्रपती संबाजी राजे पादशाहा जुदी उनोकु येक कतबत वा हेजीब भेज देकर उनोका कुच घोडा मगाकर मोगलापर च्याल देणा. गनीमकू मारकर फना करणा है. हम खासा कंबर बस्त है. कलबरगोकु भाते है. तुमं कमर बदकर आणा है. उस तर्फेलु संबाजी कमरबस्त होकर आता है. तीनो जब मिलकर मोगलाई लेणा है तो कुच तुमारी पादशाहीका... होणा है. नै तो मुलूख खराब होता है. साहेब न पस हमारा हेजीब माघवराऊकू तुमारे पेश मेब दिये है. उनो बहुत कुच बयाण बोले दिलकू मालू [म] होवेगा. साहेब वास्ते कुच १।२ मेवा, घोडे

१।२ इत्ती ४, सारिंगी घोडी ६ भेज दिये है. वो तुम कहेनापासे कहमणसे खिजमतमे हाजीर है. हुकमतपन्हा: मसूदखानकू खर्जकू देकर कोटमे रखणा. इस वखतमे इतनाही पकडे तो कुच ज्यार देत है. तुमारे कोट बकशी छाडणा करेंगा. सबाजी राजे याने च्यार हिशे करड्या घाडेकी सचणी किया है. उनोपर दिलीका पादशहाका फर्जंद तारालू कर गया है. सुफतयानी मादमाहाम हजरत शाहाजादेने हमणेकू किताबत लिखते. हम दिली फिर कन्नरबंदते है. हमकू मिलकर मोगलाई...तो बहुत कुच तुमारी नामोश होती है...हम तुमारे खलबत मे है. इस बरहुकूम हम कारबार किये है इताना हमार फते-बाजी हुये. पीछेलूसाहेब कू अमारी बेटी देकर दोस्तीका अमल करेकू इस बातपर तुमारा भला येक अदमी भेजे देकर मजबूदी काम करणा है. तुम बडे बुजुरककार है. साहेब नजर करकर भला येक हेजीबकू भेज देणा है. उनो संगत दोनी बात करकर कुच पैशे भेजे देयेगा. दखणकी पादशाहीकी खिज-मतकु रहते रहत है. कस्तवानी मुरीदनखान बलूलखान बडा हजीर है. उशकुच दिलासा करकर रखणा है. कलम दुजाई प्यारी दिलपानी दुरी हाल रखे है. वो उसे है. तुमतर्फे करनाटकी राजे राचेवाळ है. उस तर्फेलू हशेम आये तो बी कुच जोर होता है. हम तो पेश छत्रपती संबाजी राजे यान माबुल रामचंद्रपंत हेजीबकू भेजे दिये.

शि. च. सा. २ ले. ३८२ व सु. १०८६ ले. ३८३	(१८२) कौलनामा	श. १६०७ इ. १६८५

मकबुलखान सुमेदार महाबानिहाय मामले बंकापूर —सिवबा मुछडी इत्यादि ५६ व्यापारी मंडळींची नांवे (सराफ, नाईक, तेली, तांबोली, बागवान, पुजारी, समस्त माहा-नाड थळ, परस्थळ उभा मार्ग छपन देश हाये. पेठ नवाब, अबदुल रौनगर मामले मजकूर.

जकातीचा तपशील. पेठेसी कौल सा साल; घावेसी व खपरेल घरासी पाच साल; वतन घरास तीन साल, कौल भरिलेवरी दिवाण व समस्त माहा-नाड व नाडगीर बैसून कूळ पाहून कुळप्रमाणें बिराड बाधावे. मिरासदारासी वर्तना करून द्यावे. गडच व भूस जिनस यादी जनावरावरील यादी, भांडण व्यवस्था, इतर पेठेचे संबंध इ. इ.

खं. १५ ले. ४४५ सु. फ. १०९५ रबब ४	(१८३)	श. १६०७–८ ज्येष्ठ शु. ५ इ. १६८५–८६ मे. २८,१७

देशमूख देसपांडे पा। चाकण—मोकदम कसबे इंदोरी

वे. केसवभट अग्ने याचे सेत का मार इनाम आहे तेयाचे सांभाळी करणें.

खं. १५ ले. २८० सु. १०८६ रबव ५	(१८४)	श. १६०७ ज्येष्ट शु. ६ १६०८ „ ७ इ. १६८५ मे २९ १६८६ मे १८

शंकराजी नारायण—कृष्णाजी दादाजी प्रभु देशपांडे सबनीस व वासनीस नि॥ लोक इशम दि॥ हुजरात मौजे कारी वडतुंबी कोरळ चौकी व खिंड ता॥ रोहिडखोरे.

मावळप्रांती गनिमानी चाल केली म्हणोन समजले त्यास कोरळखिंड व ढवला घाट व मांडरदेवचा सडा येथीळ जागा जागा चौक्या घालून गनिमाची खबर ठेऊन कमकसूर खास बातमी पावती करणें. + राजगडी कळविताच, तुमची कुमक रोहिड वगैरे जागाहून होईल तुम्ही सिरवळी मर्दमु चांगली केली हे खबर येथे समजली. या वेळी गनीम नामोहरम सर्वांनी करावा. तुम्ही जमेदार व सरचाकर माहाराजाचे वेळचे (नामोश) करोन दाखवतील हा भरवसा आहे. बहुत काय लिहिणे.

शि. च. सा. ९ ले ६६ सु. १०८६	(१८५) महजरनामा	श. १६०७-०८ इ. १६८५-८६

मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल. पेसजी सन सबासामर्षे श. १६०४ विठोजी बापूजी, गोंदोबा नारायण इ. पांच जणानीं आपली वाडी सूर्याजी विसाजी प्रभु वस्ती तपे अस्टमी यांसी विकत दिघली. याची किमत चौकचारें देशमूख, आगरनाईक, खासा हरदू वाडीचे खावंद चारी कोन वाडीचे हिंडोन भुईमाण पाहोन केली. वाडी खराबा भाट १२५ काहारी बसरी. आपले निशाण करून दिघले. हे खती सजणाजी होता त्याची अवलाद काहान नादान. पुढे दाने जाहाले. मग वाडीमधे पदरीहून मबलग पैका खर्च करून विहीर पाणी केले, आबादानी केली, नवे घर बाघले. वसात केली. यैसियासी सूर्याजी प्रभु रोजगाराबद्दल रायेगडास गेले. तेथें जिवाजी प्रभु वाडीची मनसुबी सांगो लागला. ते मनसुबी पंत न्यायाधीश यांजवळ गेले. तेही खत पाहोन जिवाजीस आज्ञा केली कीं, तुवा जाऊन तुझे वारिसदार आहेत त्यांचे गळा पडणें. जिवाजी म्हणो लागला, आपले तक्षीमदारावर बाकी होती. सूर्याजी प्रभूस चेऊलची मनमू होती. येन्हे जुलमे वाडी विकत घेतली.

सूर्याजी बोलिले जुलमे विकत घेतली नाही. यावरी जिवाजी चेउली येऊन तकरीरा जुलमे वाडी घेतली म्हणोन घेऊन हुजूर गेला. मोगल सन खमसामधे (श. १६०६) कोकणामधे येऊन लूट नागावा केला, घुघल जाहाली. सूर्याजी म्हणतो, वाडी जुलमे घेतली नाहीं, वाडी पाहिजेत तरी चौकचारे किमत ठरेल ती देणे, वाडी घेणे. मामले मजकुरी येसवंतराव अनंत सुभेदार होते. त्यावरून त्यासी बोलाऊन नेले. पुढें मनसुबी बजाबा माहाले दिमत म्यानबंक हुजरी लोक येही हाजीर मजालिसी बैसऊन मनसुबी आरंभिली खतावरील दोाख, भले लोक हमशाई यासी मनास आणिता आत्मसंतोषे विकली हें खरे जाले. सूर्याजीनें सुखे पुत्रपौत्रानी उपभोग करावा. विठोजी वगैरे अर्थाअर्थी समध नाही.

१८३५ इ. ह. पृ. २४७ व २५४ शक क्रोधन सनदापत्रें पृ. १६१ ले. २ फ. १०९५ रवळ ५	(१८६ –८७)	श. १६०७ माघ शुा ७ बुधवार इ. १६८६ जाने. २०

येसाजी वलद संताजी व देशमुख
विठोजी „ बाबाजी „
नारोजी चंद्रस देशपांडे
बाळाजी बापूजी „ समस्त
मोकदम परगणे चाकण—

—कचेश्वरभट सिद्धेश्वर—
भट ब्रह्मे उपाध्ये
का चाकण

दंडवत अनुक्रमें नमस्कार,

साल मारी प्रजन्य मुतलक गेला यानिमित्य किलेदार व फौजदार साहेबी फर्माविले की, का व पा मारचे ब्राह्मण मेळवून अनुष्ठान करऊन पर्जन्य पडे ते करणे. मग हनुमंताचे देवळीं अनंदगिरीचे मठी हरिकथेस मंडप दिला व मुख्य महंत आले. कथेस प्रारंभ होतांच पाऊस पडला.

११ दिवस समस्तांनीं अनुष्ठान केलें. परंतु पर्जन्य न पडे. त्यावरून व्यंगोक्ति केली कीं, मुख्य महंत आग्रहामध्यें आणिले पाहिजे. त्यावरून स्वामीस आग्ही अनुष्ठानाच्या ब्राह्मणांत आणिलें. स्वामीनी हनुमंताचे देवळी आनदगिरीचे मठी हरिकथेस मंडप देण्यास आज्ञा केली. हरिकथेचे साहित्य केले. स्वामीनी कथा आरंभिताच पर्जन्य अहोरात्र पडला. पुरे पुरे केलें. स्वामीचे उतराई व्हावे म्हणून परगणे मजकुरी दर गावांस टकाशाई व धान्य केली मण करून दिले. ते चालवू ही ब्राह्मण्याची आण असे.

रा. खं. २० ले. २५९
शक क्रोधन बुधवार
(१८८)
श. १६०८ माघ वै.
इ. १६८६ जाने. २०

तिपाजी राजे पांढरे—वे० दामोदरभट धर्माधिकारी पुणतांबे

तुम्हास तुमचे स्थलचे तीर्थ उपाधीक दिल्हे· तुमच्या गांवास आलिया पूजन तुमच करावे, उपाधीक तुम्हास द्यावे. आपले वंशीचे येतील त्यानी तुमचे घरीं राहावे.

रा. खं. ८ ले. ४०
शक क्षय भोम
(१८९)
श. १६०८ चैत्र शु. २
इ. १६८६ मार्च १६

उपाध्ये व मोरेश्वर पंडितराव—देशमुख देशपांडे व ज्योतिषी व उपाध्ये व समस्त वेदमूर्ति वस्ती कसबे हरसूल प्रांत अवरंगाबाद व समस्त महाराष्ट्र कोंकण-देशस्थ विद्वद् वैदिक गृहस्थ

गंगाधर रंगनाथ कुलकरणी कसबे हरसूल हा ब्राह्मण मोगलापासी सेवेसी होता. मोगली यावरी बलात्कार करून बाटविला. भ्रष्ट करून ३ महिने बंदखानी ठेविला होता तेथें यवनासी अन्नोदकसंसर्ग घडला. नंतर यास भाग्य अडीच सद्दी मनसब देऊन चाकर करून ठेविला. पांच वर्षे चाकरी केली. स्नानसंध्यादिक कर्मे करिता न ये. यास्तव राहिले. पांचा वर्षांत अन्नोदक संसर्ग केला नाहीं. दौलत असतां भाग्याचें सुख टाकून, अंतःकरणीं अनुताप मानून, आपले जातींत यावें, यास्तव छत्रपती स्वामीपाशीं रायगडास येऊन एक वर्ष दरबारीं प्रायश्चित्त द्या म्हणऊन सरकारकून, न्यायाधीश व उपाध्ये व दानाध्यक्ष, व भलेभले ब्राह्मण व समस्त आपले ज्ञातीस शरण येऊन प्रायश्चित्त मागत होता. त्याउपरी रा. समस्त राजकार्यधुरंधर वर्णाश्रमधर्मप्रतिपालक छंदोगामात्य स्वामी यांस वर्तमान विदित जालें. यांहीं ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बहुत देखोन छत्र० स्वामीस वृत्तांत विदित केला. छत्र०नीं प्रायश्चित्त द्यावयासी आज्ञा दिल्ही. त्याउपरी आम्ही छंदोगामात्यांचे सभेसी विद्वद्वैदिक ब्राह्मणांचे संमतीने मिताक्षरादि. निबंध पाहोन प्रायश्चित निर्वाह करून प्रायश्चित्त संकल्प सांगोन श्रीत्र्यंबकेश्वर यात्रेस पाठविला. तेथें श्रीगिरिप्रदक्षिणा ३६० व दोनी यात्रा चतुर्विंशत्यब्द प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित गंगाधरें केलें. श्रीक्षेत्रीं समस्तधर्माधिकारी आदिकरून ब्राह्मण संमतीनें तीर्थविधी करून, शुद्धिभोजन अन्नप्रसादपंक्तीस घेतला, म्हणऊन श्रीक्षेत्रीचीं पत्रें घेऊन आम्हापाशीं आला पत्रें दिलीं. उपरी प्रायश्चित्त यथाविधी निर्गमिलें. ऐसें वर्तमान छंदोगामात्य

गोसावी यांसी विदित केलें. त्याहीं पत्रें मनास आणून कारकून न्यायाधीश यांच्या अनुमतें आपले पंक्तीस भोजन देऊन शुद्धिपत्र देणें ह्मणऊन आज्ञा केली. त्यावरून शुद्धिपत्र दिले. हा ब्राह्मण शुद्ध संव्यवहार्य जाहाला यासी अन्नोदकादि व्यवहार यथापूर्व करीत जाणे. जो कोण्ही याच्या ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देवब्राह्मणद्रोही, महापातकी जाणीजे. (साक्षी पंडित शास्त्री अष्टप्रधान)

शि. च. सा. २ ले. ७५ } (१९०) { श. १६०८ चैत्र शु. ५
सु. १०८६ जवल ४ } { इ. १६८६ मार्च १९

गोविंद रघुनाथ सुबेदार व—गुडपगौडा देसाई व देशकुलकर्णी पा मुलगुद
कारकून सुभा प्रां गदग

रा. खानगौडा देसाई पा लक्ष्मेश्वर येंही येकनिस्टतीने माहाराज राजेश्री छेत्रपतीसाहेबाचे कार्येभागास वर्तणूक करून मसलहत केले. माहाराजसाहेब हरुशीत होऊन मौजे नरतीबुा पा मार इनाम करून दिल्हे. दुबाळा करून दीजे. असल परतून दीजे.

रा. खं. १८ ले. २७ } (१९१) { श. १६०८ वैशाख शुा १
शक क्षय } { इ. १६८६ एप्रील १३

रिणको मोकदम व समस्त दाहीजण—धनको धर्मोजी कासार कसबे तळेगाऊ
मौजे वाघोली ता हवेली

तुम्हापासून घेतले कर्ज रु. १५० यासी व्याज द. म. द. से. ५ रु. प्रो देऊन हे लिा सही. यासी उगवणीस दत्ताजी पा व जावजी सा व कृष्णाजी सा लाळजी सा यासी गहाण आपली मोक. + + +

रा. खं. १८ ले. २८ } (१९२) { श. १६०८ वैशाख शुा ११
फ. १०९५ जलर१० } { इ. १६८६ एप्रिल २४
सुलूस २९

—देशमूख देसपांडे व मोकदम सेटे, महाजन प्रा पुणे

आमची स्वारी प्रा मजकुरी एउनी तुम्ही भेटावयासी न आलेती ऐसे सुस्त आणि पा मार करारवाके अमल होत नाही. खालसे फैल टाकीत नाहीं तरी हे खूब नाही. पा मा तहसील मवलग राहोनी तुम्ही तगाफली करिता. तरी पैसे खुा निा तुम्हास देणें लागतील. आता हवती दस्तगाहासीपदत माहा खेद सुलतान पुढे पाठविले आहेती तरी तुम्ही सामानसीर राहाणे.

आम्ही पा मास स्वारी करून येतो तोपौतो तयारी करून ठेवणें तगाफली केलिया आपले केले पावाल. खबर +++ असे.

रा. खं. २० ले. २० }
फ. १०९५ जखर २९ }　　(१९३)　　{ स. १६०८ ज्येष्ठ शु. १
　　　　　　　　　　　　　　　{ इ. १६८६ मे १३

मोकदम पणदरे (पा सुपे)—साहेब

कतबा लेहून दिल्हा, जे, आपणावर साहेबाची बाकी रु. १८ राहिले. ते ८ रोजी पाठवून देऊन हे सही.

शि. च. सा. ९ ले. ६७ }
सु. १०८६ रजब ६ }　　(१९४)　　{ श. १६०८ ज्येष्ठ शु. ७
　　　　　　　　　　　　　　{ इ. १६८६ मे १९

नीलकंठ मोरेस्वर—दादाजी महादेव देसकुलकर्णी मामले चेऊल

बखैर पाठवून लिहिले की, आपणावर राजाज्ञाकडून १२५ होनाची वरात जाली. अफराद येऊन आटाआट केली. तरि मनारोखा पाठविला पाहिजे. तरि अफरादास मनारोखा पाठविला असे. काही आदा न करणे. वरातच बजिनस पाठवून देणे.

रा. खं. १५ ले. २४१ }
सु. १०८७ रजब १५ }　　(१९५)　　{ श. १६०८ ज्येष्ठ बा १
　　　　　　　　　　　　　　　{ इ. १६८६ मे २८

बाजी घोलप हवालदार व—बाजी सर्जाराऊ देशमूख
कारकून किले पुरंदर　　　　　ता रोहिडखोरे गोसावी.

पत्र पाऊन वर्तमान कलो आले. लिहिलें की, 'आपल्यास बहुतच फार अटक केली होती त्यास हुनरेच बाहेर पडिले आता काय विचार करावा सो लिहिला पाहिजे. तरी उत्तम गोष्ट बरीच केली. आता रा. छत्रपती स्वामीचे भेटीस जाऊन आपले ऊर्जित करून घेतले पाहिजे. राजश्रीचे दरशण होताच बरीच सरंजामी होईल जाणिजे.

शि. च. सा. ६ ले. ४६ }
सु. १०८७ रजब १५ }　　(१९६)　　{ श. १६०८ ज्येष्ठ वद्य १
　　　　　　　　　　　　　　　{ इ. १६८६ मे २८

रखमाजी बाबाजी सुभेदार व कारकून—मोकदम, कुलकर्णी मौजे
सुभा महालानिहाये प्रांत कोपल　　　गुबलानूर प्रा मार

मा। हणमाजी बनवरस देसाई दोर्णी किले मार. साहेब कामावरी येकनिस्ट असोन कारभार करून एकनिस्टा दाखविली. याबदल मेहरबान होऊन मौ मार देशकुलकर्णकीस इनाम उमली कुलबाब कुलकानू देखील दिधले असे. दुमाले करणे. याचे रजेमधे अमल जाणे.

शि. च. सा. ५ ले. ९९३ } (१९७) { श. १६०८ आषाढ वा। १०
सु. (१०) ८७ साबान २३ } { इ. १६८६ जुलै ५

मकाजी देशरक्षक सुभा जुन्नर—येसाजी गोविंद सर सुमेदार ता। संगमनेर

आ। रेवादास गुजराबानती पैके रुपय ४८२॥ वाइदेप्रमाणे आपण देऊन गुजरासी लिगाड लाविले न पाहिजे.

ऐ. फा. सा. १ ले. ६६ } (१९८) { श. १६०८ श्रावण शु. १३
हि. १०९७ रमजान ११ } { इ. १६८६ जुलै २३

फर्मान-नेगोजी, मुकुंदजी, विठोजी, रौलोजी व तुकोजी यशवंतराव घोरपडे.

तुम्ही पाठविलेला अर्ज पोहोंचला. तुमच्या शिपाईगिरीची, व प्राणार्पणाची हकीकत वाकेनवीसांच्या अखबारांवरून कळली. तसेंच व्यंकटी हणरस कुलकर्नाटकच्या हकिमांचा सर शुरु यानेंहि तुमची वार्ता लिहिली. तरी सदर व्यंकटी जो तुम्हास दिलासा देईल तो हुजूरचाच जाणून त्याच्या सांगण्याप्रमाणें चाकरी काम प्राणार्पणापर्यंत करावे त्यांत तुमचा उत्कर्ष होईल.

श्रीसां. ले. ६६ } (१९९) { श.१६०८ श्रावण वद्य १०
राजशक १३ भौमवासर } { इ. १६८६ आगष्ट ३
सु. १०८७ रमजान २२ }

—पारपत्यगार व लेखक तो मेढे

राजाज्ञा जे, चाफळ श्री रघुनाथ व सजणगड श्रीस्वामी यांस सुभा जावली सायगाव व मकात-ऐवज मोईन करून छत्रपतींची सनद असतां सदर मोइनीमधून चिठीमसाले म्हणून कौल वरात करून ऐवज खोरून नेता. तरी ही घालमेल करायास गरज काय ? फिरोन बोभाट आलिया ताकीद होईल.

शि. च. सा. ५ ले. ९९४ } (२००) { श. १६०८ भाद्र. शु. १३
सु. १०८७ सवाल ११ } { इ. १६८६ आगष्ट २१

दामाजी रघुनाथ सरसुभेदार व—हवालदार व कारकून ता
कारकून प्रा पुणे व माहाये　　　करेपठार

मुरारी खंडेराव भगत मुा जेजुरी याचे पुत्र भैराळ गोसावी यानी विदित केलेप्रमाणें त्यास त्याचे जमीन जिरात निबघाट कास रुके ।. बारा व बागाइत फुले व आंबराई चिचा बावळी अनार इ. बाजे झाडोरा नख्त मख्ता टके ४० व ठाणपट्टी, पायेपासी, खर्चपटी, सरदेशमुखी व सराफी वगैरेसह (शहाजी) महाराजापासून चालत आहे ते चालवावें.

शि. च. सा. २ ले. ३९२ } (२०१) { श. १६०८ आश्वीन शु. ७
क्षय संवछर } { इ. १६८६ सप्टं. १४

नारबा नायक फोंडेसरदेसाई—फोंडे सुभेदार ज्ञानलिंगयन
वरिगे दळवई

नायकाचा मुतालीक बाबुल सेणवी याने विना करून घेतला, जे आपला देसाई स्वस्थानचे सेवेठाई एकनिष्ठ चालिला. आपणास चालोन आलें हक इनाम इ. गैरवारसांचे दुंदाईमुळें सद्या तैकूब आले. त्यामुळे आपला देसाई परमुलखी जाऊन होता. त्यास सुभेतील कौल पाठऊन फोंडस आणिला. अशास माहाराजसाहेब कृपाळू होऊन पुरातन प्रमाणें देसाई याचे देसगत चालवावयासी आज्ञा द्यावी म्हणून सेणवी यानी विनंती केली. त्यावरून देसगत चालो देणे. त्याचे घरचे वारीस यांस घरास निा होन १२५ नायकास ताकीद करून देऊस (देण्यास) लावणें.

शि. च. सा. ४ ले. ७३८ } (२०२) { श. १६०८ कार्तीक शु. ४
राजशक [१] ३ क्षय इंदुवार } { इ. १६८६ आक्टो. ११

राजा शंभु छत्रपती—नीलकंठ नारायण देशाधिकारी व देशलेखक
प्रांत कुडाळ

पाटगावी परमहंस मौनी गोसावी होते ते मृत्यु पावले. कै. स्वामी असतां मठ बांधोन दिल्हा. नतर गणोराम देशाधिकारी यांनी विदित केले, त्यांचे स्थळी मोहोत्सव चाले ते केले पाहिजे. म्हणोन ५०० होनाचा निर्वाह केला. सांप्रत तुरुतगिरी मठी आहेत. या वर्षापासून ज्याजती २०० होन निा द्यावयाचा निर्वाह केला. मोहोत्सवधर्म चाले ते करणें.

रा. खं. १५ ले. १४८ } (२०३) { श. १६०८ मार्ग. शु. २
फ. १०९६ जिल्हेज ३० } कौलनामा { इ. १६८६ नोव्हें. ७

—आनंदगिरी गोसावी मठ
सदानंद का। निंब सा। मार पा। वाई

तुमचे बाबे तुळाजी पाटील मोकदम कसबे निंब मालूम केले जे गोसावीयाचे सुदामत चालत आले तैसे चालविलें पाहिजे. तरी तैसे चालेल सुखे राहणें. शक न धरणे, दरीं बाब कौल.

ऐ. फा. सा. १ ले. ७५ } (२०४) { श. १६०८ मार्ग. शु. १५
जुलूस ३० मोहरम १२ } { इ. १६८६ नोव्हें. १९

—देशमूख, मुतसद्दी, पटवारी, सेट महाजन, परगणे बिदर सुभे विजापूर.

आमच्या कानीं आलें कीं, तुम्ही परगण्याच्या रयतेसह आमच्या विजयी सैन्याच्या आगमन-निर्गमनामुळें आणि शत्रु-सैन्याच्या भटकण्यामुळें निराश्रित व परागंदा झाला. तरी तुम्ही आपल्या मूळ वतनावर येऊन आपापल्या चाकरींत गढून रयतेस दिलासा देऊन रयतेकडून शेतकाम करवावें. आणि जेणेकरून परगण्याची आबादानी, भरभराट होईल, जिराअत उत्कर्ष पावेल तें प्रयत्नपूर्वक करावें.

रा. खं. ३ ले. ५६० } (२०५) { श. १६०८ मार्ग. व. ४
सु॥ १०८७ मोहरम १७ } { इ. १६८६ नोव्हें. २४

अनाजी हरजी व जानोजी तुकोजी—धनाजी जाधव तथा शिवाजी
सोनजी रेवजी पटेल मौजे बोरगांव   जाधव मौ. माजीगाऊ

लेहून दिल्हा कागद ऐसा जे, साल मजकुरीं मुलकांत दुकाळ पडला; आपणास एक दिवसाचे खावयास नाहीं. म्हणवून आम्हीं तुम्हापाशी येऊन आपल्या आत्मसंतोषे आपले खासा तकसीमपैकी तकसीम घेऊन आपणांस वाचविलें पाहिजे. ऐशियास तुम्ही उतर दिल्हे जे, तुमचे वतनभाऊ व बारा बलुते यांच्या विद्यमाने पैके देऊं त्यासारखी तकसीम घेऊं इ. इ.

शि. च. सा. ५ ले. ७९९ } (२०६) { श. १६०८ पौष शु. ९
फ. १०९६ सफर ७ } { इ. १६८६ डिसें. १३

—प्रां वरलीचे अधिकारी

मौजे धर्मपूर येथें १ चाहूर जमीन गबहलाही व मोबत सनद

सुराबखान मरहूम दिल्हे ते दासो दिगंबर पंडत गोसाई यांचे वंशपरंपरा जहागीरचे यैवजी इनाम आहे; ते चालवणें.

कों. इ. सा. २ ले. १५ }
सु. १०८७

(२०७)

{ श. १६०८
इ. १६८६

जाविते वतनदार ता॥ पेडणे सुभा ता॥ भीवगड

बा॥ तह हुजरात १२२६॥। निशाण होनु पैकी वजा येसाजी जसवंतराव (ही पदवी आहे) देसाई परका होऊन कुडाळकर देशकास भेटला. सबब वतन होन ६०० वजा. पैकी मा॥ इलेचा बंदा गोदजी नाईक तो येऊन भेटला त्यास सालिना देणे शंभर. नाडकर्णी, देसाई कसबा, भिकाजी नाईक सांवळ देसाई ता॥ मजकूर, देसाई मांद्रे, धारगळ, पारसे, यांच्या कदीम रकमांची नोंद.

शि. च. सा. ५ ले. ८०० }

(२०८)

{ श. १६०८
इ. १६८६

महजर-खुदादावदीयान, कारकुनान, कानगोयान, देशमुखान, देशपांडियान, पाटलान, पटवारियान, बा॥ देवराव लोमटे रविराव मोकदम कसबे आंबेजोगाई येथील भावकी करतां कजिया उत्पन्न जाला. शिकंदर बातशाहपर्यंत गेला. बादशहा बोलले की भाऊबंद व गोत घेऊन येणे. ते आले. त्यांस बादशहा म्हणाला खरा कोण व खोटा कोण. अपूर्ण

रा.खं.१८ ले.५७
रा. श. १३ क्षय }
सु. १०८७

(२०९)

{ श. १६०८
इ. १६८६

दतसेट सेटिया याच्या नावे हिरोजी इंडलकर याचे कर्ज बा॥ हमी गोपाळसेट सेटिया हुजूर दसरी वेढत आहे. त्यापैकीं म्हणोन राजपत्र.

रा.खं.१८ पृ.७९
रा. श. १३ क्षय }
सु. १०८७

(२१०)

{ श. १६०८
इ. १६८६

गोपाळसेट सेट्या याचे नावें वराता. त्यांत अन्वय कीं, हिरोजी इंडलकर याजबा॥ कर्ज बा॥ हमी तुजकडे हुजूर दफ्तरी वेढत आहे त्यापै॥.

९

रा. खं. १५ ले. ३१५ }
सुा १०८७ + २५ }

(२११)

{ श. १६०८
{ इ. १६८६

शंकराजी नारायण सचीव—दादाजी नरसप्रभु देशकुलकर्णी ताा भोर व उत्रोळी तपे रोहिडखोरे

रा. स्वामीची आज्ञा माहालो माहालची जप्ती हकलाजिमा व इनामती व इसाफतीची जाली तेणेप्रमाणें तुमचे वतनाची हरदू खोरियाची गावगनाची बाली असता तर्फ मारचा वसूल घेतला हे विदित जाले. या कामास स्वार पाठविले आहेत. मसाला रु. २५ आदा करणे.

रा. खं. १८ पृ. ७९ }
माघ शु. ६ भानु. }
रवल ४ }

(२१२)

{ श. १६०८ माघ शुा ६
{ इ. १६८७ जानेवारी ९

लोक दिाा दंडपाणी सेवक याजकडील तकदमा होन पाा १०० देविले असेत. सदरहू ऐवज हुजुर पोहचऊन देणे. या कामावा नफर दिाा दंडपाणी होत. जथेदार यांस ४ होन देविले असेत.

शि. च. सा. ९ ले. ६८ }
सु. १०८७ रवल ५ }

(२१३)

{ श. १६०८ माघ शु. ७.
{ इ. १६८७ जानेवारी १०

जिवाजी हरी सुभेदार व कारकून—देशमूख, अदिकारी, देशकुलकर्णी सुभा किलेहाय तर्फ सुधागड व रयेत मामले चेऊल

तुम्ही रायाजी सदक प्रभु सुभेदार मामले मजकूर व दताजी विठल मजालसी सुभा याबरोबर आपला मुदा लेहून पाठविला तो मावया आम्ही रा. तुलजोजी गे सरसुभेदार नामजाद प्रांत चेऊल व नरसो सुरो सुभेदार मामलेमार बैसोनु कलामाचे कलम मनास आणून कोल तुम्हांस सादर केला. तेण्हेप्रमाणें तुम्ही येऊन गावाचा गाव मामुरा करणे, कीर्द...बेगमी करून... याउपर स्वामिकार्यास हरकत कितवा सर्वथा न करणे. तुम्हास वरातदाराचा तगादा होता तोहि दूर केला. वरातदार तगादा लावणार नाहीं. हर एकविसी तुमचे चालऊनु.

इ. सं. गो. इ. सा. पृ. ९ }
शा. श. भौम दिन }

(२१४)

{ श. १६०८ माघ शु. १५
{ इ. १६८७ जानेवारी १८

श्रीशंकराचार्य शृंगेरीमठ—अंतरुज (कोंकण) ब्रह्मवृंद

(सर ज्योतिषी यांच्या धर्माधिकारत्वाबद्दल, पौरोहित्याबद्दल तसेच त्यांच्या निर्दोषत्वाबद्दलचें संस्कृतमध्यें पत्र.)

रा. खं. १८ पृ. ७९ } (२१५) { श. १६०८ माघ वद्य ११ इ. १६८७ जाने. २९

देणे रदकर्ज नरस सेट उधाप्पा वकाल पेठ पाचाड कर्ज जमा पेठा हाय नजीक रायगड बा बखैर कारकून पेठमार छ २२ जवळ तकदमा होन पा। ६० देविलें असेत आदा करणे पावलियाचा जाब घेणे; या अन्वये बरात.

रा. खं. १५ ले. २८१ } (२१६) { श. १६०८ माघ वद्य १४
सु. १०८७ रवल २७ } कौलनामा { इ. १६८७ फेब्रु. १

नीलकंठ मोरेश्वर—सर्जाराऊ जेधा

तुम्ही गनिमाकडे जाऊन सेवा करिता. कोण्या भरास भरून गेलेत ! बरें जे झाले ते फिरोन न ये. परंतु मुसलमानाची सेवा करतां तुम्हास कष्ट होतात. साप्रत स्वामीचे सेवेसी येऊन कार्यभाग करावा. कष्टाची मुजरा होईल. सरफराजी करून घ्यावी. म्हणून कळो आले. तरी तुम्ही कदीम लोक, तुमचा भरवसा, रा. स्वामीचे बहुत अन्न भक्षिले आहेत. क्रिया धरुनु आणि याव-याचे केले तरी बहुत उतम केले. कदाचित गनिमाकडे गेले होतेस. त्या गोष्टी करिता यावयाचा अनमान कराल तर सरवस्वी न धरने, बेशक येणे. तुमचे बरे करणे सुभे होऊन सर्फराजी करून बहुत चालऊन. अतर न पडे. समा-धान असो देणे. आणि येणे. दरीबाब कौल असे. आज्ञाप्रमाण मोर्तब.

रा. खं. १८ पृ. ८१ } (२१७) { श. १६०८ फाल्गुन शु. १
सु. १०८७ रवल २९ } { इ. १६८७ फेब्रुवारी ३

कोंडाजी भोले सर हवालदार—दतसेट सेटया

इमारती किले पुरंदर

पावती—तुझे व जावसेटीचें भांडण. त्याचा नेतोजी राजे पालकर हवालदार किले मार यानी निवाडा केला. व तुला सेटेपण देऊन सेरणी होन ५० बांधिली. ते जमा करून कारखाननिसीकडे बाकी ओढत होती. त्यावर किला आर्वामध्यें मोगलास दिल्हा. मोगलापासून रा. कै. स्वामीनीं घेतला. अनाजी दतो सुरनीस यानी बाकी मनास आणून जिल्हेज १९ खमसामध्यें सनद चालती केली ती सीतामध्यें हुजरून बरात चालविली. सदरहू १३ रु. ७७॥ टके खुर्दा १५४८६ जमा झाले.

श्रीसां. ले. ६७, ६८
फ. १०९६ रखर २४ }　　(२१८)　　{ श. १६०८ फाल्गुन वद्य १०
इ. १६८७ फेब्रु. २७

—सौ. रा. बाईसाहेब चाफळ.
मोकदम कोा मसूर.

यात्रेस व सिंगणवाडीचे इनामास अभय असे. आमचे तर्फेने कोणी वाटे जाणार नाही. गावोगावी कागद पाठऊन यात्रेकरी बोलवून समारंभ करणे. देवाचे इनामस्थळ तुमचे आधीन आहे. प्रसाद पावला. मसूर येथील इनामापासून मोकदमानी पैसे घेतले म्हणून कळो आले. तरी ते फिराऊन देणे.

शि. च. सा. २ ले. २२२
सु. १०८७ रखर २९ }　　(२१९)　　{ श. १६०९ चैत्र शु. १
इ. १६८७ मार्च ४

नीलकंठ मोरेश्वर— बाजी सर्जाराऊ जेधे देशमूख तपे भोर
तर्फ रोहिडखोरे.

तुम्ही मुदा येकनिस्टता धरून आपले वृत्तीवरी यावे, सेवा येकनिस्टतेने करावी, मुलेमाणसे कबिला आणावा, अभये देऊन मस्तकी हात ठेऊन सेवा घ्यावी म्हणून कितेक वजेने सागोन पाठविला. तरी बहुत बरें. याहून काय बरें आहे. तुम्ही आधीच या प्रांतीहून नव जावे आणि गेलेस तरी ते सर्व अन्याये तुमचे, तुम्ही येकनिस्टता महाराज राजश्री स्वामीचे पायासी धरून आलिया माफच केले असेती. तुम्ही रा. स्वा. च्या अभयपत्राचा उजूर कराल तरी सहसा न करणे. तेहि पत्र अणून देउनु.. तुम्ही आलियाने तुमच्या कबिल्याची, खायाखर्चाची विळे मामला करूनु. देउनु. तुम्हापासी जे लोक असतील ते घेऊन कबिलासह येणे. कबिला रोहिडागडी ठेऊनु तुम्ही आम्हापासी श्रीवर्धनगडी भेटीस येणे. भेटीनंतर तुमचा मुदामवाफीक सरंजाम अवघाच करून, तुम्हा बराबरी लोक येतील त्यांची विळे करून. अभय असे. अन्याय कुल माफ असेत. येविसी आम्हास रा. पंत कै. पंताचे पायाची आण असे. हा कौल.

रा. खं. १८ पृ. ७८
सु. १०८८ जवल १६ }　　(२२०)　　{ श. १६०९ चैत्र वद्य २
इ. १६८७ मार्च २१

दामाजी रघुनाथ सरहुमेदार याचा दतसेटी एलसेटी याचे नावाचा हकाविसी आहे यास स. ११०० पावेतों वर्षे ९७.

रा. खं. १८ ले. ५७
जवळ ३० भानुवासर वै. शु. २ } (२२१) { श. १६०९ वैशाख शु. २
इ. १६८७ एप्रील ३

मोरो भास्कर कारखाननीस किले सिंहगड तकदमा होन पा। १५ देविले असत. आदा करणे पावल्याचा जाब घेणे, या अन्वये वरात

खं. २० ले. २१२
सु. १०८७ फ. १०९६ } (२२२) { श. १६०९ वैशाख शु. ३
इ. १६८७ एप्रील ४

होनाजी बाबाजी नागोजी बाबाजी—त्रिंबक काकाजी राघो काकाजी
देशकुलकर्णी का। सांगोला पा। माण

आपणास काळ कठीण पडला, पाठी कोन्ही नाहीं. यास्तव तुम्हापासून आत्मकार्यालागी घेतले होन ५००. घेऊन कर्याती सांगोल्याचे दो।र्णाचे ४ थी तकसीम दिली. म्हणजे ऐन हक ४५ होन त्याचे ११।· गांव तोहून वाडेगाऊ ३, चिचोली २, पेठ वजिराबाद १ असे ६ आणि सोनद ३, माणेगांव १ मडासिगे होन २ पैकीं १ असे ५। मिळून ११। इनाम चाबूर ॥· १२॥. पैकीं चौथी तकसीम बिघे १८ तुम्ही खावे. व दर मोठेस मीठ ·।· होन ८।· जुतेजोडा इ. जे उपेद्र होईल ते चौथे; वृत्तीमुळे टका पडेल तो चौथा तुम्ही द्यावा. नवी वृती साधेल त्यांतील निमी देऊ. सदरहू ठाणाचा महजर करून देऊं.

रा. खं. २१३ (ले. २२२ प्रमाणें) „
रखर १

का। भाळवणी, म्हैसवड, कासेगाऊ हे आपले वतन. पण परी-सदार रेटून खातात. याकरता तुम्हास पाठोवा केले असे. आम्ही तिन्ही वतनाची देवखव करावी. तुम्ही पाठी राखावी. दरबारखर्च करून वतन सोडवावी व मग त्यांतील निमे देऊं. मान, नांव, विकलम आमचे व रुमाल मान तश्रीफ निमे तुमचे

शि. च. सा. १ ले. ६९
राज. १३ प्रभव गुरुवार
जखर ४ सु. १०८७ } (२२३) { श. १६०९ वैशाख शु. ६
इ. १६८७ एप्रील ७

नीलकंठ मोरेश्वर यांची राजाज्ञा—बाजी घोलप मुद्राधारी व लेखक
किले पुरंदर

वे. शिवभट पुरंदरे यांनी विदित केले कीं, पूर्वी कै. स्वामीनी आपले पिते (दादंभट) व चुलते रामभट यासी श्रीपुरंदरेश्वर व केदारेश्वर यांचा

प्रत्यही अभिषेक करावयाची आज्ञा केली होती व प्रत्येकास प्रतिवर्षी होन ५ पा। पोतांतून पावत आले. त्या उपरी पुरंदरगड मोगलास देत[विला] (श. १५८७) त्या दिवसापासून अभिषेकाची मोईन पावत नाहीं. तरी देव जागृत स्थान नंदादीप नेवेद्य चालत आहे आणि अभिषेक मात्र चालत नाहीं. तरी केदारेश्वराकडे नारायणभट व पुरंदरेश्वरास शिवभट अभिषेक करतील व स्वामीस आसीर्वाद देतील. मोईनहि देत जाणें. नैवेद्य भटगोसावी यांचे विद्यमाने करून समर्पित करावा. गुरवाकडून न करणें. पेस्तर स्वामीची सनद सादर होईल.

रा. खं. १८ ले. ५७ वै. शु. ६ जखर ४ गुरुवासर	(२२४)	श. १६०९ वैशाख शु. ६ इ. १६८७ एप्रिल ७

तुझा चुलता गोपाळ शेट—असें ज्याजती लिहिलें आहे. बा। देणे वर्षासन त्र्यंबकदेव गोसावी किले राजगड यास तकदमा होन पा। ७५ देविले ते आदा करून जाब घेणे; या अन्वये वरात.

रा. खं. २० ले. २१ फ. १०९६ अखेर साल	(२२५)	श. १६०९ वैशाख इ. १६८७ एप्रील मे

सुभे औरंगाबाद ऊर्फ दखन मधील पा।—सुपे—याचा सेख महमद बकर दिवाण या मार्फत तहसील बा। हवेल वसूल ६५५७॥ गांवे २८. (सामराज काटे देशमूख यांची मुद्रा.)

खं. २० ले. २६० शक प्रभव फ. १०९७ साबान १२ !	(२२६)	श. १६०९ ज्येष्ठ शु. १ इ. १६८७ मे २

महिमाजी राजे वळद — वे. रा. दामोदरभट धर्माधिकारी
माणकोजी राजे सिंदे पुणतांबे

तुम्हास पुण्यस्तंभीचे पुरोहिताची दिधलें.

* साबानाची १२ ता. ही या पत्रावर कां आली ?

रा. खं. १८ ले. २९ फ. १०९७	(२२७)	श. १६०९ ज्येष्ठ इ. १६८७ मे

बाद जालीक जागीर तुळोजी शिंदे जागीरदार पा। पुणे सालगु[द]। सन हजार १०९६ बा। तुमार रु. २१७॥= रासपैकी वजा सालगुा। मारुफाते

विठल गंगाधर सेखदार व कारकून गुमास्ते मा।इले या साल देहे बाद इ. रु. १०८।।।≈ राख.

इ. वृ. १८३७ पृ. ३०० }
हि. १०९८ रजब २६ } (२२८) { श. १६०९
{ इ. १६८७ मे २९

सेखनिजाम हा संभाजीस संगमेश्वरी पळणारा ह्यास औरंगजेबानें (तकरीबखान नव्हे) मुकरबखान असा किताब दिला. मुस्ताइदखान कृत मआसीर अलमगिरी.

शि. च. सा. २ ले. ७६ }
सु. १०८८ रमजान } (२२९) { श. १६०९ आषाढ
{ इ. १६८७ जून जुलै

रायाजी सामराज—खानगौडा देसाई पा लक्ष्मेश्वर व नाडगौडा किले कोपल

तांम्ही विजापूर घेतले आणि कोपल भुजबलगड प्रांतीं तांम्राची ठाणी येउनु कितेक मुलूक कबज केला व कितेक गड पालेगारानी घेतले. रजबखान याणेही कितेक माहाल कबज करून ठाणी गडकोट घ्यावे येसी श्रम करूं लागला ते प्रसंगी किले कोपल व किले बहादुरबंडा हे दोन्ही किल्याची बहुत जबुनाई जाली होती. तेशामध्यें तुम्ही आपणाकडून कांहीं गला दोही किल्यावरी घातला. दोही किल्याचे हशम होते ते कितेक पलोन गेले. म्हणून तुम्ही आपणाकडून हशम पाठऊन मजबुदी केली. स्वार ठेविले. आणि छत्रपतीच्या पायासी येकनिस्टता धरून हें केलें. त्या उपरी आमच्या लस्कराच्या फौजा घेऊन आम्ही आलों. आणि किल्यांची बेगमी करावी तसी केली. तुम्ही बहुतच येकनिस्टपणें वर्तोन दोन्ही किल्यांची मदती केली येसे पूर्ण कलों आलें. त्यावरून कृपाळू होऊन अलबंडो किले कोपल हा गांव म-हामत करून इनाम दिला.

ऐ. सं. सा. खं. ५ ले. ३८ }
स. १०९७ जुलूस ३१ रमजान ९ } (२३०) { श. १६०९ आषाढ शु. १०
{ इ. १६८७ जुलै १०

सुंदर पाटील, मना चौगुला व समस्त रयत मौजे घोसीतूर पा आसेर } —फौजदार परगण असेर

वायेदा लिहून दिल्हा जे, साहेबाचे फौजदारीत आमची ढोरे म्हैसी वगैरे चरतात. ऐसियास आपुन रुपये मा। रु. २५ कबूल केले असेत. आपनास ठाणेदाराचे नावे परवाना होये की याना जंगलात ढोरे चरू देने. जे वेलेस परवाना आम्हाबवल पावे ते वेलेस पैसे बिला उजूर देऊन.

रा. खं. २० ले २१४ } (२३१) { श. १६०९ आषाढ शु. १४
शक } { इ. १६८७ जुलै १३

पांडुरंगभट बिन नागोहरि—बाळकृष्णभट नागेशभट काले आपणास न पुसता आपली व आपाजी शिवाजीची तकसीम मिरासी करून दिघली काय सबब. आपणे व बापाने ते सेत केले नाहीं. रायाजी जनार्दन जागिरदार यापासून पैका न घेतां उगेच लेहून दिघले. तेथवा त्रिंबक बाडिवा व निरा आराध्या बोलिला जे त्याचा भाऊ भिकाजीची आमची आणभाश जाली आहे. आम्ही दिघलियाने तिहीं दिघलेंच आहे. त्यास याच्या दोन्ही तकसिमा येही दिघल्या नसता आपण स्वहस्त केले तरी महाराजे याचे यासी फिराउनी दीजे. मार्गस्वरी पौर्णमासीचा वाइदा केला असे. यासी चुकोन तरी आपला बाप नागो हरी सोडउनू घेईल.

रा. खं. २० ले. २२ } (२३२) { श. १६०९ श्रावण शु. १
शक प्रभव } { इ. १६८७ जुलै ३०

मालजी रामजी यादव—गोपजी रागोजी यादव
मोकदम माळशिरस　　मौ माळशिरस

वृत्तिपत्र दिघले जे काळ थोर पडला, गांव खराब जाला, कितेक सुजोन मेलो, कितेकाची घरे बुडाली, कितेक उठोंन देसावरी गेली, आपला लेक रामाजी व सुभानजी देसावरी पोटासाटी सुजोन मेला. आपली बाइल मरोन गेली. आपण व सून दोघे उरलो. अन्न मिळेना, हातपाय सुजले कोण्ही हाती घरीना. मग आपणापासी मोकदमीच्या सनदा, व वतनाचे कागद होते ते दरम्यान बुडतील म्हणून हर कोण्हास नाव नागर शेत घर देण्यापेक्षा तुम्ही आपला बाप भाऊ तैसाच आहेस म्हणऊन देशमुख व देशपांडे व गावीचें जे कोण्ही वाचली आहेत त्यांचे गोहीनसी व हमशाही गावीचे मोकदमाचे गोहीनसी आपले वडिलाची मिरासी हक लाजिमा आहे तो तुम्हास दिघला असे. जोवरी वाचोन तो अन्न वस्त्र देणे. मेलियावरी मुठीमाती देणे आणि वतन मिरासी खाणे. आपणास वतनास संबंधु नाहीं. आपले भाऊबंधु, आपला लेक वांचोन आला तरी त्यासी संबंधु नाही. काळीवरी पांढरी तोवरी वतन खाणें. हिला हरकती करील तो दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा अन्याई (५ गोही.)

सनदापत्रें पृ. १६६ ले. ८ } (२३३) { श. १६०९ श्रावण शु॥ ६
राजश १४ प्रभव गुरुवार } { इ. १६८७ आगष्ट ४

राजा शंभू छत्रपती—सुभेदार, जुमलेदार, कारकून, हवालदार, बारगीर, अफराद, बाजे लष्कर, हुजुरात, सुभे हाय व हशम.

मौ. चिंचवड प्रांत पुणे हा गांव श्रीदेव यांकडे चालतो. तेथें आपल्याला कांहीं उपद्रव देऊं नये अशी स्वामींची पहिल्यापासून आज्ञा. असे असतां तुम्ही रहदारीस नाहक दरफ्ती करता. उपद्रव देऊन धामधूमहि करितां. रयतीकडून गैरसनदी मनास येईल ते मागत होता म्हणोन कळों आले. तरी हे ढंग स्वामीस कैसे मानो पाहतात. याउपरी ही बदराहा वर्तणूक केलिया तुमचा एकंदर मुलाहिजा होणार नाही. जो धामधूम करील त्यास स्वामी जिवेच मारितील. हें जाणून मौजे मजकुरास तसदी न देणें. ताकीद असे.

रा. खं. २६ ले. ५६ फ. १०९७ सवाल ९	(२३४)	श. १६०९ श्रावण शु. १० इ. १६८७ आगष्ट ८

—राजेसाहेब

साल गुदस्ताप्रमाणें या वर्षी आवर्षण झालें आहे. सर्व प्रजा हवालदील आहेत. इकबालपनाह मुनाशी यांच्या दृष्टोत्पत्तीस हें सर्व आलें आहे. आपल्या रकमेची तरतूद जहागिरीतून व हंगामाच्या वेळेपर्यंत होईल. जहागिरीबद्दल इतर कांहीं मनांत आणूं नये.

रा. खं. १५ ले. १४९ रा. श. १४ प्रभव	(२३५)	श. १६०९ श्रावण वद्य १० इ. १६८७ आगष्ट २२ सोम

शंभु छत्रपती––येसाजी मल्हार देशाधिकारी व देशलेखक प्रांत वांई

श्रीसदानंदमठ कसबे निंब यासी कें. स्वामीच्या वेळेपासून अन्नछत्राबद्दल ऐवज चालिला आहे. स्वामीनेंही आज्ञा केली. सांप्रत कारकून हेंगे करितात. म्हणून आनंदगिरी याणी लिहिले. तरी मधें ऐवजावाबे कुसूर करावया काय गरज. तरी सुस्ती न करणे मोईन चालों देणे. धर्म–कार्यास खलेल न करणे.

रा. खं. १५ ले. १३ श. १६१० प्रभव सुा १०८८ जिलकाद ७	(२३६) क्रयपत्र	श. १६०९ भाद्र. शु. ७ रविवार इ. १६८७ सप्टेंबर ४

बाबाजी गंगाजी व माणकोजी रावजी—महादजी सुलतानजी पाटील जगदळे व माहादजी नरसो व पाटील जगदळे सूर्याजी बापूजी पाा जगदळे शिरवडे

१०

तुमचा आमचा मूळ पुरुष व घराणें एक. तुमचे वाटणीस मसूर व आपले वाटणीस शिरवडे. तुम्ही राजगडास (रायगड, खं. १५ ले. १० पृ. ३२) गेलेवी. माघे हरबाजी अजहत देशमूख यांच्या पाठिराखेमुळें नाइकडे कुणबी यानीं आमच्याशीं पटेलगीसी कयळा केला. नाइकडे आपणासी रेटेनात. दुसरियाने येऊन पटेलगी जोरावारीनें घ्यावी ! मौजे मारची पटेलगी निमे तुम्ही खावी व नाइकडियासी वाद सांगावा. आपण पाठी राखावी. ऐसा तह करून वाद सांगितला. नाईकडे दूर केले. ते प्रसंगी हरखीचे आमचे वरील होन ५० तुम्ही दिल्हे व पोटाकरतांहि होन ५० दिल्हे. याबदल वडील-पणाची पानतश्रीफ, माहारनागर, हदमहदूद पांढरीवरी जे उत्पन्न येईल ते निमे दोनी ठाई तारोतार वाटून द्यावे. गांव समायीक लावावा. ज्यासी फावेल त्याणें लावणी करावी. एकाची मोडी एकावरी न घालावी. आपल्या भाऊ-पणामध्यें दुसरें दिसों न द्यावें, आपण आधीं पान व नागर घ्यावें, मागे तुम्ही; बाबाजी पाटिलाची विल्हेच्यानी हरकती केली तरी बाबाजीनें सांभा-ळावें. माहादाजी पाटिलाच्याने आपले सांभाळावें. हिला हरकत कोणी करणार नाही. श्रीची व वडिलाची आण.

शि. च. सा. ६ ले. ७८ } (२३७) { श. १६०९ कार्तिक शु. २ नंतर
हि. १०९९ जुल्स ३१ } { इ. १६८७ आक्टोबर २८ ”

नुरुद्दीन—मामले बंकापूरच पेठेचे अमलदार व देशमूख देशपांडे

सैद आदम करीम सर्जा व खानगौडा लक्ष्मेश्वर सरनाडगौडा सर-कार मामले मजकूर व गैर माहालानिहाये यानी सरकारचे फौजाचे सामील होऊन पादशाही कामावरी रुजुवत जाहालेबदल यावरी मेहेरबानगी फर्माऊन याचे वतन सोगूर हें इनाम गांव आणि इनाम जमीन बमोजीब देसाई मामले मार व वतना व गैर साबक सरनाडगौडकी ता पेठ कसबा, कोटिगेरा व आमदकणा केचकेरा, काजीपूर, येतमादपूर, इभराईमपूर देखील सी मजरे दुमाला करून दिल्हे.

ले. ७९ (ले. ७८ प्रमाणें) पादशाही किलेचे गिर्दनवाई गनीम येऊन ताख्तताराज करिता वख्ती तुम्ही आपले जमाऊ समेत येऊन गनिमास तंबी पोहाचाविलेवरी, इनाम दिले.

शि. च. सा. ६ ले. ७७ } (२३८) { श. १६०९ कार्तिक शु. २ नंतर
हि. १०९९ जु. ३१ नंतर } { इ. १६८७ आक्टोबर २८

नुरुद्दीन—सैद आदम करीम सर्जा व खानगौडा लक्ष्मेश्वर सर-नाडगौडा बंकापूर वगैरे महालानिहाये

तुम्ही पादशाही कामावरी रुजवात राहोन हमेशा गनीम आले वख्ती कुमक पोहचाऊन खिजमत केले. बजल पेठ कसबा येतमादपूर, कोटिगेरा व आमदकणा व कचणकेरा, पेठ इभराईमपूर दो सीमजरे दुवाला करून दिले. तरी इनाम जमीन बमोजीब देसाई मामले मार व वर्तना व गैर साबक जेणे बमोजीब चालत आहे तैसे आपुले मिरास भोगवटा करून पातशाही कामावरी साबूत कदम राहाणे व चीनवल व गैर साबकदमोजीब भोगवटा करून घेणे.

शि. च. सा. ९ ले. ७१ } (२३९) { श. १६०९ कार्तीक शु. ४
सु. १०८८ मोहरम ३ } { इ. १६८७ आक्टो. ३०

(ले. ७० प्रमाणें) रयतेस कौल, देशमुखांनीं सांगितल्यावरून दिला. —घरटका, मीठटका व बाजे बाबती व महसूल माफ केला पाहिजे. तरी मीठ टका घेऊन वरकड येक साला माफ. १ कोटवाडा खाजगीमधे येक दोघ सोनार धरून नेऊन तकदमा अगाऊ पैसे नेले आहेती. तरी जाले ते जाले. याउपरी तसवीस लागो देणार नाहीं. १ शाहारामधे दिवाण लोक कामे करवितातीं त्याची मशाखत देत नाही. तरी ताकीद करून मशाखत देववून १ दारी एक दोन माड आहेती. साहेबीबदल मामुरी देणे माफ केले पाहिजे. तरी येक साला देणे माफ. १ वेट बेगार रायगड, खादरी, कुलाबा, सागरगड, पदमदुर्ग हे आमच्याने करवत नाही. तरी शाहाराखेरीज दुसरे जागा तुम्हा कोन्हास पाठवणार नाहीं. १ शाहारातील आम्ही सोनार मुलकात फिरावयास जातो. भलताच किलेकरी व नामजाद लोकामधेच धरून, घासदपट करितो, कांही दाणादुणा रुका अडका असतो तो घेऊन जातो. ते माफ पाहिजे. तरी दरम्याने तसवीस लावील त्याचे ठावठिकाण हुजूरेच ठाईं पाडूं. मामलास येणे पारपत्य होईल. १ आम्ही शाहारात मामूर जालियाने वस्ती करून उदीम चाले ते माफीक खंडणी पाहिजे. तर बहुत बरे. येण्हेचप्रमाणे. चालऊन. येण्हेप्रमाणें कौल असे येण्हेप्रमाणेच हुजूर राजश्री पंत स्वामीचे सेवेस बखेर सुभास लिहून कोल आणऊन.

शि. च. सा. ९ ले. ७० } (२४०) { श. १६०९ कार्तीक शु. ४
सु. १०८८ मोहरम ३ } कौलनामा { इ. १६८७ आक्टो. ३०

दिवाण मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल—सराफ कसबे चेऊल तुमचे बाबे देसक मामले मजकूर मामला येऊन मालूम केले की सन सीतामधे गनीम राजापूरकर येऊन शाहार जाल हाल करून गेले. ता मजकूरचे सराफ परागदा होऊन जागाजागा गेले. तरी साहेबी सराफावर मेहेरबानी करून मकसूदप्रमाणे कौल दिलिया सराफ शाहारामधे जाऊन ताफा मामूर करितील म्हणोन

कौल. १ उदीम मवाफीक बारमाही उसूल घेऊन साल मजकुरी देणे माफ. १ दिवाणाकडे मामलाकडे कर्ज असत आहे ते हातीं आलियावर उदीम व्यापार करून साहेबाचा ताफा मामुरा करूं. तरी हिसेब मनास आणून साल मजकुरी विल्हे करून देऊं. १ आम्ही पोटाचे दाणे तगाव्यावदल ठेविले होते ते दिवाण लोकानी नेले. तरी बाजे लोकांचे नेले, त्याची विल्हे करून त्याप्रमाणे तुमचीही विल्हे करू. १ घरटका, मीठ, दारमाड याचे देणें याची तसवीस न लाविली पाहिजे. तरी मीठटका घेऊन वरकड साल मजकुरापासून माफ. १ शाहार मामुरी जाहलियावर वस्ती करूं. हर कोण्ही सराफ म्हणोन कर्जवाम उसनपासनें मागेल. तरी कर्ज कोणी नेदावे. दाट जोरे कोणी कर्ज मागेल त्या हुजरून ताकीद करऊंन.

सदरहूप्रमाणें कौल असे. सुखे शाहारात घरे बांधोन वसाहती करणें. येणेंप्रमाणें मकसुदाच्या तालिका हुजूर लिहून राजश्री पंताचा व सुभेदाराचा कौल आणून देऊ.

शि. च. सा. ९ ले. ६९ } (२४१) कौलनामा { श. १६०९ कार्तिक शु. ४ इ. १६८७ आक्टो. ३०

दिवाण मामले मूर्तजाबाद चेऊल—रयती मोख्तसर बागायेत मा। अगर चेऊल

तुमचे बाबे मामले मारचे देशमूख मालूम केले की, सन सीतामधे गनीम राजापूरकर येऊन शहर बालहाल करून गेले. याकरतां कुल रयत परागदा जाहाली. शाहर दोन बरसे खराब पडिले, वसाहत नाहीं. राहट, राहटबल व घरे व देउलें मोडून गेली. तरी अजी ता। वसूल जाला तो जाहाला, बाकी उरला त्याची तसवीस लागणार नाही. पेस्तर साली पाहणी करून होईल. बेरीज ते सालपावेतो वसूल घेऊन जागा नाही त्यास कर्ज, बैल नाही त्यास बैल देविला पाहिजे तर मवसर मनास आणून तुमचा आज्ञा पाहून देऊन; इत्यादि २३ कलमें.

शि. च. सा. २ ले. ३०७ शक प्रभव संव. } (२४२) { श. १६०९ कार्तिक शु. ५ इ. १६८७ आक्टो. ३१

आपाजीभट भाष्य—त्रिंबकभट व कृष्णभट धर्मांतकारणी मौजे पिंपलई साकीन का। नाशीक

फारखती लेहोण दिधली जे, तुम्ही पाच जन भाऊ मिलोन आपणापासी खेडी गाहाण ठेविली होती. रु. १५० घातले होते. त्यास गाव बिल-

देवी, राजूर, कामतवाडे येसे ठेविली होती. त्यास तुमचे भाऊ त्र्यंबकभट व कृस्णभट, मोरेस्वरभट व अनंतभट व बालभट याचा जनाऱ्या नांवाचा रोखा आपणापासी होता तो गयाल जाला. तुम्ही आपणास रु. वसूल केले— तपसील त्रिंबकभट १००, कृस्णभट रु. ५० सेदिढे भरून पावलो. त्यास तुमची खेडी तुमचे हवाला केली. कालकला रोखा पत्र निघाला तो रद असे. सही बा। शंकराजी नागनाथ कुलकर्णी.

राम. दासी ४२ ले. ४६ } (२४३) { श. १६०९ मार्ग. शु. १३
सु. १०८८ सफर १० } { इ. १६८७ डिसें. ६

दोंजान चेल जनराल इंग्रेजात— माहाराज राजश्री संभाजी राजे छत्रपती
हिंदुस्थान मुकाम जंजिरे

आम्ही खैर आहों पण आपलेकडील चंदरोज गुजरले पत्र आले नाहीं. पंडित नीलकंठ मोरेश्वर प्रधान यानी कलमी केले की, 'हबसी गनीम खाडीतून येऊन आमचा मुलूक मारतो. आणि तुम्हामध्ये व महाराजामधें कदीम दोस्ती त्यावरी नजर देऊन दर्यामधे खाडी राखोन गनीम पेस होऊन द्यावा.' आणि पंडित त्रिंबक गोपाल हेजीब पाठविले. तह केला की, 'तुम्हास खर्च बसेल त्यास आम्ही आपल्या मुलकातून ५० ह. रु. नख्त आणि १ ह. मुडे मुंबईप्रमाणे भात देऊन. तरी तुम्ही दर्यामधे खाडी राखा. आम्ही खुशकीवरी मजबुदी करून खुशकी राखोन.' ह्याप्रमाणें आम्ही कबूल केले व बडे ज्याहाज व बोटी गलबते आरमार पाठवून खाडी बंद ऐसा केला गनीम फाचकले पावेना. आणि छत्रपतीचे लोकानी खुशकी राखावी ते मोकलीच टाकिली. आज तीन महिणे जाहाले. आमचे लोक सिकस्ता हैरान परेशान होऊन कितीएक जखमी होऊन पडले. कितीयेक गनिमाचे लोक पडले. खर्चास देऊ केले ते पोहचविले नाहीं. आमचे लोकाचे अडिसेरी यास भात देविले होते तेहि सेभर मुडे पावले. वरकड काही पोहचत नाही आतां हानीचा जाब येई तोवरी १५ रोज पावेतो राखो. मग खर्चास पावले नाही. लोकास अडिसेरी भात पावे आणि इंगरेज लोकाचा खर्च बेमबलग. याबद्दल आम्हास लोकाचे मुशारेखेरीज २० ह. असर्फी खर्च जाहाला आहे. आणि पुढेहि किती म्हणून करावा. १५ रोजांत जाब आला तरी खूब; नाही तरी आम्ही आपले आरमार बोलावून आणून. मोहिबा बोलतील की, पैकियावरी नजर देता. तरी तैसे नाही. आधी मोहिबाचा लोकासी पहिले काम पडिले आहे; बोलाचा भरवसा नाही. शमा दोस्तीवर नजर देऊन आजीलग या कामाची शर्ती केली. मालूम होणे ज्यादा काय लिहिणे हे कितावत.

रा. खं. १५ ले. ४२२ } (२४४) { श. १६०९ पौष शु. ७
सु. १०८८ रबल ५ } { इ. १६८७ डिसें. ३०

कृष्णाजी राजे भोसले—कारकून, नाटेवार, रयान व कुलकर्णी
संमत मा।र

वे. रामेश्वरभट बालभट उपाध्ये आरवीकर यासी पुष्य शुध सप्तमी शुक्रवार मकरसंक्राती पर्वकाली सर्वमान्य भूदान धारादत केले नजिकाणी १ दिघली तरी सदरहू जमीन मौजे मलेनूर सा। मजकूर बा। इनाम रतनतिमला लग पैकी कुळबाब कुल कानुची दुमाले करणें 'दानपालनयो०' व 'स्वदत्ता द्विगुणं०' हे दोन श्लोक.

रा.खं. १८ ले.३० } (२४५) { श. १६०९ (ज्येष्ठ)
सु. १०९७ } { इ. १६८७

तुमार जमा पेशकशी मुतालब बार जमे देशमुख व रामचंद्र बाबाजी देसपांडिये पा। पुणे सा। जुनर सुभे अवरंगाबाद अज बा। रसूल बहतफाक शंकराजी कृष्ण गुमास्ते आऊजी कान्हो नाईक रकूयत पन्हा मिर्जा मुकुरला बेग बा। परवाना पो इा। अवल साल ता। अखेर साल अज देह २९० पैकी वइरान मुतलक देह, आबाद देह, मोकरा साल तमाम जमा बेरीज रुपये ३६२॥

रा खं.१८ ले.३२ } (२४६) { श. १६०९
(सु.) फ. १०९७ } { इ. १६८७

हकीकत देह झाडा देहाय पा। पुणे अज देह २९० पैकी फौजदार याचे तालुक ता। पाटस ४३, ता। नीरथडी ३७, (बाकी देह) २१०. पैकी आबाद जुज जुजी देह हवेली ४०, सांडस ५, कऱ्हेपटार १३, मावल १२=७०. रास देहे १४० बाकीक वइरान ६३.

रा. खं २० ले. २४ } (२४७) { श. १६०९
फ. १०९७ } { इ. १६८७

तसलमात रोखा, सामराज काटे मनसबदार देसमुख व देशपांडे पा। सुपे. रु. ३०० बाबत महसूल माहाल पायबक सरदार अहमदनगर वगैरे बाबत तहशील, मसीखतपनाह महमद शरीफ करोडी सरकार मजकूर, आपणापासी अनामत आहेत. एकरार केला जे सदरहू रुपये बदल खजाना अमरे सुबे अवरंगाबाद करून वमोहर, मदसवियान खजाने आणून करोडियास देऊन.

रा खं. २० ले. २३ } (२४८) { श. १६०९
फ. १०९७ } { इ. १६८७

तुमार बरदास्ती बजोर ताजदी देहाय पा। सुपे सा। जुनार महाल पायबाकी खालीसे शरीफे रफायतपनाह हणमंतराऊ ठाणेदार ता। बारामती पा। मजकूर याने बजोर ताजदीने धरून नेऊन पैके घेतले बमारुफाती मा। हा। रु. १२७३ इ.

रा. खं. २० ले. २५ } (२४९) { श. १६०९
फ. १०९७ } { इ. १६८७

तुमार बरदास्ती बजोर ताजदी देहाय पा। सुपे सा। जुनर खालीसे शरीफे माहाल पायबाकी कारणे तहवर दस्त गाहा एकबलमनाह काकडखान फौजदार पा। पुणे सा। मजकूर याने बजोह ताजदी करून नेऊन पैके घेतलें तहसील बमारुफाती शिवाजी शेडगे मु।। लोणी गु।। माहाले रु. २०७४।= वसूल गांवे ९.

खं. २१ ले. ४५ } (२५०) { श. १६०९ पौष शुद्ध १४
सु. १०८८ रवल १२ } { इ. १६८८ जानेवारी ६

प्रल्हाद निराजी न्यायाधीश—गंगाजी दादाजी सुभेदार व कारकून प्रांत राजापूर.

ता। देवरूख येथील देशमुखीचा वेव्हार तिमाजी ना। कान्होबा ना। देशमूख यामध्यें व रामाजी गोविंद यामध्यें वेव्हार लागोन हुजुर भांडत आले. छंदोगामात्य याही मनास आणोन निर्वाह केला कीं, रा. छ. स्वामीचा तह कीं ज्याचे वृत्तीस ३०।३५ वर्षे भोगवटा चालला असेल तोच खरा. तरी तिमाजी ना। खरा. रामाजी गोविंद नवाच कथला करतो. त्यास कथळा करावयास समंध नाहीं.

खं. २१ ले. ४६ } (२५१) { श. १६०९ पौष वद्य १
सु. १०८८ रवल १४ } { इ. १६८८ जाने. ८

कविकलश छंदोगामात्य—गंगाजी दादाजी सुभेदार व कारकून प्रांत राजापूर

(ले. ४५ प्रमाणें) तिमाजी व रामजी यांतील वृत्तीचा कथला प्रल्हादपंत न्यायाधीश यांस चौकसीनें मनास आणून निवाडा करण्यास सांगितला. त्याणी तिमाजीसच वृत्तीचा संबंध; रामाजीस निसबत नाहीं ऐसा निर्वाह केला व पत्र पाठविले. त्याप्रमाणे वर्तणूक करणे. पो। १० रवर (माघ शु. १२ फेब्रु. ३)

खं. १५ ले. १५१
सु. १०८८ रवल १७ } (२५२) { श. १६०९ पौष व. ४
इ. १६८८ जाने. ११

खेमाजी घोरपडे मोकदम मौजे—ती. रा. आनंदगिरी बावा
सायगांऊ ता मेढे सुभा जावली स्वामी

स्वामीचे अणछत्र आपले वडिलाचे संकल्प आहे जे, प्रतीवसी बारीक भात ८१ देवावे ते आपणापासून राहिले तरी मठी अणून देत जाणाईन हे आपले व तुमचे इनाम.

इ. वृ. १८३८ पृ. १३१
शक प्रभव. भानुवासर } (२५३) { श. १६०९ पौष वद्य ३०
इ. १६८८ जाने. २२

शहाजीराजे यांची स्त्री—बाळंभट आरवीकर उपाध्ये
नरसाबाई

अर्धोदय महापर्वनिमित्त परमेश्वरप्रीत्यर्थ तोरपाडी हें पूर्व नांव प्रस्तुत नांव नरसांबपूर ता तायेनूर पा वेंटवाल प्रांत त्रिणामल सहित ण्योदक धारादत्तं अग्रहार दान दिले. या गांवी क्षेत्रे केली २३ त्यामध्ये तुम्हांस येक क्षेत्र न(ज)जीपुजी व तोप व झाडझाडोरा व सुवर्ण अदाये व धान्य अदावे अक्षणी आगामी सिद्धीसाध्य अस्ट भोग तेजसाम या सकळ समुदाय-सहित दिले पुत्रपौत्र पारंपर्य आचंद्रार्क सर्वमान्य फल भोगवटा घेऊन सुखी असिले पाहिजे. दानपालनयो० इ. ३ श्लोक.

सनदापत्रें पृ. १६५ ले. ७
शक प्रभव
सु. १०८८ } (२५४) { श. १६०९ पौष वद्य ३०
इ. १६८८ जाने. २२

हरजी राजे महाडीक चंदी—श्रीनिवासाचार्य नरहराचार्य
पैठणकर.

महोदय पर्वकाळी मौ. अकंडनेलूर तर्फ अयूर परगणे त्रिकोव्ळीर, सरकार त्रिणामल प्रांत कर्नाटक हागांव कुल बाब कुल कानु जंची व पुंजी हलीपटी व पेस्तदपट्टी. चालवावें. मोगलाई तर्फेनेही पत्रें करून देऊन वंशपरं-परेनें चालविले पाहिजे. म्हणून तुम्ही विनंति केली.

राम. दासी ४२ ले. ४८
सु. १०८९ } (२५५) { श. १६१० माघ वा ४
इ. १६८९ जाने. २९

राजकोट किले दिवाण सरकार—खोत, पाटेल व मोकदम,
ता श्रीगांव.

आपाजी महादाजी अधिकारी प्रां। मजकूर यांस ताजिमा पावत असतां दरम्यान तानदरिया बिन लखमतरिया हरकत करतो, देत नाहीं. लखमा धरमा देत असे आणि ताना मजकूर हरकत करितो. तरि ताकीद करून ज्या मोजीब पेश अजी देत आला. त्या मोजीब देत जाणे. हरकत करील तर हुजूर पाठवून देणें.

रामदासी ४२ ले. ४७ } (२५६) { श. १६०९ माघ शु. ८
सु. १०८८ रबर ६ } { इ. १६८८ जाने. ३०

येसजी फर्जंद—मख्तसर खोतु रामाजी भानोबा इ. समस्त मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल

रामाजी महादेव हवालदार सर देशमुखी प्रां। मजकूर यानी सांगितलें कीं, कुळ रयेती लोकावरी ज्याजती मुरड घातली आहे व कितेक किलेकराची व लस्कराची धामधूम पडली ते दूर केली पाहिजे व जो धारा त्याचो पाहणी करून जमाबंदी होईल तेणेप्रमाणें घेतले पाहिजे. तरी हे अभय पत्र कीं, किलेकोटाची तसवीश लागणार नाहीं. हकहिसाबी जे, तेच घेतील. कोण्हे गोस्टीचा तसवीस व आजार लागणार नाहीं. फिकीर न करणें. गाव वरी येऊन कीर्दी करून सुखरूप राहाणें.

इ. वृ. १८३५ पृ. २१२ } (२५७) { श. १६१० चैत्र शु. १ गुरु.
विभव संवत्सर } { इ. १६८८ मार्च २२

शंभुछत्रपती—धर्माजी नागनाथ मुख्य देशाधिकारी प्रांत मामले फोंडा

सामनायक तिमनायक यानी विनंती केली मुसलमानाच्या राज्यामध्यें तरी अंत्रुजेसी अंगभाडे घेत नव्हतें. तेणेकरून व्यावहारिक लोक सुखे येत. राबगुदी हासिल होय. आतां हे हिंदु राज्य जाहालेपासोन आंगभाडे घेऊं लागले, हासिलासि धका बसला. तरी मना करावे. तें प्रमाण जाणून भाणस्तरी, पारवगवि, मांदुस येथील आंगभाडे दुडुवा अर्ध कोसी, चौदा दुडु घेत ते सोडिले. सहसा धर्मकृत्यास नाश करूं नये. करितील त्यास महापातक आहे.

शि. च. सा. खं. ६ ले. ८० } (२५८) { श. १६१० चैत्र शुा ३
सु. १०८८ जबर १ } { इ. १६८८ मार्च २४

रायाजी सामराज—श्रीनिवास वेंकटाद्री देसाई पा गदग, व नाडगौडा किले बादावी

येखतयारखान सौदागार पा मजकुरी राहात आहे. त्याने घोडियाचे खरिदीबदल मस्कत बंदरास गेला होता. घोडे खरेदी करून राजापूर बंदरास आले. तेथे दिवाण लोकी अगदी चाहजपैकी ९ घोडे कैद केले. त्यामध्यें आमचे स्वारीस घोडे आणावयास सांगितले होते. तरी स्वामीने रा. बाबा स्वामीस विनंती करून सदरहू घोडी येतसारखे केले पाहिजे. म्हणऊन हणमंत-राऊ हेजीब लक्ष्मेश्वरकर याने बाबा स्वामीस विनंती केली जें, हे सौदागर आमचे यजमानाचा बहुत स्नेहीत. सदरहू घोडियाचे बहुत आगत्य, म्हणून बहुत प्रकारें विनंती करून घेतां कृपाळू होऊन ९ घोडियाचा निर्वाह लक्ष्मे-श्वराकडे करून दिधला आहे. गोसावीयांचे कार्यास अंतर न पडे. परंतु अगोघर हा प्रसंग निवडला आहे.

शि. च. सा. खं. ६ ले. ९ जुलूसवाला ३१ जखर ११	(२५९)	श. १६१० चैत्र शु. १३ इ. १६८८ एप्रील ३

—देशमूख, देशपांडे, मोकदम देशय पा रायेर हुबली

हुजुरून हसबल हुकूम आहादी येथे येऊन बैसले आहेती. यैसियास फौज तयार होऊन येत आहे. तरी तुम्ही रयेत पातशाही आहा. त्यास माकूल करून सांगोन त्याचा आमल फैला तेथे न राहे व जे कोणी हुजूराचा हुकूम घेऊन आले आहेती त्यास आंमल देती येसे माकूल करून सांगणें. जरी हे बात ते खातिरेस ना आणीत तरी त्यांवरी चहूंकडून फौजा तयार होऊन चालिल्या आहेती त्याबा तुम्ही रयेत सलक नाहक लुटिले जाल. बाजे मज-कूर मा जानो पंडित जबानी जाहीर करितां खातिरेस येईल. दिगर त्यांबा जो कोणी शामील होईल त्याचा हाल कांही राहाणार नाहीं.

रा. खं. १७ ले. १८ सु. १०८८ रजब १२	(२६०)	श. १६१० वैशाख शु. १३ इ. १६८८ मे ३

शंकराजी नारायण सचीव—रायाजी तोडकरी हवालदार व कार-कून किले प्रचंडगड

रा. विसाजी माणकेश्वर मुतालीक सबनीस किलेमजकूर याणी विनंती केली की, देवपाल, पालबुा व बालवडी या तिन्ही गावच्या सिवार घेरिया-मध्यें आहे. त्यास गुंजणमावळचे वतनदार कथला करितात. तरी घेराच निर्वाह करून माहालीच्या वतनदारास आज्ञा केली पाहिजे. त्यावरून संताजी सिलिमकर देशमूख व देशकुलकर्णी ता। गुंजणमावळ व माळोजी इतबार-राव सरनाईक घेरा व चाहुजी नाईक देवगिरकर घेरा किले मा।र यांस आणून घेराची हद घातली. (हद तपशील) यावरता घेरा. हदखालतीं जमीन

महालाकडे दिल्ही आहे त्याप्रमाणे घेराची चौकशी करणे. येविसी तर्फ मारच्या देशमूख व देशकुळकर्णी यांसी अलाहिदा आज्ञापत्र सादर केले आहे. या उपरी तेही कथला करणार नाहींत.

शि. च. सा. ३ ले. ६४४
सु. १०८९ साबान ७　　(२६१)　　श. १६१० ज्येष्ठ शु. ८
इ. १६८८ मे २७

कविकलश छंदोगामात्य—तुळाजी देसाई पा शिराले

तुजकडे हा वारणाकडेत पैकी हुजूर दसरी बाकी बोढत आहे. त्यापैकी बदल देणे ऐवज दाणा पागा सरसुभा रा. सेनापती, गला केली नव सेरी सोळुलेमाप खंडी १० रास देविले असत. खुदनिसबतपैकी आदा करून पावलियाचा कागद घेणे. मलकापुरी पागा मारनिलेकडील छावणीस आहे तेथे देणे पा हुजूर.

का. पत्रेयादी ले. ३
शक व फ. १०९८　　(२६२)　　श. १६१० ज्येष्ठ शु. १०
इ. १६८८ मे २९

यादी श्रीमन्महाराज शंभुछत्रपती यांची स्वारी संगमेश्वरमुकामी होती ते समयीं अवरंगजेब पादशहा याची फौज श. १६१० विभव ज्येष्ठ शु॥ १० मंदवासरी येऊन लढाई जाली.

रा. खं. १६ ले. २६
फ. १०९८ साबान १०　　(२६३)
कौलनामा　　श. १६१० ज्येष्ठ शु. ११
इ. १६८८ मे ३०

—संकराजी जुंझारराऊ देशमूख ता॥
कानदखोरे

तुवा बापुजी मोकदम मौजे पाबे मा॥ मा॥ मालूम केले जे, देशमूख मजकूर गणिमाचे ता॥ होता. हाली मुलकांत येउनु आपले ता॥ देहवदेह छावणी करील, मुलूक बसाहती करील आणि हुजूर रुजू होईल. बा॥ मालुमाती कौल सादर केला खातिरजमा राखोन येऊनु आपले तर्फ आबादानी करणे. हुजूर रुजू होणे.

रा. खं. १५ ले. ४२३
रमजान ११ व　　(२६४)　　श. १६१० आषाढ शु. १२
इ. १६८८ जून ३०

कृष्णाजी (गंगाधर) राजे (भोसले)—बालंभट गोसावी
आम्ही सैन्यासी स्वार जालो ते छ १० रोजी पलीपटास पावलो पुढे

मजली दर मजली स्वार होऊन जातो. सैन्यामध्ये खर्चवेचास पाहिजे समयासि न पावे याबदल सांप्रत रु. ५०० चे खत पाठविले खतप्रमाणें पैके अबुल नबी महालदार पाठविला आहे यापासी देऊन पाठवून देणे. जे तेरखेस पैके द्याल ते तेरीख खती घालोन आम्हासहि लेहोन पाठविजे. वाटेतिटेचा विचार पुढे न पावे याकरता जरूर जाणोन खत पाठविले तरी पैके पाठविजे त्याचा अभिमान तुम्हास आहे.

ढेरे अप्र. कागद
सुा १०८९ सवाल २ } (२६५) { श. १६१० श्रावण शुा ३
इ. १६८८ जुलै २०

निळकंठ मोरेस्वर—मेघग्राम (ढेरे) कुळकर्णी

(हा मेघग्राम मौ. पाशाण, भुकूम, भुगाव, कोथरूड व हिंगणे ताा करांती मावळ ह्या पांच गावचा कुलकर्णी.) ह्याजकडे हुजुरून वजाई आली होती त्या बारतीनें परागंदा जाला. ह्याचे बाबे श्रीयाजी सिव प्रभु हवालदार यानी मालूम केलेवरून स्वामीनी कौल सादर केला. कीं तुवा येऊन गांवाची वसाहाती करणे. मेहेरबान होऊन वजाई दूर केली आहे. कोन्हे बाबे शक अंदेशा न धरणें.

शि. च. सा. ६ ले. ४७
सु. १०८९ सवाल ३ } (२६६) कौलनामा { श. १६१० श्रावण शुद्ध ४
इ. १६८८ जुलै २१

रायाजी सामराज—हणमया देसाई व देशकुलकरणी हवेली किले कोपल

तुमचे बाबे रा. गणेश रघुनाथ व राा कासी त्रिमल सबनीस किले बहदुरबंडा येही विनती केली की देसाई मजा साहेबांचे पायासी बहुत येकनिष्ट आहे. साहेबाचे भेटीस येणार आहे. तरी स्वामीचें अभयपत्र देविले पाहिजे. तरी तें पाठविले तुम्ही अनमान न करितां भेटीस येणे.

शि. च. सा. ३ ले. ६४५
सु. १०८९ जिलकाद १५ } (२६७) { श. १६१० भाद्र. वद्य२
इ. १६८८ सप्टें. १

कविकलश छंदोगामात्य—तुळाजी देसाई पाा शिराले

तुजकडे बाबतीकर्ज सरदेशमुखी देऊ आहे. गला खंडी २० पैकी बदल देणे खर्चास मिरबातखान दिलेलखानाचा भाऊ हुजूर आहे त्यास तकदीम होन पाा ४० रास देविले असेत—रवैशप्रो मादा करणे.

रा. खं. १५ ले. ४२४
शक विभव
सु. १०८९ जिल्काद १७

(२६८)

श. १६१० भाद्र. वद्य ४
इ. १६८८ सप्टेंबर ३

कृष्णाजी गंगाधर राजे भोसले—रामेश्वरभट उपाध्ये आरवीकर

आत्मकार्यपरवतसमध्ये तुम्हांपासून कर्ज घेतले मुद्दल नख्त रु. १०० यासी कलांतर दर माहा दर सदे रु. ३ देऊन.

ढेरे अप्रसिद्ध कागद
सु. १०८९ जिलकाद २५

(२६९)

श. १६१० भाद्र. व. १२
इ. १६८८ सप्टें. ११

नीळकंठ मोरेस्वर—मोकदम व रया मौजे भूगाव ता। कर्यांती मावळ

मेघशाम कुळकर्णी घास्ती करतां परागंदा जाहला होता. हली हुजूर येऊन भेटी घेतली. मानिलेस गावावरी पाठविले. तरी याजपासोन, कारभार घेता त्याप्रमाणें हालीहि घेत जाणे. हिला हरकत करील त्याचा हुजूर बोभाट आलियाने उबार राहणार नाहीं.

ढेरे अप्र. कागद
सु. १०८९ जिल्हेज २७

(२७०)

श. १६१० आश्वि. व. १४
इ. १६८८ आक्टो. १३

दिवाण ठाणे का। मावळ—मोकदम भूगांव व बावधण

मेघशाम ढेरे कुलकर्णी याचे कुलकर्ण हुजरून पंत स्वामीनी याचे दुमाला केले असे. तरी तुम्ही येकदिल असोन याचे हाते कुलकर्णाचे काम घेत जाणे. गाव आबादान करून कीर्दी मामुरी करणे. देहाये मजकुरी याची माणसे गुरुढोर वस्तभाव असेल त्यास हिला हरकत करीत नव जाणे. याचा साल दरसाल सांभाळ करीत जाणे.

सा. सं. इ. ले. २०
जुलूस ३२ मोहरम ६

(२७१)

श. १६१० कार्तीक शु. ७
इ. १६८८ आक्टो. २१

दिल्लीकर मोंगल बादशा—बादशाही ताबेदार खेमसावंत

बहादरखान याणी मजालसीत विनती केली जे (छत्र०) संभा खोटा व हरामी याच्या किल्यास व तालुकयास वेढून यत्न प्रयत्न करून अदलखानी तळ कोकणीं ठाणीं स्थापावयास तुम्ही उमेदवार आहां व परगणे कुडालची सर-देशमुखी बहाल व्हावी. तरी तुम्हास ती देशमुखी इनाम दिली. तुम्ही करार केलेप्रमाणें आपले बरवेपणासाठी ठाणी बसवणें व बादशाही फत्ते निशाणी

लष्करास रसद पोचविणें. आणि आरमारी जहाजाने जळमार्गे नीट येण्याकरतां कोकणांत बहुत मेहनत करणें. हेविषयीं हुकूम.

शि. च. सा. ५ ले. ९५८ } (२७२) { श. १६१० कार्तीक शु. १२।१३
शक विभव भृगुवासर } { इ. १६८८ आक्टो. २६

परगणे वाईचे देशकुलकर्ण व गांवकुलकर्ण कसबा देखील खूम, व बावधाण, समत मुऱ्हे व बाजे कुलकर्ण तुमचे वाडवडिलांचे मिरासी पिढीदरपिढी कारकीर्द दर कारकीर्द चालत आहे. दरीवख्त कारकीर्द कमालखान वजीर याचे मुदतीमध्यें थिटे यानी नस्ता कलह आरंभून वतनास खलेल मांडिले. त्यावरी तुमचे वडील गोपाळ लाहिदेव हुजूर जाऊन आपलें वतन सही करून गांवास येतां मार्गी जिवें मारिले. मागती गोपाळपंताचे भाऊ जाऊन नवीं पत्रें घेऊन महालास आले. आतां तरी ज्यास माहाल मिस्तीचें बळ असेल तो तुमच्या वृत्तीची गोष्टी काढील. आम्ही त्या कथळयांत नाहीं. जो कोण्ही आम्हांतील गोष्टी काढीळ तो दिवाणीचा गुन्हेगार व ब्रह्मसभेचा अन्याई. येकाचे वृत्तीस आपली वृत्ति म्हणणें हे ईश्वरास मानत नाही. नीती नव्हे. निर्वंश होईल. कथळा करील तो आमच्या वीर्याचा नव्हे. अनामिकाचे वीर्याचा असे हे पत्र.

शि. च. सा. २ ले. ३०८ } (२७३) { श. १६१० मार्ग. शु. २
सु. १०९८ जुलूस ३२ सफर } { इ. १६८८ नोव्हें. १५

गोपालभट व शंभुदेऊ धर्माधिकारी—
वगैरे जुनारदार कसबे गुलशनाबाद

साहेबाचे बंदगी कतबा लेहोन दिधला की, साहेबी हुकूम फर्माविला की, जेज्या देणे. तरी आपण गवाईसार आहो. सिवाई गवाई भाणखी कसब करीत नाही. सुदामद आम्हास जेजया माफ आहे. यैसियास करार करितो की, दो महिनियाचा वाइदा जालिया हुजूर जाऊन माफीची सनद आणून देउनु. परी वाइदियास सनद आणून न देऊन तरी जेजयाचा जाब करून.

शि. चं. सा. ३ ले. ६४६ } (२७४) { श. १६१० कार्तीक वद्य ९
फ. १०९९ मोहरम २२ } { इ. १६८८ नोव्हें. १८

का। इंदापूर येथे पेठ वहीद व असारी कदीम त्यांची यादी
सराफ, सोनार, तेली, दरजी, नवे व जुने
३–९; १–२; ६–९; २–०.

शां. सं. इ. ले. २१ } (२७५) { श. १६१० पौष शु. ३
जुलूस ३२ रवल १ } { इ. १६८८ डिसें. १५

बहादरखान अमीर अळमगीर—देशख देशडे, रयत, कमाविसदार परगणे कुडाळ

खेम सावंत हे थोर, तरवारबहादर, दैवाचे पांच ह. जातीस ४ ह. स्वार मुलाची मनसब २ ह. व १ ह. स्वारानिशी दरबारची चाकरीस आहे. सर्फराजी होऊन परगणे मजकूर व जहागीर करार जहाला. देत जाणे. जहागीरदार याचे रजातळबेत वागणे. रयतेस रजावंत ठेऊन लावणी करवून आबादानी राखणें. सरकारकून यास ताकीद.

शि. च. सा. १ व ३ } (२७६) { श. १६१० पौष शु. ११
ले. ९१ व ४०३ } { इ. १६८८ डिसें. २३
फ. १०९८ रवल ९ }

महजर पा। वांई सुभा दारुळ जफर. मनाजी शंकर नीलकंठराव याचा इनाम व आंबराई (चांमिली, किकवी, जेजोरी, नारायणपूर,) निजामनमुल्क, अदिलखान, सिवाजी भोसले, मिर्जाराजा, बाजी दिवाण घोरपडे जागीरदार यांच्या सनदा होत्या. यैसियास नफर मजकूर गनिमाकडे होता. त्यास नाहारखान गोरी इही कौल देऊन आणिला. सिरवळास आला, मागून कबिला आणविला. वाटेस आसवलीचे वाटे गनिमानें कुल बिसाती लुटून नेली त्यात सनदा गेल्या. यैसियास भोगवट्याचे गोही गावगनाचे मोकदम व बाजे लोक यांनी दिलो हा महजर सही.

शि. च. सा. ९ ले. ९७ } (२७७) { श. १६१०
{ इ. १६८८

कवींद्र गोसावी—चि. रा. विसाजी कुमदेऊ सुभेदार ता चेऊल

आपाजी ताउजी व तथा बाळाजी ताऊजी हे दोघे बंधु देसाई देसकुळकर्णी मामले चेऊल हे बहुत दिवस झगडतात. त्यामध्यें बाळाजी ताऊजी हा जोरावरी करितो. तरी उभेयेतास किले रायेगडी पाठवणे. त्याचा न्येये सरकारकून व आम्ही मिळोन करून. तरी बहुत सिताबीने रवाना करणें. येक घडीचा उजूर न करणे.

रा. खं. १७ ले. १९ } (२७८) { श. १६१०
सु. १०८९ (९९ !) } अभयपत्र { इ. १६८८

शंकराजी पंडित सचीव—संताजी विठोजी हैबतराव सिलिंबकर देशमूख ता गुंजणमावळ

तुम्ही हुजूर येऊन पाली बुद्रुक तर्फ मजकूर आपले इसाफतीचा गांव कास जमीन जुमला खंडी १५ पैकीं दिवाणांत ११. याकरता रा. कै. स्वामीनें मुबदला खालसा जमीन बोराळे (३८।।) व तांभाड (११।) येथील देविले. त्यास मनास आणिता पालीखुा येथील जमीन दिवाणीच्या बागाखाले व प्रचंडगडच्या घेरियाकडे बाद पडोन जमीन बाकी राहिली ती देसमुखाकडे करार. किलाचा घेरियाकडे व दिवाणीच्या बागाकडे जमीन आहे त्याचा मुबादला तुम्हांस मौजे तांभाड ताा मा।र कामथ कास खंडी ४ व धुरगवडापासून वरते कास खंडी ७। एणेप्रो ११। खंडी सरसनिरस महसूल कुलबाव कुलकानू व बाजे पटिया देखील झाडझाडोरा तुमचे दुमाला केले. मौ. बोराले येथे ३।।। खंडी पाळीचा मुबदला हावजी हैबतराऊ यास देविला तो दूर करून हली पालीस करार केला असे. ऐसियास विठोजी हैबतराऊ याणी हबाजी· राऊ यास आपले तकसिमेपैकी गवंड ताा मा।र येथे देविले याबदल तुम्हाकडे पालीची जमीन ३।।। खंडी करार केली वंशपरंपरा अनुभवणें.

शि. च. सा. ३ ले. ४४६ } (२७९) { श. १६१०
इ. १६८८

शक १६१० सन १०८९ सुा या साली संभाजीराजे यासी धरून संगमेश्वराहून नेले. पुढे दोन वर्षे मोगलाई होती भालेराई जाली.

खं. १५ ले. १५२
रा. श. १५ विजय (विभव) } (२८०)
निवी पत्र { श. १६१०
इ. १६८८

तुबाजी वा रतनोजी नाईक + देसमूख —मोकदम खोत व सेटे महाजन
वा माहाभलो अनंत देसकुलकरणी व बाजे खूम तालुकदेहाय
पाा कुडाल पाा मा।र

देहाय मजकुरी आमचे वडिलानी शक १४६३ प्लव संवछरेस एक विल्हे तें जीर्ण म्हणून पहिलेप्रमाणे श. १५२६ क्रोधी संवछरी पुनः करून दिल्हे हाली आमचे कारकीर्दीस सदर साहेबाचे भिसेलीस करून घेतले मग आम्ही करून दिल्हे. ४९ गांवें तेथे जोरी २।।।४।। व गहू ·।।≥। व तुरी ·।।≥। मिळाल्या.

रा. खं. १५ ले. २४
सु. १०८९ विभव
फ. १०९८ } (२८१) { श. १६१०
इ. १६८८

तुळापुरीं तेच वर्षी मुकाम जाहला. मग राजश्री संभाजी राजे द(ह)स्तगत केले. ते सवछर जाले.

रा. खं. १५ ले. ३४४ } (२८२) { श. १६१०
फ. १०९८ } { इ. १६८८

(पातशा)—बाजी सर्जाराऊ जेधे देशमूख ता। रोहिडखोरे

तुवा हुजूर सिवाजीपंत पाठविला होता त्याणे हकीकत जाहीर केली त्यावरून तुझे इसापतीचे गाव व हक तुझे दुमाले केले व तुम्हा गुमास्ता सिरोली चाकरीस देणे तुवा हुजूर येणे. हुजूर आलिशावरी तुम्हास हजरतीजादे याचा कौल आणून मग तुम्हांबरोबरी भले माणूस देऊन त्याची भेटी करून फर्मान करून देऊ. जरी तू हुजूर न येस तरी गाव दुमाले नाहींत. दिगर बाजी घोलप व बकाजी नावडकर यासी कौल दिधले त्यास बराबरी घेऊन येणे. शक न धरणे. तुम्ही हुजूर न या तरी जे सनद दिवली ते मंजूर नाहीं. तुम्हां नजीक जमाव कितेक होईल ते लेहोनु घेऊन येणे.

शि. च. सा. ९ ले. ७२ } (२८३) { श. १६१०-११
सु. १०८९ } { इ. १६८८-८९

रामाजी सोनाजी आदिकारी मामले चेऊल—सेखजी हुसैन जमुरे वस्ती
माणकाई अयाळ प्रतावजी सोनाजी दादर कसबे चेऊल
मुगताई „ हिराजी प्रतावजी

आपली मिलकत वाडीपैकी तकसिना ११ वजा तकसिमा १० बाकी आपली १ तकसीम टके २०, वाडी दुरभाट आपली तकसीम सातवी १ सदरहू मिळकत आत्मसुखे फरोख्त केली असे. त्या मिळकतीच्या चहु हदासहीत देखील जलस्थल राहाट राहटवट व माड व सुपारी व बाजे हरजिनसी झाडे देखील फरोख्त केली असे. त्याची मिलकतीची चौवचारे किमत बसरी लारी १२५०८ हे रोख पावले. (गोही)

इ. सं. गो. इ. साधनें ले. ७ } (२८४) { श. १६१० पौष व. १२
जुलूस ३२ रबिलोवल २५ } { इ. १६८९ जाने. ८

—मुत्सद्दी, दे०ख, दे०डे, तपे अंतरूज मामले गोवा

अनंत बिन फट जोतिसी यांच्या वुजुरगापासून पिढी दर पिढी मिरास सरजोतीस भोगवटा चालिला आहे त्याप्रमाणें हक रुसूम अंतरुज पैकी रु. १५० व बाजे मिरास व सरजोतिस हिंदु याचे घरी कसबे फोंडा दर गावी व बाजे तपें हाय मोकरर करून देविले असे. तरी अवलाद अफलाद चालवणें.

रा. खं. १८ ले. ३३ }　(२८५)　{ श. १६१० माघ शु. ३
फ. १०९८ रवर १ }　　{ इ. १६८९ जाने. १३

—मोकदम मौजे चिंचवड ता हवेली प्रा पुणे

कारणे साहेबाचे वंदगीस कतबा लेहोन दिधला ऐसा जे, साहेबी हुजूर बोला-ऊन खंडणीची रजा फर्माविली कीं जमाबंदी निश्चित करणे. तरी आपले बाबे अंताजी राम गुा रामचंद्र बाबाजी देशपांडे प्रा पुणे याणी दुकळे रयतीचा हालहवाल जाहीर केला जे—सन हजार १०९६ (श.१६०८=इ.१६८६) अखेर साली दुकाळ पडिला याकरिता रयती कुल मेली, कांहीं परागंदा जाली, मिरासदार कुळ कोणी नाही, उपरी पाऱ्ही रोड दुबळी कुळे मेळवून कीर्दी केलि यास उंदिरानी कुळी सेते खादली, व लस्कर पायमालीने रयतीचा हाल राहिला नाही. तरी जीवनमाफिक खंडणी केलिया सालमजकुरीची उगवणी करितील—हा हवाल खातिरेसी आणून कुलबाब व कानु, माल व सायर साल तमाम कुलबाब बिलमक्ता खंडणी केली ते कबूल असोन उगवणी करोन मोकरा बेरीज रु. १२५१.

श्रीसां. २ ले. ४२३ }　(२८६)　{ श. १६१० माघ शु.५
विभव बुधवार फ. १०९८ }　　{ इ. १६८९ जाने. १६

पिराजी व सुभानजी देसमुख—सुभानजी माणकोजी इत्न
व दासोजी व नरसोजी देशपांडे　विठोजी कलारे (कराळे)
पा टेभुर्णी　मोकदम मौ नाळगाऊ पा हवेली

महबर लिहून दिधला जे, तुम्हास मौजे सेवरे पा मार तेथील निमे मोकदमी मिरासदारास ठेविले. मिरासदार हाजीर जाहालियावरी निमे मोकदमी त्याचे हवाला करणें. २६॥ चावर पैकी सिव लीवलीनु गुरवीचे १३। चावर तरफ करून दिली. जमीन सकरनिखर वाटून देणें. तुम्हास खुद निम चावर इनाम दिधला तो खाऊन कीर्दी आबादानी करणें.

श्रीसां. २ ले. ४२४ }　(२८७)　{ श. १६१० माघ
फ. १०९८ }　　{ इ. १६८९ जाने.

(लेखक ले. ४२३ प्रो—विशेष नरहरी लुमाजी कुलकर्णी
मौ पिपळ दुठ पा टेभुर्णी सा परंडा

कौलनामा—मौजे सिवरे येथील मोकदमी बरोबर कुळकर्णाहि निमे दिले. कारण मौजा वीस वर्षे वैरान पडला. त्याची जमा परगणियावर मुरली

घालून देता परगणाहि खराब पडला. लावणीचे वख्ती कोणी मोकदम व कुळकर्णी हाजीर नव्हेती. जमाबंदीचे वख्ती देहाये मोकदमास विचारिले वैरान गांवाचा टका तुम्ही देणें. मग वरगतं करून जो टका हिसेब येईल तो देऊन. त्यावरून हकीमे जोर ताकीद केली. मग आम्ही तुमचे गळा पडलो व निमे मोकदमी व कुलकर्ण तुम्हास दिले, व ४ साले ७५, १५०, २२५ व २९३।।।≥ प्रमाणें इस्तावा केला. साळमजकुरी ९५३ तुम्हापासून घेतले.

पे. द. ३१ ले. ४६ } (२८८) { श. १६१० माघ
इ. १६८९ थाने.

विठोजी सिर्के याची भावजय कासीबाई यांस कोतळुक, व मासू हे गांव मोकासा संभाजी राजे यांनीं दिले असतां तेथें सिर्क्यांची पागा होती; दाणेकरी गावगना घाऊन बलात्कारें खल्यावरून दाणे भरून नेत. मौजे मासू हा गाव हरबा देसाई याकडे वाघेरीतीनें खोती हकानें होता. त्यापैकी बावलतुरवटे येथील भातहि एक दोन वेळ नेहले. देसाई व सिर्के यांचे राउतांत कटकट होऊन सिर्क्यांचा रखवालदार धर्मा माहार कवटेकर होता त्यास ठार करून पेंढ्यांत घालून आग दिल्ही. मग देसाई यांनी सिर्क्यांची पागा मोडून टाकली. व संगमेश्वरी संभाजी राजे यांसी सर्व वृत्त सांगून सिर्क्यांकडील मोकासा काढून सरकारांत गांव ठेवले.

सा. पं. इ. ले. १७
शक वर्तमान प्रभव
फ. १०९८ रखर २४ } (२८९) { श. १६१० माघ वद्य १०
इ. १६८९ फेब्रु. ४ सोम.

कानोजी राजे प्रभावळीकर—नारायण प्रभु देसाई प्रा कुडाळ

खेम सावंत जोरावरीने देसकतीचा अधिकार नसतां तुमची वृतभूम खातो. यास मारून काढणेबदल तुम्ही आम्हास तिसरे भाऊ करून तिसरी तक्षीम आमास उभय वर्गी (जोगण प्रभू) दिली. मागतेन तुम्ही तुळापुरी आलेत. तेव्हां स्वारी तुम्हाबरोबर देऊन कोंकणामध्ये रवाना करावे तंव आम्हास हुकूम चंदीस जाण्याचा जाहाला. त्यावरून तुम्ही आपली पत्रे फिराऊन मागितली. लिहिले प्रो कार्य होऊन आले नाहीं. उगेच वतनदारास गुतवावे काय निमित्य. याकरता तुमची पत्रें फिराऊन दिली, आमचेपैकी जोगण प्रभूच्या गुजारतीनें मणेरीचे मुकामी दिले ते आम्ही आपला घेतले.

को. इ. सा. के. ९८ पृ. १०९ सां. स. इ. ले. १६ पृ. १६ शक विभवनाम सोमवार	(२९०)	श. १६१० माघ वद्य १० इ. १६८९ फेब्रु. ४

हिज. १०९८ रबर २४ वर्तमान प्रभव

नारायण प्रभु बिन दादाजी प्रभु—रा. मानधाता वलद कानोजी देसाई परगणे कुडाळ मु॥ मणेरी राजे प्रभावळीकर.

प्रगणे मजकूरची देशमुखी आपली व जोगणप्रभु बिन नारायण प्रभूची पुरातन चालत आहे. येसीयासी भोसले याणी मुलुक लुटून खराब केला. हक लवाजमास सेतबाग कुळ बुडाले. बहुत नातवान जहालों. त्यावरी मुलूख पातशाही तरफातीस आला. कीर्दी आबादानीस कुवत नाहीं. आम्ही दोघ वर्गी आपली देशमुखी बिती एकत्रांतून तिसरा विभाग ५ इ. १ बाळावळीखेरीज करून विकिली असे. याकटा भाऊ केले असे. तरी इनाम गांव हकपटी वोवळ तेनाती व नमसी व बागसेत व घरठाव व सेव फसकी व मान पान व बाजे लाजिमा माल व जकाती व बाजेबाबी विभाग खाऊन असावे. नवी बिती दिवाणांतून जे साधून येईल ते त्रिवर्गी बराबर वाटून खावे. आमचे डाईज गोत्रज सकसक करतील त्यास आम्ही वारूं, परगणे मजकुरी गेलियावरी थळच महजर करून देऊन.

ऐ. फा. सा. ३ ले. ३१ जुलूस ३२ जबल ४	(२९१)	श. १६१० फाल्गुन शु. ६ इ. १६८९ फेब्रुवारी १५

कासीमखान—हनुमंत गौडा

तुम्ही सरहद्दीवर खबरदार राहणें ह्या अटीवर तुम्हांस बसवापट्टण सरकारची देशमुखी मुक़रर केली आहे. हा परवाना पोंचतांच तुम्ही आपले १०० स्वार व ५०० प्यादे ह्यांस बसवापट्टणचा किल्लेदार गाझी बेग याजकडे पाठवून त्याच्या बरोबर पादशाही मुलुखांत दक्ष राहावें. स्वारप्यादे पावल्याची रसीद गाझी बेगची यावी. कोणाहि जमीदारास बंड करूं देऊं नये. व रोजच्या रोज वार्ता कळवावी.

शि. च. सा. ३ ले. ५०६ जुलूस ३२ जबल १२	(२९२)	श. १६१० फाल्गुन शु. १५ इ. १६८९ फेब्रु. २३

—जमीदार पाइन घाट (अंतरूज मामले गोवा.)

त्या मुलखाचे जबान कारणे मिर्जा व सैद अल इसलाम पाठविले आहे. दोघास कागदाचा शिरिस्ता व पहिला अमल दाखल करणें.

सरकार मालाचे गीर्दावारी करारवाकी करणें. वाजवी पैका वसूल करणें. तफरका न कीजे. व दिवानी सनद पावले वेगळे कोणास अमल न दीजे व गैरज सनद अमल दिलेया त्याचा जवाब तुम्हांस करणे लागेल.

रा. खं. १५ ले. ३०१ } विभव } (२९३) { श. १६१० फा व. ३० { इ. १६८९ मार्च ११

औरंगजेब पातशहानी संभाजी महाराजास तुळापुरीं अणिलें (धिंड काढली व ठार केले. शाहूनें पुढें त्याची समाधी वढू बुा येथें बांधिली.)

शि. च. सा. ७ पृ. १२० } (२९४) { श. १६११ { इ. १६८९

नगर फते करून तुळापुरी मुकाम जाला ते वख्ती रयेतीचा बरदास्त अबादानीचा हुकूप जमदतुल उमदे वजिराये असदखान आला दिवान अकदस यानि मदारुल माहामीन सफीखान दिवान उर्फ दक्षण यासि हुकूम सादर जाला. त्यावरून देशमूख देशपांडे बोलाउनू हुकुम केला कीं, रयतीची बरदास्त करणे आहे मुलाजमतीस हाजीर करणे त्यावरून तमाम मोकदम मुखालमतीस हाजीर होऊन आवीव अदालती सिरपाव कौलू सरफराजी जाला, ता नवे वमिनीस कौलू....

शि. च. सा. ५ पृ. ७९ } (२९५) { श. १६१० { इ. १६८९

औरंगशाहे पातशाहे देही विजापूर व भागानगर फते करून या प्रांतास आले. पातशहा वढू कोरेगावी येऊन मुकाम केला तेथून लस्कर पाठवून सिवाजीराजे पहिलेच गेले होते त्याचा लेक संभाजीराजे धरून आणिला आणि वढू कोरेगावांत मारिला. मग त्याचा लेक शाहू राजा व बाइका आपल्या जाळीत ठेविली.

रा. खं. १५ ले. १५३ } फ. १०९९ } (२९६) { श. १६११ { इ. १६८९

दताजी केशवजी नाईक देशमूख देशपाडे प्रा वाई } —समस्त मोकदम व शेटे महाजन देहाय समत हवेली, वाघोली, मुरे, जोरखोरे, जांबुळखोरे, निंब, कोरेगांव

श्रीसदानंदगोसावी मठ येथील भंडारा व नंदादीपाबदल तीर्थरूप रा. नरसोजी नाईक यांचें पत्र तें बहुत जीर्ण, म्हणोन आनंदगीर गोसावी

नूतन पत्र करून देणेबदल रदबदल केली. त्यावरून तमाम मोकदम बैसोन पूर्वील सनद मनास आणोन त्याप्रा सनद करून दिल्ही. दर मुकाम लष्कर हजरती जिलसुभानी मोकाम तुलापूर प्रा पुणा. . गावकुडो वृत्ती करून दिल्ही ती पिढी दरपिढी चालवणें हिंदु अगर मुसलमान हरकती करील त्यासी आण असे (४५ गावांची नोंद त्यापुढें गलाकुडोचा आंकडा दिला आहे).

खं. १५ ले. १५४ (२९७) श. १६११ इ. १६८९

ले १५३ प्रमाणें—फक्त नखत टके व गला केलीची नोंद संमत हवेली· तील गांवाची आहे.

ले. १५५ वाघोली पैकी गांवें.

ले. १५६ संमत निंब पैकीं गांवें.

रा. खं. १५ ले. ३ पृ. १६ (२९८) श. १६११ इ. १६८९

(मसूरचे जगदाळे पाटील यांनीं) शिवाजी राजे मृत्य पावले. त्यांचे लेक संभाजीराजे राज्य करूं लागले त्यांस जाऊन भेटोन अर्ज केला कीं, साहेबीं (शहाजी शिवाजी यांनी) कऱ्हाडची देशमुखी घेतली. मसुरीचे तरी देसमुखीचें वतन आपले, आपले दुमाला करणें. बाज गुन्हाई माझें वतन घेऊन माझे तीन खून केले आहेत. तरी त्या खुनांचा वांटा तरी मसुरीचे वतन तरी तेवढें दुमाला करणें. (संभाजीच्या सांगण्यावरून) कऱ्हाडची नांवगोष्टी काढणार नाहीं ऐसे लेहून मग संभाजीराजे मेहेरवान होऊन मसूरपरगणाची देशमुखी दुमाला करावी ऐसें केलें. काम होऊन यावें तों एसजी फर्जंद याचे हवाला देसमुखी केली. मग त्याचे आर्जव करून मग एसजी फर्जंदानें अर्ज करून देसमुखी दुमाला करविली तों सर्वेच संभाजी· राजा धरून नेला. राजाराम पळोन चंदीस गेला.

छत्रपती संभाजी शकावली

ह्या शकावलींत जधे शकावली, जेधे करिना, विजापूर अदि० चा इतिहास मोडक कृत आवृत्ती, रा० खं. १५ व रा० खं. १८ मधील शकावली, मल्हार रामरावकृत संभाजीबखर, मंडळ त्रै. वर्ष ९ अं. १ मधील शकावली, हिं. बु. स. इत्यादि साधन ग्रंथांतून संभाजी विषयक आलेल्या कालनिर्दिष्ट प्रसंगांची नोंद केली आहे. ह्याच ग्रंथांत पृ.१ ते ९६ मध्यें संभाजीकालीन पत्रांचें जें सारांशानें संकलन व कालानुक्रमानें ग्रथन केलें आहे त्यांतीलहि कांहीं घटना ह्या शकावलींत समाविष्ट करावयास पाहिजेत. परंतु प्रत्यक्ष पत्रेंच साररूपानें व कालक्रमागत अशीं येथेंच दिलीं असल्यामुळें अर्थात् द्विरुक्ति होईल म्हणून त्यांतील गोष्टींचा निर्देश येथें करण्याचें रहित केलें. ह्याच बरोबर मराठींतीलच अन्य सिद्ध ग्रंथांत आलेले कालदर्शित प्रसंग द्यावयास पाहिजेत पण तेंहि ह्याच कारणामुळें देण्याचें रहित केलें. संभाजी छत्रपतींची कारकीर्द म्हणजे औरंगजेब पातशहाचा दक्षिण-विध्वंसन-कार्याचा पूर्वभाग होय. म्हणजेच पातशहा औरंगजेबाच्या दक्षिणेंतील पहिल्या सहा वर्षांतील कुच-मुकाम व इतर हालचालीहि येथें दर्शित करणें एका दृष्टीनें आवश्यक आहे. पण मला तें अशक्य असल्यामुळें येथें फक्त ह्या गोष्टीचा निर्देश करून खालीं ती शकावली पुढें दिली आहे. ग्रंथ-नाम-संक्षेपाची स्पष्टता वर व ग्रंथप्रारंभीं आलीच आहे.

श. १५७९ हेमलंबी जेष्ठ शुद्ध १२ = इ. १६५७ मे १४ गुरुवारी घ. १० पुरंधरीं संभाजी राजे जन्म शि. च. प्र. पृ. १८, ५६, ५०, ६५.

श. १५८१ भाद्र. वद्य १४ = १६५९ सप्टं. ५ संभाजीची आई सईबाई मृत्यु शि. च. प्र. पृ. १९

श. १५८७ विश्वावसु आषाढ शु. १० = इ. १६६५ जून १२ शिवाजी जयसिंग भेट व तह, संभाजीराजे यास मोगलातर्फे पंचहजारी मिळते. शि. च. प्र. २३; जयसिंग पत्रें जदुनाथ सरकार पृ. ११३

—फाल्गुन शुद्ध ९ सोमवार = १६६६ मार्च ५ शिवाजी व संभाजीराजे औरंगजेबाचे भेटीस गेले. समागमे सर्जाराव जेधे. शि. च. प्र. पृ. २३

श. १५८८ श्रावण वद्य १२ = १६६६ आगष्ट १७ आगरियातून पेटारियात बैसोन (शिवाजी बरोबर संभाजीचें) पलायन शि. च. प्र. पृ. २४

श. १५८८ मार्ग. शु. ५ = १६६६ नोव्हें. २० संभाजी राजे वडील शिवाजी बरोबर राजगडास आले शि. च. प्र. पृ. २४

श. १५८९ कार्तीक वद्य ५ = १६६७ आक्टो. २७. संभाजीराजे शहाजादा शहाअलम यांच्या भेटीस औरंगाबादेस गेले. मोगलासी सला जाला. [रियासतींत १६६८ व उम्र. सं. २० ब्र्न्हाणपुर असें पडलें आहे.] शि. च. प्र. २४.

श. १५९१ सौम्य पौष = १६६९-७० डिसें. जाने. मोंगलाचा व शिवाजीराजे यांचा तह मोडला म्हणून औरंगाबादेहून संभाजी व प्रतापराव, आनंदराव शहाजादियाजवळून राजगडास आले. शि. च. प्र. पृ. २४

श. १५९४ फाल्गून वद्य १३ = १६७३ मार्च ६ आणाजीपंती भेदेकरून पनाला घेतला. कोंडाजी फर्जंद याजबरोबर ६० लोक दिले होते. संभाजीचें वास्तव्य पन्हाळगडीं व विजापूरकराशीं शिवाजीचें युद्ध. शि. च. प्र. पृ. २६; रिया उम्र. सं. पृ. २१

श. १५९६ चैत्र-ज्येष्ठ १६७४ एप्रील-जून-संभाजीकडे इंग्रज व्यापारी कंपनीचें काम. उम्र. सं. पृ. २१

माघ वद्य ५ गुरुवारी = १६७५ फेब्रु. ४ संभाजीराजे यांची मुंज जाली. शि. च. प्र. पृ. २५

श. १५९९ पिंगल कार्तीक शुद्ध ६ रविवार = इ. १६७७ आक्टो. २१ संभाजीराजे शृंगारपुरास जाऊन राहिले. उमाजीपंडित पढवावयास असत. शि. च प्र. पृ. २८ व २७०; उम्र. सं. पृ. २१

श. १६०० भाद्रपद वद्य १४ बुधवार = १६७८ सप्टें. ४ संभाजीराजे यास भवानीबाई मुलगी शृंगारपूर येथें जन्म. शि. च. प्र. पृ. २९

—पौष शुद्ध १० = १६७८ डिसें. ३ संभाजीराजे शिवाजीराजे यासी पारखे होऊन परळीगडावरून पळून मोगलाईत दिलेलखानाकडे गेले. तेथें हप्त हजारी घेऊन सन्मान मानून राहिले. शि. च. प्र. पृ. २९; सरदेसाई नोव्हेंबर देतात. उम्र. सं. २१

श. १६०१ सिद्धार्थी वैशाख शुद्ध २ गुरुवार = इ. १६७९ एप्रील २ दिलेरखानानें-संभाजी समागमें आहे-भूपाळगड घेतला. शि. च. प्र. पृ. २९

श. १६०१ मार्ग. व. १४ = १६७९ डिसें. २१. संभाजीराजे मोगलाईतून पळोन पन्हाळगडावर आले. शि. च. प्र. पृ. ३०, हिं. बु. स. पृ. ७१६

पौष वद्य ७ भोमवार = १६८० जाने. १३ शिवाजीराजे व संभाजीराजे ह्यांची पन्हाळ्यास भेट. शि. च. प्र. पृ. ३०

श. १६०२ चैत्र शु. १५ = इ. स. १६८० एप्रिल ३ रायगडावर श्रीशिवाजी मृत्यु शि. च. प्र. ३०

चैत्र वद्य ११ गुरु. = १६८० एप्रिल १५. कारवार बंदरांतील धान्य संभाजीनें आणविलें. वप्र. सं. पृ. २३

वैशाख शु. १ = सन १६८० एप्रिल १९ चे पूर्वी. संभाजी पन्हाळ्यावर. लष्कर संभाजीस जाऊन मिळत आहे. संभाजीनें दाणा रसद बंद केली असून सर्व धान्य पन्हाळ्यास नेण्याचे हुकूम सोडले आहेत. संभाजीचे लोकांकडून कारवार लुटण्याची भीती. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १३

वैशाख शु. २ = इ. स. १६८० एप्रिल २० मोगलाकडून सुरत येथील इंग्रज, डच व पोर्तुगीज यांस उपद्रव. सर्व रयतेप्रमाणें इंग्रजांनाही ३½ टक्के कर द्यावा लागत आहे. त्यामुळें वार्षिक २०,००० चें त्यांचें नुकसान होऊं लागलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १३

वैशाख शु. ३ = १६८० एप्रिल २१ आनाजीपंत सुरनीस सचीव यांनी राजारामास मंचकारोहण करून संभाजी राजे यास कैद करावे असा तह करून मोरोपंत पेशवे यांसह पन्हाळ्यावर चालोन गेले [शि. च. प्र. पृ. ३०]

वैशाख शु. ४ = १६८० एप्रिल २२=हि. १०९१ रबर २ मसऊदखानानें व्यंकटाद्रीस बंधमुक्त केले. [विजा. इ. मोडक पृ. २५९]

वैशाख शु. ८ = १६८० एप्रिल २६ चें पूर्वी. देश संभाजीचा झाला. सर्व सुभेदारांनीं संभाजीस पन्हाळ्यास येऊन हिशेब द्यावे असे हुकूम रावजी पंडिताकरवीं रवाना. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

वैशाख शु. ९ = इ. १६८० एप्रिल २७ संभाजीनें राज्यपद

धारण करून राजा म्हणवूं लागला. त्यानें सर्व हवालदार व सुभेदार यांस बोलावून घेतलें आणि कांहींना त्यानें कैद केलें आणि कांहिंना कामावरून दूर केलें. राजापूरला नवीन सुभेदार नेमला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

श. १६०२ वैशाख शु. १० = इ. १६८० एप्रील २८ चे पूर्वी. सध्यां सर्वत्र स्थिरस्थावर होत आहे. संभाजी पन्हाळ्यावर होता. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४.

वैशाख शु. १५ = इ. १६८० मे ३ चे पूर्वी. संभाजी राजा म्हणून जाहीर झालें. मोरोपंत व अनाजी दत्तो वगैरे पन्हाळ्यास हुकुमासाठीं गेल्याची खबर. राजाराम रायरीवर. सर्व हवालदार व सुभेदार वगैरे कामावर रुजू झाले. बदल नाहीं (!) त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

वैशाख वद्य ३ = १६८० मे ६ गुरुवार. राजाराम छ. यांस सर्वांनीं विचार करून मंचकारूढ करून कारभार चालविला सं. बखर पृ. ५ आवृत्ती १९१५ साने. रा. खं. १५ ले. ३०१

वैशाख व. ४ = स. १६८० मे ७—पोर्तुगीजांचें संभाजीशीं सख्यत्वाचें बोलणें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

वैशाख व. १३ = इ. १६८० मे १६—रायगडी घराबर झाली. शि. च. प्र. ३०; त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

वैशाख व. ३० ते आषाढ शु. ६ = स. १६८० मे १८ ते जून २२ चे पूर्वी. संभाजी खात्रीपूर्वक पन्हाळ्यावर. त्रै. वर्ष अंक १ पृष्ठ १४

ज्येष्ठ शु. २ ते ज्येष्ठ व. ३० = स. १६८० मे १९ ते जून १६—मोरोपंत व अनाजीपंत व प्रल्हादपंत यांस हंबीररायानें धरून पन्हाळ्यास नेलें. कुल फौज एकत्र होऊन राज्य संभाजी राजे यांस दिल्हें. शि. च. प्र. ३०; त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४.

ज्येष्ठ वद्य १ सह २ = १६८० जून ३ गुरु. = सु. १०८१ जवळ १५ नाडोली (कऱ्हाड) हा गांव मल्हार गोसावी सदाव्रती ह्यांस अग्रहार असतां शिवाजीराजांनीं

(श. १६०२) कांहीं दिवस अमान्य (अमानत) केला होता कारण कीं आपल्या राज्यांत हे रीत नाहीं. पण पुढें शिवाजीनींच पन्हाळ्याहून रायगडास येतां कोरटीस गोसावी भेट झाली व गांव दिला. तोच गांव चालविण्याबद्दल देशाधिकाऱ्यांस छत्रपती संभाजीची आज्ञा. ले. २

आषाढ शुद्ध २ शुक्रवार = १६८० जून १८ संभाजी राजे रायेगडास आले, बंदोबस्त करून राज्य करूं लागले, राजाराम कैदेंत ठेवले. [शि. च. प्र. पृ. ३०; सं. ब. पृ. ५]

आषाढ शु. १० = इ. १६८० जून २६ चे पूर्वी. रायरीस संभाजीकडे इंग्रज वकील बक्षिस मिळविण्यासाठीं रवाना झाले. सर्वत्र स्थीरस्थावर झाल्यानें आणि त्याला फुरसत असल्यामुळें इंग्रजांचें गाऱ्हाणें ऐकलें जाईल अशी समजूत. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

आषाढ शु. ११ = इ. १६८० जून २७—श्रीशिवाजीराजे यांची ४ थी पत्नी पुतळाबाईनें अग्निप्रवेश केला. शि. च. प्र. ५३; त्रै. वर्ष९ अंक १ पृष्ठ १४

आषाढ शु. १४ = इ. १६८० जून ३० चे पूर्वी—संभाजी पन्हाळ्यावर. ५००० लष्कर गोळा केलें असून त्याला दोन महिन्यांचे पगार अगाऊ दिले. त्यांनीं आपले सुभेदार व अधिकारी नेमले. अनाजीचें डोकें मारल्याची मुंबईस बातमी. मोरोपंतावर मेहेरनजर परंतु पूर्ण विश्वास नाहीं. सर्वत्र स्थीरस्थावर होत आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४

आषाढ व. ११ = इ. १६८० जुलै १२ अनाजीची बातमी खोटी असल्याचें वर्तमान. इंग्रज व्यापारी लिहितात कीं संभाजीच्या नांवाची द्वाही फिरली आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १४; उम. सं. २३

(आषाढ व. ११ = इ. १६८० जुलै १२) संभाजी रायरीस राजारामास पूर्वींप्रमाणेंच ममतेनें वागवितो. सर्वत्र चांगलीच स्थीरस्थावर झाली आहे. संभाजीनें राजपद जाहीर केलें. वीस हजार सैन्य जमा केलें आहे. कारण समजत नाहीं; बातमी अशी आहे. कीं तो फार

(इ. १६०२) धूर्ततेनें व काळजीपूर्वक वागत आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

श्रावण शुा ५ = १६८० जुलै २०
संभाजीराजे यांनी मंचकारोहण केलें.
शि. च. प्र. पृ. ३०; सं. बखर सिंहासनारोहण पृ. ५ उग्र. सं. २४

श्रावण वद्य २ = १६८० आगष्ट १. दाभोळेस मोत्याची वृष्टि झाली, शि. च. प्र. पृ. ३१; त्रै. व. ९ अं. १ पृ. १५

श्रावण व. ६ = इ. १६८० आगष्ट ५ मोत्याची वृष्टी रायगडास आणवून संभाजी राजे यांनीं पाहिली. शि. च. प्र. ३१

श्रावण व. ८ = इ. १६८० आगष्ट ७ पूर्वी. बहादुरखान मोगलाकडून सुभेदार होऊन आला. दिलेरखान हुजूर गेला. बहादुरखानानें अहिवंतास वेढा घातला. मराठे चांगल्याप्रकारें तो लढवित आहेत. दिलेरखान परत गेला. त्रै. वर्ष. ९ अंक १ पृष्ठ १५; शि. च. प्र. पृ. ३०; उग्र. पृ. ४२

भाद्रपद शु. ६ = इ. १६८० आगस्ट २० पूर्वी—संभाजीराजे बहादुरखानाशी पावसाळ्यानंतर उघड लढाई देण्याची तयारी करीत असून बहादुरास त्यानें तसें कळविलें असल्याची बातमी. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

भाद्रपद—आश्वीन = इ. १६८० सप्टेंबर—एका काळोखी रात्री संभाजीचे २०० लोक उंदेरीवर उतरले. परंतु चाहूल लागल्यानें व रस्ता आणि जागा माहित नसल्यानें त्यांतील ८० चीं डोकीं मारली व मुंबईस आणले. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

आश्वीन वद्य १ ते आश्वीन व. ३० = स. १६८० सप्टेंबर २९ ते आक्टोबर १२—मोरोपंत रायगडीं वारले. निळोपंतास मुक्त करून पेशवाई आणि अनाजीस मजमु दिल्ही. शि. च. प्र. पृष्ठ ३०; उग्र. सं. २४; त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

श. १६०२ कार्तीक = इ. १६८० आक्टोबर १३ ते नवें. ११. संभाजीराजे केळशी येथें येऊन बाबा याकूद फकीर यांचें दर्शन घेतलें; तेथें आठ दिवस वास्तव्य. शं. बखर पृ. ७

कार्तिक शु. ७ = इ. १६८० आक्टोबर १९ केळशीस स्वारी झाली. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

कार्तिक शु. १३ = इ. १६८० आक्टोबर २५ संभाजीराजे रायगडास गेले. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ ५

—पूर्वी. मुंबईकरांनीं पाठविलेल्या वकिलांना, शिद्यास मुंबईत राहूं देतां व दारुगोळा पुरवितां आणि हें शिवाजीच्या तहाविरुद्ध असल्यानें, बक्षिस न देतां परत धाडलें. शिद्दीला बाहेर काढून न लावलें व त्याला माणसें मिळण्याची बंद न केली तर त्यांचेवर शस्त्र धरण्यास लागून दिलेली रक्कमहि परत द्यावी लागेल असें सांगून पाठविलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

कार्तिक व. १४ = इ. १६८० नवंबर १० संभाजीची एक सेना व स्वार सुरतेला गेल्याची, दुसरी बऱ्हाणपूरवर चालल्याची व तिसरी बहादुरखानाला गुंतवण्यास निघालेली आहे अशी बातमी चोरट्यास होती. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १५

मार्ग. = इ. १६८० नवं. डिसें. आनाजीपंतास सोडिले व मजमू दिल्ही. त्यास बऱ्हाणपूर येथें हंबिरराव याणी मारिला. शि. च. प्र. पृ. ३१

मार्गशीर्ष शु. ९ = इ. १६८० नवंबर २० मोरो पंडिताच्या हाताखालचा विश्वासू सरदार व सेनापति मुंबईत २० रोजीं गेला असून त्यांनीं शिद्याच्या विरुद्ध तक्रारीचें संभाजीचें पत्र आणलें आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६

मार्गशीर्ष व. २ = इ. १६८० नवंबर २७ पूर्वी—संभाजीचें आरमार वाटेल तसा धुडगूस घालीत आहे. त्यांत ६० गलबतें, ५००० सैन्य आहे व ५००० माणूस किनाऱ्यावर ठेवलें आहे अशी बातमी. त्रै. वर्ष ९ अंक १ पृ. १६

श. १६०२ मार्गशीर्ष व. ४ = इ. १६८० नवंबर २९–बहादुरखानाच्या आगमनानें मराठ्यापासूनचा इंग्रजांस होणारा ताप कमी झाला. त्रै. वर्ष ९ पृष्ठ १ अंक १६

—मार्गशीर्ष व. ६ = स. १६८० डिसेंबर १ मराठ्यांचा तगादा सुटल्यानें मुंबईच्या प्रांतात शांतता झाली. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६

पौष = इ.१६८०–८१ डिसें.१२ ते जाने. ९ संभाजीराजे यांनी रघुनाथ नारायण.(हणमंते) यांस चंदी येथें कैद करविलें. हरजी राजे माहाडीक व शामजी नाईक पुंडे यांस कर्णाटकचा कारभार सांगितला. शि. च. प्र. पृ. ३०, ३१; त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६; उग्र. सं. पृष्ठ ३४

पौष वद्य ७ = १६८१ जाने. १ बाप औरंगजेब यास पदच्युत केल्याचा व स्वतः त्याचा पुत्र जो अकबर यानें तख्तनशीन झाल्याचा जाहीरनामा काढून बापास कैद करण्याकरतां अजमीरवर चाल केली. अजमीर येथें औरंगजेब होता. उग्र. सं. पृ. २६

पौष व. १२ = इ. १६८१ जानेवारी ६–जिंजी, कुडालूर कोमिनेर व पोर्टोनोव्हो येथील व्यापारी परवान्याबद्दल इंग्रजांची छ. संभाजीकडे मागणी करण्याचा ठराव. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६

पौष व. १४ = इ. १६८१ जानेवारी ८ पूर्वी. दोन दिवसां पूर्वीची सेंट जॉर्जला खबर कीं, संभाजीस तुकडे तुकडे करून सरदारांनी मारिलें. शिवाजीच्या धाकट्या मुलास राज्यावर बसविलें. संभाजी व शिवाजीच्या धाकट्या भावानें रघुनाथ पंडितास धरून शृंखला घातल्या. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६

माघ शु. २ = इ. १६८१ जानेवारी ११. पोर्टोनोव्होला गोपाळ दादाजी हाच सुभेदार राहिला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६

माघ शुा ७ = १६८१ जाने. १६ अजमीर येथें औरंगजेब व त्याचा पुत्र अकबर यांचे युद्ध. अकबर पराभूत बरोबर दुर्गादास उग्र. सं. पृ. २७

—रविवार. संभाजी रायगडावर राज्याभिषेक होऊन सिंव्हासनस्थ झाले. विनायक–शांति, पुरंदर–शांति

(श. १६०२) होऊन १२ तुला केल्या. सं. बखर पृ. ७, ८; खं. १५ ले. ३०१ मध्यें शु. १० आहे. [शि. च. प्र. पृ. ३१; उग्र. सं. २४. त्रै. वर्ष ९ अं. १ पृ. १६

फाल्गुन शु. ३ = इ. १६८१ फेब्रुवारी ११ चे पूर्वी. संभाजीच्या सैन्यानें धरणगांव लुटलें. इंग्रजांचेही नुकसान झालें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६.

श. १६०३ दुर्मती चैत्र शुद्ध २ ते चैत्र व. ३० = इ. १६८१ मार्च ११ ते एप्रील ८ संभाजीराजे यानी हरजीराजे माहाडीक व शामजी नाईक पुंडे यास जइतजी काटकर व बादजी कांडे (काकडे) यांस ससैन्य कर्नाटकांत रवाना केले. [शि. च. प्र. पृ. ३१;

चैत्र व. २ = इ. १६८१ मार्च २६ पूर्वी. औरंगजेबानें पैशाच्या टंचाईमुळें सुरतेला मुसलमानांवरहि १½ टके कर बसविला. त्रै. व ९ अंक १ पृष्ठ १६.

ज्येष्ठ शु. २ = इ. १६८१ मे ९ अकबर व दुर्गादास हे संभाजीस मिळण्यासाठीं नर्मदापार झाले उग्र. सं. २७

ज्येष्ठ शु. ४ = इ. १६८१ मे ११ अकबराचें संभाजीस पत्र. हिंदूस बुडवावें, हें औरंगजेबाचें राज्य-धोरण चूक आहे. तुमचें राज्य बादशहाचे मुकामापासून दूर आहे. मजबरोबर दुर्गादास राठोड आहेत. त्यासह आपण सर्व औरंगजेबास पदच्यूत करूं. मजविषयीं निःशंक असा. उग्र. सं. पृ. २७

ज्येष्ठ शु. ९ = स. १६८१ मे १६ चे पूर्वी. पोर्तुगीजानें संभाजीच्या कांहीं लोकांना ठार मारल्यामुळें दमणजवळ मराठयांच्या सैन्यानें त्यांचीं घरें जाळलीं. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १६.

ज्येष्ठ शु. १ ते ज्येष्ठ व. ३० = इ. १६८१ मे ८ ते जून ६ — सुलतान अकबर शहाजादा औरंगजेबावर यागी होऊन रुसून त्रिंबकास आला. त्यास संभाजी राजे यांणीं कोंकणांत पालीस ठाव दिला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १० ज्येष्ठ वद्य १०=जून १; शि. च. प्र. पृ. ३१; उग्र. सं. पृ. २८

आषाढ शु. ५ = इ. १६८१ जून १० चे पूर्वी अकबर पालीस नागोठण्यापासून एका दिवसाच्या रस्त्यावर.

(श. १६०३) त्याच्याजवळ ४०० घोडे व ५० उंट व थोडेसें पायदळ आलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

आषाढ शु. ११ = १६८१ जून १६ संभाजीनें नेताजी पालकर, हिरोजी फर्जंद यांस अकबराचे भेटीस पाठविले. नजरहि पाठविली. उग्र. सं. पृष्ठ २८

आशाढ शु. १२ = इ. १६८१ जून १७. हरजी फर्जंद खलिता व नजराणा घेऊन आला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

आषाढ व. १ = स. १६८१ जून. अकबर पालीस गडाखालीं दुर्गादासाबरोबर. भोंवतालीं संभाजीचें सैन्य ३०० आहे. संभाजी पन्हाळ्यावर. अद्याप भेट नाहीं. आणखी थोडे दिवस लागतील. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

श्रावण शु. ११ = सन १६८१ जुलै १६–अकबराचें सैन्य (१५०० व ५०००) त्रिंबक स्वार इतकें झालें आहे. संभाजी येण्याची रोज बोलवा असते. अशी बातमी आहे कीं, तो २००० स्वारासह अकबराला घेऊन बऱ्हाणपुरावर चालून जाईल. सर्व हिंदुराजे व उमराव तेथें त्यास सामील होतील. तेथून ते दिल्लीवर चालोन जातील. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

श्रावण वद्य ११ रविवार = १६८१ जुलै ३१ औरंगजेबानें अजमशहा–३ रा पुत्र–यास अकबरावर ससैन्य पाठविले. उग्र. सं. २९

श्रावण व. १४ = इ. १६८१ आगष्ट २–सिद्दी संबूळचा मुलगा संभाजीच्या बाजूला मिळण्याच्या उद्देशानें मुंबईस आला. कट उघडकीस येतो. अकबर पत्रें पाठवितो. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

भाद्र. = १६८१ आगष्ट सप्टें. संभाजी राजांनी कवि कलशाच्या सांगण्यावरून आणाजी दतो सचीव, बाळाजी आवजी प्रभु, सोमाजी दतो व हिरोजी फर्जंद यांना परळीजवळ कैद केले व नंतर ठार केले. कर्नाटकांत शामजी नाईक यास कैद शि. च. प्र. पृ. ३१; उग्र. सं. पृ. ३०; त्रै. व. ९ अं. १ पृ. १७

अ. आश्वीन शु. ६ = १६८१ सप्टें. ८ औरंगजेब अजमिराहून मुकाम हलवितो व बऱ्हाणपुरास येतो. [उग्र. सं. १९

(श. १६०३) अ. आश्वीन शु. ६ = इ. १६८१ सप्टेंबर ८ चे पूर्वी संभाजी ३०००० स्वारांनिशीं ब-हाणपुरावर चाल करून जाण्यास तयार असल्याचें अकबरास कळवितो. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

आश्वीन शु. १० = इ. १६८१ आक्टोबर १२ चे पूर्वी संभाजी रायरीवर येतो. विषप्रयोगाच्या कटाची चौकशी करतो. ब-हाणपूरच्या स्वारीची तयारी. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

आश्वीन व. ८ = इ. १६८१ आक्टोबर २४ सिद्दी कासम मोगलाचा आरमारी सेनापती मुंबई बंदरांत आला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

आश्वीन व. ११ = इ. १६८१ आक्टोबर २७ राजारामाची आई सोयराबाई हिचा मृत्यू. संभाजीनें कोणाकडून तरी विष घालून मारलें म्हणून बातमी आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १७

अ. आश्वीन = इ. १६८१ सप्टेंबर = हि. १०९२ रमजान औरंगझेबानें आदिलशाही राज्य काबीज करण्यास दिल्लीहून प्रस्थान उठविलें. विजा. इ. मोडककृत पृ. २६१

कार्तीक शु. ११ = इ. १६८१ नोव्हें. ११ अकबरावर चाल करून येत असलेला त्याचा भाऊ अजमशहा हा औरंगाबादेस येतो. उम्र. सं. पृ. २९

कार्तिक शु. १३ = इ. १६८१ नोव्हेंबर १३ = हि. १०९२ जिल्काद १२ औरंगजेब ब-हाणपुरास येऊन पोहोंचला. विजा. इ. मोडक कृत. पृष्ठ २६५

कार्तीक शु॥ १३ रविवार = इ. १६८१ नोव्हें. १३ संभाजीराजे व अकबर यांची भेट पातशहापूर=धोडसें–(पाली=पातशहापूर. उम्र.) भेट झाली. बरोबर दुर्गादास होता. बहुत सन्मान झाला. ह्याच महिन्यांत अजमशहा = औरंग० चा ३ रा पुत्र औरंगाबादेस आला. शि. च. प्र. पृ. ३१ व ४८; उम्र. सं. पृ. २८ शुद्ध ११

माघ शु. ४ = इ. १६८२ जानेवारी ३–मराठ्यांनीं आपटें जाळलें. त्यामुळें सिद्यानें बराच धुमाकूळ घातला आहे.

(श. १६०३) परंतु संभाजीला त्याचा राग आला व त्यानें दंडाराजपुरीचा नाश करण्यासाठीं सैन्य पाठविलें असून त्या सैन्यानें गेळा पंधरवडा सारखा मारा चालू ठेवला आहे. तट फोडल्यामुळें सिद्दी दगडी टेकडीच्या आश्रयास लपून बसला आहे. पोर्तुगीजाची मदत मागितली असून ती त्यानें नाकारली तर चौलाचा नाश करण्याची भीति घातली आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

माघ व. ६ = इ. १६८२ जानेवारी १९–दंडाराजपुरीवर निकराचा हल्ला चालू आहे. समुद्रावरील खिस्ती सत्ता नाहींशी करण्याचें संभाजीनें ठरविलें आहे. मुंबईकरांना संभाजीच्या सैन्याकडून त्रास पोहोचूं लागला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

माघ वद्य ९ मंदवार = इ. स. १६८२ जाने. २२ रविवार. श्री रामदासस्वामी परळी किल्ल्यावर समाधिस्थ. सं. बखर पृ. ९

माघ ते फाल्गुन = इ. १६८२ जानेवारी. औरंगजेब बऱ्हाणपुरी आला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८.

माघ ते फाल्गुन = इ. १६८२ जानेवारी–हसन अलिखान कल्याण भिवंडी प्रांतांत जाळपोळ करून परत कल्याणास गेला. बरोबर २०००० स्वार व १५००० पायदळ आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८.

फाल्गुन शु. ७ = इ. १६८१ फेब्रुवारी ४ दंडाराजपुरीवर हल्ला चालू आहे. नवाब हसन अलीखानानें घाटावरून येतांना संभाजीची बरींच गांवें जाळलीं व ८–९ पोर्तुगीजांचींहि जाळलीं. संभाजीच्या सैन्याचा व हसनखानाचा झगडा झाला. दंडाराजपुरीचा वेढा उठविला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

फाल्गुन व. १२ = इ. १६८२ फेब्रुवारी २४–रणमस्तखान कल्याणास आला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

श. १६०४–०५ = इ. १६८३–८४ = हि. १०९४–अलमगीर बादशहाची व संभाजीची आलमाजच्या नजीक लढाई होऊन संभाजीस जय मिळाला. अलमगीरकडील बरीच माणसे ठार व जखमी झाली. हुसेनखान पठाण अदिल०

श. १६०४ 　सर्जाखान याच सोडून औरंगजेबास मिळतो. [विजा. इ. मोडक कृत पृ. २६५]

अ. चैत्र वद्य ९ = १६८२ मार्च २२. औरंगजेब औरंगाबादेस येतो. उग्र. सं. पृ. २९

चैत्र = १६८२ मार्च एप्रील–शाबदीखानानें रामसेज किल्यास वेढा घातला. शि. च. प्र. पृ. ३१–३२

चैत्र कर्नाटकांत श्रीरंगपटणकर व हरजी माहाडीक, जइतजी काटकर, दादजी काकडे–हे त्रिचनापलीस मदतीस गेले होते–ह्यांमध्यें भांडण झालें. २ ह. घोडी पाडाव केली, श्रीरंगपटणकरांचा सरदार कुमार हाहि पाडाव केला. [त्रै. व. ९ अं. १ पृ. १८]

चैत्र व. १३ = इ. स. १६८२ एप्रील २५–इंग्रजांचें हंटर नांवाचें आरमारी जहाज मुंबईत आलें. संभाजीचा इंग्रजांस निर्वाणीचा खलिता. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

वैशाख = १६८२ एप्रील मे. रूपाजी भोसले, मानाजी मोरे यांनीं शाबदीखानाशीं गणेशगावाजवळ लढाई देऊन त्याची ५०० घोडी पाडाव केली. शि. च. प्र. पृ. ३२

वैशाख शु. १ = इ. १६८२ एप्रील २८ पूर्वी–अंजदीव बेटे घेण्यास माणसें रवाना झालीं. पोर्तुगीजांनीं ४ गलबतें व २०० लष्कर पाठविलें आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १८

वैशाख शु. ९ = इ. १६८२ मे ५–कोदद अकबर यानें मराठी सैन्यास हांकून लावून अंजदीव घेतलें व मोठ्या समारंभानें किल्याच्या पायाचा दगड बसविला. तेथील हिंदूंचें देवालय पाडून चर्च केलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

वैशाख शु. १२ = इ. १६८२ मे ८–इंग्रजांचे सिद्यास मदत करणें. सिद्याची लुटालूट चालू. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

वैशाख व. ५ = इ. १६८२ मे १६–मायनाईक भंडारी व सिद्दी संबळचा जावई यांचें हाताखालीं १५ गलबतें

(श. १६०४) व ५००० लष्कर देऊन इंग्रजांवर संभाजीनें आरमार पाठविलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

वैशाख वद्य ७ गुरुवार = इ. १६८२ मे १८ संभाजी व येसुबाई यांस गांगोळी येथें शिवाजी = शाहू पुत्रजन्म. सूर्योदयापासून घ. ५४ (दिनमान घ. ३२) शततारका नक्षत्र चरण ३ रास कुंभ. इ. सं. पे. द. स. मा. पृ. १; शि. च. प्र. पृष्ठ ३१

वैशाख व. ११ = इ. १६८२ मे २२–धरणगांवचे आसपास शांतता, औरंगजेब औरंगाबादेस जाला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृ. १९

ज्येष्ठ शु. ७ = इ. १६८२ जून २. गलबतें ४० व इंग्रजी आरमार याशी लढाई. खांदेरीस मराठी आरमार गेलें. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

आषाढ शु. ९ = इ. १६८२ जुलै ३–सिद्दी संबूळच्या मुलाकडे संभाजीच्या आरमाराचा कांहीं भाग असून तो लढत आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

आषाढ व. १ = इ. १६८२ जुलै १०–पावसाळ्यासाठीं औरंगझेब औरंगाबादेस व बहादुरखान नासिक त्रिंबकास तळ देतो. सर्वत्र महागाई (धरणगांव) त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

श्रावण शु. ४ = स. १६८२ जुलै २८–संभाजीनें पोर्तुगीजांचीं जहाजें पकडलीं. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

श्रावण शु. ७ = स. १६८२ जुलै ३०–सर्व बाजूनें संभाजीवर चढाई होत आहे. यांतून संभाजी वांचणें शक्य दिसत नाहीं. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

आषाढ, श्रावण = स. १६८२ जुलै–संभाजीचे ३–४ गड मोगलांकडे गेले. रामसेजही त्यांनी घेतला. हंबीररावास १०,००० पायदळ देऊन पाठविलें. परंतु २००० लोक पाडाव झाले. मराठी सैन्य साताऱ्यास आले. लोकांचे पगारहि थकले आहेत. विजापूरकराला ९ लाख रुपये देऊन मोगलानें मदतीस घेतलें. सर्जाखान वगैरे लोक २० हजार स्वार घेऊन मिरजला आले आहेत. संभाजीनें विजापूरकराकडे वकील पाठवून त्यांची मदत

(श. १६०४) मागितली. परंतु बऱ्याच अटी घालत्यामुळें संभाजीस ती स्वीकारतां आली नाहीं. दादप्रभु बरोबर ४ हजार चांगले निवडक लोक देऊन दंडाराजपुरीवर हल्ला केला; परंतु त्यांत यश नाहीं. जवळ जवळ ५०० लोक वांचले. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

भाद्रपद शु. ६ = इ. १६८२ ऑगस्ट २८–सिद्यानें कुर्ला वगैरे लुटलें. नागोठण्याच्या बाजूलाही लुटालूट करून माणसें धरून नेलीं. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ १९

भाद्रपद शु. ९ = इ. १६८२ आगष्ट ३१–मुलतान तारानें बंड केल्याची बातमी फुटली. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

भाद्रपद शु. १४ = इ. १६८२ सप्टेंबर ५.३०,००० सैन्यानिशी अकबर व संभाजी औरंगजेबावर चालून जाण्याची तयारी करीत आहेत. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

भाद्रपद व. १३ = इ. १६८२ सप्टेंबर १९.२०,००० सैन्यानिशी बहादुरखान औरंगजेबाकडे येत आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

आश्वीन = इ.१६८२ सप्टें.आक्टो.रामसेजेचा शाबदीखानाचा वेढा उठला. शि. च. प्र. पृ. ३२;

आश्वीन शु. १३ = इ. १६८२ आक्टोबर ४–सिद्दी मसूद वारला. सर्जाखानाला पाठविलें. पन्हाळा विजापूरकरांना दिल्याची बातमी आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

आश्वीन शु. १४ = इ. १६८२ आक्टोबर ५–सिद्दी मिस्ति ३० गलबतें घेऊन नागोठण्याच्या बाहेर आला. दौलतखान ८० गलबतांसह नागोठण्यांस आले. सिद्यानें १६ गलबतांनिशी भांडण दिलें. त्यांत मराठ्यांचीं ७ गलबतें सिद्यानें नेली व ४० लोक मारले. परंतु सिद्दी मिस्ती जखम होऊन मेला. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

आश्वीन व. ३० = इ. १६८२ आक्टोबर २०. १२००० स्वार व २०,००० पायदळ यांसह दुर्गादास सुरतेच्या बाजूला कूच करीत आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

(श. १६०४) आश्वीन, कार्तिक = इ. १६८२ ऑक्टोबर. संभाजीचा वकील इंग्रजाकडे मुंबईस होता. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

कार्तिक, मार्गशीर्ष = इ. १६८२ नोव्हेंबर. सिद्यानें लुटालूट चालविली आहे. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

मार्ग. = इ. १६८२ नोव्हें. डिसें. रणमस्तखान कल्याणास आला असतां त्यावर रूपाजी भोसले, केसोपंत व निळोपंत पेशवे रवाना झाले. शि. च. प्र. पृ. ३२; उम. सं. ६०

मार्गशीर्ष शु. ३ = इ. १६८२ नोव्हेंबर २२–बहादुरखान व रणमस्तखान कोंकणांत उतरले. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

मार्गशीर्ष शु. ५ = स. १६८२ नोव्हेंबर २४ रणमस्तखानाचा कल्याणास मुक्काम. त्रै. वर्ष ९ अंक १ पृष्ठ २०

पौष = इ. १६८२ डिसें. १६८३ जाने. रघुनाथ नारायण हणमंते कर्नाटकांतून येऊन संभाजी राजे यास भेटले व त्यांस मुजमू दिल्ही शि. च. प्र. पृ. ३२

माघ = १६८३ जाने. फेब्रु. सुलतान अजमशहा कोल्हापूरपावेतो आला असतां त्यास हंबिररायानीं हटवून भवरे अलिकडे लाविले. शि. च. प्र. पृ. ३२

श. १६०५ = इ. १६८३ औरंगजेब यानीं भागानगरची पातशाही घेऊन बंदोबस्त करून छावणी केली. सं. बखर पृ. १३–१४; ख. १५ ले. ३०१

चैत्र = इ. १६८३ मार्च एप्रील. रोहिलाखान कोलवणातून उतरून गेला व रणमस्तखान घाटावर येऊन गेला. तेव्हां त्याशी रूपाजी भोसले याने तिटोलियाजवळ लढाई केली. पद्मसिंग रजपूत व इतर कित्येक थोर लोक ठार केले. शि. च. प्र. पृ. ३२

वैशाख वद्य ४ बुधवार = १६८३ मे ४. रघुनाथ नारायण हणमंते वलणी येथें मृत्यु पावले. शि. च. प्र. पृ. ३२

ज्येष्ठ वद्य ११ = इ. १६८३ जून १०. संभाजी राजे स्वार होऊन राजापुरास गेले. फिरंगियासीहि विग्राह केला. रेवदंड्यास वेढा घातला. शि. च. प्र. पृ. ३२

(श. १६०५) आषाढ शुा १५ = इ. १६८३ जून २८ जनार्दन नारायण हणमंते यांचा देवरूख येथें मृत्यु शि. च. प्र. पृ. ३१

भाद्रपद व. ३ = इ. १६८३ आगष्ट ३० = हि. १०९४ रमजान १७ सिकंदरबादशहानें मसऊदकडून त्याच्या आग्रहास्तव शपथा घेऊन अदोनीस जाण्यास त्यास परवानगी दिली. विजा. इ. मोडककृत पृ. २६३

आश्वीन = इ. १६८३ सप्टं. आक्टो. अवरंगजेब औरंगाबादेहून अहमदनगरास आला. दिलेरखान विष खाऊन आत्महत्या करतो. शि. च. प्र. पृ. ३२

कार्तिक = इ. १६८३ आक्टो. नोवें. शाबदिखान पुण्यांत येऊन मुक्काम करतो. शि. च. प्र पृ. ३२

कार्तीक वद्य ७ = इ. १६८३ नोवें. १ संभाजीराजे इंदि (फोंडि)-यास गेले. गोवीकर फिरंगीयानी कोटास वेढा घातला होता त्यासी लढाई करून वेढा उठविला. तेथें येसजी कंक व त्याचा लेक कृष्णाजी कंक याणें युद्धाचीं शर्त केली शि. च. प्र. ३२; ले. १५१ व १५२ पहा.

मार्ग. = इ. १६८३ डिसें. २१ संभाजीनें फिरंगियाचे कुंभार-जुवें घेतले. साष्टी व बारदेश मारले. शि. च. प्र. पृ. ३२

मार्गशीर्ष शु. १२ = इ. १६८३ नोव्हेंबर २० = १०९४ जिल्हेज ११. मसऊदखान विजापुराहून निघून उदोनीस आला. विजा. इ. मो. कृत पृ. २६३

पौष शु. १५ = इ. १६८३ डिसें. २३ संभाजी राजे रायेगडास जातात व कविकलुशास कुल येखत्यार दिला. शि. च. प्र. पृ. ३३

पौष वद्य ४ = इ. १६८३ डिसें. २७ शाबदीखान देवघाटानें उतरून निजामपूर मारतो. शि. च. प्र. ३२

पौष वद्य ५ = इ. १६८३ डिसें. २८ शाहा आलम राम-घाटानें उतरून कुडाल व बांदे जाळतो. शि. च. प्र. पृ. ३१

माघ शुा १ इ. १६८४ जाने. ७ कविकलश अकबरास घेऊन भीमगडच्या झाडींत गेले. फिरंगियाशी सल्ला केला. शि. च. प्र. पृ. ३३

(श. १६०५) फाल्गुन शुद्ध १५ = इ. १६८४ फेब्रु. २० शाहा आलम घाटावर जातो व जातांना लष्कर फार मरतें. शि. च. प्र. पृ. ३२

श. १६०६ चैत्र व. १० = इ. १६८४ मार्च ३०–हि. १०९५ रबर २१ आदिलशहाकडे अलमगिरकडून एक आज्ञापत्र येतें. त्यातील सारांश, संभाजीशी अंतर्बाह्य परिचय न ठेवतां त्याचे निर्मूलन करण्याचा विचार चालवावा. वि. इ. मो. कृत पृ. २६६

रक्ताक्षी संवत्सर वैशाख = इ. १६८४ एप्रील मे. शाहाअलम विजापूराजवळील शेकस म्हणून गांव तेथें राहिला. शि. च. प्र. पृ. ३३

ज्येष्ठ शुद्ध १५ = इ. १६८४ मे १८ विजापूरकरानी मोगलासी बिघाड केला. शि. च. प्र. पृ. ३३

कार्तिक शु. २ = इ. १६८४ आक्टो. २९. मानाजी मोरे व गंगाधरपंत, वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ यांस संभाजीराजानी कैद केले. शि. च. प्र. पृ. ३३; उग्र सं. पृ. ३६

कार्तिक शु. ११ = इ. १६८४ नोव्हें. ७ कवजी रायगडास येतो शि. च. प्र. पृ. ३३

कार्तिक शु. १४ = इ. १६८४ नोव्हेंबर १० = हि. १०९५ जिल्काद १२ आकाखुसरव इहलोक सोडून परलोकी गेला. विजा. इ. मोडककृत पृ. २६३

पौष = १६८४–८५ डिसें. ज्यानेवारी. यकोजीराजे तंजावर येथें वारले. शि. च. प्र. पृ. ३३

पौष वद्य ४ = इ. १६८५ जाने. १४ शाबदीखान पुण्याहून दौड करून बोरघाटानें उतरून गांगोलीस आला. तेथें कविकलशानें जाऊन भांडण दिल्हे. फिरोन घाटावरी घातला. शि. च. प्र. पृ. ३३

माघ = इ. १६८५ जाने. फेब्रु. कुडालकर देसाई खेमसावंत पारखा जाला त्यास फिरंग्यानी आश्रय दिल्हा. शि. च. प्र. पृ. ३३

श. १६०७ क्रोधन संवत्सरे = इ. स. १६८५ राहिमखान बहुरखान रणमस्तखान येऊन विजापूरास वेढा घातला. शि. च. प्र. पृ. ३३

(श. १६०७) वैशाख=इ. १६८५ एप्रिल, मे. भागानगरकरानी विजापुरकरांस मदत तीन ह. स्वार व तीन लक्ष होन खर्चास दिल्हे. शाहा आजम व बहादुरखान ऐसे जाऊन भागानगर लुटिले. त्याच महिन्यात मांदणावरी हांला करून मारिले. त्याचा भाऊ अकंणा मारिला. क्रोड रुपये देऊन मोगलासी सला केला. शि. च. प्र. पृ. ३३

ज्येष्ठ = इ. १६८५ मे जून--अवरंगजेब अहमदानगरीहून कुच करून सोलापुरास आले. विजापुरावरी मोहीम केली. शि. च. प्र. पृ. ३३

आषाढ = इ. १६८५ जून, जुलै–संभाजी राजे याणी विजापूरचे मदतीस कबजीस पाठविले. ते जाऊन पनाळा राहून फौजा रवाना केल्या. शि. च. प्र. पृ. ३३

मार्गशीर्ष व. ९ = इ. १६८५ डिसेंबर १० = हि. १०९७ मोहरम २३ संभाजीकडून हंबीरराव सैन्यासह येऊन विजापुरीं पोहोचले. [वि. इ. मोडककृत पृ. २७०]

श. १६०८ चैत्र = इ. १६८६ मार्च, एप्रील–मिरज मोगलानीं घेतली. शि. च. प्र. पृ. ३४.

आषाढ = इ. १६८६ जून जुलै–अवरंगजेब सोळापुरीहून येऊन विजापुरासी लगट केली. शि. च. प्र. पृ. ३३

आषाढ शु. ३ = इ. १६८६ जून १४ = हि. १०९७ साबान २ औरंगजेब ससैन्य सोलापूरहून रसूलपुरास आला. विजा. इ. मो. कृत पृ. २७१

आश्वीन शु. ६ = इ. १६८६ सप्टेंबर १३ = हि. १०९७ जिल्काद ४ विजापूर किल्ला औरंगझेबाच्या स्वाधीन झाला. वि. इ. मो. कृ. पृ. २७३

आश्वीन शु. ७ सोमवार=इ. १६८६ सप्टं. १४ औरंगजेबानें विजापूर घेतलें. सुलतान सिकंदर भेट व नजरकैद; सरजाखान व बहलोलखानाचा लेक यास पंच हजारी दिल्ही. शि. च. प्र. पृ. ४८; ३३, ३४

आश्वीन शु. ७ = इ. १६८६ सप्टेंबर १४ = हि. १०९७ जिल्काद ५ औरंगजेबाचा विजापूरांत शहर पहाण्याकरतां प्रवेश. विजा. इ. मो. कृत पृष्ठ २७३

(श. १६०८) कार्तीक = इ. १६८६ आक्टोबर नोव्हेंबर. केसो त्रिमळ करनाटकात रवाना केले. शि. च. प्र. पृ. ३३

पौष = १६८६ डिसें. १६८७ जाने. औरंगजेब बुऱ्हाणपुरास आला. शि. च. प्र. पृ. ३३

माघ = स. १६८७ जानेवारी फेब्रुवारी–कुतुबशाहा बसबपटण अदी करून भागानगर अवरंगबास दिल्ही. कासिमखानाचे विद्यमाने तेच मासी अवरंगजब भागानगरास येऊन वेढा घातला. करनाटकात व देशात दुकाल पडिला. शि. च. प्र. पृ. ३४

फाल्गुण सुध १० = इ. १६८७ फेब्रुवारी ११ केसोपंत करनाटकात गेले. शि. च. प्र. पृ. ३४

फाल्गुन = सन १६८७ फेब्रुवारी मार्च. अकबर जाहजात बैसोन इराणात गेला. शि. च. प्र. पृ. ३४

शक १६०९ प्रभव संवछरे आषाढ शु. १० = इ. १६८७ जुलै १० बंगळोर म्हैसुरकरी मदत आणून कासीमखानास फौजनिसी घेतले. म्हणजे म्हैसूरकर चिक्कदेव वोडियार यानें हरजी राजे महाडीक वगैरेंचें सहाय्य घेऊन कासमखानास त्याच्या सैन्यासह बंगलोरमधून घालवून दिले. शि. च. प्र. पृ. ३४

भाद्रपद सुध १२ = इ. १६८७ सप्टेंबर ८ अवरंगजेबे भेद करून भागानर घेतले. कुतुबशाहा जिवंतच दस्त केला. शि. च. प्र. पृ. ३४, ४८

आश्वीन सुध १=इ. १६८७ सप्टेंबर २७ कासीमखाने किल्लेदारासी भेद करून पिलगोंडे घेतले शि. च. प्र. पृ. ३४

पौष = इ. १६८७=८८ डिसेंबर जानेवारी. अवरंगजेब विजापुरास येतो व शाबदीखानास गाजदीखानी दिल्ही.अदवनीवर पाठविले. तेथें जाऊन वेढा घातला. (सर्जाराव जेधे समेत भाऊ व लोक राजमाचीस राजश्री निळोपंत प्रधान याजवळ सेवेसी होते.) शि. च. प्र. पृ. ३४

फाल्गुण = इ. १६८८ फेब्रवारी–मार्च इसमाइलखान मका व याचपाखान नाईक व सादी महमद येऊन कंची सोडिविली. शि. च. प्र. पृष्ठ ३४

फाल्गुण=इ. १६८८ फेब्रुवारी मार्च, अजमशाहा याणी बेळगाव घेतले व इतरहि कितेक किल्ले घेतले शि. च. प्र. पृ. ३४

(श. १६०९) संवत् १७४४ इ. १६८७ नंदुरबार येथील जटाशंकराचें मंदीर शिवाजी व मुलगा संभाजी ह्याच नांवाच्या अधिकाऱ्यांनीं बांधविलें. मुं. यु. जर्नल व प्रा. प. कृ. गोडे.

शक १६१० विभव संवछरे चैत्र शु. १ = इ. १६८८ मार्च २२-हरजी महाडीक त्रिणामलीहून कंचीवर गेले शि. च.प्र.पृ. ३४

आश्वीन = इ. १६८८ सप्टेंबर-आक्टोबर विजापुरास महामारीचा रोग शि. च. प्र. पृ. ३४

कार्तीक = इ. १६८८ आक्टोबर नोव्हेंबर. कविकलश याजवरी सिरके पारखे जाले. कलश पळोन खिलणियांवर गेला. तेच मासी संभाजी राजे रायेगडाहून कलशाचे मदतीस आले. समागमे स्वारी सिरकियांसी युध्य करून त्यास पलऊन आपण खलणियास आले शि. च. प्र. पृ. ३४

मार्गशीर्ष = इ. १६८८ नोव्हेंबर डिसेंबर. संभाजी राजे याणी कलशाच्या बोले प्रल्हादपंत व सर कारकून व कितेक लोकास धरिले. तेच मासी औरंगजेब विजापुरीहून तुळापूरजजीक मीमातीर येथें आले. शि. च. प्र. पृ. ३४

माघ वद्य ७ शुक्रवासर=स. १६८९ फेब्रुवारी १ संभाजी राजे व कविकलश खेळणाहून रायेगडास जावयास संगमेश्वरास अले असता सेक निजाम कोल्हापुरीहून दौड करून येऊन उभयेतांस जीवतच धरून नेले वरकड लोक पळोन रायेगडास गेले. शि. च. प्र. पृ. ३४-३५, ४८

माघ व. ३० = इ. सन १६८९ फेब्रुवारी ९ अदबखानाहून राजारामास बाहेर काढिले. शि. च. प्र. पृ. ३४-३५

फालगुण शुध ३=सन १६८९ फेब्रुवारी १२-राजारामास रायेगडचा किलेदार चांगोजी काटकर व येसजी कंक यांणी मंचकी बैसविले. मानाजी मोरे व वरकड सरकारकून धरिले होते ते सोडिले, ज्याचें कार्यभाग त्यासी देऊन राजाराम राज्य करू लागले. येसजी व सिदोजी फर्जंद यास कडेलोट केले ! शि. च. प्र. पृ. ३४-३५

फाल्गुन शु. ५ = इ. १६८९ फेब्रुवारी १४ = हि. ११०० जवल ५ बहादुरगडच्या किल्ल्यांत इतरांस पकडून ठेविले. विजा. इ. मो. कृत पृ. १७६

(श.१६१०) फाल्गुण व. १३=सन १६८९ मार्च ९ हरजी महाडिक यांणी केसो त्रिमळ यांस संभाजी राजे याचे विपरीत वर्तमान यैकोन त्रिणामली धरिलें. शि. च. प्र. पृ. ३५

फाल्गुण व. ३० = इ. सन १६८९ मार्च ११ अवरंगजेब तुळापुरी संभाजी राजे व कविकलश यास जिवे मारून सिरच्छेद केले. शि. च. प्र. पृ. ३५; खं. १८ पृ. ४७; सं. बखर पृ. २६; खं. १५ ले. ३०१. कोरेगांव ऊर्फ फत्तेआबाद येथें ठार मारिलें. विजा. इ. मोडककृत पृ. २७६

—औरंग शाहे पातशाहे विजापूर भागानगर फत्तेकरून या प्रांतास येऊन पातशहा वढूकोरेगावी मुकाम केला. तेथून लष्कर पाठवून संभाजी राजे धरून आणिले आणि वढू कोरेगावांत (फताबाद) मारिला. त्याचा लेक शाहू व बाइका आपल्या आलमगिरी जाळींत ठेविली. शि. च. सा. ५ पृ. ६९; मआसीर इ.;

—कै. संभाजीराजे स्वामी यांचें वृंदावन दर जागा मौजे वढू ता। पाबल येथें करून शुश्रूषेसाठीं व व्यवस्थेसाठीं भिकाराम गोसावी, वासुदेवभट शामभट धर्माधिकारी ठेवून धूपदीप नैवेद्य, बाग तुळसी व अन्नछत्राबद्दल बागाईत जमीन बिघे ५, कोरडवाहू वहित जमीन बिघे १० आणि बाकीची पड जमीन बिघे १०५ मिळून १२० बिघे जमीन दिली. शा. रो. पृ. ३६; पे. द. ३० ले. १६

सूची

पुढील सूचींत संभाजी का. प. सा. संग्रहांत व संभाजी शकावलींत आलेल्या व्यक्तिस्थल-नामांची अकारादि वर्णानुक्रमानें नोंद केली आहे. नांवापुढें शककाळ दर्शित केला असून त्यापुढें लेखांक वा पृष्ठांक दिलेले आहेत. नांव पहातांना जुनी परिपाठी लक्ष्यांत घेऊन केशव-केसव-केशो; एसजी-येसजी, आमदानगर-अहमदनगर-नगर, इब्राहिम-इमराइम-पूर, कऱ्हाड-कराड, खेलणा-खिलणी, गदग-गदक, चांबली-चामिली, चेऊल-चौल, शहाबकस-शहाबक्ष; वेंकटाधरी-वें० ध्वरी इत्यादि शब्दोच्चारप्रकार लक्ष्यांत आणून नावें पाहावीं.

— * समाप्त * —

शुद्धिपत्र

पान	लेखांक	ओळ	आहे	पाहिजे
१	३	५	'येथें'	'येथें' नको
३	८	१,२	आश्वीन,सप्टें. २३	भाद्रपद,आगष्ट २४
२२	७९	५	आताहि देणें	आताहि जें बसे
२७	९१	९		देत असाल तसें देणें
			ठाणामासी	ठाणामासी = मजकुरासी
२८	९४	६	दाठविले	पाठविले
२९	९८	७	'भेट'	'भट' शब्द नको
३०	९९	१	खं. १५	खं. १८
३२	१०७	१२	श. १६०५	श. १६१०
३४	११०	१५	इ.१६८६, मासळा	इ. १६८९, मसाला
४१	१३३	१	श. १६८६-८७	श. १६०६-०७
५१	१५९	३	नारायण रघुनाथ	रघुनाथ नारायण
५५	१६८	१	१३०७	१६०७
५९	१८०	२	१३८५	१६८५
६१	१८४	६	जासनीस	जामनीस
६३	१८८	१	१६०८ चै.	१६०७ माघ शु. ७
७१	२१७	३	भोळे	भोसले
७४	२२६	५	पुरोहिताची	पुरोहितपण
७५	२२८	३	पळणारा	पकडणारा
८१	२४३	८	होऊन	होऊ न
८४	२५४	८	पेस्तद	पेस्तर
८६	२५९	३	देशये	देहाये
८७	२६३	५	तुवा	तु वा = व
			मा०	ता। = तर्फ
९०	२७४	३	जहीद असारी	जदीद असामी
१०३		३	शिवाजीनींच	संभाजीनें

५४ (अ) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
खंड ३ रु. ३
५५ शिवचरित्रसाहित्य खंड ८. १८८
५५ (अ) शिवचरित्रसाहित्य
खंड ५ वा. रु. ३८८
५६ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ४. २
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मयसाहित्य खं. १. १८८
५८ शिवकालीन दंडनीति. वा. सि. बेंद्रे ४
५९ पुणें नगरसंशोधन वृत्त खंड. २. १८८
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध
खंड १ ला १८८
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
खंड ५ वा. १८८
६२ शिवचरित्र साहित्य खंड ९ वा. १८८
६३ खरे, ग. ह, हिंगणे दप्तर, खंड १
पृ. १९२ रु. ३
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ६
पृ. १०१ रु. १॥
६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड ३
पृ. ७६ रु. २
६६ कर्वे, पुणे नगर संशोधनवृत्त खंड ३
पृ. ८५ रु, १॥
६७ डॉ. दीक्षित, महा. ताम्रपट शिलालेख
पृ. १३३ रु. ३
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ७
पृ. ९१ रु. २
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड २
पृ. ८९ रु. ३
७० खरे, हिंगणे दप्तर, खंड २ पृ. १२७ रु. ३
७१ अवळसकर, आंग्रेकालीन पत्रव्यवहार
पृ. ९२ रु. ३
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ४
पृ. ८९ रु. २॥
७३ चितळे, पेठे दप्तर, भाग १ पृ. ८८ रु. ३
७४ Explorations at Karad pp. Rs.
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली
श्री. शं. ना. जोशी पृ. १७५ रु. ३
७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इति साधनें
खंड ३ पृ. १३३ रु. ३
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य चौथा खंड

भारत इतिहास संशोधक-मंडळ-पुरस्कृत ग्रंथमाला

(१) मठगांवचा शिलालेख (रा. ब. बांवर्डेकर पृ. २४३.) रु. २
(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (स. म. दिवेकर. पृ ५०) रु. ८१०
(३) श्री शिवभारत (मुळ व मराठी भाषांतर-पृ. ५८८) रु. ६
(४) शिवचरित्र (पृ. ३२५-कागदी व कापडी) रु. ३॥ व ४
(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. (कृ. वि. वझे पृ. २००) रु. ३
(५) शिवकालीन जंत्री शके १५५१-१६५० (ग. स. खरे पृ. २००) रु. ५
(६) शिवकालीन जंत्री शके १५५१-१६५० (ग. स. खरे पृ. २००) रु. ५
(७) साधन-चिकित्सा (वा. सि. बेन्द्रे पृ. ३२०) रु. ४
(८) ऐतिहासिक पोवाडे (य. न. केळकर) पृ. ६१५) रु. ३
(९) वाठारकर निंबाळकर-इतिहास (पृ. ३००) रु. १॥
(१०) भूतेश-आख्यान (पृ. ७५) ८१२
(११) कऱ्हाड, (य. रा. गुप्ते-पृ. ५४) ८८
(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (वि. का. राजवाडे-पृ. ६००) रु. ३

(१३) राजवाडे यांचे संकीर्ण निबंध (शं. ना. जोशी पृ.) २९१ रु. ३
(१४) राजवाडे संकीर्ण निबंध भाग ३ रा. श्री. शं. ना. जोशी (पृ. २८०) २
(१५) (१६) प्रकाशित व्हावयाचे आहेत.
(१७) पुरंदरे-दप्तर, भाग २ रा. उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार रु. ३
(१८) The Escape of shivaji from Agra (रावबा. देशपांडे) रु. ३
(१९) लोककथा, पुस्तक १ लें (शं. ग. दाते कापडी, कागदी) रु. १॥
(२०) पानसे घराण्याचा इतिहास (रा. ब. पानसे) रु. ३
(२१) कै. वासुदेवशास्त्री खरे-चरित्र (दा. मो. भट) रु. २॥
(२२) लोककथा भाग २ रा. (शं. ग. दाते-पृ. ८०) रु. १८८
(२३) संपूर्ण भूषण (रा. गो. काटे-पृ. २३०) १८८
(२४) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा. (शं. ना. जोशी व ग. ह. खरे पृ. २८१) रु. ३
(२५) राजधानी रायगड (वि. वा. जोशी-पृ. १६४) रु. १
(२६) shivajj (C. V. Vaidya-PP. 410) Rs. 3
(२७) आळंदी (ग. ह. खरे-पृ. २०) ८२
(२८) मठगांवचा शिलालेख: कुडालप्रांतेतिहास (वालावलकर पृ. १६५) रु. १८२
(२९) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (कृ. वा. पुरंदरे पृ. २५०) रु. ३
(३०) मध्वमुनीश्वराची कविता (प्र. व्यं. गुब्बी-पृ. २५८) ३
(३१) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (वि. गो. दिवे-पृ ९०) रु. १
(३२) वेदस्तुति आणि स्फुट कविता (कृष्णदयार्णवकृत)—किं ८१२
(३३) ज्ञानप्रदीप (द. वा. पोतदार-पृ १२५) रु. १
(३४) पेशवाईच्या सावलींत (ना. गो. चापेकर-पृ. ४००) किं. रु. ४
(३५) मूर्तिविज्ञान (ग. ह. खरे पृ. १५०, ९४ चित्रें;) रु. ३८८
(३६) आठल्ये घराण्याचा इतिहास-(वि. वा. आठल्ये पृ. ४४०) ३॥
(३७) किल्ले पुरंदर-(कृ. वा. पुरंदरे पृ.
(३८) किल्ले विशाळगड (पं. बा. शिरवळ
(३९) श्रीशिवकाव्य (प्रकाशक-ह. वा. भ
(४०) गुण्ये घराण्याचा इतिहास (वि. व्यं
(४१) वैद्य दप्तर खंड १ (शं. ला. वैद्य)

(४२) वैद्य दप्तरांतून निवडलेले कागद पुरवणी खंड १-२ किं. रु. ३
(४३) खेड (गुप्ते, य. रा., पृ. २२) रु. ॥
(४४) हरिहरेश्वर वर्णन (मो. वि. परांजपे-पृ. ५६) रु. १
(४५) वैद्य दप्तरांतील कागद. खं. २ (शं. ल. वैद्य-पृ. १ ८,) रु. ३
(४६) वैद्य द. कागद खंड ३ रा. (शं. ल. वैद्य-पृ. ८२) रु. ३
(४७) चिमाजीआप्पा (कृ. वा. पुरंदरे-पृ. १४८) रु. २
(४८) पौंक्षे कुल वृत्तांत (भा. सि. पौंक्षे) रु.